मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४२४/अम/२०१०

१)श्री निलेश कचरुलाल भुतडा,
विदर्भ हाऊसिंग सोसायटी, बुलढाणा,
ता.जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जि. बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११ मार्च, २०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी यांचे तर्फे वरिष्ठ सहाय्यक श्री डी.व्ही.आढाव हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांचेकडे, कंत्राटी ग्रामसेवक भरती सन २००८, जिल्हा परिषद बुलढाणा मधील माहिती एकुण सहा मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २५.११.२००८ ते १.१२.२००८ असा दिलेला आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा निर्णय**
**झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दिनांक ४.१२.२००८ रोजी जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात माहितीचा अर्ज दिला होता व त्यांना अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे उपस्थित असलेल्या प्रतिनिधीने सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे दिनांक ६.१२.२००८ रोजी हस्तांतर केला व जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचकडून दिनांक १५.१२.२००८ रोजी तो पुन्हा हस्तांतर करण्यात आला आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी ज्या कार्यालयात माहिती होती त्या कार्यालयात माहिती न मागता ती जिल्हाधिकारी कार्यालयात मागितलेली दिसून येते. व त्यामुळे अर्जाचा प्रवास दिनांक १.१२.२००८ ते १५.१२.२००८ पर्यंत हस्तांतरणासाठी झालेला आहे. व त्यामुळे अर्जाची मुदत ही दिनांक १५.१२.२००८ पासून परिगणना करणे आवश्यक**

**( पान २ वर..)**

**राहील. ही बाब अपीलकर्ता यांनी लक्षात घेवून दिनांक १३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल करण्याचा विचार करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी मुदतीच्या पुर्वीच अपील दाखल केलेले दिसून येते.**

**असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे मात्र स्पष्ट होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय सुध्दा देणे आवश्यक होते. परंतु सुनावणीची नोटीस दिनांक २३.३.२००९ रोजी काढण्यात आली होती व ती मुदतीच्या नंतरच काढण्यात आली आहे. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी दोषी आढळून येतात. यावरुन सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही हे सिध्द होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलाच्या सुनावणीच्या मुदतीनंतरच नोटीस काढलेली होती. अपीलकर्ता गैरहजर असेल तर माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना, जन माहिती अधिकारी यांना विचारणा करता आली असती. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रशासकिय अज्ञान व कायदयाचे अज्ञान दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता गैरहजर म्हणून सुनावणी होऊ शकली नाही असा निरर्थक खुलासा दाखल केला जातो. व त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक १५.१२.२००८ पासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलबध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी दोषी आढळून येत असल्यामुळे व तशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त)ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांची बदली झाली असल्यास त्यांना हा निर्णय कळविण्याची जबाबदारी विद्यमान जन माहिती अधिकारी यांची राहील व तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी यांना सुध्दा रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार फक्त)ची शास्ती लावण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता यांना, मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने देण्यात यावी.**

**३) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केले आहे. त्याकरीता त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करण्यात यावी.**

**४) निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४२९/अम/२०१०

अपील क्रं. १४३०/अम/२०१०

<u>अपील क्रं. १४२९/अम/२०१०</u>

१)श्री रमेश शंकर मंडळकर,
वार्ड नं. १ मोताळा, ता.मोताळा, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
बुलढाणा. ता.जि. बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
सहाय्यक प्रादेशिक परिवहन कार्यालय बुलढाणा.
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

<u>अपील क्रं. १४३०/अम/२०१०</u>

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जि. बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (साप्रवि),
जिल्हा परिषद बुलढाणा, ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे.**

**२. अपील क्रमांक १४२९/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा यांचेकडे, खाजगी परवाना वाहनांना टॅक्सी परमीट भाडोत्री वाहने दाखवून शासनाचा प्रवाशी कर (महसुल) बुडविण्यास कारणीभूत असलेल्या विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग प्रमुखांवर शासनाच्या फसवणुकीबाबत फसवणुकीची कारवाई होणे बाबत मी केलेल्या लेखी तक्रार अर्जावर काय चौकशी झ ाली त्या संपूर्ण कागदपत्रांची नक्कल प्रत मिळणेबाबत व दोषींवर काय कारवाई करण्यात आली त्या कागदपत्रांच्या प्रती मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २०.५.२००८ ते ३१.९.२००८ पर्यंत दिलेला दिसून येतो. माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.**

**३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.९.०८ रोजी, आपल्या अर्जात नमूद केलेल्या वाहनाबाबत संबंधीत विभागाकडून माहिती मागविण्यात येत आहे. त्यांच्याकडून माहिती**

**( पान २ वर..)**

प्राप्त होताच संबंधित मोटार वाहन मालकांवर मोटार वाहन नियमा नुसार कारवाई करण्यात येईल व केलेल्या कारवाईची माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.११.२००८ रोजी देण्यात आला असून

झालेल्या चौकशी बाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, दिनांक १८.९.२००८ रोजी पाठविलेले पत्र त्यांना मिळालेले नाही. तसेच दिनांक २९.११.२००८ रोजी पाठविलेले पत्र सुध्दा त्यांना मिळाले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १८.९.२००८ रोजी जे पत्र पाठविले त्याची जावक नोंदवहीत नोंद आहे. तसेच दिनांक २९.११.२००९ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या पत्राची सुध्दा जावक नोंदवहीत नोंद आहे. व दोनही पत्रांची सुध्दा जावक नोंदवहीत नोंद आहे. व दोनही पत्रे माहितीच्या संबंधात आहे. अपीलकर्ता यांना इतर पत्रे मिळतात, परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेले पत्र मिळत नाही हे म्हणणे बरोबर दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले की, त्यांना काही पत्र व्यवहार व राज्य माहिती आयोगाची नोटीस मिळाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व आयोगापुढे पुरावा सादर केलेला असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. कारण माहिती ही केलेल्या तक्रारीवर चौकशी करुन उपलब्ध करुन द्यावी अशी अपीलकर्ता यांची अपेक्षा आहे. जी माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. तरी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व ती मिळाली नसल्यास पुन्हा रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी यापुढे अर्जाचे योग्य वाचन करुन पुढील योग्य तो पत्रव्यवहार किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याची खबरदारी घ्यावी. अपीलकर्ता यांनी सुध्दा केलेल्या तक्रारीची निश्चित तारीख याची माहिती द्यावी, म्हणजे ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होणार नाही. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १४३०/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"मा.मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचे स्तरावरुन नियोजित जागेवर शेत रस्त्याचे काम न करता शासनाची प्रशासनाची दिशाभूल करुन फसवणुक करणा-या दोषींवर फसवणुकीचे गुन्हे दाखल होणे बाबत मी केलेल्या तक्रार अर्जावर मु.का.अ. यांचे स्तरावरुन केलेल्या चौकशी व कारवाई बाबतच्या अहवालाची नक्कल प्रत मिळणे बाबत. २० टक्के आराखडयातून मौजे तरोडा येथील शेत रस्ता न केलेल्या गैर कामाबाबतचे प्रकरण. शासन कामकाजातील सत्यता व पारदर्शकता पडताळणी करुन शासन निदर्शनास आणणेबाबत. दिनांक २८.३.२००८ पासून आज दिनांक पर्यंत वर नमूद अहवालाची नक्कल प्रत सत्यप्रत प्रमाणित करुन मिळणे बाबत" अशी माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जदार दारिद्रय

( पान ३ वर..)

रेषेखालील आहे असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध न झाल्यामुळे दिनांक २४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे व प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी माहिती कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे मागितली होती. परंतु त्यांनी माहितीच्या अर्जामध्ये तक्रारीची तारीख दिलेली नाही व तक्रार कोणाकडे केली याबाबत नमूद केले नाही व त्यामुळे सदरचा अर्ज हा संबंधीत अधिका-यांकडे हस्तांतर केला व त्यामुळे विलंब झालेला दिसून येतो. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्ज प्राप्त झ ाल्यानंतर उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मलकापूर यांना मागितलेल्या माहितीचा कार्यवाही अहवाल मागण्यात आला. त्याप्रमाणे दिनांक २२.१२.२००८ अन्वये, विषयांकित माहिती उपविभागात उपलब्ध नसल्याचे या कार्यालयास कळविण्यात आले. प्रथम अपील सुध्दा अपीलकर्ता यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांचेकडे दाखल केले होते व ते दिनांक ३.१२.२००८ रोजी कक्ष अधिकारी यांचेकडून प्राप्त झाले. दिनांक २९.१२.२००८ रोजी अपीलाच्या सुनावणीस उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग यांचेकडून माहिती घेण्यात आली. श्री सी.एम. किनगे, शाखा अभियंता यांना पत्र दिनांक २२.६.२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. परंतु स्पष्टीकरण प्राप्त झाले नाही. सुनावणीच्या दिवशी अपीलकर्ता अनुपस्थित होते. त्यानंतर श्री सी.एम.किनगे यांना पुन्हा स्मरणपत्र देण्यात आले. मुळात सदर प्रकरण उपअभियंता, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, बुलढाणा यांचेशी संबंधीत असल्यामुळे दिनांक ११.४.२०१० रोजी समक्ष चर्चा केली असता विषयांकित प्रकरणाची चौकशी त्यांचे कार्यालयाकडे प्रगतीत असल्याबाबत सांगितले. व त्यानुसार दिनांक १२.४.२०१० रोजी कार्यालयास कळविले.

अपीलकर्ता यांना वेळोवेळी त्यांच्या अर्जाच्या प्रवासाबाबत कळविण्यात आलेले होते. यावरुन अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये तक्रार कोणाकडे केली व तक्रारीची तारीख दिलेली नसल्यामुळे तक्रारीच्या विषयानुसार नस्तीचे हस्तांतरण झालेले दिसून येते. माहिती ज्या शाखेशी संबंधीत असेल त्यांचेकडेच मागितल्यास ती ३० दिवसांत उपलब्ध होऊ शकते. परंतु मोघम स्वरुपात तक्रार केलेली असेल व ती संबंधीत अधिका-यांकडे केलेली नसेल तर ती माहिती ३० दिवसांत उपलब्ध होईलच असे नाही. त्यातही जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संपूर्ण नस्तीच्या संदर्भात आयोगाची नोटीस निर्गमित केल्यानंतर पुढील कार्यवाही केलेली दिसून येते. असे असेल तर अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती १० दिवसांचे आंत विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४२९/अम/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेली

( पान ४ वर..)

**माहिती/चौकशी अहवाल विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.**

**२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४३०/अम/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवयांचे आंत मागितलेल्या माहितीच्या तक्रारीच्या चौकशी संबंधातील अहवाल विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.**

**३) अपीलकर्ता यांनी दोनही अपीलात मागितलेल्या माहितीचे निश्चित वर्णन केलेले नसल्यामुळे त्यांची शास्तीची विनंती मान्य करता येत नाही.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४२८/अम/२०१०

१)श्री तुळशिराम सुर्यभान राऊत,
नांद्राकोळी, ता.जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, बुलढाणा
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, बुलढाणा
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, बुलढाणा यांचेकडे, दिनांक १५.५.२००३ रोजीचे अर्जावर झालेली कार्यवाही तसेच दिनांक ५.६.२००३ रोजीचे अर्जावरील कार्यवाहीची माहिती टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.११.२००८ रोजी अर्जदार यांनी दिनांक १५.५.२००३ व दिनांक ५.६.२००३ चे कशाचे प्रकरण होते याचा स्पष्ट उल्लेख केलेला नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते व त्याची एक प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.२.२००९ रोजी देण्यात आला असून, अपीलार्थी यांनी नमुद केलेल्या मुद्यांवरील माहिती संबंधीत लिपिक यांचेकडून प्राप्त करुन घेवून आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आंत अपीलार्थीस देणे. त्यानंतर दिनांक १६.२.२००९ रोजी, आपला दिनांक १५.५.२००३ चा अर्ज पोलीस स्टेशन, बुलढाणा यांना दिलेला असल्यामुळे ती माहिती या कार्यालयाकडून देता येत नाही. आपल्या दिनांक ५.६.२००३ च्या अर्जावरुन असे दिसून येते की, गट क्रमांक ३२२ मधील चार बाभळीची झाडे तोडण्याबाबत अनुमती मागितली होती. सदर खोडाची ७/१२ तात्काळ सादर करावी म्हणजे त्यानुसार आपणास परवानगी देण्याची कार्यवाही करता येईल.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक १५.५.२००३ चा अर्ज पोलीस स्टेशन यांचेकडे असल्यामुळे त्याबाबत कोणतीही माहिती देता आली नाही. परंतु दिनांक ५.६.२००३ च्या अर्जाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व तशा प्रकारे कळविण्यात आले आहे. त्याबाबत कार्यवाही करावयाची असल्यास त्यांनी पूर्तता**

**( पान २ वर..)**



**करणे आवश्यक आहे असे आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांना, कार्यवाही झालेली नाही ही माहिति उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे योग्य ती पुर्तता केल्यास त्यांच्या अर्जाप्रमाणे कार्यवाही करता येईल. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४२७/अम/२००९

१)श्री श्रीकांत त्र्यंबकरास ताले (ॲड.)
सावजी ले-आऊट, खामगांव, ता.खामगांव, जि.बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
बाळापूर, ता. बाळापूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, पातूर,
ता. पातूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय पातूर यांचेकडे आर.सी.नं. एल.एन.अे.१२/सस्ती/४ ८८-८९ या प्रकरणातील माहिती- (१) वरील प्रकरणातील संपूर्ण प्लॉटचा नकाशा (२) वरील प्रकरणात दिलेला आदेश (३) कोणत्या तरतुदीनुसार प्लॉट देण्यात आले व पाडण्यात आले (४) प्लॉटचा लिलाव करतानाच्या अटी व नियम (५) प्लॉटची त्या व्यक्त्ीला विक्री करण्यासंबंधीत असलेले अटी व नियम (६) या प्रकरणातून जे प्लॅाट विकण्यात आले ते कोणाला देण्यात आले, त्यांची प्रत्येकांची नांवे, प्रत्येकाचा प्लॅाट क्रमांक, प्रत्येकाला किती किमतीमध्ये देण्यात आला, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्या दिनांक १८.१०.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक ४ ची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. तसेच श्री दिलीप नामदेव काशील यांचे संदर्भातील फार्म G माहिती दिलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी फार्म G माहिती मागितली नाही किंवा कोणत्याही नियमाची माहिती मागितली नव्हती. व ही सर्व माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे. जी माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे ती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्यापेक्षा वेगळी माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संबंधीत प्रकरणातील नस्तीचे निरीक्षण करणे संयुक्तिक राहील व त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन**

**( पान २ वर..)**

**घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित होऊन संबंधीत नस्तीचे निरीक्षण करावे. निरीक्षणा अंती ज्या कागदपत्रांची माहिती आवश्यक असतील त्यांच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन घ्याव्या व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता यांनी लेखी कळविल्यानंतर व उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संबंधीत नस्ती निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावी व त्यातून त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्य पुरविण्यात याव्या व पोच घ्यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४३७/अम/२००९

१)श्री श्री राजेंद्र भाष्कर शेळके,
मु.पो.पेठ, ता.चिखली, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा.
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी यांचे तर्फे उपशिक्षणाधिकारी श्री सी.आर. राठोड हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग), जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे, (१) दि. २२.१०.२००८ रोजी निर्गमित पदवीधर प्राथमिक शिक्षक पदस्थापना दिलेल्या शिक्षकांच्या नियुक्ती आदेशाच्या छायांकित सत्यप्रती मिळणे बाबत. (२) दि. २२.१०.२००८ रोजी निर्गमित पदवीधर प्राथमिक शिक्षक पदस्थापनेसाठी विचारात घेतलेल्या सेवाजेष्ठता यादीची प्रत मिळणे बाबत. (३) दि. २२.१०.२००८ रोजी निर्गमित पदवीधर प्राथमिक शिक्षक पदस्थापनेसाठी विचारात घेतलेली सेवाजेष्ठता यादी प्रकाशित करुन आक्षेप मागविले असल्यास प.स. निहाय पुर्तता केल्याची यादी व त्याची माहिती मिळणे बाबत. (४) ज्या सेवाजेष्ठता यादीनुसार दि. २२.१०.२००८ रोजी पदवीधर प्राथमिक शिक्षक पदस्थापना देण्यात आली त्या शिक्षकांच्या सेवाजेष्ठता क्रमांक नमुद करुन पदस्थापना दिलेल्या शिक्षकांची यादी मिळणे बाबत (५) परावर्तीत पदवीधर प्राथमिक शिक्षक पदस्थापना देतांना डावलल्या गेलेल्या सेवाजेष्ठ शिक्षकांची यादी मिळणे बाबत (६) सेवाजेष्ठ शिक्षकांना पदवीधर पदस्थापना देतांना वगळण्यासंबंधी शासनाने दिलेल्या निर्देशाची प्रत अथवा शासन निर्णय किंवा परिपत्रकाची प्रत मिळणे बाबत, अशी माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.**

**३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली**

**( पान २ वर..)**

**नाही. जन माहिती अधिकारी हे आज उपस्थित नाही. उपस्थित असलेल्या प्रतिनिधी यांनी सांगितले की, कोणतीही माहिती आतापर्यंत दिलेली नाही. प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही. परंतु माहिती आता आणलेली आहे व ती देण्यास तयार आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन दिली होती परंतु ती अपूर्ण आहे असे आयोगास सांगितले. अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय कागदपत्रांच्या स्वरुपात छायांकित प्रती उपलब्ध असल्यास विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५,०००/-ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. खुलासा न केल्यास शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.**

**३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे व शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४३२/अम/२००९

१)श्री रामदास ओंकर भगत,
वार्ड नं.३, राखोंडे प्लॅाट, आठवडी बाजाराजवळ(सिंधी धर्म शाळेजवळ),
नांदूरा. ता.नांदूरा, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, नांदूरा
ता. नांदूरा, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, नांदूरा
ता. नांदूरा, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, तथा नायब तहसिलदार नांदूरा यांचेकडे, (१) हिंगणे (मोठे) व निमगांव या गावांची लोकसंख्या किती (२) या गावातील ६.५.२००६ रोजी अतिवृष्टीने नुकसान झालेल्या २४ व १०८ दुकानदारांना आर्थिक मदत देण्यात आली त्या सरकारी रेकॅार्डला लावलेल्या दुकानदारांच्या प्रत्येक कुटूंबांची रेशन कार्डाची नक्कल व सर्वांकडून भरुन घेतलेल्या सर्व फार्मची नक्कल. क रजिस्टरवर सहया केल्या त्याची नक्क्ल व कोणत्याही प्रकारची नोटीस वगैरे देण्यात आली असल्यास त्या सर्वांच्या नोटीसची नक्कल (३) दोन्ही गांवामध्ये किती दुकाने आहेत (४) दोन्ही गावांच्या ग्रामपंचायतमध्ये किती दुकानदारांच्या नोंदी ओत त्यांची नांवानीशी यादी, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.**

**३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३.७.२००८ रोजी अतिरिक्त खर्चाचे रुपये ८२/- चा भरणा**

**( पान २ वर..)**

**करण्यासाठी कळथ्वलेले होते व त्याच दिवशी माहितीच्या संदर्भात सूध्दा पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १९.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २०.८.२००८ रोजी निर्णय दिला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती तहसिल कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे पुरविता येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४३५/अम/२००९

१)श्री शे. मेहबुब शे. लाल
इकबाल चौक, शेगांव, ता. शेगांव, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
जिल्हा उपनिबंधक कार्यालय, बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शेगांव, ता. शेगांव, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.११.२००८ रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचेकडे, दि केशव अर्बन क्रे.को-ऑप सोसायटी, शेगांव कडून कर्ज घेतेवेळी कोणकोणते कागदपत्रे आपल्या पतसंस्थेत जमा केले होते त्या कागदपत्रांच्या झेरॅाक्स प्रती. तसेच मला कर्ज मिळाल्यानंतर मी आपल्या पतसंस्थेत आजपर्यंत किती रक्कमेची परतफेड केली आहे त्याबाबत पतसंस्थेचा खातेनिहाय व सदर कर्जावरील व्याजाबाबत सविस्तर व लेखी स्वरुपात माहिती पुरविण्यात यावी, अशा स्वरुपाची माहिती रजिस्टर टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.**

**३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.११.२००८ रोजी नमूद केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता येणार नाही. तसेच संबंधीत संस्थेचे व्यवस्थापक हे या माहितीबाबत माहिती अधिकारी असल्यामुळे सदरची माहिती घेण्याकरीता आपण कृपया संस्थेशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.४.२००९ रोजी देण्यात आला असून, अपीलार्थी संस्थेचे सदस्य असल्यास त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरीता संबंधीत संस्थेकडे रितसर अर्ज दाखल करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००८ रोजी व दिनांक ३०.५.२००८ रोजी संस्थेकडून ही माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. तसेच पुन्हा दिनांक १३.४.२००९ रोजी सुध्दा त्यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेतली आहे. व प्रथम**

**(पान २ वर..)**

**अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. असे असून सुध्दा तीच माहिती अपीलकर्ता वारंवार मागत आहे. अपीलकर्ता यांनी कर्ज घेतलेले आहे व कर्ज घेताना त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहे व तीच माहिती पुन्हा पुन्हा ते संस्थेकडून किंवा माहितीच्या अधिकारातून किंवा सहाय्यक निबंधक यांचेकडून मागणी करीत आहे. त्यांचा उद्येश हा खर्चाची रक्कम न भरता टाळाटाळ करणे असा दिसून येत असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४३१/अम/२००९

१)श्री सचिन गुलाबराव देशमुख,
ब्राम्हण गल्ली, लोणार, ता. लोणार, जि. बुलढाणा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, लोणार,
ता. लोणार, जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, लोणार,
ता. लोणार, जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहे. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, निवासी नायब तहसिलदार यांचेकडे, (१) श्री जी.आर. देशमुख, क.लि. दिनांक ३१.३.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचे प्रकरण आपल्या स्तरावरुन केव्हा सादर केले. जावक क्रं. व दिनांकासह (२) विभागीय स्तरावरुन प्रकरण केव्हा परत आहे आवक क्रं व दिनांकासह कोणकोणत्या त्रुटी काढल्या (३) त्या त्रुटींचा पाठपुरावा कोणता केला, प्रकरण प्रलंबित का? हे प्रकरण प्रलंबित ठेवणारे कर्मचारी व अधिका-यांची नांवे (४) प्रकरण प्रलंबित असल्यामुळे सदर रक्कम व्याजासह देण्याची तरतूद आहे, अशा स्वरुपाची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २०.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा तपशिलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, सदरचे प्रकरण प्रलंबित होते. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नव्हती म्हणून माहितीच्या अधिकारात माहिती मागितली. परंतु, ती माहिती सुध्दा त्यांनी मुद्येनिहाय दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांच्या वडीलाचे भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदानाची रक्कम काही त्रुटीमुळे महालेखापाल नागपूर यांचेकडून मंजूर केलेली नाही. सदर प्रकरणात जेव्हा अर्जदारानी अर्ज केला तेव्हा नवनियुक्त कनिष्ठ**

**( पान २ वर..)**

**लिपिक नियुक्त झाले होते. त्यांना सदर दप्तर माहिती नसल्यामुळे वारंवार विचारुन कामे करावी लागत. त्यामुळे वरिष्ठांच्या मार्गदर्शनावरुन दिनांक १९.९.२००८ रोजीचे पत्र संबंधीतांना दिले. त्यानंतर सदर लिपिक यांनी महालेखापाल नागपूर यांचेकडे दूरध्वनीवरुन विचारणा करुन सदर प्रकरण त्रुटीत असण्याबाबतच्या कारणांची विचारणा केली व नंतर सदर त्रुटीची पुर्तता सुरु केली. सदर पत्रव्यवहार चालु असताना अर्जदाराने पुन्हा अपील अर्ज सादर केला. त्यानंतर सदर भनिनि प्रकरण निकालात निघुन त्यांची संपूर्ण रक्कम सदर कर्मचा-याला प्रदान करण्यांत आली. या पूर्ण प्रकरणाचे मुळ याद्वारे निकाली निघालेले आहे व अर्जदारांच्या वडीलांना ती रक्कम मिळालेली आहे. म्हणून आता सदर अपील अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती आयोगाकडे केलेली आहे.**

**४. अपीलकर्ता यांना दिनांक १९.९.२००८ चे जे पत्र दिलेले आहे ते पत्र तहसिलदार यांचे सहिने दिलेले दिसून येते व खुलाशामध्ये कनिष्ठ लिपिक यांनी सांगितल्याप्रमाणे दिले असे नमुद आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या पत्रातील मजकूर वाचलेला दिसून येत नाही व आकलन झालेले नाही असे दिसून येते. त्यामुळे दिशाभूल करणारे उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळे त्यांची किंवा संबंधीत लिपिकाची चौकशी होणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्यामुळे संबंधीत तहसिलदार किंवा कनिष्ठ लिपिक यांना समज देण्यात येत आहे.खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४२५/अम/२००९

१)श्री रमेश यादवराव माळवे,
यशवंत नगर, मु.पो.ता.मलकापूर, जिल्हा बुलढाणा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा. ता.जि.बुलढाणा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे, श्रमसाफल्या मजूर का.सह.संस्था म. तरोडा, ता. मोताळा या मजूर संस्थेने केलेल्या कामाची यादी मिळण्याबाबत एकुण चार मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे व व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.१.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे दिनांक १६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.२.२००९ रोजी दिला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये बिलातून कपात केलेल्या रॉयल्टीच्या रकमेच्या पावत्या व चाचणी अहवाल दिलेला नाही, असे नमूद केले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहिती मागितली त्यावेळेस रोडमध्ये रॅायल्टी नव्हती व त्यामुळे त्याबाबतची माहिती, रक्कमेच्या पावत्या देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच चाचणी अहवालाच्या संदर्भात दिनांक ९.१.२००९ च्या उत्तरात कामाचा चाचणी अहवाल संबंधीत संस्थेने देयकासोबत जोडलेला नसल्यामुळे त्यांचे देयकाचे भाग दर (पार्ट रेट)ने**

**( पान २ वर..)**

**अदायगी करण्यात आलेली आहे, असे कळविलेले असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४३६/अम/२००९

१)श्री अर्जुन हंसाजी कळंबे,
खामगांव, वार्ड क्रं.३(हरिफैल) बुध्द पुतळयाजवळ, खामगांव,
ता. खामगांव, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे, शिक्षण खाते जि.प. बुलढाणा येथील माजी रोखपाल ए.एच.कळंबे यांचे प्रकरणा संबंधी रेकार्ड चेक रजिस्टर ७०-७१ रोकड वही (कॅश बुक) हे मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग २ ) यांचेकडे दिनांक ३.४.७९ ला पाठविले हे अद्याप त्यांचेकडे पडून आहे. मध्यंतरी कार्यालय शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी दिनांक ७.७.२००१ ला मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बुलढाणा यांचेकडे विनंती करुन चेक बुक रजिस्टर ७०-७१ रोख पुस्तिका ७०-७१ हे १९७१-७२ शिक्षक दिन व समाज शिक्षक दिन उपलब्ध करुन देणे म्हणजे मा. शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरीत करावे त्यावरुन मला मा. शिक्षण संचालक पुणे यांचेकडे शिक्षण विभागातून जो शिक्षक निधी पाठविला त्या बाबतीत आवश्यक नोंदी पडताळणीसाठी चेक रजिस्टर नोंदी १८.१२.७० ते ३०.४.७१ व रोकड पुस्तिका मधील नोंदी १६.१२.७० ते ३०.४.७१ यांच्या झेरॉक्स प्रती मिळण्याबाबत विनंती, अशी माहिती मागितलेली दिसून येते.**

**३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ते स्वतः रोखपाल या पदावर शिक्षण विभाग (प्राथमिक) येथे कार्यरत असताना शिक्षक दिन निधी व समाज शिक्षक दिन निधीचा भरणा केल्याबाबतची माहिती संबंधीतास तात्काळ उपलब्ध करुन देवून त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी व सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. व पुन्हा माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले**

**( पान २ वर ..)**

**दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ती संपूर्ण कागदपत्रे अतिशय जीर्ण झ ालेली असल्यामुळे त्याच्या कोणत्याही प्रकारे छायांकित प्रती काढता येत नसल्यामुळे ती उपलब्ध आहे असे कळविलेले असेले तरी माहिती देता येत नाही असे पुन्हा कळविण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, आयोगाकडे सदरचे अभिलेखे आणून दाखविण्यात आले होते व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्याबाबतची माहिती निरीक्षणाच्या माध्यमातून सुध्दा देता आली नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पुन्हा त्यांनी निरीक्षण करावयाचे आहे. त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संबंधीत नस्तीचे निरीक्षण करण्याकरीता जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवावे. व त्या तारखेस व वेळेस उपस्थित झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी सदरचे अभिलेखे निरीक्षणास उपलब्ध करुन द्यावे व त्यातील आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढता येत असल्यास उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४३३/अम/२००९

१)श्री गजानन वामनराव बरगे, क.लिपिक,
तहसिल कार्यालय, नांदूरा, ता.नांदूरा, जि. बुलढाणा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
खामगांव, ता. खामगांव, जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी ,
उपविभागीय कार्यालय, ता.खामगांव, जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा पुरवठा कार्यालय अकोला यांचेकडे, श्री एस.व्ही. विंचणकर, तत्कालीन उपविभागीय अधिकारी, खामगांव येथे असतांना त्यांचेकडून खाली नमूद केल्याप्रमाणे एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००५ ते ३१.५.२००८ असा दिलेला आहे. माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक ५.२.२००८ रोजी माहिती उपलब्ध झालेली असली तरी दिनांक ९.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.२.२००९ रोजी दिला असून, अर्ज शासकिय माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, खामगांव यांचेकडे वर्ग झालेला असल्यामुळे अपील खारीज केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ७.३.२००९ रोजी अपील अंशतः मान्य करण्यात आलेले असून मुद्या क्रमांक ६ ची अपूर्ण असलेली माहिती व मुद्या क्रमांक ७ व ८ ची माहिती संबंधीत शाखेकडून उपलब्ध करुन घ्यावी. माहिती ७ दिवसांचे आंत विनाशुल्क द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांना माहितीचा अर्ज कोणत्या तारखेस केला असे विचारले असता तारीख माहिती नाही असे त्यांनी सांगितले. व माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध झाली नाही एवढेच आयोगापुढे त्यांनी सांगितले. त्यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी लेखी युक्तीवाद सुध्दा दाखल केला आहे. व त्या लेखी युक्तीवादात विश्लेषणच जास्त दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी जी माहिती मागितली आहे ती जन माहिती अधिकारी किंवा तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांचे अभिमत मागितलेले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या**

**( पान २ वर..)**

**माहितीचे अवलोकन केले असता त्यांना वेळोवेळी जे पत्र कार्यालयाकडून दिलेले आहे त्यामध्ये केलेल्या आरोपाचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कलम २(च८ प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्याप्रमाणे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती पुरविणे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी किंवा कोणत्याही अधिका-यांचे मत हे अपेक्षित नसल्यामुळे अपीलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध करुन देता आली ती दिलेली दिसून येते. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २४१/नाग/२०१०

१)श्रीमती रुपा बाबुलाल बनोदे,
धरमपेठ, हनुमान मंदिर जवळ, धरमपेठ, नागपूर-४४००१०. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रं.१, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.४.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १२.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे, दिनांक ३१.८.२००६ ला श्री नितीन सुरेश वर्मा यांनी घर पाडण्याकरीता मागीतलेल्या पोलीस संरक्षणाची दिलेल्या तक्रारीची प्रत मिळणे बाबत. (२) दिनांक ३१.८.२००६ ला श्री नितीन सुरेश वर्मा यांना संरक्षणासाठी दिलेल्या पोलीस पुरुष आणि स्त्रिया कर्मचा-यांची संख्या नांव आणि पद यांची लिस्टची सर्टिफाईड प्रत मिळण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः शिघ्र पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे.**

**३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.१.२०१० रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २६.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २६.१.२०१० रोजी पुरविण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु ती अपूर्ण होती व म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते. व त्यानंतर दिनांक ९.३.२०१० चे पत्रान्वये अपीलकर्ता यांना दिनांक ११.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे असा खुलासा आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी केला आहे. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले होते.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे. पोलीस खात्याने ४५ पोलीस पाठविले होते. परंतु त्यांनी फक्त २ महिला पोलीसांची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे खोटी माहिती**

**( पान २ वर..)**

दिली असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, श्री नितीन वर्मा यांनी अर्ज केल्यानंतर त्यांना संरक्षणाकरीता एक महिला पोलीस कॅान्स्टेबल व एक होमगार्ड महिला उपलब्ध करुन दिलेले होते. त्यापेक्षा कोणतेही पोलीस उपलब्ध करुन दिलेले नव्हते. व त्याबाबत श्री नितीन वर्मा यांनी पावती क्रमांक ३४३७१११ नुसार शुल्क रुपये ५९२/- भरलेले होते. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचेकडे व्ही.डी.ओ.कॅसेट आहे व त्यामध्ये ४५ पोलीस दिसून येतात. त्याकरीता आयोगाने, आयोगाचे उपसचिव यांनी सदरची व्ही.डी.ओ.कॅसेट पाहावी व आयोगाकडे अहवाल सादर करावा असे आदेश दिले. त्याप्रमाणे आज आयोगाचे उपसचिव यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

"मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार आज दिनांक १५.४.२०१० रोजी दुपारी २.३० वाजता श्रीमती रुपा बनोदे, यांनी सादर केलेली सी.डी. बघितली. त्यामध्ये एकूण ५ फोटो आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. बुलडोझर व पाडलेले घर.

२. बुलडोझर, बुलडोझरच्या मागे उभे असलेले लोक, पाडलेले घर

३. घरसामान, ४ महिला व ६ पुरुष दिसतात.

४. सिव्हिल ड्रेस मधील एक इसम, पोलीस गणवेषातील एक इसम, बुलडोझर चालक बुलडोझर सह व एका इसमाचा पाठमोरा डोक्याचा भाग दिसून येतो.

५. बुलडोझर व पाडलेले घर."

सदरच्या अहवालावरुन असे दिसून येते की, पोलीस गणवेषातील एक इमस, ४ महिला व ६ पुरुष, सिव्हील ड्रेसमधील एक इसम व एक इसम पाठमोरा डोक्याचा भाग दिसून येतो व बुलडोझर दिसून येतात. त्यात ४५ पोलीस आहे असे दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४४३/अम/२०१०
अपील क्रं. १४४४/अम/२०१०

अपील क्रं. १४४३/अम/२०१०
१)श्री रामकृष्ण पांडुरंग तिव्हाणे,
मु.पो.वाडी अदमपूर, ता. तेल्हारा, जिल्हा अकोला. अपीलकर्ता
अपील क्रं. १४४४/अम/२०१०
१)श्री सुनिल महादेव वर्गे,
मु.पो.वाडी अदमपूर, ता. तेल्हारा, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत वाडी अदमपूर, ता.तेल्हारा, जि.अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**दोनही अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १४४३/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत वाडी यांचेकडे, १ एप्रिल, २००५ ते १० सप्टेंबर, २००८ पर्यंत तारीखवार जमा रक्कम, तारीखवार झालेला खर्च व्हाऊचरच्या संपूर्ण झेरॉक्स प्रत, मंजूर कामाचे अंदाजपत्रक, एम.बी.च्या नकला निघालेले मुल्यांकन दिनांक १.४.०५ ते आजपर्यंत अखेर शिल्लक बँकेच्या प्राप्त बुकाची झेरॉक्स प्रत. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.**

**३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.११.२००८ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती तेल्हारा यांचेकडे प्रथम अपील केलेले दिसून येते. अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १८.१२.२००८ पर्यंत माहिती द्यावी असे तोंडी सांगितले. व त्यामुळे माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, ते माहिती घेण्यासाठी गेले होते परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु त्याबाबतचा पुरावा अपीलकर्ता यांनी आयोगास सादर केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज हा**

**( पान २ वर..)**

अपीलकर्ता यांनी पंचायत समितीकडे दिलेला होता. माहिती मात्र ग्राम पंचायत स्तरावरची आहे. व अर्ज सुध्दा सचिव ग्रामपंचायत यांना संबोधून केला होता. त्यामुळे सदरचा अर्ज गट विकास अधिकारी यांचे कार्यालयातून दिनांक ३०.९.२००८ रोजी प्राप्त झाला. व त्यानंतर दिनांक ३०.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. परंतु अपीलकर्ता यांनी पत्र घेण्यास नकार दिला असे ग्रामपंचायत चपराशी श्री हरिसिंह गणपत पवार यांनी शिक्षणाधिकारी दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचेकडे माहिती घेवून आले नव्हते. अपीलकर्ता व ग्राम पंचायत कार्यालय हे एकाच गावात आहे व त्यामुळे शिपाई आला नव्हता असा निष्कर्ष काढता येणार नाही. तसेच अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती मागितलेली असल्यामुळे ती घेण्याकरीता त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे जाणे आवश्यक होते. तसेच मुळातच माहिती ग्राम पंचायत स्तरावरची असून सचिव, ग्राम पंचायत यांना माहिती देण्याचा अर्ज मात्र पंचायत समितीकडे दाखल करणे व पुन्हा ३० दिवसांचे आंत माहितीची अपेक्षा करणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.१२.२००८ रोजी नोटशिटवर देण्यात आला असून अपीलकर्त्यास माहिती घेवून जाण्याबाबत सूचना करण्यात येत आहे असे नमुद केलेले दिसून येते. मात्र निर्णय दिलेला नाही. व त्यामुळे माहिती पुरविण्यात आलेली नाही असे दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांनी पुर्वी माहिती घेण्यास नकार दिलेला असल्यामुळे माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. माहिती देण्याची टाळाटाळ केलेली नाही व जवाहर रोजगार योजना अगोदरच बंद झालेली आहे. त्यामुळे टाळाटाळ करण्याचा प्रश्न नाही असे त्यांचे म्हणणे आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक ११४४/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांना उद्येशून ग्राम पंचायत स्तरावरील सामान्य फंडाचा व बारावा वित्त आयोगाच्या कामाचा संपूर्ण हिशोब, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या नोटशिटमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास छायांकित प्रतीचे शुल्क कळविण्याबाबतचे पत्र प्रत्यक्ष पाठविले असता ते घेण्यास अपीलकर्ता यांनी नकार दिला असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्त्यास शुल्क भरण्याबाबतचे पत्र पाठवून शुल्क भरल्याबरोबर माहिती देण्यात यावी असे आदेश केलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

६. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारचे पत्र मिळाले नाही व माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु व्यक्तीशः माहिती घेण्यास गेलो असता माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मात्र याबाबतचा पुरावा अपीलकर्ता यांचेकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, ग्राम पंचायतच्या माहिती अधिका-यांकडे माहिती मागितली. अर्ज मात्र पंचायत समितीकडे दिला. व तरीही ३० दिवसांचे आंत माहितीची ते अपेक्षा करीत आहे. अर्जच मुळात दिनांक ३०.९.२००८ रोजी गट विकास अधिकारी

(पान ३ वर..)

**यांचेकडून प्राप्त झाला व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१०.२००८ रोजी खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिलेले होते. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील सदरात, होय असे म्हटले आहे. परंतु दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर केलेले नाही. खर्चाचा भरणा पत्राच्या संदर्भात श्री ह.ग. पवार यांनी पत्र घेण्यास नकार दिला असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करण्याचे पत्र दिनांक ३०.१०.२००८ रोजी दिलेले आहे. याचा अर्थ ते शेवटच्या दिवशी दिलेले आहे. त्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना ३० दिवसांचे आंत खर्चाचा भरणा करण्याची संधी दिलेली नाही. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया ही ३० दिवसांत होणे शक्य नाही. त्यामुळे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदरच्या माहितीचा खर्च जन माहिती अधिकारी यांनीच स्वतः करावयाचा आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४४३/अम/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत यांचेशी संपर्क साधून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४४३/अम/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १२.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. सदरच्या माहितीचे कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचा खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी स्वतःच करावयाचा आहे. कार्यालयीन खर्चातून करता कामा नये.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४४२/अम/२००९

१)श्री फिरोज खॅान सरदार खॅान,
मीठी बॅाडी, बेदपुरा, अकोला, ता.जि.अकोला. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला,
डी.एस.पी.बंगल्याजवळ, मुर्तिजापूर रोड, अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला
डी.एस.पी.बंगल्याजवळ, मुर्तीजापूर रोड, अकोला. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी यांचा प्रतिनिधी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचेकडे, मुस्लीम एज्युकेशन सोसायटी, अकोला या संस्थेचा नों.क्रं.२०/३/१९४२ मिळाला किंवा या बद्दलची जी माहिती असेल ती आठ दिवसामध्ये द्यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१.२००९ रोजी सदरच्या नांवाची संस्था पंजीबध्द असल्याचे आढळून आले नाही असे कळविले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.२.२००९ रोजी दिला असून त्यात अर्जदाराने केवळ विशिष्ट नांव कळवून संस्था पंजीबध्द आहे किंवा नाही याबाबत माहिती विचारलेली आहे. त्याचा पत्ता किंवा नोंदणी क्रमांक कळविलेला नाही. या कार्यालयात**

**( पान २ वर..)**

**सूमारे पंधरा हजार न्यास/संस्था पंजीबध्द असून नोंदणी क्रमांक शिवाय त्याचा शोध घेणे शक्य नाही. माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्रानुसार अर्जदाराने उपस्थित केलेल्या प्रश्नास समर्पक उत्तर दिले आहे. तसेच अर्जदाराने विचारलेल्या माहितीचे निरीक्षण करण्याची मुभा दिली आहे, त्यामुळे अर्जदारास माहिती नाकारली नाही. माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य व कायदेशिर आहे. त्यामुळे अपील खारीज केलेले दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगाकडे कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४४०/अम/२००९
अपील क्रं. १४४१/अम/२००९

१)श्री सुभाष एकनाथ रेवसकर,
सि-३२, जि.प.नगर खडकी बु. ता.जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, अकोला. ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद, अकोला. उत्तरवादी

अपील क्रं. १४४१/अम/२००९

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अकोला.
ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा आरोग्य विभाग,
ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १४४०/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे, एप्रिल, ०६ ते ३० सप्टेंबर, २००८ या कालावधीतील जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र अकोला येथे एकुण प्रशिक्षणाचे प्रकार किती त्याचे विवरण याबाबतची माहिती एकुण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.१.२००९ रोजी देण्यात आला असून त्याच दिवशी अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आली व त्यांनी पोच दिलेली आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यात माहिती ज्या स्वरुपात मागितली होती त्या स्वरुपात दिली नाही. हाताने माहिती तयार करुन दिली व अपूर्ण दिली. माहिती लपविण्याचा हेतू स्पष्ट होतो. माहिती विशिष्ट कालावधीत दिली नाही. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारले**

**( पान २ वर..)**

**असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अतिशय विस्तृत प्रमाणात आहे व त्यामुळे ती संकलीत करण्यास वेळ लागणार होता त्यामुळे अपीलकर्ता यांना मुदत मागितली होती. कोणतीही माहिती अपूर्ण देण्याचा किंवा लपविण्याचा प्रश्न नाही व माहिती अपीलकर्ता यांना विहित मुदतीत देण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपील खारीज करण्याची विनंती केली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही किंवा ते स्वतः हजर नसल्यामुळे माहिती मिळाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

**३. अपील क्रमांक १४४१/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अकोला यांचेकडे, श्री आर.के. इंगळे, उपअभियंता यांचे संदर्भात माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१.२००९ रोजी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी, या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आपणास यापुर्वी देण्यात आलेली आहे. आपण पुन्हा जी माहिती मागितली आहे ती या कार्यालयात उपलब्ध नसून सदर माहिती आपण महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अकोला किंवा कार्यकारी अभियंता, लघु सिंचन, अकोला यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे दिनांक २८.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग यांचेकडे माहितीची विचारणा केलेली दिसून येते व त्याबाबतचे पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.२.२००९ रोजी दिला असून, माहिती ही लघु सिंचन विभागातून उपलब्ध करुन देण्याकरीता ठरविण्यात आले व त्याप्रमाणे माहिती मागविलेली दिसून येते. व माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. व लघु सिंचन विभागाकडून सदरची माहिती उपलब्ध झाल्यावर ती दिनांक २६.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील क्रमांक १४४०/अम/२००९ व अपील क्रमांक १४४१/अम/२००९ खारीज करण्यात येत आहेत.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४४५/अम/२००९
अपील क्रं. १४४६/अम/२००९

१)श्री बाळासाहेब पुंडलिकराव ठाकरे,
मु.पो.कानशिवणी, ता.जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,
अकोला. ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
अकोला, ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

अपील क्रं. १४४६/अम/२००९

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,
पातूर,जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
पातूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १४४५/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे तीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) तालुका कृषि अधकारी अकोला यांचेकडे मोजणी दुर्बीण किती उपलब्ध आहेत त्याची माहिती. (२) दिनांक १.१.२००८ पासून ढाबा दाळीचे बांध सिमेंट नाला बांध,मातीचे बांध,C.C.U.(समतलचर) या कामावर किती क्षेत्राची मोजणी झाली त्याची सविस्तर माति व त्याचे क्षेत्र पुस्तक, साखळी पुस्तकाची झेरॉक्स प्रत. (३) दिनांक १.१.०७ ते ३१.७.०८ पर्यंत विस्तार कार्यावर तालुका कृषि अधिकारी यांनी किती खर्च केला व खर्चाचे बिलाची झेरॉक्स किंवा कॅश बुकाची सत्यप्रत." सदरची माहिती स्वत: घेणार असे नमूद कारुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.९.०८ रोजी काही माहिती उपलब्ध झाली. परंतु अपूर्ण माहिती उपलब्ध झाल्याचे कारणास्तव दिनांक २३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.१.०९ रोजी दिला असून जन माहिती अधिकारी यांनी श्री एम.ए.पोहरे, सहाय्यक अधीक्षक यांना**

**( पान २ वर..))**

अखेरची संधी म्हणून दिनांक ३०.१२.२००८ ला समक्ष बोलावून माहिती देण्याबाबत सूचित केले होते. त्यांनी माहिती सादर केली नाही. व दिनांक ३१.१२.२००८ ला अर्ज करुन १० ते १५ दिवसांचा कालावधी मिळावा असे कळविले आहे. सदर प्रकरणी यापूर्वी ब-याच वेळा पत्र देवून सुध्दा माहिती सादर केली नाही किंवा किती पैसे भरावे लागतील याबाबत कळविले नाही. करीता त्यांचा मुदत वाढवून देण्याचा अर्ज फेटाळून लावण्यात आला व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देण्यास असमर्थ आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध
झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, दिनांक १२.९.२००८ रोजी त्यांना काही माहिती मिळाली व दिनांक १७.९.२००८ रोजी काही माहिती मिळाली. परंतु मुद्या क्रमांक ३ ची माहिती त्यापुर्वी त्यांना मिळाली नाही. त्यासंदर्भात प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक ३ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे व आज त्यांनी आयोगापुढे हजर होऊन कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नसल्यामुळे अर्धवट माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक झाले आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १४४६/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पातूर यांचेकडे वर्ष ०७-०८ मधील खालीलप्रमाणे चार मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) तालुका कृषि अधकारी पातूर यांचेकडे मोजणी दुर्बीण किती उपलब्ध आहेत त्याची माहिती. (२) दिनांक १.१.२००८ पासून ढाबा दाळीचे बांध सिमेंट नाला बांध,मातीचे बांध,C.C.D.(समतलचर) या कामावर किती क्षेत्राची मोजणी झाली त्याची सविस्तर माति व त्याचे क्षेत्र पुस्तक, साखळी पुस्तकाची झ रॅाक्स प्रत. (३) दिनांक १.१.०८ ते ३१.९.०८ पर्यंत कृषि पर्यवेक्षक निहाय सिमेंट नाला बंडींग, पंतप्रधान पॅकेज व्यापक विदर्भ पाणलोट यावर किती खर्च केला याची कृषि पर्यवेक्षकाच्या नांवासह माहित (४) दिनांक १.१.०७ ते ३१.७.२००८ पर्यंत विस्तार कार्यावर तालुका कृषि अधिकारी यांनी किती खर्च केला व खर्चाचे बिलाची झेरॅाक्स किंवा कॅश बुकाची सत्यप्रत." माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली ती त्यापुर्वी त्यांना प्राप्त झाली नाही. माहिती व्यक्तीशः मागितलेली असल्यामुळे ते दिनांक २०.११.२००८ रोजी माहिती घेण्यास गेले होते परंतु माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २१.११.२००८ रोजी त्यांनी आक्षेप घेणारे पत्र दिले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता दिनांक १२.११.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी, आपणास आवश्यक माहिती विस्तीर्ण स्वरुपाची असल्यामुळे ती कार्यालयामध्ये पाहाण्याबाबत विनंती करण्यात येत आहे. पाहाणीनंतर त्यापैकी आवश्यक माहितीच्या प्रती

( पान ३ वर..)

**आपणास देण्यात येतील असे कळविले होते. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना पत्र मिळाले नाही व जन माहिती अधिकारी यांची काही भेट झाली नाही. जन माहिती अधिकारी हे दौ-यावर असतात असे त्यांना सांगितले गेले. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा त्यांना वरंवार दौ-यावर जावे लागतात हे मान्य केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रथम अपील अर्ज सादर केलेला नसल्यामुळे व माहितीचे निरीक्षण अर्जदाराने न घेतल्यामुळे प्रथम अपील घेण्यात आले नाही, असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी कार्यालयात अपील अर्ज दिला आहे व त्याबाबतची पोच दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचे संदर्भात कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेली नाही हे स्पष्ट होते. तसेच आतापर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध**

**झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती सर्वसाधारणपणे एक हजार पष्ठांची होते व त्यामुळे निरीक्षणाकरीता कळविले होते. परंतु अपीलकर्ता हे खर्च भरण्यास तयार आहे असे त्यांनी आता आयोगापुढे सांगीतले. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहितीच्या पृष्ठांची सुख्या व येणारा खर्चाची माहिती अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहील. व अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४४५/अम/२००९ हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.८.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रं. ३ ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अर्जातील मुद्या क्रं. ३ ची माहिती प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रकमेची वसुली संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे दर महिन्याचे पगारातून वसूल करुन ती** "००७०-इतर प्रशासीक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**३) अपील क्रमांक १४४६/अम/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.११.२००८ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहितीच्या पृष्ठांची संख्या व येणारा खर्च हा अपीलकर्ता यांना कळविण्यात यावा व खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४३९/अम/२००९

१)श्री संजय रमेशराव माजरे,
मु.पो.गांधीग्राम, ता.जि. अकोला. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अकोला. ता.जि. अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्राम पंचायत गांधीग्राम, ता.जिल्हा अकोला. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे सन २००६ ते ०७ पर्यंतच्या कालावधीची ग्रामपंचायत गांधीग्राम यांनी २००६ ते २००७ पर्यंत मासिक सभा व ग्रामसभा यातून घेतलेल्या (१) यशवंत ग्राम योजना (२) रोहयो (३) दलीत वस्ती (४) जि.प. सेस फंड (५) १२ वा वित्त आयोग इत्यादी ठरावाच्या नक्कल सत्यप्रती व या सर्व योजनातून केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकांच्या व दरपत्रकांच्या नक्कल प्रती सर्व लेखी स्वरुपात माहिती मिळावी, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस दिनांक ३.११.२००८ रोजी काढलेली दिसून येते परंतु निर्णय झालेला आहे किंवा नाही हे उत्तरवादी गैरहजर असल्यामुळे कळू शकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, अद्याप पर्यंत त्यांना माहिती मिळाली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या व शासन निर्णयाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे असे दिसून येते व त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली**

**( पान २ वर..)**

**माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे संपर्क साधून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रकमेची वसुली ही त्यांच्या दरमहिन्याचे पगारातून वसूल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.**

**४) निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.**

**५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५२/अम/२००९

१)श्री विलास जानराव वानखडे,
मु.पो.आडसुळ, ता.तेल्हारा, जिल्हा अकोला. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, तेल्हारा. ता. तेल्हारा, जिल्हा अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
जि.प. वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा, अडसुळ, ता.तेल्हारा, जि.अकोला. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळा, अडसूळ यांचेकडे, अडसूळ जिल्हा परिषद शाळेतील मागील सत्रात शिकस्त वर्ग खोल्या पाडण्यासाठी मंजूरात आलेल्या वर्ग खोल्यांची संख्या व पाडण्यात आलेल्या वर्ग खोल्यांची संख्या याची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १३.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना पोस्टाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु माहिती मिळाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.२.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी पुर्वी माहिती देण्याचा प्रयत्न केला होता परंतु अपीलकर्ता यांनी माहिती घेतली नाही. त्यामुळे माहिती पोस्टाने पाठविली तरी सुध्दा माहिती मिळाली नाही या कारणास्तव जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे ठरले. अर्जदाराने सुध्दा माहिती घेण्याची तयारी दर्शविली व त्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येत. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, माहिती दिशाभूल करणारी आहे. दोन खोल्यांचे बांधकाम झ ाालेले असतांना ३ खोल्यांचे बांधकाम झालेले आहे अशी चालचलाऊ माहिती दिली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरता दिनांक ६.१.०८ रोजी कार्यालयात आले होते परंतु त्यांनी माहिती घेतली नाही व प्रथम अपील दाखल केले. त्यांना पोस्टाने सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा सांगितले की, त्यांच्या पुर्वीचे जन माहिती अधिकारी यांनी ती**

**( पान २ वर..)**

**माहिती दिली आहे. त्यावर ३ खोल्या असे जरी लिहीलेले असले तरी प्रत्यक्षात दोनच खोल्या आहेत हे खरे आहे. त्यात शिक्षणाधिकारी यांनी पुन्हा चौकशी केली परंतु त्याबाबत सांगितले की, पुर्वी मोळा हॅाल होता व त्याच्या दोन खोल्या करण्यात आल्या. त्यामुळे जशी माहिती उलपब्ध आहे तशीच ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांनी सक्षम अधिका-याकडे तक्रार करणे संयुक्तिक राहील. माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५३/अम/२००९

१)श्री संतोष प्रल्हाद लांडे,
मु. धनेगांव, पो. देगांव, ता.बाळापूर, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुर्तीजापूर, ता.मुर्तीजापूर, जि. अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत कवळा, ता.मुर्तीजापूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांचेकडे, सन १ जानेवारी २००४ ते ३१ डिसेंबर २००६ पर्यंत (१) ग्रामपंचायत कवळा, ता.मुर्तीजापूर येथी वैधानिक विकास महामंडळा मार्फत निधी आला होता काय? व तो निधी अकरा वित्त आयोगाच्या खात्यामध्ये जमा करण्यात आला होता काय? करण्यात आला असल्यास किती निधी आला व त्या निधीतून कोणकोणती कामे करण्यात आली. व त्याकरीता किती खर्च करण्यात आला व किती शिल्लक आहे. या निधीतून केलेली कामे किती पूर्ण झाली व किती कामे अपूर्ण आहेत. पुर्ण झालेल्या कामांच्या अंदाजपत्रक तसेच मोजमाप पुस्तकेच्या सत्यप्रतीसह माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.**

**३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना ग्रामपंचायत येथील रेकॅार्डची पाहाणी केली असता वैधानिक विकास मंडळाच्या निधीबाबत माझ्याकडे प्रभारात माहिती मिळाली नाही. त्यामुळे आपणास मागितलेली माहिती देवू शकत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे दिनांक २०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी तत्कालीन सचिव श्री एन.एस. येवले यांचेकडे प्रभार असल्यामुळे दिनांक २२.२.२००९ पर्यंत प्रभार हस्तांतर करण्यात यावे म्हणून कळविण्यात आले आहे. माहिती उपलब्ध होताच सचिव, ग्रामपंचायत कवडा यांचेकडून माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून गट विकास अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते व त्यापुर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक**

**( पान २ वर..)**

**२०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, पुर्वीचे ग्राम पंचायत सचिव श्री येवले यांनी प्रभार दिला नव्हता, त्यामुळे माहिती देता आली नाही. परंतु प्रभार दिल्यानंतर दिनांक ३१.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे ते आज सुनावणीस उपस्थित झाले नसावे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४४७/अम/२००९

१)श्री रामराव महादेवराव वानरे,
मु.पो.चांदूर, ता.जि.अकोला-४४४०४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अकोला. ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, अकोला. ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग(प्राथमिक) यांचेकडे, जिल्हयातील मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या शिक्षकांना घरभाडे किती. वरील कालावधीत किती शिक्षकांना घरभाडे दिले. त्यांची नांवे, वास्तव्यासहित. तसेच ट्राव्हलिंग अलोंन्स किती शिक्षकांना देण्यात आला त्याची झेरॉक्स प्रत, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. दिनांक १०.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना सदरची माहिती पंचायत समिती स्तरावरील असून संबंधीतास तात्काळ पुरविण्यात यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २९.१.२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी यांनी माहिती तयार करण्यात आली असून सदर माहिती या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही दिनांक १७.२.२००९ रोजी पुन्हा एक पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २६.३.२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बार्शिटाकळी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अपूर्ण माहिती मिळाली म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत संपूर्ण माहिती मिळाली नाही व अपूर्ण माहिती मिळाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती पंचायत समिती स्तरावर असते. प्रत्येक पंचायत समिती सार्वजनिक प्राधिकरण आहे व अपीलकर्ता यांनी सदरची माहिती प्रत्येक पंचायत समितीकडे मागणे आवश्यक होते. कारण सर्व**

**(पान २ वर..)**

**शिक्षकांचे वेतन पंचायत समिती स्तरावरुनच काढण्यात येते. व त्यामुळे सर्व पंचायत समितींना पत्र देण्यात आले होते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले होते. आतापर्यंत ज्या पंचायत समितीने माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यांना पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश काढून अपीलकर्ता यांना विचारुन दिलेल्या माहितीबाबत माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही अशी चौकशी करावी व आदेश काढावे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पंचायत समिती कडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पुरविण्याची व्यवस्था करावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४४८/अम/२००९
अपील क्रं. १४४९/अम/२००९

१)श्री वसंतराव विष्णूजी झाडे,
रा.उमरा, ता.आकोट,जिल्हा अकोला. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, अकोला. ता.जिल्हा अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
श्री बगाजी विद्यालय, रुईखेड, ता.आकोट, जि. अकोला. — उत्तरवादी

अपील क्रं. १४४९/अम/२००९

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
लोकमान्य विद्यालय, उमरा, ता.आकोट, जि. अकोला. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ व १८.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १४४८/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री बगाजी विद्यालय, रुईखेड यांचेकडे, (१) सन २००८-०९ या शैक्षणिक सत्रातील विद्यार्थी पट व हजेरी पटाच्या झेरॉक्स प्रती व विद्यार्थ्यांच्या पत्यासह संपूर्ण माहिती दयावी. (२) विद्यार्थ्यांला देण्यात येणा-या शालेय पोषण आहाराचे संपूर्ण रेकॉर्ड (२००० पासून ते २००९) झेरॉक्स दयावी. संपूर्ण माहितीच्या सत्याप्रती दयाव्या. (३) शासनाकडून मिळत असलेला निधी, विनियोग, कॅश बुक, सर्व बँकांचे पासबुक, ऑडीट प्रत संपूर्ण माहितीच्या सत्यप्रती. (४) कार्यरत कर्मचारी, मस्टरच्या झेरॉक्स प्रती, त्यांना लावतांना लावलेले शासन निकष, वर्तमानपत्रांत दिलेल्या जाहिरातीच्या झेरॉक्स प्रती, आवक जावक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती संपूर्ण माहिती दयावी. (५) शाळेने केलेले आतापर्यंत सर्व बांधकामाची माहिती एम.बी.सह दयावी. (६) शाळा कोणत्या संस्थेच्या अधिन आहे त्या संस्थेचे संपूर्ण दस्तऐवजाच्या झेरॉक्स प्रती. (७) बिंदूनामावली बाबत शाळा संबंधीत संपूर्ण माहिती दयावी. (८) शाळेसंबंधी असलेल्या वसतीगृहातील कार्यरत कर्मचारी २००७ ते २००९ मस्टरच्या झेरॉक्स प्रती, त्यांच्या सुटीच्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती, वसतीगृहात राहात असलेले कर्मचारी, विद्यार्थी यादी संपूर्ण माहिती**

**(पान २ वर..)**

दयावी. (सदर माहिती २००० ते २००९ पर्यंतची आहे.) माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ९.२.२००९ रोजी, सन २०००-०९ पर्यंतची मागणी असली तरी आर्थीक निधी बाबत माहितीचे संकलन करुन ती जवळ असलेल्या माहितीनुसार ४२५९ पेजेसची होत आहे. मागितलेली माहिती संपूर्णतः संदिग्ध स्वरुपाची आहे. सदरची माहिती उपलब्ध अभिलेखातून अंदाजे स्वरुपात कळवित आहे. दैनंदिन शालेय कामकाज सांभाळून विहित मुदतीत ही बाब पूर्ण करावयाची म्हणून अंदाजे शब्दाचा वापर केलेला आहे. शाळेला शासनाकडून सन १९९९ पासून वेतनेत्तर अनुदान प्राप्त झालेले नाही. त्यामुळे वर नमुद केलेल्या पृष्ठसंख्येच्या छायांकित प्रती काढण्याएवढा निधी उपलब्ध नसल्याने व आपण दारिद्रय रेषेखालील असतांना सुध्दा मोफत पुरविल्या जाऊ शकत नाही. आपल्या मागणीनुसार माहिती शाळेच्या/संस्थेच्या/वसतीगृहाच्या कायालयात उपलब्ध आहे. आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ७(८) अन्वये प्रत्यक्ष निरिक्षणाकरीता हे पत्र मिळाल्यापासून दिनांक १३.२.२००९ शुक्रवार रोजी सकाळी ११.३० ते २.३० दरम्यान किंवा दिनांक १४.२.२००९ शनिवार रोजी सकाळी ८.३० ते ११.०० चे दरम्यान येऊन प्रत्यक्ष निरीक्षण करावे व उपलब्ध माहितीतील आपणास पाहिजे त्या कागदपत्राचे टिपण किंवा उतारा घ्यावा म्हणजे आपले समाधान होईल, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.३.२००९ रोजी देण्यात आला असून श्री ताडे यांना पुरविण्यात येणा-या माहितीसाठी आवश्यक खर्चासाठी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी संस्थेकडून निर्णय घेवून श्री ताडे यांना दिनांक १९.३.२००९ पर्यंत माहिती मिळेल अशा बेताने पोस्टाने माहिती पुरवावी. सदर माहिती श्री ताडे यांना विनामुल्य पुरविण्यात यावी, असे आदेश दिलेले दिसून येते. सदरच्या आदेशाप्रमाणे मा. शिक्षणधिकारी, जिल्हा परिषद माध्यमिक विभाग यांचेकडून निधी मागणी केला आहे.त्यांचेकडून निधी प्राप्त झाल्यावर विनाविलंब माहिती पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढें सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली आहे ती, ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे ॲड. श्री राजेंद्र पांडे हे हजर झाले व त्यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय विस्तृत प्रमाणात असून १० विषयाची माहिती त्यांनी मागितली आहे. सदरची माहिती मागण्याच्या करीता व्यापक जनहित दिसून येत नाही. विशिष्ट अशी कोणतीही माहिती मागितली नाही व सर्व माहिती ही मोघम आहे. ती माहिती सर्वच शाखेमधील असल्यामुळे ती संकलीत करणे सुध्दा आवश्यक आहे. व त्यामुळे सर्व माहिती ४२५९ पृष्ठांची होते. व एवढा खर्च हा मुख्याध्यापक यांना करता येणे शक्य नाही व संस्थेची माहिती मुख्याध्यापक पुरवू शकत नाही व संस्था सुध्दा सदरची माहिती पुरविण्याकरीता वेतनेतर अनुदान नसल्यामुळे शक्य होणार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी माहितीचे निरीक्षण करुन आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले होते. परंतु त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये ही बाब लक्षात

( पान ३ वर..)

न घेता माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहे. सदरच्या आदेशाप्रमाणे संस्थेस निधी उपलब्ध करुन देण्याकरीता विचारणा केली असता संस्थेने निधी उपलब्ध करुन दिला नाही. त्यामुळे माहिती अधिकारी यांचेकडे निधी उपलब्ध करुन देण्यासाठी विचारणा करण्यात आली आहे. परंतु उत्तर आलेले नाही. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी खर्चाच्या उपलब्धतेबाबत कसे करावे याबाबत शिक्षणाधिकारी यांनी मार्ग काढणे आवश्यक होते परंतु त्यांनी मार्ग काढलेला नाही. तरी अपीलकर्ता हे निरीक्षण करणार असल्यास त्यांना निरीक्षणासाठी माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. तसेच अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे माहिती व्यापक प्रमाणात असल्यास व ती संकलीत करण्यासाठी प्रमाणाबाहेर यंत्रणा वळवावी लागत असल्यास तशी माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक नाही असेही त्यांनी आयोगापुढे सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी निरीक्षणा करीता तरी यावे किंवा अपील फेटाळावे अशी विनंती आयोगास केली.

५. अपीलकर्ता यांनी सांगितले की, ते दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे. अपीलकर्ता यांचेकडे शेती आहे व त्याचा ७/१२ चा उतारा त्यांनी दाखल केला आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सन २००० ते २००९ पर्यंत संस्था व शाळेच्या सर्व विभागातील माहिती मोघम स्वरुपाची मागितलेली दिसून येते व त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित आहे असे दिसून येत नाही. त्यावर पुन्हा अपीलकर्ता हे संस्थेची निवडणुक हरलेले आहे असेही सांगण्यात आले व त्यामुळे ते अशी माहिती मागत आहे. परंतु जन माहिती अधिकारी हे निरीक्षणाकरीता माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. माहिती नाकारलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी माहितीचे निरीक्षण करणे संयुक्तिक राहील.

६. अपील क्रमांक १४४९/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लोकमान्य विद्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.

"(१) शाळा स्थापनेपासून ते आजपर्यंत शाळेला प्राप्त निधी, विनियोग केलेला निधी, संपूर्ण कॅश बुक, बँक पासबुकाच्या झेरॉक्स प्रती ऑडीटसह दयावी. (२) शाळेत केल्या गेलेल्या बांधकामासंबंधी व्यवस्थापनेच्या ठरावासह झालेल्या खर्चासह, मंजूरातीसह कॅशबुक, स्टॉकबुक ऑडीटच्या सत्याप्रतीसह संपूर्ण माहिती दयावी. (३) शाळेत नमणुक करण्यात आलेले संपूर्ण कर्मचारी शिक्षक, शिक्षकेतरसह, त्याबाबत वृत्तपत्रात प्रकाशित जाहिरातीसह आलेले संपूर्ण अर्ज, फेटाळलेले अर्ज, मुलाखतीसाठी बोलावण्यात आलेले अर्ज, नेमणुक करतांना लावण्यात आलेले निकष, नाकारलेल्या उमेदवारांच्या संबंधीतील निकष शासन निर्णयासहच्या सत्यप्रती संपूर्ण माहिती दयावी. (४) शालेय पोषण आहाराबाबतचे संपूर्ण रेकॉर्डच्या बँक पासबुकासह सत्यप्रती तसेच शिजविण्यासाठी कोणाला नेमले नियमानुसार केलेली कार्यवाहीचे सत्यापण, शासन निर्णयासह सत्यप्रती संपूर्ण माहिती दयावी. उपरोल्लेखित संपूर्ण माहिती सन १९६८ पासून २००९ पर्यंत आहे. "

७. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दिनांक १९.३.२००९ पर्यंत

( पान ४ वर..)

माहिती मिळेल अशा बेताने पोस्टाने माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

८. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. श्री राजेंद्र पांडे यांनी आयोगापुढे युक्तीवाद केला की, अपीलकर्ता यांना दिनांक २७.१.२००९ रोजी मागितलेली माहिती उपलब्ध आहे. परंतु अंदाजे १२,२५० पेजेसची माहिती होते. या शाळेला सन १९९९ पासून वेतनेतर अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे शाळेजवळ वर नमुद केलेल्या रकमेचा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे ही माहिती आपणास दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे सुध्दा आपणास ही माहिती मुदतीत पुरविता येत नाही. त्यामुळे आपली माहिती शाखेत उपलब्ध असल्यामुळे व निधी अभावी माहिती आपणास देवू शकत नसल्यामुळे अधिनियमाचे कलम ७(९) अन्वये आपण प्रत्यक्ष निरीक्षणाकरीता हे पत्र मिळाल्यानंतर शुक्रवार दिनांक ३० जानेवारी २००९ रोजी दुपारी २ ते ५ चे दरम्यान किंवा शनिवार दिनांक ३१ जानेवारी २००९ रोजी दुपारी २ ते ५ चे दरम्यान येऊन प्रत्यक्ष निरीक्षण करावे व उपलब्ध माहितीतील आपणांस पाहिजे त्या कागदपत्रांचे टिपण किंवा उतारा घ्यावा म्हणजे आपले समाधान होईल, असे कळविले होते. तरी सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा विचार न करता माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहे. व त्यामुळे खर्चाचा प्रश्न असल्यामुळे संस्था खर्च करु शकत नाही. मुख्याध्यापकांकडे माहितीच्या करीता निधी उपलब्ध नाही व शिक्षणाधिकारी निधी उपलब्ध करुन देवू शकत नाही. अशा परिस्थितीत सदरची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे आयोगापुढे सांगितले.

९. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,माहिती ही सन १९६८ पासून म्हणजे शाळा/संस्था स्थापनेपासून संपूर्ण शाळेतील प्रत्येक विभागाची तपशिलात माहिती मोघमरित्या मागितलेली दिसून येते व त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित आहे असे दिसून येत नाही. सन १९६८ पासून अनियमितता असेल तर अपीलकर्ता यांनी त्याबाबत तक्रार केली होती काय असे त्यांना विचारले असता अपीलकर्ता यांना त्याबाबत काहीही सांगता आले नाही. व त्यामुळे सदरच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित आहे असे दिसून येत नाही. तसेच याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारचा विचार न करता निर्णय दिलेला दिसून येतो. त्यांना निधी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार नसताना सुध्दा असा निर्णय जो दिलेला आहे तो रद्य करणे आवश्यक राहील. परंतु अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे निर्णयाप्रमाणे माहितीचे निरीक्षण करणे संयुक्तिक राहील.

## आदेश

१) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपील क्रमांक १४४८/अम/२००९ व अपील क्रमांक १४४९/अम/२००९ मध्ये माहितीचे निरीक्षण करावे व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ लेखी स्वरुपात कळवावी व त्या दिवशी उपस्थित होऊन उपलब्ध असलेल्या माहितीचे निरीक्षण करावे. तसेच अपीलकर्ता यांचा लेखी अर्ज आल्यानंतर दोनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना

(पान ५ वर..)

**निरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन द्यावे. परंतु अपीलकर्ता यांच्याशिवाय दूस-या कोणीही व्यक्तीस अभिलेखे निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात येवू नये.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५०/अम/२००९

१)श्री दिलीप शालीग्राम ताथोड,
मु.गाडेगांव, पो. घोडेगांव ता.तेल्हारा, जिल्हा अकोला. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद,अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
नवयुग विद्यालय, तेल्हारा, ता. तेल्हारा, जिल्हा अकोला. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्र.मुख्याध्यापक, नवयुग विद्यालय, तेल्हारा यांचेकडे, दि जिल्हा मध्यवर्ती बँकेतून पगार घेण्यासाठी जे पासबुक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी काढले आहे या कर्मचा-यांनी कोणत्या तारखेला प्रथम पगार घेतला त्या पानाची व बँकेत कोणत्या तारखेला बँकेत खाते काढले याबाबत प्रथम पानाची झेरॉक्स सत्यप्रतीची माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.१.२००९ रोजी पासबुक हे कर्मचा-यांची वैयक्तिक बाब असल्यामुळे आम्ही आपल्या मागणीची परिपुर्तता करु शकत नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. दिनांक १९.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.२.२००९ रोजी देण्यात आला असून मागितलेली माहिती १० दिवसांचे आंत पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कर्मचा-यांची वैयक्तिक माहिती असली तरी शासनाकडून वेतन अनुदान मिळत असल्यामुळे बँकेचे पासबुकाची छायांकित प्रत ही सार्वजनिक अभिलेखे होते व त्या पासबुकाच्या प्रती सुध्दा कार्यालयात हया ठेवण्यात येतात असे आयोगापुढे अपीलकर्ता यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे सदरचे अभिलेखे हे सार्वजनिक अभिलेखे आहे असे सांगितले. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहे. व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाचे सुध्दा पालन केलेले नाही. व सुनावणीसाठी हजर झालेले नाही. त्यामुळे**

**( पान २ वर..)**

**जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (पाच हजार फक्त)ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ९.१.२००९ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न केल्यास जन माहिती अधिकरी हे रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार फक्त) शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने व प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम संबंधीतांचे दर महिन्याचे पगारातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".

**या लेखाशिर्षात जमा करावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५१/अम/२००९

१)श्री दिलीप लक्ष्मणराव राऊत,
जूनी वस्ती, डॉ.मुलमुले यांचे दवाखान्याच्या मागे,
मु.पो.ता.मुर्तिजापूर, जिल्हा अकोला-४४४१०७. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, अकोला. ता.जि. अकोला. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अकोला. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १६.४.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, (१) अकोला जिल्हयातील माध्यमिक अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नॉन टिचिंग जागा पद रिक्त आहेत अशा शाळांची नांवे, संपूर्ण पत्ता व रिक्त असलेल्या पदांचे नांव याची सविस्तर माहिती द्यावी. उदा. शाळेचे संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता पदासंबंधी मुख्य लिपिक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर, नाईक, शिपाई, चौकीदार व याव्यतिरिक्त शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये नॉन टिचींग येणारे पद यापैकी कोण कोणते पद व पदाची संख्या संबंधीत शाळेमध्ये रिक्त आहेत. याची तपशिलवार माहिती द्यावी. (२) मुख्य लिपिक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर या जागा भरतांना उमेदवाराची शैक्षणिक अर्हता काय असायला हवी. (३) अकोला जिल्हयातील कोणकोणत्या उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये अनुदानित कोणकोणते पद शिक्षकेतर कर्मचा-यांचे रिक्त आहेत. अशा उच्च माध्यमिक विद्यालयाचे नांव व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पदाचे नांव व संख्या याची सविस्तर माहिती देण्यात यावी. (४) उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे पदे असतात व त्या पदांची शैक्षणिक अर्हता काय असते याची सविस्तर माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद करुन त्यासाठी रुपये ३०/- चे पोस्टाचे तिकिट लावलेले पाकिट जोडलेले नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.३.२००९ रोजी देण्यात आला**

**( पान २ वर..)**

**असून संकलीत स्वरुपात अर्जदाराने मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता येणे शक्य नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य धरण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, शासनाच्या दिनांक ६.९.२००८ च्या परिपत्रकाप्रमाणे त्यांच्या अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असल्यामुळे त्या सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जदाराच्या अर्जाची प्रत हस्तांतरीत करणे आवश्यक नाही. अशा प्रकरणी ज्या माहिती अधिका-यांकडे अर्ज प्राप्त**

**झालेला आहे त्यांनी स्वतःच्या प्राधिकरणाशी संबंधीत माहिती पुरवून अर्जदारास इतर मुद्यांचे संदर्भात संबंधीत प्राधिकरणाकडे वेगवेगळे अर्ज करण्यासाठी सूचवावे. अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे माहिती पुरविणे यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडे कलम २(च) मध्ये व्याख्या केलेली आहे व त्यात उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अभिप्रेत असून त्यापेक्षा वेगळया माहितीचे संकलन, संशोधन, पृथकरण अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रत नाही अशा सूचना आहे व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २४५/नाग/२०१०

१)श्री नामदेव बालाजी तडस,
बालाजी वार्ड, बालाजी सभागृहाजवळ, चंद्रपूर,
मु.पो.ता.जि. चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
वरोरा, ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
वरोरा, ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कार्यालय, वरोरा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"रा.मा.क्रं.२३/आर.पी.एम.६४/९६-९७ मौजा वरोरा, दिनांक ३०.६.९८ च्या आदेशाचे संपूर्ण दस्तऐवज. आपले पत्र क्रं.वशी/कली/प्रस्त.तह./२००९/५३३/ दिनांक १२.११.२००९ मध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे मला सक्षम न्यायालयात दाद मागण्यासाठी नायब तहसिलदार वरोरा, यांचे उपरोक्त नमुद केलेल्या विषयातील आदेशाअंतर्गत तथा ज्या मूळ दस्तऐवजाच्या आधारे संबंधीत अधिका-याने आदेश पारित केले आहे, त्या दस्तऐवजाच्या संपूर्ण प्रती मला पुरविण्याचे करावे. सदर बाबतीत लवकरात लवकर आवश्यक माहिती पुरविण्याची कृपा करावी."**

**३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.१२.२००९ रोजी माहितीचा रेकॅार्ड उपलब्ध नाही असे लेखी स्वरुपात कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १.२.२०१० रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २.३.२०१० रोजी सुध्दा कार्यालयात शोध घेतला असता नस्ती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.२.२०१० रोजी देण्यात आला असून रेकॅार्डचा शोध घ्यावा असे आदेश दिलेले आहे व त्याप्रमाणे त्यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांनी पुर्वी सुध्दा अपील क्रमांक ७५६/२००९ व अपील क्रमांक ७०९/०९ मध्ये सदरची माहिती मिळण्याकरीता अर्ज केलेले होते व त्यांचा निर्णय दिनांक ५.१०.२००९ रोजी**

**( पान २ वर..)**

**दिला असून दोनही अपीले खारीज करण्यात आलेली होती. पुन्हा त्यांनी तहसिल कार्यालयात माहितीचा अर्ज केला व त्यातूनही माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संपूर्ण तहसिल कार्यालयाच्या अभिलेख्यामध्ये नायब तहसिलदार यांचे कार्यालयात नस्ती शोध घेतला होता, परंतु आढळून आली नाही. असे असल्यास नस्ती गहाळ झाली या कारणास्तव पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.ब**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवससांचे आंत संबंधीत नस्तीचा शोध घेण्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेखे अधिनियम, २००५ (सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.४) च्या तरतुदीप्रमाणे संबंधीत पोलीस स्टेशनकडे एफ.आय.आर.दाखल करण्यात यावा.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५५/अम/२००९

१)श्री विनोद निळकंठराव लुंगे,
वार्ड क्रं.१, जि.परिषद हायस्कुल मागे, मंगरुळपीर,
ता. मंगरुळपीर,जिल्हा वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(महसुल विभाग)
मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर, जिल्हा वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर, जि. वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, सन १९९८-९९ कालावधीत मे.उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर यांनी रा.अ.प्र. आरटीएस-५९ लखमापूर-१/९८-९९ आदेश दिनांक २०/ए/९९५ पारित नुसार अपील मंजूर करण्यात आले असून अपीलार्थीला संबोधूनच मे.तहसिलदार गणवीर यांनी मग आदेश पारित करावा, त्यानुसार ते तहसिल मंगरुळपीर यांनी केलेल्या पारित आदेशाची सत्यप्रत. आदेश न झाल्यास त्याचे कारणे द्यावे व केसची सत्यप्रत द्यावी, ही विनंती, अशी माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते.**

**३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३.५.२००८ रोजी, सदर प्रकरण जूने असल्यामुळे ते शोध घेण्याकरीता कमीत कमी एक महिन्याचा कालावधी लागू शकतो असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, आतापर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य ती वागणुक दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. परंतु आता निधी प्राप्त झालेला आहे व ती माहिती उपलब्ध करुन देता येईल. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास संपूर्ण नस्ती दाखविली. त्यावर माहितीच्या अधिकारात माहिती दिली असे**

**( पान २ वर..)**

**प्रत्येक पृष्ठांवर सिल दिलेले आहे परंतु कार्यालयाचे सिल नाही ते देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना आयोगापुढे माहिती देण्यात आलेली आहे. परंतु त्यावर कार्यालयाचे सिल नाही ते सिल जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यावर लावावे.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १,०००/-(रुपये एक हजार फक्त) शास्ती लावण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली संबंधीतांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासकिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".**या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २४४/नाग/२०१०

१)श्री मिलिन्द शिवाजी भगत,
४०, शिवराज नगर, रोड क्रमांक ६, विश्वकर्मा नगर,
नागपूर-४४००२७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,
माध्यमिक शिक्षण विभाग, जि.प. नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक यांचेकडे, सन १९८९ ते सन २००८-२००९ या कालावधीतील ग्रामीण युवक उत्कर्ष शिक्षण संस्थेच्या कै. रामचंद्रराव कामडी हायस्कुल, वर्धा रोड, डोंगरगांव या संस्थेतील तीन शिक्षकांच्या संदर्भात तपशिलात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.१२.२००९ रोजी मागितलेली माहिती आज स्थितीत या कार्यालयात उपलब्ध नाही. तरी आपण माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. आपला अर्ज या कार्यालयाचे स्तरावर खारीज करण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती**

**( पान २ वर..)**



**आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.**

**३. अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता यांची अनेक अपीले आयोगाकडे दाखल आहे. परंतु त्यातील कोणत्याही अपीलात ते हजर राहीलेले नाही, असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता हे पोस्टाने अर्ज करतात. कार्यालयात कधीही उपस्थित होत नाही. व प्रथम अपीलाच्या सुनावणीस कधीही उपस्थित राहीलेले नाही. व नेहमीच संस्थेतील किंवा शाळा स्तरावरील माहिती ही उपशिक्षणाधिकारी कार्यालयास मागत असतात. ते मुख्याध्यापक राहीलेले आहे व त्यांना याबाबत वेळोवेळी कळविलेले आहे. तरी सुध्दा ते अशाच प्रकारची माहिती उपशिक्षणाधिकारी यांना मागत असतात.**

**यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता आहे असे दिसून येत नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५७/अम/२००९

१)श्री राजेंद्र हरीभाऊ खंडारे,
नवीन सोनखास, जांब रोड, पो.ता.मंगरुळपीर, जि. वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम. ता.जिल्हा वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, वाशिम. ता.जिल्हा वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे, दिनांक २१.१.२००८ च्या आदेशानुसार मराठी माध्यमाच्या १५१ आणि उर्दू माध्यमाच्या ८ सहायक शिक्षकांची पदोन्नती मुख्याध्यापक पदावर केलेली आहे. त्या मूळ आदेशातील पदोन्नती दिलेल्या काही शिक्षकांच्या पदोन्नतीने दिलेल्या शाळेत बदल केल्याबाबतची माहिती माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ७.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना कोणतीही माहिती आतापर्यंत प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या नस्ती उपलब्ध नव्हत्या. परंतु आता उपलब्ध झालेल्या आहेत. आयोगाकडे खुलासा दाखल करताना माहिती प्रश्न स्वरुपात असल्यामुळे पुरविली नाही. तसेच सदर अर्जदार हे जिल्हा परिषद शाळेवर मुख्याध्यापक पदावर आहे. दिनांक ३.११.२००८ चे लोकशाही दिनामध्ये संबंधीतांनी दिलेल्या तक्रारीचे उत्तर पत्र क्रमांक ५५४, दिनांक २६.२.२००९ अन्वये व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने पत्र क्रमांक १३३८ दिनांक ९.३.०९ अन्वये सादर करण्यात आले, असा खुलासा केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्यात कोणत्याही प्रकारचा प्रश्न विचारलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक आहे याची बरीच कागदपत्रे मागितली आहे व ती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे**

**( पान २ वर..)**

**आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य, व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत त्यांचेकडे पाठविण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५४/अम/२००९

१) कु. पुष्पा उदेभानजी गाडगे,
C/o बी.डी. खिराडे, गोपाल टॉकीज जवळ, वाशिम.
ता.जिल्हा वाशिम. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) — उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
विदर्भ विद्यालय पिंपळगांव(डाक बंगला) — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे, मा.पिठासीन अधिकारी साहेब शाळा न्यायाधिकरण अपील ०३/०६ शाळा न्यायाधिकरण या अपील विरुध्द व्यवस्थापनानी जो २०.८.२००८ ला जो ठराव घेतला त्या ठरावाची सत्यप्रत मला न्यायालयीन कामाकरीता देण्यात यावी, अशी माहिती टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी, आपण अर्जात विचारलेली माहितीशी संबंधीत बाब ही माझ्या कार्यालयाशी संबंधीत नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे दिनांक २५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिनांक २३.१२.२००८ रोजी मुख्याध्यापक यांना सुनावणीस उपस्थित राहावे असे पत्र दिले, व सदरच्या अपीलाच्या निर्णयाप्रमाणे ७ दिवसांत संस्थेकडून माहिती घेवून उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, जी माहिती त्यांनी मागितली होती तो ठराव संस्थेचा आहे व संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता त्यांनी संस्थेला पत्र दिलेले आहे. परंतु संस्थेनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, व त्यामुळे पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. शिक्षण संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे अपीलकर्ता यांनी संस्थेकडे ठरावाची प्रत मागणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक यांच्या अधिकार कक्षेत जी माहिती येते त्याकरीता ते माहिती अधिकारी आहे. संस्थेची माहिती मुख्याध्यापक यांचे अधिकार कक्षेत येत नसल्यामुळे त्यांनी संस्थेस पत्र लिहिले असल्यामुळे माहिती अधिकारी म्हणून त्यांनी योग्य**

**( पान २ वर..)**

**ती कार्यवाही केलेली आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अपीलकर्ता यांना संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी लागेल व त्याकरीता संस्थेकडे अर्ज सादर करावा लागेल. सदरच्या अपीलात संस्था पक्षकार नसल्यामुळे त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारचे आदेश पारित करता येत नाही. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५६/अम/२००९

१)श्री बबलु रामकुमार अहिर(यादव)
रा.ह.मु.स्वामी विवेकानंद चौ(पाटणी चौक)वाशिम.
ता.जिल्हा वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, वाशिम, ता.जिल्हा वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा बांधकाम अभियंता,
नगर परिष, वाशिम. ता.जिल्हा वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ च्या अर्जाचे संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक १३०५/अम/२००९ चा निर्णय दिनांक १६.२.२०१० रोजी झालेला असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जाचे संदर्भात अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे योग्य नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५९/अम/२००९

१)श्री कैलास आत्माराम बनसोड
मु.पो.आमखेडा, ता.मालेगांव, जिल्हा वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, मालेगांव, ता.मालेगांव, जि. वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय मालेगांव, ता. मालेगांव, जि.वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"जोडगव्हाण रामनगर येथील स्वस्त धान्य दुकान व केरोसीन वाटप/धारकाचा याबरोबर कोणता हुद्या त्याचे संपूर्ण नांव व पत्ता. सरकारी नोकरीमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तीला कोणत्या जी.आर.नुसार स्वस्त धान्य दुकान व केरोसीन परवाना देण्यात येतो का ?. त्या जी.आर.ची संपूर्ण सत्यप्रत देण्यात यावी. व नौकरी व स्वस्त धान्य दुकान/केरोसीन दोन्ही व्यवसाय करता येतात का.? याबाबत संपूर्ण माहिती, मागितलेली दिसून येते."**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध आहे व ती छायांकित प्रती काढून घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे प्रकरण खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती विलंबाने मिळाली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध आहे, घेवून जावी असे कळविले होते. परंतु ते माहिती घेण्याकरीता आले नाही. व माहिती व्यक्तीशः घेणार असे त्यांनी दिलेले नाही. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. प्रथम अपीलाच्या दिवशी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व ती त्यांना मिळाली आहे, असे त्यांनी**

**( पान २ वर..)**

**मान्य केले. विलंबाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, मुदतीच्या नंतर माहिती विनामुल्य मिळते असे मला माहिती होते, म्हणून मी माहिती घेतली नाही. व त्यामुळे ती मला विनामुल्य मिळाली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहिती विनामुल्य उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४६०/अम/२००९

१)श्री कैलास आत्माराम बनसोड
मु.पो.आमखेडा, ता.मालेगांव, जिल्हा वाशिम. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, मालेगांव, ता.मालेगांव, जि. वाशिम. — उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय मालेगांव, ता. मालेगांव, जि.वाशिम. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"जोडगव्हाण रामनगर येथील स्वस्त धान्य दुकान व केरोसीन जोडगव्हाण रामनगर येथील अन्नपुरवठा (गहु, तांदुळ व इतर) व केरोसीन हे माहे १ जानेवारी ते १ डिसेंबर, २००८ या कालावधीलमध्ये ज्या व्यक्तीने चलनाद्वारे पैशचा भरणा करुन माल उचलला आहे त्या सर्व चलनाच्या पावत्यांच्या सत्यप्रत साक्षांकित करुन देण्यात यावी. तसेच वरील प्रमाणे अंत्योदय बी.पी.एल. धारकाचा उचललेला मालाच्या चालान पावत्याची वरील प्रमाणे सर्व देण्यात याव्या. याबाबत माहिती, मागितलेली दिसून येते."**

**२. सदरच्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.०९ रोजी जानेवारी, ०७ ते डिसेंबर, ०८ पर्यंतची चालान पावत्या माहिती उपलब्ध आहे ती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ४.२.०९ रोजी सुध्दा त्यांनी तसे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.२.०९ रोजी देण्यात आला असून, माहिती अधिकारात मागितलेली माहिती अर्जदारास देण्यात आली, त्यामुळे प्रकरण नस्ती करण्यात आले अशी टिपणी केलेली दिसून येते. चालनाच्या प्रती ६५ आहेत. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहिती कशी घेणार असे अर्जात नमुद केलेले नव्हते. त्याचप्रमाणे दिनांक २.१.०९ रोजी त्यांना माहिती घेवून जावे असे**

**( पान २ वर..)**

**कळविले होते. परंतु ते माहिती घेण्यास आले नाही व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णयाच्याच दिवशी अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४६१/अम/२००९

१)श्री कैलास आत्माराम बनसोड
मु.पो.आमखेडा, ता.मालेगांव, जिल्हा वाशिम. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वाशिम.जि.वाशिम. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी,
महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद वाशिम. जि.वाशिम. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे ,कु. स्वाती द. वानखेडे (व.सहा.) महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद वाशिम येथे कनिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत असताना त्यांच्या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते.**

**२. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.२.२००९ रोजी उपरोक्त माहितीचे १५ पृष्ठ होत असल्यामुळे ३० रुपयाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले होते. परंतु अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला नाही व दिनांक २४.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात आले व त्याप्रमाणे दिनांक २३.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे. तरीही अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, माहिती उपलब्ध झाली. परंतु विलंबाने उपलब्ध झ ाली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना**

**( पान २ वर..)**

**विहिती मुदतीत खर्चाचा भरणा करण्यास कळविले होते. परंतु त्यांनी तो केला नाही. तरी सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे त्यांना माहिती दिलेली आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४६२/अम/२००९

१)श्री कैलास आत्माराम बनसोड
मु.पो.आमखेडा, ता.मालेगांव, जिल्हा वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मालेगांव ता.मालेगांव, जि. वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत आमखेडा, ता. मालेगांव, जि.वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, यांचेकडे अंमलबजावणी केलेले ग्राम सभा ठरावाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अर्जदारास घेतलेल्या ठरावाची प्रोसिडींग, जिल्हा परिषद निवडणुक बुक दाखविण्यात आले व त्यास काही आवश्यक ठराव दिले. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २५.४.२००९ रोजी घेतली, त्यावेळेस जन माहिती अधिकारी गैरहजर होते. तक्रारदार हजर होते व त्यामुळे माहिती देता आली नाही. दिनांक २८.२.२००९ अन्वये ग्राम सेवकाला पत्र दिले, तसेच कार्यालयाचे अधीक्षक व कक्ष अधिकारी यांनी ग्रामसेवकाला वारंवार तोंडी सूचना देवून सुध्दा माहिती दिली नाही. तसेच पत्र देवून सांगितले की, तक्रारकर्त्यास १५ दिवसांचे आंत माहिती देण्यात यावी व माहिती न दिल्यास आपल्या विरुध्द प्रशासकिय कारवाई करण्यात येईल. तरीही माहिती दिली नाही. त्यामुळे ग्रामसेवक यांची दिनांक २८.९.२००९ या एका दिवसाची विनापगारी रजा मंजूर करण्यात आली आहे. व कागदपत्रांच्या छायांकित प्रती आता सादर करण्यात येत आहे. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, ते ग्राम पंचायत कार्यालयात गेले होते. त्या कार्यालयात त्यांना सर्व माहिती दाखविण्यात आली होती. त्यातील काही ठराव दिले परंतु काही ठराव दिलेले नाही म्हणून अपील केले होते. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा काही ठराव दिलेले नाही व ठरावाच्या छायांकित प्रती दिलेल्या नाही हे मान्य केले. व आता**

**( पान २ वर..)**

**सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्याचे आयोगापुढे मान्य केले. त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या ठरावाच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४६३/अम/२००९

१)श्री कैलास आत्माराम बनसोड
मु.पो.आमखेडा, ता.मालेगांव, जिल्हा वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, वाशिम. जि. वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था मालेगांव, ता. मालेगांव, जि.वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी,यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"मौजा उबळवेल येथील शेती कर्जदाराची २००६ चे सर्व शेतकरी कर्जदार यांची संपूर्ण यादी. व ज्या शेतक-यांचे कर्ज माफ झाले अशा शेतक-यांची यादी. सन २००७-०८ मध्ये ज्या शेतक-यांचा कर्ज पुरवठा करण्यात आला त्यांची यादी. सेवा सहकारी सो.दुबळवेल अंतर्गत मिळालेले संपूर्ण कर्ज यादी. अशी माहिती, मागितलेली दिसून येते." सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केले आहे.**

**२. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१०.२००८ रोजी सहाय्यक निबंधक यांनी सचिव, सेवा सहकारी संस्था यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १४.११.२००८ रोजी माहितीचा खर्च रुपये ११२/- भरावा असे कळविलेले दिसून येते. परंतु माहितीचा खर्च न भरता अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १९.१.२००९ रोजी पुन्हा खर्चाचा भरणा करण्याचे पत्र दिले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.२.२००९ रोजी देण्यात आला. त्यात अपीलार्थीचे अपीलाचे प्रयोजन पूर्ण झालेले असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना माहिती ही विनामुल्य मिळायला पाहिजे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना विहित मुदतीत खर्चाचा भरणा**

**( पान २ वर..)**

**करण्यास कळविले होते. व त्यांनी खर्चाचा भरणा केलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यावर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील, हा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१)** **अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)** **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४५८/अम/२००९

१)श्री प्रा.एस.व्ही. देव्हडे व इतर-९,
रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव,
ता. मालेगांव जिल्हा वाशिम. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, मालेगांव, ता.मालेगांव, जिल्हा वाशिम. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय,मालेगांव, जिल्हा वाशिम. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांच्या नेमणुका/नियुक्ता करताना निवडणुक आयोगाच्या कोणत्या कायदयाचा/ निर्देशाचा/ नियमांचा मार्गदर्शक त्त्वांचा/सूचनाचा अवलंब करण्यात आला त्या सर्व संदर्भाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. (२) मालेगांव तालुक्यातील कोणकोणत्या विभागाचा समावेश जसे राज्य सरकारचे विभाग, केंद्र सरकारचे विभाग, सार्वजनिक उपक्रम, निमशासकिय विभाग, जिल्हा परिषद शाळा, खाजगी अनुदानित शाळ, कनिष्ठ महाविद्यालये, वरीष्ठ महाविद्यालये किंवा इतर संस्था यांचा समावेश निवडणुकीच्या वेळी कर्तव्य करण्यासाठी होवू शकतो अशा विभागांची यादी उपरोक्त क्रमानुसार देण्यात यावी. त्या संदर्भात मा. निवडणुक आयोगाची काय तत्वे आहेत यांच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्या. (३) वरील मुद्या क्रं. २ मधील किती व कोणत्या विभागांना आपण पत्रे पाठवून कर्मचा-यांची नांवे बोलाविली त्यांचे जावक क्रमांक व दिनांकासह विवरणपत्र देण्यात यावे. (४) मुद्या क्रं. ३ नुसार किती व कोणकोणत्या विभागाची माहिती आवक क्रं. व दिनांकानुसार आपल्या कार्यालयात प्राप्त झाली याचे क्रमवार विवरणपत्र देण्यात यावे. (५) मुद्या क्रं.२ नुसार कोणकोणत्या विभागाने माहिती पाठविली नाही त्यांची नांवे व कार्यालय पत्ते यांचे विवरणपत्र देण्यात यावे. (६) ज्या विभागाची माहिती प्राप्त झाली नाही त्यांना स्मरणपत्रे पाठवून माहिती मागविली काय. किंवा त्यांनी माहिती न पाठविल्यामुळे त्यांच्यावर निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही केली आहे काय. (७) सदर निवडणुकीकरीता मालेगांव तालुक्याबाहेरील जे अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्ये लावण्यात आली होती त्यांच्या विभाग पदनाम व वेतनश्रेणीनुसार यादी देण्यात**

**( पान २ वर..)**

यावी. (८) संदर्भिय आदेशानुसार निवडणुकीकरीता जी सर्व पथके नेमली होती, त्या आदेशमध्ये नमुद केलेल्या एकुण किती मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी त्यांची कर्तव्ये/काम रद्य होण्यासाठी अर्ज दिलेत व कर्तव्ये रद्य केली, आणि त्यांच्या जागेवर दूसरे कोणते अधिकारी व कर्मचारी त्यांचे पदनाम व वेतनश्रेणीनुसार नेमले अशा सर्व केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची नांवे, नेमणूकीचे ठिकाण, पथक क्रमांक कर्तव्य रद्य करण्यासाठी दिलेले कारण आणि त्यांच्या जागी नेमलेले अधिकारी व कर्मचारी यांची नांवे, त्यांचे पदनाम व वेतनश्रेणी अशी विभागणी करुन विवरणपत्र देण्यात यावे. (९) संदर्भिय आदेशामध्ये आम्हा सर्व अधिका-यांची पदनामे का लिहण्यात आली नाहीत याची माहिती देण्यात यावी. (१०) मुद्या क्रं. ४ नुसार आपल्या कार्यालयात प्राप्त झालेल्या विविध विभागाच्या यादीमधील किती व कोणत्या कर्मचा-यांच्या डयूटीज लावण्यात आल्या नव्हत्या त्यांची यादी देण्यात यावी, आणि त्यांची कारणे सुध्दा देण्यात यावीत. वरील प्रकारच्या मुद्या क्रं. १ ते १० पावेतोच्या माहितीस झेरॅाक्स सत्यप्रती यांच्या करीता माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे जो खर्च/फी लागेल तो आम्ही सेक्रेटरी स्टॉक कौन्सील, श्री वाय.एस. निकस यांचे मार्फत देण्यास तयार आहोत. कृपया विहित मुदतीच्या कालावधीत माहिती व झेरॅाक्स प्रती प्रमाणित करुन देण्यात यावी, ही विनती."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.१.२००९ रोजी माहिती तयार असून आपण आज दिनांक १५.१.२००९ रोजी रुपये २/- प्रती पेज याप्रमाणे शासकिय फी चा भरणा करुन माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. व त्याच दिवशी दिनांक १५.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना एकुण १० पृष्ठे माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १३.३.२००७ रोजी प्रकरणाचे अवलोकन केले. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना पुरविली असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी माहिती दिली ती अतिशय त्रोटक व अपूर्ण दिली व कागदपत्रे सुध्दा उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्ता यांनी सांगितले की, प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व दिनांक १५.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव अपील खारीज करण्यात आले. त्यामुळे त्यांना जी अपूर्ण माहिती मिळाली आहे त्याबाबत कोणत्याही प्रकारचा आदेश झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करावे लागले. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, प्रथम अपीलाची सुनावणी झाली नाही व त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यासाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा

( पान ३ वर..)

**प्रथम अपीलाची सुनावणी घेवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.**

आदेश

**१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.१.२००९ च्या प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेवून मुद्येनिहाय माहितीची तपासणी करुन अपीलकर्ता यांना प्रत्येक मुद्याचे संदर्भात छायांकित प्रती विनामुल्य त्याच दिवशी उपलब्ध करुन देण्यात याव्या. व पोच घ्यावी. त्याकरीता अपीलकर्ता व उत्तरवादी यांना पुरेसा अवधी देवून लेखी नोटीस काढावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २४६/नाग/२०१०

१) सौ.रश्मि सुधीर कुलकर्णी,
प्रो. रेणुका प्लास्टर वर्क्स,
१५० पूर्व वर्धमाननगर, इस्टर्न स्पोर्टस, क्लब जवळ, नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००९३. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नागपूर
उद्योग भवन, ५ वा माळा, सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री चंद्रकांत पालोलकर हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडे, औद्योगिक भूखंडाबाबत १ जानेवारी १९९९ पासून भूखंडावर समयसीमेत उद्योग स्थापित न करणा-या भूखंड धारकांवर केल्या गेलेल्या कार्यवाहीचा तपशिल संबंधाने माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.४.२००८ रोजी, दिनांक १.४.२००४ ते २८.२.२००८ या कालावधीपर्यंतची माहिती या कार्यालयात तयार आहे. उर्वरित सहा वर्षाची माहिती तयार करुन पुरविणे शक्य होणार नसल्यामुळे आपणास उर्वरित माहिती या कार्यालयात पाहता येईल. आपण ६३ पृष्ठांकरीता २/- रुपये प्रती पृष्ठ याप्रमाणे एकुण रुप्ये १२६/- या कार्यालयात जमा करावे. तरनंतर सदर्हु माहिती आपणास पुरविण्यात येईल. माहिती डाकेद्वारे हवी असल्यास रुपये ८०/- चा भरणा करावा लागणार, असेही कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी श्री उदय जाधव, अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.६.२००८ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रादेशिक अधिकारी, नागपूर यांना मागितलेली देय माहिती मुदतीत देण्यात यावी. माहिती दिल्याचा अहवाल सादर करावा असे पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ११.७.२००८**

**( पान २ वर..)**

रोजी प्रादेशिक अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही एकुण ६-७ वर्षाची आहे. कार्यालयीन कामे सांभाळून आपण मागितलेली माहिती आपणास द्यावयाची आहे. तेव्हा सदर माहिती पुरविण्याकरीता अजून कालावधी लागण्याची शक्यता आहे. माहिती तयार करण्यात येत आहे. माहिती तयार होताच पुरविण्यात येईल असेही कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध
झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी श्री उदय जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, उद्योग सारथी, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दिनांक २२.२.२०१० रोजी दाखल केलेले दिसून येते. त्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने, या विभागाअंतर्गत एकुण ३९ औद्योगिक क्षेत्रे अस्तीत्वात असून बराच व्याप आहे. त्यामुळे बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील संपूर्ण भुखंडा बाबतची माहिती विस्तृत स्वरुपात मागितलेली आहे. त्यामुळे सदरची माहिती तयार करणेकरीता या कार्यालयाचा बराच वेळ खर्च होईल. या कार्यालयास पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे सदरची माहिती तयार करुन पुरविणे सहजपणे शक्य नाही. सदरची माहिती आपणास आवश्यक असल्यास स्वत: कार्यालयीन वेळेत हजर राहून उपलब्ध करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यापुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, एम.आय.डी.सी. मार्फत प्लॅाट अलॅाट होतात. व त्यामध्ये तीन वर्षाच्या आंत उद्योग उभारणी करणे आवश्यक असते. व ते न केल्यास योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक असते. परंतु आतापर्यंत ज्या ज्या अर्जदारांना भूखंड मिळालेला आहे त्यांनी आतापर्यंत कोणत्याही प्रकारचा उद्योग उभारलेला नहाी व वर्षोनवर्षे भूखंड तसेच पडून आहेत. व त्यांचे विरुध्द एम.आय.डी.सी. कोणतीही कार्यवाही करीत नाही, त्यामुळे ही माहिती मागितली आहे. परंतु जी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली ती सन २००४-०५ या कालावधीतील आहे. याचा अर्थ ते अजूनही मुदतीत असल्यामुळे त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. व अशा प्रकारे दिशाभूल करणारी माहिती त्यांनी मला उपलब्ध करुन दिली. व जानेवारी, १९९८ पासून मागितलेली माहिती दिलेली नाही. व आतापर्यंत माहिती देण्यास टाळाटाळ करीत आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांना आतापर्यंत जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सन २००४ पासूनच्य कालावधीतील आहे. व उर्वरित माहिती ही व्यापक व विस्तृत प्रमाणावर असल्यामुळे कार्यालयात येवून निरीक्षण करावे असे विहित मुदतीत कळविलेले आहे.

५. यावरुन माहिती नाकारलेली नसली तरी ती उपलब्ध सुध्दा करुन दिली नाही. निरीक्षणाच्या बाबत कोणत्याही प्रकारे त्यांना त्यानंतर कळविलेले दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी सुध्दा माहितीचा अर्ज केल्यानंतर ३० दिवसाच्या नंतर माहिती उपलब्ध झाली नसेल तर ३० दिवसांचे आंत म्हणजेच दिनांक ८.५.२००८ चे आंत त्यांनी प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसे प्रथम अपील दाखल न करता थेट २०१० मध्ये दाखल केले आहे. व ते प्रथम अपील त्यांनी नागपूर येथील कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांचेकडे दाखल न करता मुंबई येथे वरिष्ठ अधिकारी यांचेकडे दाखल केले. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्याकरीता नागपूर येथील कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना जी माहिती हवी आहे ती विनामुल्य

( पान ३ वर..)

**कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांनी अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे उपस्थितीत सुनावणी घेवून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती विनामुल्य, कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन दयावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २४९/नाग/२०१०

१)श्री रोशन बिहारीलाल जांगडे,
C/o तिरपूडे भवन, गुर्जर पेट्रोल पंपचे मागे, भंडारा
ता.जिल्हा भंडारा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
(लघु पाटबंधारे विभाग), जिल्हा परिषद, भंडारा.
ता.जिल्हा भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,
(लघु पाटबंधारे विभाग), जिल्हा परिषद भंडारा,
ता. जिल्हा भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांचेकडे, सन २००७-०८ ते २००९-२०१० या आर्थिक वर्षातील कालावधी( मार्च ते मार्च व अद्यावत तारखेपर्यंत) सदर विभागाचे नियोजन, निधी प्राप्तीचा अहवाल निविदा, कामाचे वाटप व पध्दती आणि आवश्यक जी.आर.ची माहिती, अशी एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांना रुपये २०५३/- चा भरणा मनी ऑर्डरने किंवा चलनाने किंवा धनादेशाद्वारे करावा असे कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या रकमेचा भरणा न करता दिनांक २६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १२.११.२००९ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांनी रुपये २०५३/- चा भरणा करावा असे कार्यकारी अभियंता यांनी कळविलेले दिसून येते. व त्यानंतरही खर्चाचा भरणा न करता अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यात चालानद्वारे भरणा करावयाचा आहे परंतु त्यात लेखाशिर्ष नमूद केलेले नाही असे कारण दिलेले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली त्या माहितीच्या संदर्भातील अतिरिक्त खर्चाचा भरणा करणारे पत्र दिनांक २६.१०.२००९ हे त्यांना मिळालेले नाही. पत्रावर दिनांक १.१०.२००९ ची तारीख असली तरी ते दिनांक २४.१०.२००९ रोजी पोस्टात टाकण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे सदरचे पत्र त्यांना**

**( पान २ वर...)**

विलंबाने मिळाले आहे. प्रथम अपील केल्यावर सुध्दा त्यात सुनावणी घेतली नाही,चौकशी केली नाही व पुन्हा अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविले आहे. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला असल्यास ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी लागते. तसेच माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी विनंती आयोगाकडे केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी जावक बारनिशीची छायांकित प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ५.१०.२००९ रोजी पत्र पाठविण्याच्या संदर्भात उपकार्यकारी अभियंता यांची सही घेण्यात आलेली आहे व त्यामुळे ते मुदतीत पत्र पाठविले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे माहितीच्या पृष्ठांचा अंदाज घेण्यासाठी विलंब झाला तरी सुध्दा अतिरिक्त खर्चाचे पत्र मुदतीत पाठविण्यात आलेले आहे. स्टॅम्प रजिस्टरवर सुध्दा दिनांक ५.१०.२००९ रोजी त्यांची सही घेण्यात आली होती. व त्यामुळे सदरचे पत्र मुदतीत पाठविण्यात आले असे जन माहिती अधिकारी म्हणून त्यांनी गृहित धरले होते. परंतु प्रत्यक्षात सदरचे पत्र दिनांक २४.१०.२००९ रोजी पाठविण्यात आल्याचे पोस्टाचे स्टँम्प वरुन दिसून येते. व त्यावरुन ते अपीलकर्ता यांना विलंबाने मिळाले हे सिध्द होते. तसेच सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता श्री एस.एन. निखार, वरिष्ठ सहाय्यक यांना उपकार्यकारी अभियंता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी पत्र दिले व त्याप्रमाणे दिनांक ३०.९.२००९ रोजी प्रष्ठ किती याबाबतची माहिती त्यांना दिली व त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक १.१०.२००९ चे पत्र तयार करुन पाठविले आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी म्हणून त्यांनी योग्य ती कार्यवाही विहित मुदतीत केलेली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केलेली असली तरी डिस्पॅाचर, जावक लिपिक यांनी सदरचे पत्र विलंबाने पाठविल्याचे दिसून येते. व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०/- ची शास्ती लादणे आवश्यक राहील. अतिरिक्त खर्चाचा भरणा केला पाहिजे व लेखाशिर्षाची कोणतीही माहिती दिली नाही या तक्रारीच्या संदर्भात अपीलकर्ता यांना मनीऑर्डरने पैसे भरण्याचा पर्याय दिला होता व तो नियमानुसार आहे. त्यामुळे तो मुद्या निकाली निघतो. कार्यकारी अभियंता यांनी मात्र त्याच वेळेस सुनावणी घेवून निर्णय दिला असता तर त्यांना पत्र हे विलंबाने निर्गमित करण्यात आले हे त्यांचे निदर्शनास आले असते. परंतु अपीलाच्या संदर्भात सुनावणी न घेता किंवा अपीलकर्ता यांचे न ऐकुण घेता, कनिष्ठांकडून आलेल्या पत्रावर सही करुन पाठविणे अशा प्रकारची कार्यपध्दती असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यांच्या विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.९.२००९ च्या अर्जात मागितलेली माहिती ही विनामुल्य कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचे स्वरुपात रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केलेली असली तरी त्यांनी केलेली कार्यवाही ही अंमलबजावणी न केल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरचे पत्र विलंबाने

( पान ३ वर..)

**मिळाल्यामुळे व डीस्पॅाचर हे सुध्दा अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यास सहाय्यभूत असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये त्यांचे विरुध्द रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दर महिन्याचे वेतनातून वसूल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करावी.**

**३) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे त्यांचे विरुध्द सक्षम अधिकारी यांनी प्रशासकिय कार्यवाही करावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५३/नाग/२०१०

१)श्री नंदकुमार ऊर्फ नंदलाल सिताराम वाघ
घर क्रं.२२२-अ, वार्ड नं.६९, कॅाफी हाऊस मागे, जुना पोस्ट ऑफिस रोड,
गोकुलपेठ, नागपूर-४४००१०. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,
महानगर पालिका, नागपूर, ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त/वार्ड अधिकारी,
धरमपेठ झोन क्रं.२, महानगर पालिका नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, महानगरपालिका नागपूर यांचेकडे, आपण दिलेला दिनांक ३१.८.२००९ चा नोटीस झेरॅाक्स सोबत जोडला आहे. त्याप्रमाणे त्यातील अनुसूची प्रमाणे दिलेल्या परवानगीचा पुर्ण तपशिल द्यावा. सोबत जोडलेल्या दिनांक ३१.८.२००९ च्या नोटीस मधील कलम ब च्या दिलेल्या परवानगीचा पूर्ण तपशिल द्यावा, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.१२.२००९ रोजी सहाय्यक आयुक्त वार्ड यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.१.२०१० रोजी दिलेला असून विभागातर्फे सहाय्यक आयुक्त यांनी अर्जदारास रितसर कळविले आहे. त्यापलीकडे माहिती उपलब्ध नाही व त्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड.श्री गजानन नाफडे यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ३१.८.२००९ रोजी मनपा तर्फे "दिलेल्या परवानगीला अनुसरुन नसल्याने" सदर्हु इमारतीचे वर नमूद केलेले बांधकाम पाडावे अशा प्रकारे नोटीस दिलेली होती व त्यामुळेच इमारतीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु दिनांक ७.१२.२००९ रोजी परवानगी दिलेली नाही अशी माहिती दिलेली आहे. व त्यामुळे नोटीस व दिलेली माहिती ही विसंगत असल्यामुळे प्रथम अपील दाखल केले आहे व प्रथम अपीलात सुध्दा तशीच माहिती**

**( पान २ वर..)**

**दिलेली असल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नोटीस संबंधीत लिपिकांनी चुकून टिकमार्क केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांस पाठविली नसल्यामुळे परवानगी देण्याचा प्रश्न नाही व त्यांना दिनांक २९.६.२००९ रोजी आपण सादर केलेल्या इमारतीचे बांधकामाचे नकाशा नागपूर शहराच्या योजने नुसार प्रस्तावित बांधकामाची जागा विद्यमान रस्ता या कारणामुळे नामंजूर करण्यात येत आहे असे कळविले आहे. त्यामुळे चुकीची माहिती दिली आहे असे म्हणता येणार नाही. चुकीची माहिती दिली याबाबत जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती माहिती ही नगररचना विभागात आहे व त्यामुळे नगररचना विभागाकडून उपलब्ध झाल्यावर ती अपीलकर्ता यांना पुरविण्यात आली आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५१/नाग/२०१०

१)श्री विनोदकुमार गंगाराम बियाला,
C/o प्रेमलाल साहू, गणेश सॉ मिल के सामने, हरीराम नगर,
पुलगाव, जिल्हा वर्धा-४४२३०२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी, भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी
ता. आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी, भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी
ता. आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, भारत एज्युकेशन सोसायटी आर्वी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतली आहे.**

**"(१) भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी के आर्थिक वर्ष १९९०-९१ तक के आर्थिक व्यवहार से संबंधीत व बॅलेंस शीट की सत्यप्रतिया. (२) भारत एज्युकेशन सोसायटी, आर्वी के आर्थिक व्यवहार जिस जिस बँक के मार्फत होते है उन सभी बँक खाते के पासबुक की सत्यप्रतिया. (३) भारत एज्युकेशन सोसायटी आर्वी ,द्वारा सार्वजनिक बांधकाम विभाग से शाला इमारत भाडा बाबत प्राप्त इमारत भाडा प्रमाणपत्र व समय समय पर प्रती तीन वर्ष बाद जब जब नवीनीकरण नुतनीकरण किया गया इन सभी की सत्यप्रतिया. (४) जब जब भारत एज्युकेशन सोसायटी आर्वी द्वारा इमारत भाडा बढाया गया तब तब बांधकाम के लिऐ नगर परिषद से की गई अनुमती, निविदाओं के दिए गए विज्ञापन मांग पत्र, निविदाए, निविदाओं से तैयार किए गए तुलनात्मक विवरण दिए गए आदेश पत्र, किए गये पेमेंट ठेकेदार का रजी.प्रमाणपत्र इत्यादि सभी कार्यवाही से संबंधीत जानकारी की सत्यप्रतियॉ." सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.४.२००९ रोजी संपूर्ण माहितीकरीता रक्कम रुपये ६,०००/-चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यामध्ये माहितीची किंमत २५०० ते ३००० पेक्षा जास्त होत नाही असे कारण दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती**

**(पान २ वर..)**

ही शिक्षण संस्थेकडे मागितली आहे व शिक्षण संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत नोंद झालेली असल्यामुळे ती सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे व त्यास मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्रमांक ५२९४/०८ च्या दिनांक २८.४.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही व त्यामुळे सदरची अपील खारीज करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता हे हजर नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे वकीलांना सदरच्या शिक्षण संस्थेस शासकिय निधी प्राप्त होतो किंवा नाही असे विचारले असता त्यांच्या संस्थेस शासकिय निधी प्राप्त होतो असे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. याचिका क्रमांक ५२९४/०८ मधील भाष्करराव शंकरराव कुळकर्णी विरुध्द राज्य माहिती आयोगाच्या संदर्भातील निर्णयाचे अवलोकन केले असता सदरचा निर्णय हा श्री गोविंद रामानंद समर्थ सदगुरु प्रल्हाद महाराज(रामदासी) संस्थान या सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या संदर्भात आहे. सदरचे संस्थान हे धार्मिक संस्थान आहे. याचा अर्थ सार्वजनिक विश्वस्त संस्था असली तरी त्या प्रत्येक सार्वजनिक विश्वस्त संस्थेचे उद्येश वेगवेगळे असतात. व त्या सार्वजनिक विश्वस्त संस्थेस शासनाचे अनुदान मिळत नसेल तर त्याच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही, हा निर्णय योग्य आहे. परंतु एखादया संस्थेस मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत सार्वजनिक विश्वस्त संस्था म्हणून पंजिबध्द असली तरी त्या संस्थेस शासनाचा निधी मिळत असल्यास सदरचा निर्णय लागू होणार नाही. व या संस्थेबाबत प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनीच मान्य केलेले आहे की, भारत एज्युकेशन सोसायटी आर्वी ही सार्वजनिक विश्वस्त संस्था म्हणजे शिक्षण संस्था आहे. व त्यास शासनाचे अनुदान आहे. त्यामुळे सदरची संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेच्या व्याख्येत समाविष्ट होते. सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

(ज)"सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ-

(क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये,

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे,

(ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे,

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे, स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे, आणि त्यात,

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो असा निकाय,

(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना,

यांचा समावेश आहे.

यावरुन सदरच्या संस्थेस शिक्षण संस्था चालविण्यासाठी शासनाकडून मोठया प्रमाणात निधी मिळत असल्यामुळे या निकषाप्रमाणे ते सार्वजनिक प्राधिकरण आहे. शासनाचे अनुदान हे वेतन अनुदान जरी असले व ते शाळेस जरी मिळत असले तरी शाळेचा प्रशासकिय कारभार हा

(पान ३ वर..)

संस्थेकडे असतो. त्याकरीता मा. उच्च न्यायालय केरळ यांचे समोरील याचिका क्रमांक ४६६८/०७ रिट पिटीशन (c) नंबर ४९३३, ६६६७, ६७१४, ६७७४, ९५४७, ९५४८, ९५९२, ९५९४, ९५९५, १२२४४, १२७३० व १३७१४/२००७ निर्णय दिनांक ४.७.२००७ यामध्ये अनुदानित महाविद्यालयाच्या संदर्भात माहिती मागितली होती. त्यामध्ये (A) Right to Information Act (२२ of २००५), S.२(h)- 'Public authority' -Private aided colleges controlled and substantially financed directly or indirectly by funds provided by appropriate Govt. - colleges also privy to information relating to students and staff which is not private or sensitive information -private or sensitive information- private aided college covered by definition of 'public authority'.

It has been observed by your Lordship in short, every facet of the functions of these aided private colleges is strictly controlled and financed by the Government. For coming within the definition of Public authority either control or financing by Government need be satisfied. In this case, both the conditions are satisfied. In the above circumstances, I have no doubt in my mind that these aided private colleges are bodies controlled and substantially financed directly or indirectly by the funds provided by appropriate Government. Further, these colleges deal with information relating to educational activities pertaining to students who pay fees to the Government and teachers and staff whose salaries are paid by the Government. When these colleges are financed and controlled by the Government and Universities and they are privy to information relating to students and staff those information do not have the character of private or sensitive information and the public have a right of access to such information so as to ensure transparency in the conduct of the management of the colleges in which the public are witally interested. Denial of such information would be against the very object of the statute. Essentially much of these information relate to students, teachers and staff of these colleges, and not to any information to any private activities of the management of the colleges. That being so, these colleges would certainly answer the definition of public authority under Section २(h) of the Act.

तसेच शासन नवीन शाळा मंजूर करतांना जी संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० च्या प्रमाणे तसेच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० प्रमाणे नोंदणी झालेली आहे अशाच संस्थांना शाळा सुरु करण्याची मंजूरी मिळते. वैयक्तिक व्यक्तीला शाळा सुरु करण्याची मंजूरी दिली जात नाही. माध्यमिक शाळा संहिता ही शासनाने प्रसिध्द केली आहे. सदरच्या माध्यमिक शाळा संहिता, अशासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना

( पान ४ वर..)

अनुदानासाठी शासनाकडून लागू करण्यात आलेली संहिता आहे. व ही संहिता १९६३ पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या संहितेमध्ये माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी परवानगी मिळविण्याचा अर्ज परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या नमुन्यात करावा असे मान्यतेच्या शर्ती, मंजूरी, मान्यता नाकारणे व काढून घेणे या भागात दिलेले आहे. तसेच २.८ मध्ये नवीन माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत खालील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाचीच शिफारस करण्यात येईल.

(१) संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि किंवा मुंबई सार्वजनिक विश्वसत अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

(२) संस्थेत मागील सलग दोन वर्षात किमान तीस हजार रुपये निधी शिल्लक असावा. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जी संस्था आदिवासी उपयोजना क्षेत्रात माध्यमिक शाळा सुरु करु इच्छिते अशा संस्थांच्या बाबतीत रुपये १०,०००/- चा निधी संस्थेत शिल्लक असावा किंवा वरील रकमेइतके संबंधीत संस्थेबाबत बँकेमार्फत हमीपत्र दिले गेले असावे.

(३) संस्थेने मागील सतत किमान दोन वर्षाचा सनदी लेखपालामार्फत लेखा परीक्षा अहवाल सादर केलेला असावा.

(४)ज्या ठिकाणी नवीन शाळा सुरु करावयाची आहे त्या ठिकाणी शाळेसाठी संस्थेच्या मालकीची किंवा भाडयाची किमान जागा वा इमारत उपलब्ध असावी.

(५)संस्थेच्या एकूण सदस्यांपैकी किमान ३० टक्के सदस्य महिला असाव्यात.

(६) संस्थेतील कोणत्याही सदस्यास भारतीय दंड संहितेच्या तरतुदीनुसार गंभीर गुन्हयाबाबत तुरुंगवासाची शिक्षा झालेली नसावी.

वरील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाची शिफारस करण्यात येईल अशी तरतुद आहे. यावरुन नवीन शाळा सुरु करावयाची परवानगी ही फक्त नोंदणीकृत संस्थांना मिळते हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे अनुदानासाठी अर्ज, अशा प्रकारची जी तरतुद आहे त्यामध्ये सुध्दा ८६.२ मध्ये सहाय्यक अनुदानाची पात्रता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे- खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १८६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्रमांक एकवीस किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० किंवा शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी न केलेल्या शाळा, जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा) हया लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत. तसेच अनुदानाचे प्रकार यामध्ये- मान्यताप्राप्त शाळा मंजुरी प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालील प्रकारची अनुदाने मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवीत असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.

(१) वेतन अनुदान

(२) वेतनेतर अनुदान

(३) इमारत अनुदान आणि

(४)शासन वेळोवेळी मंजूर करील अशी इतर अनुदाने.

( पान ५ वर..)

**यावरुन संस्थांनी अटी व शर्ती पूर्ण केल्यानंतरच अनुदान मंजूर होते. व त्यामुळे सदरचे अनुदान प्रत्यक्ष शाळेस देण्यात आलेले असले तरी ते संस्थेच्या माध्यमातून देण्यात येते. याचा अर्थ सदरचे अनुदान हे मान्यताप्राप्त किंवा अटी व शर्ती पूर्ण करणा-या संस्थेसच असते असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यातही नियंत्रणाचा विचार केल्यास माध्यमिक शाळा संहितेमध्ये खाजगी शाळेच्या संदर्भात कशा प्रकारचे नियंत्रण आहे याबद्दलचे संपूर्ण नियम दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या अटी व शर्ती विनियमन अधिनियम, १९७७) यामध्ये सुध्दा खाजगी शाळेच्या संदर्भात तरतुद करण्यात आलेली आहे. व त्यामुळे शाळेला अनुदान मिळते परंतु, संस्थेला अनुदान मिळत नाही हे म्हणणे बरोबर नसल्यामुळे संस्थेस शाळेच्या कामकाजाच्या संदर्भात माहिती मागितली तर संस्थेच्या माहिती अधिका-यांनी ती देणे आवश्यक आहे व त्यामुळे अनुदानित शिक्षण संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत समाविष्ट होते, अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे अपील क्रमांक २५१/नाग/२०१० हे मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.३.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली सर्व माहिती, अपीलकर्ता यांनी अतिरिक्त माहितीच्या खर्चाचा भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २४७/नाग/२०१०

१)श्री सारंग भाऊराव दाभेकर,
गांधी वार्ड, चिमूर, ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर, ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर, ता.चिमूर,जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, चिमूर यांचेकडे दिनांक ४.१२.२००९, २.१२.२००९, २१.११.२००९, १.१०.२००९, ८.१२.२००९ व दिनांक २०.१२.२००८ च्या पत्रांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागितलेला दिसून येतो. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १७.२.२०१० रोजी आदेश करुन ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे पत्र दिले. त्यानंतर दिनांक २३.३.२०१० रोजी स्मरणपत्र दिले. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांची जी सर्व पत्रे आहेत ती पत्रे दिनांक २२.१२.२००९ रोजी कार्यवाही करण्याकरीता श्री पी.एस.अल्लीवार यांचेकडून माहिती मागविण्यासाठी पत्र दिले होते. त्यानंतर दिनांक २.१.२०१० रोजी सुध्दा माहिती तात्काळ सादर करावी असे पत्र दिले होते. दोनही पत्रांच्या प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेल्या आहेत. दिनांक २२.१.२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणीसाठी पत्र देण्यात आले. व त्यानंतर दिनांक १७.२.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला. गट विकास अधिकारी यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी पुन्हा श्री अल्लीवार यांना पत्र दिले. व त्यानंतर दिनांक ३०.३.२०१० रोजी सर्व पत्रांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती विलंबाने कां दिली याबाबत विचारले असता चौकशी करुन अहवाल सादर करावयाचा होता व**

**( पान २ वर..)**

**त्या सर्व अर्जांच्या संदर्भात चौकशी झालेली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे असे त्यांनी सांगितले.**

**अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व द्वितीय अपीलाच्या सुनावणीस ते हजर न राहिल्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे असे गृहित धरुन सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५८/नाग/२०१०

१)श्री केशव साधू तितिरमारे,
मु.रोहा, पो. बेटाळा, ता.मोहाडी, जिल्हा भंडारा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(महसुल)
भंडारा. ता.जिल्हा भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, भंडारा यांचेकडे, आबादी प्लॅाटचे वाटपाच्या संदर्भात जुलै, २००९ च्या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, जुलै, २००९ पासून प्लॅाट वाटपाची विक्री होत आहे. वास्तविक सदरचे प्लॅाट सरकार जमा होणे आवश्यक आहे. त्या संदर्भात माहिती मागितली होती. व तक्रार केली होती. परंतु त्या तक्रार अर्जाची चौक शी करण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही तहसिलदार यांचे स्तरावरील असल्यामुळे तो अर्ज तहसिलदार यांचेकडे पाठविला. परंतु अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता गैरहजर आहे या कारणास्तव अपील खारीज केले आहे असे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचेकडे कोणते सरकारी कागदपत्रे असतील याबाबतचा विचार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी करणे आवश्यक असते. माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी अधिनियमाचे कलम १९(५) अन्वये जन माहिती अधिकारी यांची आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केल्यावर जन माहिती अधिकारी यांना विचारणा करणे योग्य असते. परंतु ते न करता अपीलकर्ता हजर नाही म्हणून अपील खारीज करतात याचा अर्थ प्रथम अपीलीय अधिकारी यांना कोणत्याही प्रकारचे कायदयाचे ज्ञान आहे असे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी तहसिलदार यांचेकडे अर्ज पाठविल्यावर त्याबाबत तहसिलदार**

**( पान २ वर..)**

**यांनी काय कार्यवाही केली किंवा माहिती दिली आहे किंवा नाही हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी चौकशी करणे आवश्यक होते. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी तहसिलदार यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले असून सुध्दा तहसिलदार यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी १० दिवसांचे आंत तहसिलदार यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व ती अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरवावी.**

**२) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार यांना माहिती उपलब्ध करुन द्या असे आदेश दिलेले असून सुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे.सदरच्या शास्तीची वसुली संबंधीत तहसिलदार यांचे दर महिन्याचे पगारातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करावी.**

**३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची चौकशी केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५५/नाग/२०१०

१)श्री राजू धरमदास शेन्डे,
ई/३४, संत मार्टिन नगर, जरीपटका, नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रिकर सह आयुक्त,
नागपूर. ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, विक्रिकर सह आयुक्त कार्यालय,
नागपूर. ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, ऑल इंडिया रिपोर्टर G-४० विक्रिकराची माहिती, मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२.१.२०१० रोजी ऑल इंडिया रिपोर्टर जी-१४ नागपूर या व्यापा-याचा सन २०००-२००१ व २००१-२००२ या वर्षाच्या निर्धारण प्रलंबित असल्यामुळे आपणास हवी असणारी विक्रीकरा संबंधी माहिती आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ७.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. आता ती दिली आहे व ती अपूर्ण आहे.त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना कर निर्धारणाचे आदेश दिले आहे व त्यावर कर आकारणी दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५६/नाग/२०१०

१)श्री मधुसुदन श्रावणजी पाटील,
रहाटे ले आऊट, परसोडी उमरेड, ता.उमरेड, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर.ता.जि.नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय,उमरेड, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, ११.५.२००९ ते ४.८.२००९ या कालावधीतील मोजणीची क प्रत मिळण्याबाबत एकुण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.१०.२००९ रोजी माहितीच्या करीता प्रति पृष्ठ रुपये २/- प्रमाणे भरणा करुन माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ६.११.२००९ रोजी कार्यालय प्रमुखांनी सदर मोजणी प्रकरणात फेर मोजणी अरण्याची आवश्यकता वाटते. फेर मोजणी झाल्यावर आपणास क प्रत देण्यात येईल व मोजणीची तारीख आपणास लवकर कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. आपला नगर भूमापन क्रं. ६७९२ चा नकाशा उपलब्ध आहे. आवश्यक फी भरुन घेवून जावे असेही कळविलेले दिसून येते. परंतु दिनांक २४.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.१.२०१० रोजी दिला असून मागितलेली माहिती मुदतीत दिली आहे. क प्रत मुदतीत दिली नाही. अर्जदार यांना मागणी केलेली माहिती नियमानुसार द्यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो.समाधान न
झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे क प्रत देण्यास हरकत नव्हती. परंतु मोजणीच्या संदर्भात लगतच्या शेतजमीनीच्या मालकांचा आक्षेप असल्यामुळे फेर मोजणी करणे आवश्यक आहे, असे कार्यालय प्रमुखांनी निष्कर्ष काढला व त्याप्रमाणे दिनांक ६.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना कळविले होते. परंतु अपीलकर्ता यांनी फेर मोजणीस सहकार्य केलेले नसल्यामुळे फेर मोजणी होऊ शकली नाही व त्यामुळे क प्रत त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही. तसे त्यांना दिनांक २९.३.२०१० रोजी कळविण्यात आले होते. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, फेर मोजणीचा आक्षेप आल्यास ज्यांनी आक्षेप**

**( पान २ वर..)**

**घेतला त्यांची शेत मोजणी आवश्यक नाही. परंतु तसे काही नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. फेर मोजणी झाल्यावर क प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. व त्यामुळे फेर मोजणी करुन अपीलकर्ता यांना क प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे फेर मोजणी केल्यानंतरच अपीलकर्ता यांना क प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५७/नाग/२०१०

१)श्री गंगाधर गणपतराव चित्रीव,
ह.मु.जिल्हा परिषद कॅालनी क्रं.१, गणेशपुर, भंडारा. जि.भंडारा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद भंडार.
ता.जिल्हा भंडारा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
(सामान्य प्रशासन विभाग) जिल्हा परिषद भंडारा.
ता.जिल्हा भंडारा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचेकडे, (१) वरिष्ठ सहाय्यकांची जेष्ठता यादी सन १९९७-९८ व सन ९७-९८, ९८-९९ वर्षात पदोन्नत अधीक्षक म्हणून पदोन्नतीचे आदेश. (२) अधीक्षक यांची जेष्ठता यादी सन १९९९-२००० व सन १९९९-२०००, २०००-२००१ वर्षात कक्ष अधिकारी म्हणून पदोन्नतीचे आदेश (३) वर्ग-२ सि.डी.पी.ओ./बी.डी.ओ. यांची जेष्ठता यादी सन २००१-२००२ व पदोन्नतीचे आदेश, अशी माहिती स्वत: घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.११.२००९ माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला परंतु अपीलकर्ता यांनी घेतली नाही व दिनांक ३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.१२.२००९ रोजी दिला असून अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क न भरता माहिती अप्राप्त आहे असे सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांना शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेता येईल असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली आहे त्यापेक्षा वेगळी माहिती देण्याचा प्रयत्न झाल्यामुळे मी माहिती घेतली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या दिनांक ३.१०.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अपीलकर्ता यांनी पुन्हा एक अर्ज सादर करुन त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असा अर्ज दिला व त्यामुळे त्यांनी ती माहिती**

**( पान २ वर..))**

**उपलब्ध करुन घेतली नाही. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक ३.१०.२००९ च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यात पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.१०.२००९ च्या अर्जातील संपूर्ण माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५९/नाग/२०१०

१)श्री मिलिन्द शिवाजी भगत
४०, शिवराज नगर, रोड क्रं.६, विश्वकर्मा नगर,
नागपूर-२७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
वेतन व भविष्य निधी पथक(माध्यमिक)कार्यालय,
रविनगर, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, बी.पी.एड.पात्रता धारकांना पी.टी.आय. या पदावर मान्यता देण्यात येते व ती मान्यता देण्यासाठी शासनाचे आदेश व इतर शासनाचे आदेश याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.११.२००९ रोजी बी.पी.एड. पात्रता धारकांना सहशिक्षक म्हणून मान्यता देण्याची कार्यवाही या स्तरावरुन होत नसल्यामुळे तसे शासन निर्णय या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत असे कळविलेले दिसून येते. मात्र बी.पी.एड. पात्रता धारकांना रुपये ५५००-९००० ही वेतन श्रेणी देण्याबाबत शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे**

**( पान २ वर..)**

**राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितच्या संदर्भात वेतन व भविष्य निधी पथक कार्यालयात बी.पी.एड. पात्रता धारकांना सहाय्यक शिक्षकाची मान्यता देण्याची कार्यवाही होत नाही. तसेच कोणत्याही पदाला नियुक्तीची मान्यता देण्याची कार्यवाही या कार्यालयाकडून होत नाही असे कळविलेले आहे. यावरुन माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २६०/नाग/२०१०

१)श्री अब्दुल मजीद व अब्दुल करीम,
गांधी ले आऊट, खडड कंपनी मागे, कळमना रोड, कामठी,
ता.कामठी, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,
कामठी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, copies of written statement given on १२.८.२००९ by Shri Abdul Hafij and Smt. Bismillah, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.१२.२००९ रोजी घर क्रमांक एम/८५ एम-९० च्या अवैध फेरफार घेतल्याबाबत दिनांक १२.८.२००९ ची तसेच नायब तहसिलदार यांच्या दिनांक ३१.७.२००९ ची प्रमाणित प्रत नियमानुसार रक्कम खजीना दाखल करुन त्वरीत माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. व त्यावर अपीलकर्ता यांच्या पत्नीचे दिनांक ४.१.२०१० रोजीचे स्विकृतीची सही दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जन**

**( पान २ वर..)**

**माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती घेवून जावी असे अपीलकर्ता यांच्या पत्नीस दिनांक २१.१२.२००९ रोजी पत्र दिले होते व त्याची स्विकृती आहे. परंतु अपीलकर्ता यांनी असे सांगितले की अशा प्रकारचे कोणतेही पत्र त्यांना मिळालेले नाही. व ३० दिवसांचे आंत सदरची माहिती घेण्यास गेले याबाबतचा कोणताही पुरावा त्यांचेकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या दोनही बयाणाच्या प्रती उपलब्ध आहे व त्या अपीलकर्ता यांना आजही उपलब्ध करुन देता येतील व त्याच दिवशी त्यांना त्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५०/नाग/२०१०

१)श्री विनोदकुमार गंगाराम बियाला
द्वारा प्रेमलाल साहू, गणेश सॉ मिल के सामने, हरिहर नगर,
पुलगांव जिल्हा वर्धा-४४२३०२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी
न्यू लोकहित शिक्षण संस्था,
द्वारा धैर्यशीलराव वाघ कनिष्ठ महाविद्यालय, रोहणा,
ता. आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी
न्यू लोकहित शिक्षण संस्था,
द्वारा धैर्यशीलराव वाघ कनिष्ठ महाविद्यालय, रोहणा,
ता. आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१०रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, लोकहित शिक्षण संस्था रोहणा के आर्थिक वर्ष ९०-९१ से २००७-०८ तक के आर्थिक व्यवहार से संबंधीत व बँलेंस शीट की सत्यप्रतीयॉ. (२) लोकहित शिक्षण संस्था रोहणा के आर्थिक व्यवहार जिस जिस बँक से मार्फत होते है उन सभी बँक खाते के पासबुक की सत्यप्रतीयॉ. (३) लोकहित शिक्षण संस्था रोहणा द्वारा सार्वजनिक बांधकाम विभाग से शाला इमारत भाडा बाबत प्राप्त इमारत भाडा प्रमाणपत्र समय समय पर प्रती तीन वर्ष बाद जब जब नवीनीकरण नुतनीकरण किया गया उस सभी की सत्याप्रतीयॉा. (४) लोकहित शिक्षण संस्था रोहणा द्वारा इमारत भाडा बढाचा गया तब तब बांधकाम के लिए नगर परिष से ली गई अनुमती ग्रामपंचायत से ली गई अनुमती, निविदांओं के लिए दिय गए विज्ञापन, मांग पत्र, प्राप्त निविदाए, निविदाओं से तैयार किय गए तुलनात्मक विवरण दिए गए आदेश पत्र, किए गये पेमेंट, ठेकेदार का रजिस्टर प्रमाणपत्र इत्यादि सभी कार्यवाही से संबंधीत जानकारी की सत्यप्रतीया, अशी माहिती मागितलेली दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीची सर्व कागदपत्रे ऑडीट करीता सादर केली आहे. ती प्राप्त होताच उपलब्ध करुन देण्यात येईल असे**

**( पान २ वर..)**

**कळविलेले दिसून येते. परंतु अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता व उत्तरवादी सुनावणीस गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे नमूद केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसे न केल्यास ते रुपये २५,०००/- शास्तीस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.३.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.३.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २६७/नाग/२०१०

अपील क्रं. २६८/नाग/२०१०

१)श्री कृष्णा गोपाळराव कोंडलकर,
C/o हेमंत कृष्णराव कोंडलकर, कृषी विज्ञान संस्था, कर्मचारी परीसर
क्वार्टर नं.सी-६, पिंपरी (मेघे) , ता.जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,
गोंडपीपरी, ता. गोंडपीपरी, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
गोंडपीपरी, ता. गोंडपीपरी, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

अपील क्रमांक २६८/नाग/२०१०

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
राजूरा, ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
राजूरा, ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० व १२.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपील क्रमांक २६८/नाग/२०१० मध्ये उत्तरवादी गैरहजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलांमध्ये दिनांक ११.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयामध्ये सन १९९७ मधील वैद्यकिय बील मंजूरीबाबतची तसेच एल.टी.सी. सन २००० मधील माहिती. सदर देयके मंजूर केली असल्यास मंजूरी क्रमांक व दिनांक तसेच नामंजूर केली असल्यास क्रमांक व दिनांक इ. टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.७.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी ११.११.२००९ रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेले दिसून येते. दोनही प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.११.२००९ रोजी देण्यात आला परंतु सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली दिसून येतात.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी रजा प्रवास सवलतीचे देयक व**

**( पान २ वर..)**

**वैद्यकिय देयक ही मुदतीत सादर केली आहे. व त्याकरीता त्यांनी पाठपुरावा सुध्दा केला होता. परंतु त्या देयकांचे भूगतान मिळाले नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचा रजा प्रवास अर्ज दिसून येतात परंतु देयके सादर केलेली दिसून येत नाही. व वैद्यकिय देयकाच्या संदर्भात सुध्दा ती सादर केली किंवा नाही ती आढळून येत नाही. त्यामुळे त्यांनी दिनांक १४.७.२००९ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलांच्या संदर्भात सुध्दा दिनांक २३.११.२००९ रोजी स्पष्टपणे कळविण्यात आलेले आहे. असे असले तरी दिनांक २६.१२.२००८ रोजी लेखा अधिकारी, विभागीय कृषि सहाय्यक संचालक, नागपूर यांचेकडे पत्र दिले होते व त्या पत्राप्रमाणे सुध्दा दिनांक ६.१.२००९ रोजी त्यांना, आपले क्रमांक १ वैद्यकिय बिल रुपये १२५००/- कालावधी १९९३, क्रं. २ वैद्यकिय बील रुपये ५५००/- कालावाधी १९९७ व प्रवास सवलत रजा रुपये ३५००/- कालावधी २००० नियमाप्रमाणे ६ महिन्याचे आंत सादर केल्याचे आपण नमूद केलेले आहे. तालुका कृषि अधिकारी गोंडपिपरी यांना आपण ६ महिन्याच्या आंत सादर केले असल्यास पोचपावतीची झेरॉक्स सत्यप्रत करुन या कार्यालयास कळवावी जेणेकरुन संबंधीत कार्यालयास तपासणी करण्याचे आदेश देणे सोईचे होईल असे कळविलेले दिसून येते.**

**यावरुन अपीलकर्ता यांना माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांची अपेक्षा ही अभिलेखे उपलब्ध नाही म्हणून कार्यवाही करावी अशी दिसून येते. परंतु, सन १९९३, १९९७ व २००० या कालावधीतील कोणतेही अधिकारी आज उपस्थित नाही व त्याबाबतची जबाबदारी निश्चित करणे शक्य होत नाही व त्यामुळे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.**

## आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २६७/नाग/२०१० व अपील क्रमांक २६८/नाग/२०१० हे खारीज करण्यात येत आहेत.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २६४/नाग/२०१०

१)श्री नरेंद्र मधुकर साखरकर,
रा.सुमठाणा, पो. कोसरसार, ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक,
उत्तर चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी(मुख्यालय व नियोजन)
उत्तर चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, सन २०००-२००९ पर्यंत अनुशेष भरण्यात आलेली वर्ग ३ ची पदे व रिक्त असलेल्याचा तपशिल. (२) सन २०००-२००९ पर्यंत धरणग्रस्त अनुशेष याची जात कॅडर नुसार तपशिलवार माहिती पाहिजेत. (३) २०००-२००९ पर्यंत अनुशेष अंतर्गत धरणग्रस्त बुडीत क्षेत्रातील भरण्यात आलेल्या व्यक्तीचा पूर्ण नांवासहित तपशिल देण्यात यावा,अशी माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेला दिसून येतो व दिनांक ९.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.२.२०१० रोजी देण्यात आला असून त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली व**

**( पान २ वर..)**

**त्यावर अपीलकर्ता यांनी आक्षेप दिला आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. तो आक्षेप हा प्रक्रियेबाबत आहे. परंतु माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता हे आज हजर राहीले नाही असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २६५/नाग/२०१०

१)श्री रविंद्र बाबाजी वासेकर, मु.पो.लोंढोली,
ता. सावली, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती सावली,ता.सावली,जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा,लोंढोली,
ता.सावली,जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे, सर्व शिक्षण अभियाना अंतर्गत २ खोली शाळा बांधकाम अकुशल कारागीरास ठेका पध्दतीने देवून आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन आपण भ्रष्टाचार करीत असल्याबाबत एकुण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.१०.२००९ रोजी एकुण ३२ पृष्ठांचे प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे रुपये ६४/- या कार्यालयात भरणा करुन माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ७.११.२००९ रोजी माहिती अधिकारी यांनी युपीसीने, आपण मागितलेली माहिती तयार करुन ठेवण्यात आली व आपल्याला माहिती घेवून जाण्यासंबंधी वारंवार सूचना देवूनही आपण माहिती घेवून गेले नाही. तरी आपल्याला माहिती घेवून जाण्यासंबंधी लेखी कळविण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस दि. १६.१०.२००९ रोजी तयार करुन ठेवण्यात आलेली माहिती एकुण २१ पृष्ठे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतर दिनांक ९.१२.२००९ रोजी पुन्हा मुद्या क्रमांक २, ४ व ५ ची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. दिनांक १८.१२.२००९ रोजी पुन्हा ८ पृष्ठांची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. व प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक निरंक रोजी देण्यात आलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येतात.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,**

**( पान २ वर..)**

**अपीलकर्ता यांना दिनांक १०.१०.२००९ रोजी रुपये भरणा केल्यानंतर दिनांक ११.१०.२००९ ते १३.१०.२००९ पर्यंत निवडणुकीचे कामात व्यस्त असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर छायांकित प्रती काढून माहिती तयार करुन ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता हे माहिती घेण्यास आले नाही. त्यामुळे दिनांक ७.११.२००९ रोजी युपीसीने पत्र पाठविण्यात आले होते. परंतु त्यानंतरही माहिती घेण्यास अपीलकर्ता आले नाही. तसेच अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद केले असल्यामुळे ते व्यक्तीशः माहिती घेण्यास गेले किंवा नाही याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी सांगीतले की, माहिती घेण्यास गेलो होतो परंतु माहिती दिली नाही. परंतु ३० व्या दिवशी माहिती जर मिळत नसेल तर आक्षेप घेणारे पत्र देणे आवश्यक असते व तसे ते दिलेले दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत दोन खोल्या बांधकामाकरीता ठेका देता येत नाही व मजूराकडून ते काम करुन घ्यावे लागते. अपीलकर्ता यांना ठेका न दिल्यामुळे ते त्रास देत आहे. दोन खोल्या बांधकामावर अपीलकर्ता यांचा भाऊ हा मजूर आहे व तरीही अपीलकर्ता अशा प्रकारची माहिती मागवून वेठीस धरीत आहे व माहिती देण्यास तयार असून माहीती घेवून जात नाही. या एकुणच संपूर्ण कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती घेवून जाण्यास कळविले आहे व अपीलकर्ता यांना माहिती सुध्दा उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७०/नाग/२०१०

१)श्री रशीद अब्दुल सत्तारशेख,
सोमवारी क्वार्टर नं.१८६:३, जूने ९८० गाळ, म्हाडा कॅालोनी,
नागपूर-९. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडे, (१) सौ.वत्छलाबाईनी दिनांक १९९२-९३ ला अर्ज दिला होता तो अर्ज हौसिंग बोर्डाने कोणत्या तारखेला रद्य केला आहे. (२) मी दिनांक १९९९ ला अर्ज दिला होता तो अर्ज हौसिंग बोर्डाने कोणत्या तारखेला रद्य केला आहे. एक पानाच्या माध्यमाने माहिती देण्याची कृपा करावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.१०.२००९ रोजी आपणास पाहिजे असलेली माहिती प्रती कॅापी २/- रुपये प्रमाणे या कार्यालयात भरल्यास देता येईल. आपण परस्पर या कार्यालयाशी संपर्क साधावा जेणेकरुन आपणास नस्ती दाखवून पाहिजे असलेली माहिती त्वरीत देता येईल व प्रकरण नस्तीबंद करण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००९ रोजी पुन्हा एक अर्ज केलेला दिसून येतो. त्यावर दिनांक १९.१२.२००९ ला तक्रारकर्ते मला भेटले त्यांना नस्ती दाखविण्याबाबत सांगीतले असता त्यांनी सांगितले की, जे कागदपत्रे नाही त्याची प्रती मला नको व रुपये २/- चे भरणा करु शकत नाही. त्यांना नस्ती पाहून त्यातील प्रती सांगावे व त्यानंतर रुपये २/- प्रमाणे रक्कम स्विकारता येईल. त्यावर त्यांनी म्हटले की, त्या प्रती या नस्तीत नही त्यामुळे तसे मला कळवावे. व त्यानंतर दिनांक २४.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी आपणास पाहिजे असलेली माहिती त्या नस्तीत नाही असे तोंडी सांगून नकार दिला. पाहिजे असलेल्या प्रती नस्तीमधून**

**( पान २ वर..)**

**देता येईल. प्रलंबीत प्रकरणासाठी जबाबदार नाही असे कळविलेले दिसून येते.त्यानंतर दिनांक ८.१.२०१० रोजी आपणास गाळा क्रं. १८६/३, ९८० गाळे अर्थसहाय्यीत औद्योगिक वसाहत जूनी सोमवारी पेठ ही नस्ती दिनांक ५.१.२०१० रोजी दाखविली व आपण मा. मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता त्यांनी मार्गदर्शन केले की, नस्तीतील पृष्ठ क्रमांक १ ते ८८९ चे अवलोकन केल असता मागणी केलेली माहिती प्रथम दर्शनी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येते. प्रथम अपीलाचा निर्णय टिपणीच्या स्वरुपात आहे व त्यात सुध्दा अशाच प्रकारे निष्कर्ष काढलेला असल्यामुळे त्याप्रमाणे कळवावे असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक ८.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना स्पष्टपणे कळविले. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, नस्तीचे अवलोकन केले असता त्यात त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नाही. तसेच अपीलकर्ता यांनी तीच माहिती करीता अपील क्रमांक ६३/२००९ हे दाखल केले होते. सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक २३.६.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात नस्तीचे अवलोकन द्यावे व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य द्याव्या असा निर्णय आयोगाने दिलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती उपलब्ध नाही हे सुध्दा दिनांक ८.२.२००९ रोजी कळविलेले असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २६२/नाग/२०१०

१)श्री शंकर उपासराव दमके,
७२, कानफाडे नगर, वर्धा रोड, नागपूर. ता.जि.नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनियंत्रक,
वैध मापन शास्त्र, नागपूर विभाग, नागपूर
जूने सचिवालय, नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियंत्रक,
वैध मापन शास्त्र, नागपूर विभाग, नागपर
जूने सचिवालय, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनियंत्रक, वजन व मापे यांचेकडे, नागपूर महानगरपालिकेच्या हद्यीत आईस्क्रीमचे पॅकेजवर स्टीकर्स लावलेल्या कोणत्या दुकानातून जप्ती केले तसेच अेकाच पॅकेटवर दोन किमती आढळल्या त्याबाबत आपण कोणती व दिनशॅा दुध आणि दिनशॅा आईस याबाबत माहिती परस्पर देणे . दिनशावर आईस आणि दुधाबाबत किती केसेस करण्यात आल्या,किती कोर्टामध्ये सुरु आहे आणि कोणत्या कोर्टात सुरु आहे, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.२.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता गैरहजर होते. परंतु जन माहिती अधिकारी हे हजर होते. जन माहिती अधिकारी यांनी अपीलीय अधिकारी यांना दिलेली माहिती ही सहाय्यक नियंत्रक, वैद्यमापन शस्त्र नागपूर यांचेकडून प्राप्त झाली असून ती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज व कागदपत्र दाखविले. सहाय्यक नियंत्रक वैध मापन शास्त्र नागपूर यांनी कळविल्यानुसार दिनशा आईस्क्रीम व दुध या सिलबंद आवेष्टनावर वजने मापे मानके (अंमलबजावणी) अधिनियम १९८५ व वजने मापे मानके (आवेष्टीत वस्तू) नियम १९७७ नुसार घोषवाक्य बरोबर असल्यामुळे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी चुकीची माहिती दिली व दिशाभूल केली हे**

**( पान २ वर..)**

**केलेले विधान चुकीचे व निरर्थक आहे, असा निर्णय देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना दिलेली नाही व जी माहिती मागितली नाही ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे अपीलाचे जे कारण दिलेले आहे त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती पेक्षा कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सांगितले की, अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झालेले नसेल तर जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती दिली किंवा नाही याबाबतची माहिती घेवून निर्णय दिलेला आहे. अपीलकर्ता यांच्या सर्व अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना कार्यवाहीची अपेक्षा आहे. त्यांनी पुर्वी अनेक तक्रारी केलेल्या आहेत असे सांगितले. त्यामुळे सदरच्या तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती किंवा अहवाल त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक ११.१२.२००९ च्या अर्जामध्ये त्यांनी तशी मागणी केलेली नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या पुर्वीच्या तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. व दिनांक ११.१२.२००९ च्या अर्जाप्रमाणे तशी माहिती उपलब्ध आहे तशी ती दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांच्या पुर्वीच्या तक्रारींवर झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६१/नाग/२०१०
अपील क्रं. ६२/नाग/२०१०

१)श्री गोपाल बालाजी झाडे,
८, पुरोहित ले आऊट, अंबाझरी,
नागपूर-४४००३३. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव,
पशु संवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
कृषि, पशुसंवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. अपील क्रमांक ६१/नाग/२०१० मध्ये उत्तरवादी हजर आहेत. व अपील क्रमांक ६२/नाग/२०१० मध्ये जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.**

**१. अपील क्रमांक ६१/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, कषि, पशुसंवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग यांचेकडे एकुण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.११.२००८ रोजी अधिनियमाचे कलम ८(त्र) अन्वये माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सुनावणी घेतली नाही व निर्णय दिलेला नाही. त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देण्याकरीता सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे परत करण्यास पात्र आहे.**

**३. अपील क्रमांक ६२/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, कषि, पशुसंवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विकास**

**( पान २ वर..)**

**विभाग यांचेकडे, श्री आर.आर. खराबे, माजी व्यवस्थापक यांचे प्रकरणात एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.०७.२००८ रोजी अधिनियमाचे कलम ८(त्र) अन्वये माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सुनावणी घेतली नाही व निर्णय दिलेला नाही. त्यामुळे द्वितीय अपील दाखल करण्यास विलंब झाला. त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुनावणी घेवून निर्णय देण्याकरीता परत करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६१/नाग/२०१० व अपील क्रमांक ६२/नाग/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव, पशु संवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचेकडे परत करण्यात येत असून सदरच्या दोनही अपीलांची त्यांनी दिनांक ११.५.२०१० रोजी सुनावणी घेवून निर्णय देण्यात यावा.**

**२) सदरची दोनही अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७१/नाग/२०१०

१)श्री विलास कवडूजी वरभे,
द्वारा-कवडूजी वरभे, न्यु राष्ट्रीय विद्यालयाचे मागे, वडाळा (पेकू)
ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर-४४२९०३. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, यांचेकडे, भिवाजी वरभे कनिष्ठ कला महा. बोथली, ता. चिमूर जिल्हा चंद्रपूर येथील सन २००६-०७ ला श्री अे.आर. मोडघरे, शिक्षण सेवकाचे पदाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.१०.२००९ रोजी, सदरची माहिती कार्यालयातील दस्तऐवजाचा शोध घेतला असता दिसून येत नाही, त्यामुळे पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तरी सुध्दा उर्वरित माहितीच्या १२४ पृष्ठांकरीता रुपये २४८/- चालानद्वारे भरणा करुन चालानची मुळ प्रत या कार्यालयात सादर करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाच्या रकमेचा भरणा न करता दिनांक २९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.१२.२००९ रोजी दिला असून, कार्यालयाचे पत्र दिनांक १६.१०.२००९ नुसार कळविल्याप्रमाणे रुपये २४८/- चालानद्वारे भरणा करुन मुळ प्रत या कार्यालयात सादर करुन माहिती उपलब्ध करुन घेत नाही तोपर्यंत अपील अर्जावर निर्णय घेता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक १६.१.२०१० रोजी रुपये २४८/- चा भरणा केला व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २१.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली आहे ती उपलब्ध नाही असे कळविणे म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करणे**

**( पान २ वर..)**

**असा त्याचा अर्थ होतो. परंतु उर्वरित माहिती जी मला नको आहे ती मला उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, एकुण ३ मुद्यांमध्ये त्यांनी माहिती मागितली होती व त्या संदर्भात श्री भिवाजी वर्भे कनिष्ठ कला महाविद्यालय, बोथली यांच्या संदर्भात जी माहिती होती ती छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली आहे. जी माहिती उपलब्ध झालेली नाही ती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. परंतु ती शाळेतून उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.१०.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ व २ च्या संदर्भातील माहिती ही संबंधीत शाळेतून उपलब्ध करुन घेवून विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

जावक क्रं. दिनांक

**मा.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,खंडपीठ, नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७२/नाग/२०१० व २८५/नाग/२०१०

१)श्री प्रदीप उध्दवराव जानवे,
पुजारी बिल्डींग जवळ, रामनगर रोड(जूना सिव्हील वार्ड), जटपुरा,
चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, चंद्रपूर. जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,
नगर परिषद, चंद्रपूर. जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद चंद्रपूर यांचेकडे, नगर परिषदेच्या बांधकाम विभागातर्फे जटपूरा वार्डात (सिव्हील) करण्यात आलेल्या सिमेंट कँाक्रीट रोडविषयी सविस्तर माहिती मिळण्याबाबत एकुण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषगाने दिनांक २१.१.२०१० रोजी जटपूरा वार्डात अशाप्रकारे कोणतेही काम मंजूर नाही त्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.२.२०१० रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता यांनी जटपूरा वार्डातील केलेल्या कामांचे व अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती बाबत परिपूर्ण खात्री करुन माहिती पुरविणे आवश्यक होते. परंतु तसे न करता अपीलार्थीस माहिती पुरविली नाही ही बाब खेदजनक आहे.**

**३. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपील मान्य करण्यात येत असून याद्वारे आदेशीत करण्यात येते की, नगर परिषद तर्फे जटपूरा वार्डामध्ये श्री पिंपळकर ते बर्डे यांचे घरापर्यंत, श्री यादव ते डॉ. सालफळे यांचे दावाखान्यापर्यंत करण्यात आलेली रोड बांधकाम सिमेंट कँाक्रीटची कामासंबंधात समितीची मान्यता, कामाचे अंदाजपत्रक, निविदा, वर्क ऑर्डर, तांत्रिक मंजूरी, कंत्राटदाराचा रिपोर्ट, मोजमाप पुस्तीका इ. सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी यांनी या आदेशापासून ७ दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस विनामुल्य पुरविण्यात यावी व तसा अहवाल सादर करावा असे आदेश दिलेले दिसून येतात. प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे दिनांक**

**(पान २ वर..)**

१६.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना ४ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, सदरच्या रस्त्याचे बांधकाम झालेले आहे हे सर्वसामान्य माणसाला कळते. परंतु प्रत्यक्षात नस्तीमध्ये त्या बांधकामाचे काय नांव दिले आहे हे सर्वसामान्य माणसाला माहित नसते. त्यामुळे माहितीच्या वर्णनामध्ये त्या बांधकामाचे संदर्भात माहिती मागतांना वर्णन चुकले असले तरी जन माहिती अधिकारी यांनी त्या रस्त्याच्या बांधकामाच्या संदर्भात संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होते. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात दिशाभूल करणारी माहिती दिली. प्रत्यक्षात सदर काम पुरवठा अधिकारी यांचा बंगला ते नगर परिषद प्राथमिक शाळा असेच झाले आहे. नगर परिषदेने माहितीत दिलेल्या उत्तरात श्री यादव गुरुजी ते डॅा. सालफळे यांच्या घरापर्यंतची माहिती दिली. परंतु सदर रस्ताच मुळात वेगळा आहे. त्याचा परिसर मागितलेल्या रस्त्याच्या शेजारच्या गल्लीतला आहे. पुरवठा अधिकारी बंगला ते नगर परिषद प्राथमिक शाळा याच रस्त्याच्या डांबरीकरणाची निविदा सुमारे ४ लाख २६ हजार अंदाजपत्रकाची दिनांक ३.११.२००७ रोजी काढली हाच तो परिसर आहे. याबाबत कागदपत्र सादर करीत आहे. सदर कँाक्रीट रोडचे बांधकाम अवघ्या दोन महिन्यातच उखडून गेले आहे. व त्यामुळेच मला माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्या जन माहिती अधिकारी यांना शास्ती करावी. व मला अपील करण्यासाठी लागलेला खर्चाचा भूर्दंड वसुल करुन मिळावा अशी आयोगाकडे विनंती केली आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या रस्त्याच्या बांधकामाची माहिती ही ७५ टक्केपेक्षा जास्त रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागानी केलेला आहे. श्री यादव गुरुजी ते डॅा.सालफळे यांच्या घरापर्यंत नगर परिषदेने बांधकाम केलेले आहे. परंतु हीच माहिती अपीलकर्ता यांना सुरुवातीला देणे आवश्यक होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर सुध्दा जी माहिती दिलेली आहे ती संदिग्ध दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करावे लागले. सर्वसाधारण नागरिकांस प्रत्यक्ष दिसणा-या कामाचे नांव ज्ञात असणे शक्य नाही. कागदपत्रांमध्ये काय नांव दिलेले आहे ते नागरिकांस असणे शक्य नाही. परंतु काम त्यांच्या समोर झालेले असल्यामुळे त्यांना माहिती असते. त्यामुळे काम झाले नाही अशा प्रकारचे उत्तर देणे याचा अर्थ माहिती देण्यास टाळाटाळ करणे असाच होतो. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात व शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या बाबत त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीच्या वर्णनामधून विचारलेले काम झालेले नसल्यामुळे तशी माहिती देण्यात आली आहे असे आयोगास सांगितले. परंतु तरीही माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. तसेच अपीलकर्ता यांना संपूर्ण रस्त्याच्या बांधकामाच्या संदर्भातील नस्तींचे निरीक्षण देणे संयुक्तिक राहील. त्या संदर्भात प्रथम अपीलीय

( पान ३ वर..)

**अधिकारी यांनी कार्यवाहीवर देखरेख करणे योग्य राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेशी लेखी संपर्क साधून त्या दिवशी उपस्थित होऊन अपेक्षित असलेल्या कामाच्या संदर्भातील नस्तींचे निरीक्षण करावे व त्यातून आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात. अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झाल्यावर मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी स्वत: अपीलकर्ता यांना संबंधीत अभिलेखे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील याची दक्षता घेणे आवयक आहे. व निरीक्षणानंतर त्यातून आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या व पोच घ्यावी.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.११.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये त्यांचेवर रुप्ये ५,०००/- ( रुपये पाच हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दर महिन्याचे पगारातून वसुल करुत ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखा शिर्षात जमा करण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७५/नाग/२०१०

१)श्री प्रविण वसंतराव वा-हेकर,
गेडाम नगर, भगतसींग ग्राऊंड जवळ, यवतमाळ,
ता.जिल्हा यवतमाळ-४४५००१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
शासकिय माध्यमिक आश्रम शाळा, पांढुर्णा,
ता. आष्टी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, माहे एप्रिल, २००८ ते ऑगष्ट, २००८ पावेतोचा पगार न मिळणेबाबतचे कारण (२) माहे १.३.२००८ ला रुजू होऊन दिनांक ७.३.२००८ पासून पगार काढण्याचे कारण, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना दोन मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.८.२००९ रोजी दिला असून, जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली असल्यामुळे व अपीलार्थीला ती प्राप्त न झाल्यामुळे दिनांक २२.८.२००९ रोजी प्रत्यक्ष माहिती उपलब्ध करुन द्यावी व अपीलार्थीने शासकिय माध्यमिक आश्रम शाळा, पांढुर्णा येथे प्रत्यक्ष जावून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यानंतर जी माहिती प्राप्त झाली त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहितीच्या अर्जानंतर काहीही माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतर जी माहिती उपलब्ध झाली ती दिशाभूल करणारी आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जावक क्रमांक ५२८/०८ प्रमाणे पोस्टाने माहिती पाठविली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की,**

**( पान २ वर..)**

**त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे. त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संपूर्ण प्रकरणामध्ये चौकशी करावी व चौकशी करुन त्याप्रमाणे आयोगाकडे अहवाल सादर करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रकरणाची चौकशी करुन अहवाल आयोगाकडे सादर करावा.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७३/नाग/२०१०

१)श्री अजय रा.मिश्रा,
६१, रतन नगर, मानकापूर, नागपूर
ता.जिल्हा नागपूर-४४००३०. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,
नागपूर महानगर पालिका, नागपूर जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बांधकाम)
नागपूर महानगर पालिका, नागपूर. जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महानगरपालिका यांचेकडे, इन्स्पेक्शन घेतल्यानंतर जे कागदपत्र मिळाले आहे त्या कागदपत्राच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांना ३२२ पृष्ठांकरीता ६४४/- रुपयाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती १०-झोनशी संबंधीत असल्यामुळे १०झोन तसेच सर्व संबंधीत कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांना दिनांक १६.९.०९ ला माहिती मागविण्यात आली व तसे अर्जदारास दिनांक २४.९.२००९ रोजी कळविण्यात आले. मुद्या क्रमांक १ प्रमाणे नस्तीचे निरीक्षण करण्यास्तव दिनांक २९.९.२००९ रोजी कळविले. त्यानुसार दिनांक १९.९.२००९ ला निरीक्षण करुन साक्षांकित प्रतीची मागणी केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००९ चे पत्रान्वये कळविले. त्यानुसार दिनांक २५.९.२००९ रोजी शुल्क जमा केले व त्याच दिवशी माहिती पुरविण्यात आली. मुद्या क्रमांक २ बाबतची माहिती झोनशी संबंधीत असल्यामुळे ती त्यांच्याकडून दिनांक ३०.१०.२००९, ३.१०.२००९ व दिनांक १८.९.२००९ रोजी पुरविण्यात आली. झोनशी संबंधीत तांत्रिक कर्मचारी विधानसभा निवडणुक कार्यात व्यस्त असल्यामुळे विलंब होत आहे असे दिनांक २९.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना कळविले होते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.१.२०१० रोजी दिला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा**

**( पान २ वर..)**

**निर्णय दिलेला दिसून येतो. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, उपलब्ध झालेल्या माहितीमध्ये चुकीची माहिती देण्यात आली व काही माहिती देण्यात आली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नस्तीमध्ये जी माहिती उपलब्ध आहे त्या सर्व माहितीचे अपीलकर्ता यांनी निरीक्षण केलेले आहे व गुणवत्तेच्या बाबत ज्या त्रुटी असतील त्याकरीता सक्षम अधिका-यांकडे तक्रार करणे योग्य राहील. यावरुन माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु गुणवत्तेबाबत अपीलकर्ता यांची तक्रार असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७४/नाग/२०१०

१)श्री जयदेव नामदेव थुलकर,
मु.पो.नान्होरी, ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर-४४१२०६. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी(राजस्व)
ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, तहसिलदार ब्रम्हपुरी यांचे पत्र क्रमांक अका/अन्न/२००९/५०३/दिनांक ८.९.०९ नुसार दिनांक १०.८.२००९ रोजी पुरवठा निरीक्षक ब्रम्हपूरी यांनी मौजा नानहोरी येथील दुकान क्रमांक २५ कडून तपासणी केली असता स.स्व.धान्य दुकानात शिल्लक धान्याचे काय केले हयाबाबतची माहिती एकुण ३ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.११.२००९ रोजी सदरची माहिती तहसिलदार स्तरावरील असल्यामुळे उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार यांना पत्र सुध्दा दिले व त्याची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दिनांक ११.१.२०१० रोजी तहसिलदार, ब्रम्हपूरी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.१.२०१० रोजी देण्यात आला असून त्यात अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती ७ दिवसाचे आंत विनामुल्य पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे दिनांक २६.२.२०१० रोजी तहसिलदार ब्रम्हपूरी यांनी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांनी अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविलेली दिसून येत नाही. तसेच माहिती प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही.**

**३. सदरच्या प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु ती अपूर्ण आहे व ती तहसिलदार, ब्रम्हपूरी यांचेकडे न मागता उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांचेकडे मागितलेली**

**( पान २ वर..)**

**असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना तहसिलदार यांचेकडून संपूर्ण माहिती उपलब्ध होईल असे स्वतः लक्ष घालून निर्णय देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पुर्नसुनावणीसाठी पाठविण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष तहसिलदार यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून ती माहिती अपीलकर्ता यांना देण्यात यावी. व पोच घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. २२८/२००९

१) श्री महेंद्र नामदेवराव तोटावार,
गुरुदेव वार्ड, ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, ता.चिमूर, जि.चंद्रपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

निर्णय

**तक्रारकर्ता यांनी दिनांक १.९.२००९ रोजी त्यांचे अपील क्रमांक ४९४/२००८ मधील दिनांक ८.६.२००८ च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २०.४.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. परंतु, तक्रारदार यांनी राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचेवर विश्वास नसल्याची तक्रार केलेली असल्यामुळे सदरच्या तक्रारीची सुनावणी ही नागपूर येथे घेणे योग्य नसल्यामुळे ती राज्य माहिती आयोग, अमरावती येथे पाठविण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. २६९/२०१०

१) नवरतन बृजरतन बिकानेरी,
सिव्हील लाईन, गोंदिया. ता.जिल्हा गोंदिया. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक (महसुल २/ लोकशाही दिन शाखा)
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**तक्रारकर्ता यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी अपील क्रमांक ८२३/२००८ च्या दिनांक १०.६.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रमांक १ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २०.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, दिनांक ६.२.२००६ रोजी लोकशाही दिनात दिलेल्या अर्जाच्या संदर्भात पाण्याच्या टाकीच्या संदर्भात माहिती मागितली होती. परंतु माहिती उपलब्ध करुन दिली ती विहिर बुजविण्यासाठीची आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती नगर परिषदेकडून उपलब्ध करुन घेवून देण्यात आलेली आहे. परंतु मुळातच अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.२.२००६ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी त्यावेळेस पाण्याची टाकी कां तोडण्यात आली ही तक्रार केली होती. व त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झ ाले असते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना नगर परिषदेकडून दिनांक ६.२.२०६ च्या अर्जातील विशिष्ट पाण्याची टाकी तोडण्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना हा निर्णय**

**( पान २ वर..)**

**मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक यांनी नगर परिषदेकडून अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.२.२००६ रोजी लोकशाही दिनात दिलेल्या अर्जातील पाण्याची टाकीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. २७१/२००९

१) श्री दिलीपकुमार हरीदास फुले,
मु.देवगुडरीची खात, ता.मौदा, जिल्हा नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक(गृह),
नागपूर ग्रामीण, नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक १९.११.२००९ रोजी त्यांचे अपील क्रमांक ५४९/२००८ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २०.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. सदरच्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २३.११.२००९ रोजी खुलासा मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे व खुलाशाप्रमाणे तक्रारदार यांना दिनांक १२.४.२०१० रोजी माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगास सांगितले. तक्रारदार यांच्या तक्रारीच्या संदर्भात पोलीस उपअधीक्षक(गृह) यांनी पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, नागपूर यांना वरिष्ठ लिपिक श्री नंदकिशोर बनाफर यांच्या संदर्भात अहवाल पाठविला आहे व त्यांचे विरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. तसेच संबंधीत वरिष्ठ लिपिक यांचे विरुध्द सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४७३/अम/२००९

१)श्री सदाशिव अमृतराव वानखडे,
मु.चौसाळा, पो. रासेगांव, ता.अचलपूर जिल्हा अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती. जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद अमरावती. जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांचेकडे, दिनांक २९.९.२००९ ला जि.प. म.शाळा चौताळा येथील श्री सय्यद मकसूद आणि केंद्र प्रमुख यांच्याबाबत पटनोंदणीची केलेल्या चौकशीच्या मुद्यांची तक्रार सत्य असल्याबाबतची माझी स्वाक्षरी असलेल्या मुद्यांची सत्य झेरॉक्स प्रत देण्याबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीत दिनांक २९.१२.२००८ रोजी माहिती देण्याबाबत तोंडी आदेश देण्यात आले. व त्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ४.११.२००८ व दिनांक २६.९.२००८ ला जिल्हा परिषद शाळा चौताळा येथे चौकशी अधिकारी यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालाच्या संपूर्ण प्रती माहितीच्या अधिकारा अंतर्गत आपणास दिनांक १५.१०.२००८ ला देण्यात आलेल्या आहेत. तथापि, आपल्या संस्थेने दिनांक २४.१०.२००८ च्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे चौकशी दरम्यान कोणत्याही माहितीवर आपली स्विकृती घेतल्याबाबत या कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्यामुळे आपणास ती पुरविता येत नाही. आपल्या माहिती करीता चौकशी अधिकारी यांचे लेखी निवेदनाची छायांकित प्रत जोडण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व याबाबतची माहिती त्यांना उपलब्ध झालेली**

**( पान २ वर..)**

**आहे, असे त्यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी लेखी दिलेले आहे. परंतु, तरीही त्यांना ती माहिती दिनांक २४.१०.२००८ च्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध नाही असे पुन्हा कळविलेले असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४७४/अम/२००९

१)श्री अशोक एस. इंगळे,
C/o मधुकरराव बोबडे, डी.पी.चौक, महेंद्र कॅालनी, अमरावती
ता.जिल्हा अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती. जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे, चल अचल संपत्ती खरेदीकरण्याच्या परवानगीचे रजिस्टर व नस्ती बघायला मिळण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.११.२००८ रोजी आवश्यक असलेली माहिती बघण्याकरीता कार्यालयात हजर राहावे असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. व सर्व नस्तीचे निरीक्षण केल्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी, आपल्या कार्यालयात केवळ जी.पी.एफ.चे कर्ज काढतेवेळी प्लॅाट खरेदीच्या परवानगी नस्ती उपलब्ध आहेत. परंतु चल अचल संपत्ती संपादीत करताना परवानगी दिल्याचे रजिस्टर व नोंदी उपलब्ध नाहीत. त्यामुळे मला बघायला मिळाल्या नाहीत. करीता रुपये तीनशे रुपयाच्या वर खरेदी विक्री करतांना परिषद कर्मचा-यांनी परवानगी घ्यावी व त्या परवानगीच्या नोंदी आपल्या कार्यालयात असाव्यात परंतु त्या परवानगीचे रजिस्टर आपल्या कार्यालयात ठेवण्यात आले नसल्याचे लेखी स्वरुपात कळविण्यात यावे, ही विनंती असे पत्र दिलेले दिसून येते. त्यानुषंगाने त्या कार्यालयात भूखंड खरेदी करण्याबाबतची नस्ती त्यांना दाखविण्यात आली व त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. त्यानंतर दिनांक १६.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती या कार्यालयात नस्ती उपलब्ध असून आपणास आवयक असलेली माहिती दाखविण्याकरीता कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे असे कळविले आहे. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलीय अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दिनांक १६.२.२००९ रोजी सुनावणी होऊन अपीलीय अधिकारी**

**( पान २ वर..)**

**यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी निर्णय दिला व अपील निकाली काढण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, चल अचल संपत्ती खरेदी करण्याच्या संदर्भात मी परवानगी घेतली नाही या कारणास्तव मला निलंबीत करण्यात आले आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे अनेक कर्मचारी असे आहेत की, त्यांनी चल अचल संपत्ती खरेदी केली आहे परंतु जिल्हा परिषदेची परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे मला अशा प्रकारे चल अचल संपत्तीची खरेदी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी परवानगी घेतलेली असेल त्या सर्व संबंधीतांची नोंदवही असल्यास त्याबाबतची माहिती मागितली होती. परंतु त्यांनी मागितलेल्या माहितीची नोंदवही सोडून इतर माहिती दाखविली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुध्दा अपीलाच्या सुनावणीत ती माहिती देता येणार नाही असे सांगितले. जन माहिती अधिकारी सांगतात की, ती माहिती, अधिकारी यांचेकडे उपलब्ध असते. शिक्षणाधिकारी सांगतात की, ती माहिती वरिष्ठ कार्यालयात असते व वरिष्ठ कार्यालय सांगतात की, ती माहिती त्या त्या शाखेमध्ये असते. त्यामुळे सदरची माहिती कशी उपलब्ध होईल याकरीता द्वितीय अपील दाखल केले. शिक्षणाधिकारी यांचेकडे ती माहिती उपलब्ध नसल्यास त्यांनी तसे लेखी द्यावे असेही त्यांनी दिनांक ९.१.२००९ च्या अर्जामध्ये नमूद केले आहे. परंतु मला अशा प्रकारची कोणतीही माहिती आतापर्यंत देण्यात आली नाही. तसे असेल तर स्पष्टपणे अपीलकर्ता यांना जिल्हा परिषद कर्मचा-यांनी किंवा अधिका-यांनी चल अचल संपत्ती खरेदी करण्याकरीता परवानगी घेण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही किंवा तशा प्रकारचे प्रकरण किंवा नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे लेखी लिहून देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जिल्हा परिषद कर्मचा-यांनी किंवा अधिका-यांनी चल अचल संपत्ती खरेदी करण्याकरीता परवानगी घेण्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध असल्यास ती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने पुरविण्यात यावी. किंवा कोणत्याही प्रकारची नोंदवही ठेवण्यात आलेली नसेल तर तशा प्रकारचे प्रकरण किंवा नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे लेखी लिहून देण्यात यावे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४७५ /अम/२००९

१)श्री अनिल रामदास च-हाटे,
मु.पो. गौरखेडा (कुंभी), ता. अचलपूर, जिल्हा अमरावती. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी,
जिल्हा अमरावती. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी,
जिल्हा अमरावती. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे मौजा साखरी येथील ०.८१ आर.चे आतील खरेदी विक्रिच्या फेरफाराच्या (गांव नमूना नं.६) च्या प्रती (उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीने व विना परवानगीने दोन्ही मला देण्यात याव्यात) अशी माहिती नोंदणीकृत टपालाने मागीतलेली दिसून येते. आवश्यक फी भरण्यास तयार आहो असेही नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली त्या माहितीच्या संदर्भात तफावत आहे व माहिती अपूर्ण् आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. श्री राजेंद्र पांडे यांनी खालीलप्रमाणे युक्तीवाद केला.**

**"अपीलार्थी यांनी या कार्यालयात अनेकदा माहिती मागितलेली आहे. तसेच अपीलार्थी यांनी द्वितीय अपील दिनांक १७.४.२०१० रोजी अमरावती खंडपीठासमक्ष दाखल केलेले होते व त्यात सुनावणी घेण्यात आली त्यावेळी अपीलार्थी व माहिती अधिकारी हजर होते व त्यात विद्यमान राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती यांनी प्रथम अपील दिनांक १२.५.२०१० पर्यंत निकाली काढावे तसेच जबाबदार अधिकारी माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांचा नामनिर्देष आदेशात करण्यात यावा असे आदेश दिला व त्यात अर्जदारास हवी असलेली माहिती**

**( पान २ वर ..)**

**अपीलातील सुनावणी नंतर अपीलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असेही नमूद करण्यात आलेले आहे. अपीलार्थी यांचे दिनांक १७.४.२०१० चे द्वितीय अपीलात सुध्दा सदरचा दिनांक ८.११.२००८ चा अर्ज नमुद केलेला असल्याने एकदा या प्रकरणात निकाल दिलेला असल्याने पुनश्च सदर अर्जावर द्वितीय अपील केलेले असल्याने ते खारीज करण्यात यावे तसेच कर्मचा-यांची अपूरी संख्या व माहिती शोधण्यास लागलेला कालावधी यामुळे अपीलार्थी यांा माहिती देण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यात यावा अशी विनंती अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी या विद्यमान आयोगास करीत आहे."**

**यावरुन सदरच्या दिनांक ८.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपीलीची सुनावणी झाली व त्याबाबतचा निर्णय राज्य माहिती आयोग खंडपीठ, अमरावती यांनी दिला. व त्यामुळे एकाच अर्जाचे संदर्भात राज्य माहिती आयोगाकडील सुनावणी किंवा निर्णय पुन्हा देणे योग्य होणार नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४७२/अम/२००९

१)श्री सदाशिव अमृतराव वानखडे,
मु. चौसाळा पो. रासेगांव, ता.अचलपूर,
जिल्हा अमरावती-४४४८०६. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, अचलपूर, ता.अचलपूर, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा केंद्र प्रमुख,
केंद्र शाळा रासेगांव, ता. अचलपूर, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २१.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा केंद्र प्रमुख यांचेकडे, सन ०८-०९ त्रेमासिक अहवाल S.L.F. (२) सन ०७-०८ माहे जून, ०७ ते एप्रिल, ०८ ची पगारबील ची झेरॅाक्स (३) श्री आर.जे.मोरे, प्र.मुख्याध्यापक यांनी इ.१ ली च्या उत्कृष्ट पटनोंदणी बाबतची झ ेरॅाक्स, अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.१०.२००८ रोजी मुद्या क्रमांक ३ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व ती युपीसीद्वारे पाठविण्यात आलेली आहे. व इतर माहिती करीता त्यांचा अर्ज गट शिक्षणाधिकारी, अचलपूर यांचेकडे कलम ६(३) नुसार पुढील कार्यवाही करीता दिनांक २७.१०२००८ नुसार पाठविण्यात आला व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ५.१.२००९ ला माहिती उपलब्ध झाली. परंतु त्यापुर्वीच दिनांक २५.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा आदेश दिनांक ३.१.२००९ रोजी देण्यात आला व त्या आदेशामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांना दिनांक २७.१०.२००८ रोजी पाठविलेली माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरची माहिती त्यांना युपीसीने पाठविली आहे. परंतु अपीलकर्ता यांना इतर दोन मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना पुन्हा त्यांच्या अर्जातील मुद्या**

**( पान २ वर..)**

**क्रमांक ३ ची माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही व तसे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक ३ ची माहिती पुन्हा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ४५/२०१०

१) श्री सुनिल गोरले,
द्वारा श्री अविनाश चौधरी,
कमरुद्यीन ले आऊट, गोरेवाडा रोड,
बोरगांव, नागपूर-४४००१३. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभगा,
मंत्रालय, मुंबई-३२. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २१.४.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी १६.१.२०१० रोजी अपील क्रमांक ९३०/२००९ मधील दिनांक ७.११.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रमांक १ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २१.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. सदरच्या तक्रारीचे अनुषंगाने गैरतक्रारदार यांना दिनांक २३.२.२०१० रोजी आयोगाचे कार्यालयातून खुलासा मागविण्यात आला होता. तक्रारदार यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, मा. मंत्री महोदयांनी हंगामी कर्मचा-यांना कायम करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन हिवाळी अधिवेशनात दिले होते. त्या आश्वासनाच्या परिपुर्तीची माहिती मागितली होती. त्यानंतर पावसाळी अधिवेशनात आश्वासन देण्यात आले व त्या आश्वासनाच्या पुरिपुर्तीची माहिती मागितली होती. पावसाळी अधिवेशनात दिलेल्या आश्वासनाच्या परिपुर्तीच्या संदर्भातील माहिती मिळाली होती. परंतु हिवाळी अधिवेशनात दिलेल्या आश्वासनाच्या परिपुर्तीच्या संबंधात विभागाकडे नस्ती तयार झाली त्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती आतापर्यंत दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, पावसाळी अधिवेशनाच्या नंतर जी नस्ती तयार झाली त्याबाबत सर्व माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु हिवाळी अधिवेशनात मा.**

**( पान २ वर..)**

**मंत्रीमहोदयांनी दिलेल्या आश्वासनाची कोणत्याही प्रकारची नस्ती तयार झाली नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसे असल्यास स्पष्टपणे तक्रारदार यांना कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून मा. मंत्रीमहोदेयांनी दिलेल्या आश्वासनाच्या परिपुर्ती संदर्भात जी नस्ती असेल त्या नस्तीची माहिती तपशिलात उपलब्ध करुन देण्यात यावी. नस्ती उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २८३/नाग/२०१०

१)श्री सुनिल वासुदेवराव दर्भे,
दुर्गा अपार्टमेंटस, प्लॉट नं.३७, पोस्टल ऑडीट कॉलनी,
प्रतापनगर, नागपूर-४४००२२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर,
सि.पी.क्लब जवळ, तेलंगखेडी, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, भंडारा,
राजगोपालचारी वार्ड, नहर रोड, सिव्हील लाईन्स,
भंडारा-४४१९०४. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, भंडारा यांचेकडे, प्रवास भत्याच्या देयकाच्या संदर्भात एकुण ९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी जी प्रवास भत्याचे देयका सादर केले आहे त्या देयकाचे संदर्भात काही देयके नामंजूर करण्यात आले व काही देयके वटविल्याचे सांगण्यात आले त्यामुळे खुलासा मागविला आहे. तसेच त्यांनी प्रवास भत्याच्या संदर्भातील नियम व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या अर्जाचे संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. परंतु त्यांना माहिती अपूर्ण मिळाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक त्यांनी खुलासा मागीतला आहे व प्रकरणातील खुलासा हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे मागता येत नाही. परंतु त्यांना शक्य त्या सर्व मुद्यांची माहिती उपलब्ध**

**( पान २ वर..)**

**करुन दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना अजूनही प्रवास भत्याचे नियम व त्यांच्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांना लागू असलेल्या प्रवास भत्याच्या नियमांची प्रत व त्यांनी वेळोवेळी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची प्रत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २८४/नाग/२०१०

१)श्री जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन, नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण कॅालेज ऑफ इंजिनिअरींग,
हिंगणा रोड, वानाडोंगरी, नागपूर-४४१११०. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, यशवंतराव चव्हाण कॅालेज ऑफ इंजिनिअरिंग, वानाडोंगरी यांचेकडे, सुरक्षा रक्षकाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु मागितलेली माहिती विनाअनुदानीत खाजगी संस्थांना अधिनियमाचे कलम २ (एफ) या "सार्वजनिक प्राधिकारण" या व्याख्येत येत नाही असे दिनांक ८.२.२०१० रोजी कळविण्यात आले. त्यामुळे त्यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.३.२०१० रोजी कळविण्यात आलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, त्यांना मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांचे पुढील याचिका क्रमांक ५१३२/२००८ च्या**

**( पान २ वर ..)**

**निर्णयाप्रमाणे विनाअनुदानित खाजगी महाविद्यालय हे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नाही असे कळविले आहे. यावरुन अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २८६/नाग/२०१०

१)श्री शामलाल तुळशीराम गेडाम,
मु. फुटाळा, गोंड मोहल्ला (जूना फुटाळा)
अमरावती रोड, नागपूर, ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(प्रशासन)
आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय, मुंबई,
प्रशासकिय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सीसेफ,
मुंबई५४०००१८. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा अभियंता,
प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी कार्यालय, नागपूर
तेलंगखेडी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी प्रकृती अस्वास्थ्याचे कारणास्तव गैरहजर आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी यांचेकडे, महाव्यवस्थापक, शासकिय दुध योजना, नागपूर श्री पाझनकर साहेब यांचे बद्दल आणि यांत्रिक प्रभारी श्री बारापात्रे साहेब यांचेबद्दल आणि दुग्ध शाळा अभियंता श्री दातारकर साहेब यांचे बद्दलची माहिती मागीतलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.१०.२००९ रोजी माहितीच्या करीता खर्चाचा भरणा रुपये ७५/- करावा असे कळविले. त्यानुसार दिनांक ९.१०.२००९ रोजी खर्चाचा भरणा केला व त्यामुळे त्यांना दिनांक ४.११.२००९ रोजी एकुण ४ मुद्यामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली आहे. असे एकुण १५ कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.२.२०१० रोजी देण्यात आला असून, अर्जातील मुद्या क्रमांक १, ५, ६, ७ बाबतची माहिती तसेच मुद्या क्रमांक ४ मधील श्री बारापात्रे यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र तसेच मुद्या क्रमांक २ मध्ये अपीलार्थीने सन २००९ मध्ये दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती तथा दुग्ध शाळा अभियंता तथा प्रशासक, दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, नागपूर यांनी १५**

**( पान २ वर..)**

**दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावा असे आदेश दिलेले दिसून येते. सदरच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १७.२.२०१० रोजी युपीसीने मुद्या क्रमांक ७ च्या संदर्भात व मुद्या क्रमांक २, ४, ६ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जे पत्र दिलेले आहे त्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. पुन्हा दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना महाव्यवस्थापक, शासकिय दुध योजना, नागपूर यांचे कार्यालयात कागदपत्रे पाहाणीसाठी उपलब्ध आहे व त्याबाबतची फी चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. नानाबाबु एस.भगत यांनी युक्तीवाद केला. त्यात त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, मागीतलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, अशा प्रकारचे उत्तरे दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन न देता नस्ती पाहाणीसाठी उपलब्ध आहे व निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे उत्तर दिले आहे. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेश हे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आहे. नस्ती निरीक्षण करुन घेण्याचे नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाचे उल्लंघन केलेले दिसून येतात. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या कार्यालयात जी माहिती मागीतलेली आहे त्यापैकी काही माहिती उपलब्ध आहे, ती त्यांना दिलेली आहे. परंतु जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही ती माहिती जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देवू शकत नाही. व त्यामुळे तसे त्यांनी कळविलेले आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे व त्या संदर्भात जी नस्ती उपलब्ध आहे, त्या नस्तीची पाहाणी करण्याकरीता सांगण्यात आले होते जेणेकरुन नस्तीमध्ये माहिती उपलब्ध नाही हे त्यांनी स्वतः पाहाणी करुन खात्री करुन घेतली असती.**

**४. अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही जूनी आहे. व त्यामुळे ज्या नस्तीमध्ये ती माहिती असेल ती नस्ती उपलब्ध करुन देता येईल व नस्ती नसेल तर कां नाही हे सांगता येणार नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांना लेखी पत्र देवून कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ कळवावी. व त्या दिवशी उपस्थित होऊन संबंधीत नस्तीची पाहाणी करावी. व त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या. जन माहिती अधिकारी यांनी, अपीलकर्ता यांनी त्यांना उपस्थित राहाण्याबाबत लेखी कळविल्यास अपीलकर्ता यांना निरीक्षणासाठी संबंधीत नस्ती उपलब्ध करुन**

**( पान ३ वर..)**

**देण्यात यावी. व अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावी. नस्ती नसतील तर तसे लेखी कळवावे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७८/नाग/२०१०

१)श्री तुमेन हगरुजी बंसोड,
C/o गोपाल गुंगट्टीवार, इंदिरा वार्ड क्रं.३,
पो.ता.एटापल्ली, जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, गडचिरोली. ता.जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, गडचिरोली. ता.जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे, आंतर जिल्हा बदली कर्मचा-यांची माहिती मिळण्याबाबत. सन १९९८-२००० पर्यंत आंतर जिल्हा बदलीच्या प्रस्तावाचे संदर्भात एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.१.२००९ रोजी माहितीच्या खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे रुपये १५०/- चा भरणा दिनांक १.२.२०१० रोजी केलेला आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १०.१.२०१० रोजी (दिनांक १७.२.२०१० तारीख असलेले)प्रथम अपील दाखल केले होते. व त्यात माहिती चुकीची, अपूरी व दिशाभूल करणारी आहे असे नमुद केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.३.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी श्री टी.एच. बन्सोड यांनी सन १९९८-९९ ला सादर केलेल्या प्रस्तावाच्या छायांकित प्रती मिळाल्या नाही. शिक्षण सेवकांच्या आंतर जिल्हा बदली प्रस्तावाची प्रत मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शिक्षण सेवकाच्या जिल्हा बदलीच्या संदर्भात कोणतेही नियम नाही. तसेच श्री टी.एच. बन्सोड यांनी सन १९९८ मध्ये सादर केलेले प्रस्ताव आढळून येत नाही. व त्याबाबत अपीलकर्ता यांना स्पष्टपणे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले**

**( पान २ वर ..)**

**की, जी माहिती अपीलकर्ता यांनी मागीतली आहे ती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागीतली असली तरी प्रश्नाच्या उत्तरातून टिप्पणीच्या स्वरुपात माहिती उलपब्ध होऊ शकते. त्यामुळे त्या टिप्पणी किंवा कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. प्रश्न विचारले आहे म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही हे जन माहिती अधिकारी यांचे अज्ञान आहे. मागीतलेल्या माहितीचे वाचन करुन ती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. असे असेल तर अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असे दिसून येते. तरी सुध्दा शिक्षण सेवकांची आंतर जिल्हा बदलीच्या संदर्भात नियम असल्यास तसेच इतर नियमांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.१२.२००९ च्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ च्या संदर्भातील माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ३०४/२००९

१) उज्वलकुमार वासुदेवराव बागडे,
सावनेर वार्ड क्रमांक १७, ता.सावनेर,
जिल्हा नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक ६१२/२००८ च्या दिनांक ५.५.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रमांक १ मधील माहिती अपूर्ण उपलब्ध करुन दिली अशी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २७.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरचा प्रस्ताव सादर करताना इमारत भाडयाने घेतलेली असेल व भाडेकरार सादर केलेला असेल तर इतर कारणांसह परवानगीची आवश्यकता लागत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांचेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर करारनाम्याशिवाय कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाही व परवानगी देताना नगर परिषदेच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही असे लेखी स्वरुपात तक्रारदार यांना देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून तक्रारदार यांना गैरतक्रारदार यांनी करारनाम्याशिवाय कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाही व परवानगी देताना त्यात इतर कागदपत्रांची किंवा नगर परिषदेच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही, असे लेखी कळवावे व पोच घ्यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर (विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४८२/अम/२००९

१)श्री रमेश रेवाचंद जैस्वाणी
गुरुनानक मंदीर, सिंधी कँम्प, आकोट,
ता. आकोट, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद आकोट, ता. आकोट,जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, आकोट, जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.४.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, आकोट यांचेकडे, निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या बांधकामाबाबत निधी, कंत्राटदाराचे नांव, आवश्यक कालावधी, किती वर्ष रस्त्याचे जीवनमान अशा स्वरुपाची माहिती स्वतः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगो सल्लागार अभियंता श्री संजय आढाऊ यांना दिनांक ५.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता माहिती अधिकारी यांनी पत्र दिले व त्या पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.२.२००९ रोजी देण्यात आला असून श्री संजय आढाऊ, सल्लागार अभियंता यांनी वरील प्रकरणाच्या १ ते ४ मुद्यांबाबतची माहिती स्वखर्चाने अपीलकर्ता यांना मोफत पुरविण्याची कार्यवाही तात्काळ करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची बदली झालेली आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती देण्याकरीता तत्कालीन अभियंता यांना दिनांक ५.१.२००९ रोजी पत्र दिले होते. परंतु त्यांनी माहिती दिली**

**( पान २ वर..**

**नाही व आता ते निलंबित आहे. परंतु अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देता येईल असे आयोगापुढे सांगण्यात आल्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपूर्ण माहिती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४०३/अम/२००९

१)श्री शैलेष गुलाबसिंह ठाकूर,
संतश्री मारोती महाराज वार्ड, घाटंजी,
ता. घाटंजी, जिल्हा यवतमाळ. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ,
ता. जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ,
ता.जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी पोलीस भरती प्रक्रियेत व्यस्त असल्यामुळे गैरहजर आहेत.**

**२. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक १७.३.२०१० रोजी ठेवण्यात आली हाती. अपीलकर्ता हजर होते. त्यांचे म्हणणे ऐकुण घेतले व निर्णय पारित केला होता. व निर्णयामधील अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही याबाबतचा खुलासा आयोगाकडे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द रुपये २५,०००/- ची शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे आदेश दिले होते. त्याप्रमाणे दिनांक ५.४.२०१० रोजी माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**"उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये खुलासा सादर आहे की, श्री पी.एन. पाटील, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) यवतमाळ हे आजारी रजेवर असल्यामुळे त्यांचा कार्यभार आमचेकडे देण्यात आलेला आहे. अर्जदार श्री शैलेष गुलाबसिंह ठाकूर रा. संतश्री मारोती महाराज वार्ड, घाटंजी ता. घाटंजी जि. यवतमाळ यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गतचा अर्ज दिनांक ११.१२.२००८ रोजी प्राप्त झाला. त्यामध्ये अर्जदाराचे जिवितास धोका असल्याने पोलीस संरक्षण मिळणेस दिनांक २७.११.२००८ रोजी दिलेल्या अर्जावर पोलीस अधीक्षक कार्यालयाने काय कार्यवाही केली याबाबत व पो.स्टे.घाटंजी सोबत काही पत्रव्यवहार करण्यात आला असल्यास त्याबाबतची माहितीची मागणी केली. सदर अर्जावर माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता श्री सी.बी.वायस, पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा पोलीस अधीक्षक कार्यालय यांचेकडे दिनांक १२.१२.२००८ रोजी पत्र पाठविण्यात येवून ३ दिवसांत माहिती सादर**

**( पान २ वर..)**

**करण्यास कळविण्यात आले. पोलीस निरीक्षक, जि.वि.शा.यांनी माहिती सादर न केल्याने त्यांना दिनांक ९.१.२००९ व दिनांक १६.१.२००९ रोजी स्मरण पत्र देण्यात आले. अर्जदारास माहिती मिळाली नसल्याबाबतचे पत्र दिनांक १३.१.२००९ रोजी प्राप्त झाले. तदनंतर पो.नि.जि.वि.शा.यांनी अर्जदाराने शस्त्रधारी पोलीस संरक्षण मिळणे बाबत केलेली विनंती अमान्य करण्यात येत असल्याबाबतचे पत्र अर्जदारास पाठविल्याचे कळविले. व सदर पत्र उपलब्ध करुन दिल्याने ते दिनांक २८.१.२००८ रोजी अर्जदार यांना जावक क्रमांक १३१४ प्रमाणे नोंदणीकृत टपालद्वारे पाठविण्यात आले.**

**तदनंतर अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले असता दिनांक २७.१.२००९ रोजी प्रथम अपील सुनावणी मध्ये अर्जदाराचे वकील हजर झाले, अपीलीय अधिकारी यांनी अर्जदारास पो.स्टे. घाटंजी यांचे कडून परिपुर्ण अहवाल मागवून त्याची प्रत पुरविण्याबाबत आदेश दिले असता सहा.जन माहिती अधिकारी तथा पो.नि.जि.वि.शा. यांनी पो.स्टे.घाटंजी यांचेकडील अहवाल अर्जदारास पो.स्टे. घाटंजी मार्फत पाठविण्यात आला असता, अर्जदाराने तो घेण्यास नकार दिला असल्याचे कळविल्याने तो अहवाल (माहिती) अपीलीय अधिकारी यवतमाळ यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी एकुण ५ पेज नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविला असता अर्जदारास दिनांक १२.२.२००९ रोजी प्राप्त झालेला आहे."**

**३. सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यांत येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २५४१/२००७

१)श्री रामदास नारायण पडोळे,
६७ पुष्पक निवास भैयाजी नगर, खात रोड भंडारा,
मु.पो.ता.जिल्हा भंडारा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्था सचिव,
नवोदय शिक्षण संस्था, लाखनी,
श्रीराम डेअरीच्या बाजूला मु.पो.ता. लाखनी, उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
नवोदय कनिष्ठ महाविद्यालय केशोरी(केळवद)
ता. अर्जूनी मोर. जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**अपील क्रमांक २५४१/२००७ मध्ये दिनांक ३१.१.२००९ रोजी निर्णय देवून आदेश क्रमांक १ मध्ये अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व आदेश क्रमांक २ मध्ये दिनांक ११.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- ची शास्ती कां लावण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास सदरची शास्ती कायम होईल व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सदरच्या शास्तीची वसुली करीता प्रस्ताव पाठविण्यात येईल असे आदेश दिलेले दिसून येतात. सदरच्या आदेशाचे अनुषंगाने १० दिवसांचे आंत आयोगाकडे खुलासा प्राप्त न झाल्यामुळे दिनांक २९.६.२००९ रोजी शास्ती कायम करण्यात आली असून तसे शिक्षणधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद गोंदिया यांना कळवियात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना मात्र आदेश क्रमांक १ प्रमाणे दिनांक २४.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी आयोगाकडे दिनांक ९.८.२००९ रोजी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रामंक ११.२.२००९ व दिनांक २४.२.२००९ व दिनांक ७.३.२००९ या पत्रांचा संदर्भ देवून खुलासा दाखल केला आहे.**

**२. खुलासामध्ये, आपल्या कार्यालयाचे सुनावणी दिनांक ७.१.२००९ व दिनांक ३१.१.२००९ चे पत्र वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे मला उपस्थित होता आले नाही. सदरचे सुनावणी पत्र दिनांक ११.२.२००९ ला प्राप्त झाले होते. वरील सुनावणीच्या अनुषंगाने माहिती प्रत्यक्ष आपल्या कार्यालयात दिनांक १२.२.२००९ रोजी उपस्थित होऊन बाजू मांडण्याची लेखी विनंती केली होती. परंतु दिनांक ३१.१.२००९ च्या सुनावणीचे आदेश व निर्णय मला दिनांक २५.२.२००९ रोजी प्राप्त झाला. मी आपल्या संदर्भीय आदेश क्रमांक २ नूसार अपीलार्थीला आमच्या कार्यालयाने पत्र क्रमांक ५ व ६ अन्वये दिनांक ११.४.२००७ च्या मागणी नुसार अविलंब माहिती**

**( पान २ वर..)**

रजिस्टर पोस्टाने पुरविण्यात आली आहे. संदर्भिय पत्र क्रामंक ५ व ६ ची प्रत आपल्या कार्यालयाच्या माहितीसाठी उपस्थित होऊन दिली आहे. त्यामुळे दंडाची कारवाई रद्य करण्यात यावी अशी विनंती केली होती. त्यानंतर त्याच पत्रामध्ये खालीलप्रमाणे आणशी खुलासा केलेला दिसून येतो.

"माननिय महोदयजी, नवोदय शिक्षण संस्थेद्वारा दोन हायस्कुल कार्यरत आहेत. संस्थेच्या शेळयूल-१ नुसार संस्थेत एकुण सात सदस्य/पदाधिकारी आहेत. अपीलकर्ता श्री आर.एन. पडोळे हे सहकार्यवाह आहेत. व श्री गोविंद रामाजी शेन्डे, अध्यक्ष असे एकुन दोन एका गटात तर कार्यवाह व इतर चार सदस्य असे एकुण ५ दूस-या गटात संस्थेचा वाद धर्मदाय आयुक्त कार्यालय भंडारा येथे सुरु आहे. अपीलकर्ता अल्प मतात आहेत. दोन्ही गट शिक्षक/कर्मचा-यांच्या नियुक्त्या करतात. बहुमतांचा ठराव अपीलकर्त्यांच्या गटात नसतानाही मला कर्मचा-यांना रुजू करण्यास बाध्य करीत आहेत. दूसरा गट बहुमताचा ठराव देवून नियुक्ती करतो. मी ज्यांच्याकडे बहुमताचा ठराव आहे त्यांच्या कर्मचा-यांना शाळेत रुजू करतो. मी अपीलकर्ता व अध्यक्ष या दोघांनी केलेल्या नियुक्त कर्मचा-यांस रुजू करुन घेत नाही. त्यामुळे त्यांनी मा अडचणीत आणण्यासाठी हेतुपुरस्पर कट रचित आहे. मी संस्थेच्या सभेत माहिती व रेकार्ड पुरविण्यास तयार होतो. परंतु त्यांनी मला संस्थेच्या सभेत बोलावले नाही. त्यामुळे मी रेकार्ड दाखवू शकलो नाही व माहिती देण्यापासून वंचित राहीलो. मी आपल्या आदेशान्वये संपूर्ण रेकार्ड अपीलकर्त्याला दिलेला आहे. तरी महोदयजी संस्थेच्या गटबाजीमध्ये संस्थेचे काही पदाधिकारी मला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. रेकार्ड न दाखविणे हा माझा हेतू नव्हता.

विनंती : महोदयजी विनंती की, मला सुनावणी पत्र न मिळाल्यामुळे मी स्वतः उपस्थित राहू शकलो नाही. त्यामुळे मला प्रत्यक्ष बाजू मांडता आली नाही. तरी माझ्यावर दिनांक ३१.१.२००९ च्या निर्णयावर झालेली रुपये २५,०००/- ची दंडाची कारवाई रद्य ठरावी. माझेकडे एवढी रक्कम भरण्याची क्षमता नाही. माझे मुले शिक्षणात आहेत. आई वडील म्हतारे आहेत. त्यांच्या औषधीचा खर्च सांभाळावा लागतो. करीता माझी विनंती विचारात घेवून झालेली दंडाची कारवाई रद्य करावी. करीता सेवेशी अर्ज सादर करीत आहे."

३. परंतु जन माहिती अधिकारी यांचा खुलाशाचा विचार न केल्यामुळे व शास्ती कायम केलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. (याचिका क्रमांक ४२१०/२००९ खंडपीठ, नागपूर.) सदरच्या याचिकेचा निर्णय हा दिनांक १०.२.२०१० रोजी दिलेला असून त्यामध्ये, **Respondent No.१ has already received the information and hence the issue of penalty now only needs to be looked into.** असे आदेश दिलेले दिसून येतात. व सदरची याचिका निकाली काढण्यात आली आहे. त्यामुळे पुन्हा सदरचे अपील सुनावणीस दिनांक १८.३.२०१० रोजी घेण्यात आले होते.

४. अपीलकर्ता यांनी निवेदन सादर केले आहे. व त्यामध्ये श्री अशोक हलमारे, प्राचार्य यांनी दिलेल्या उत्तरातील मुद्या क्रमांक १ ते ५ चे वाचन केल्यानंतर त्यांनी आपल्या कारणे दाखवा नोटीस आदेश दिनांक ३१.१.२००९ व सुनावणीची नोटीस दिनांक ७.१.२००९ ला उशिरा मिळाल्या हे खरे मानले तरी ते विद्वान प्राचार्य असून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची पुरपूर्ण जाणिव असूनही अकारण त्यांचे पत्र जावक क्रमांक १७४३ दिनांक

( पान ३ वर..)

१५.५.२००७ च्या नुसार आमचा अर्ज स्पष्टपणे फेटाळला आहे. व त्यामुळे ते शास्तीस पात्र आहे अशी विनंती केलेली दिसून येते. माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी सुध्दा आयोगाकडे दिनांक २.३.२०१० रोजी खुलासा केला आहे. त्यामध्ये आदेश दिनांक १.३.२००९ च्या अनुषंगाने १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यास तसेच माहिती उपलब्ध करुन न दिल्यास रुपये २५,०००/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याचा खुलासा मागण्यात आले होता. परंतु सदर्हु आदेश मला दिनांक २५.२.२००९ ला प्राप्त झाला. तसेच सुनावणीचे पत्र सुध्दा उपलब्ध झाले नव्हते. तसेच दिनांक १५.५.२००७ च्या उत्तराच्या संदर्भात प्रथम अपीलाची सुनावणी घेवून

झालेली नव्हती. त्यामुळे माहिती हेतु पुरस्पर कोणत्याही वैयक्तिक उद्येशाने देण्याचे टाळलेले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी संस्था सचिव/अध्यक्ष यांनी श्री पडोळे यांच्या अपीलाची दखल घेवून निर्णय दिला असता तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती.

५. मुळात अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक १५.५.२००७ रोजी जे उत्तर देण्यात आलेले आहे, त्यात आपल्या अर्जातील तपशिल अपूर्ण पुरविलेला असल्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे. तसेच आपण संस्थेचे पदाधिकारी असल्यामुळे आपणास माहिती संस्थेच्या सभेत तपासता येते. परंतु आपण सक्रिय पदाधिकारी नाही. शाळा समितीच्या सभेची नोटीस पाठवूनही आपण उपस्थित झाले नाही. करीता सबब अर्ज फेटाळण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते.

७. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा विचार करता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती सन २०००-२००६ या कालावधीतील विस्तृत प्रमाणातील माहिती आहे. व ती मागताना सुध्दा मोघम स्वरुपात मागितलेली दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १५.५.२००७ च्या पत्रातील उत्तर हे योग्य आहे असे दिसून येते. तसेच अपीलकर्ता हे जन संस्थेचे पदाधिकारी आहे तर त्यांना सन २०००-२००६ या कालावधीतील संपूर्ण माहिती संस्थेत उपस्थित होऊन बघता आली असती. परंतु तसे न करता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचा आधार घेतला व माहिती मागवून संस्थेस किंवा माहिती अधिकारी यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक ९.८.२००९ रोजी जो खुलासा दाचाल केलेला आहे त्या खुलाशावरुन संस्थेच्या दोन गटातील वादात त्यांनी अशा प्रकारे माहिती मागण्याचा प्रयत्न करुन अडचणीत आणण्याचा प्रयत्न होत आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी हे संस्थेचे सेवेत आहे. ते जरी माहिती अधिकारी असले तरी ते शाळेचे माहिती अधिकारी आहे व अपीलकर्ता यांनी संस्थेची माहिती मागितलेली आहे. संस्था ही स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्यामुळे संस्थेची माहिती संस्थेतील जन माहिती अधिकारी यांना मागावयाची असते व शाळा संबंधीची माहिती ही मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांना मागणे योग्य असते. व त्यामुळे सदरच्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असेच उत्तर दिलेले असल्यामुळे ते शास्तीस पात्र नाही. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हे सुरुवातीलाच दिनांक ३१.१.२००९ रोजी उपस्थित राहू शकले असते तर त्याचवेळेस त्यांचा खुलासा विचारात घेवून निर्णय झ ाला असता. परंतु मा. उच्च न्यायालयाच्या पुन्हा सुनावणी घेण्याच्या आदेशाप्रमाणे सर्व प्रकरणाची पुर्नतपासणी करणे आवश्यक होते. व तशी ती

( पान ४ वर..)

**केल्यानंतर व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील २५४१/२००७ मध्ये दिनांक ३१.१.२००९ च्या निर्णयाप्रमाणे दिनांक २९.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचे विरुध्द शास्तीचा निर्णय कायम करण्यात आलेली शास्ती ही रद्द करण्यात येत आहे. व अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २८७/नाग/२०१०

१)श्री भगवंत नारायणराव साखरकर,
द्वारा-श्री शामराव भोमले यांचे मकान, पी ॲन्ड टी कॅालनी,
साई नगर, वर्धा, ता.जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद वर्धा. ता.जिल्हा वर्धा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद वर्धा,
ता.जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २८.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचेकडे, पेन्शन अदालत दिनांक ८.१२.२००९ मध्ये झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती तसेच काही प्रश्नांचा खुलासा मागितलेला दिसून येतो. व परिपत्रके व शासन निर्णय मागितलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना मागितलेली परिपत्रके, शासन निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.२.२०१० रोजी देण्यात आला असून पेंशन अदालत मध्ये कार्यवृत्त लिहिल्या गेलेले नसल्यामुळे कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येत नाही ही बाब सत्य आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेले शासन निर्णय या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही. लेखी खुलासा देण्याची पध्दत व संकेत नसल्यामुळे लेखी खुलासा देण्यात आला नाही. तरी यामध्ये विभागाकडून कोणतीही दिनंगाई केलेली नाही. प्रकरण निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु निर्णय अपीलकर्ता यांना कळविलेला दिसून येत नाही, त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे खुलासा करताना नमुद केले की, मी प्रोसिडींगची प्रमाणित झ ेरॅाक्स प्रत मागीतली होती ती मिळाली नाही. सन १९९७-९८ व २००८ चे जी.आर. संबंधीत विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ परिच्छेद ४.२ चे संदर्भात वर्तमान जी.आर.मध्ये सुधारणा झाल्या बाबत खुलासा निवेदन मागविले. परंतु माहितीचे अधिकारात तयार माहिती**

**( पान २ वर..)**

**देता येते, निवेदेन देता येत नाही, असा खुलासा केला आहे. दिनांक ८.८.२००३ ला विभागीय चौकशीचा निर्णय आदेशीत केला. त्यात न्यायालयाचे आदेशास अधिन राहून शिक्षा प्रदान केली. न्यायालयाचा निर्णय दिनांक ३१.७.२००८ ला लागता. त्यानंतर सहा महिन्यांनी मी शिक्षा रद्य करण्याचा प्रस्ताव दिला. तो नाकारण्यात येवून मला शिक्षा रद्य करण्याबाबत जिल्हा परिषदचे बंधन नसल्याबाबत लेखी पत्र दिले. त्यामुळे मी शासनाचे जी.आर. मागितले होते परंतु दिले नाही, असा खुलासा केला आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांचे नांवाने प्राप्त झाला होता. अर्जातील माहिती कृषि विभागाशी संबंधीत असल्याने जावक क्रमांक ६३ अन्वये त्याच दिवशी कृषि विभाग, जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे पाठविला. त्याप्रमाणे दिनांक १६.१.२०१० रोजी अर्जदारास माहिती दिली. प्रथम अपील सुध्दा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नांवाने केले. दिनांक १८.२.२०१० ला सुनावणी झाली व सुनावणीमध्ये वरीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेला आहे. तसेच अपीलकर्ता यांनी जो शासन निर्णय मागितला तो शासन निर्णय हा मोघम आहे. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातच त्यांनी मागितलेल्या जी.आरच्या संदर्भात त्यांना माहिती आहे असे दिसून येते. विभागीय चौकशी नियम, १९९१ ची सुध्दा त्यांना माहिती आहे. व त्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम व प्रत्यक्ष त्यांच्या विरुध्दची चौकशी या संदर्भात विश्लेषणात्मक खुलासा मागितला आहे. व अशा प्रकारचा खुलाससा किंवा जन माहिती अधिकारी यांचे मत हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(ज) मधील "माहिती" या व्याख्येत समाविष्ट होत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २८८/नाग/२०१०

१)श्री राजू शंकरराव निकोसे,
मु.पो.सावरी (बिड), ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय चिमूर, ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, चिमूर,
ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २८.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक यांचेकडे खालीलप्रमाणे ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय चिमूर जि. चंद्रपूर येथे दिांक १६.१.२००४ ला अर्ज करुन मोजणीची फी भरण्यात आली होती. त्यावर वरिष्ठांनी शेरे निर्णय देवून आजतागायत पोटहिस्सा हद्य कायम करुन देण्यात आले नाही. त्याची सत्यप्रत देण्यात यावी. (२) अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर येथे अर्ज दिनांक ५.७.२००५ ला पुरनमोजणीत झालेली चूक दुरुस्तीबाबत अर्ज सादर केला होता, त्यावर वरिष्ठ अधिकारी यांनी कोणता व कशा प्रकारचा अभिप्राय नोंदवून आजतामितीस चुक दुरुस्त करुन पोटहिस्सा हद्य कायम करुन देण्यात आले नाही त्याची सत्यप्रत दयावी. (३) सन २००७-०८ मध्ये पुन्हा परत अर्ज करुन मोजणीची फी भरायला लावून २२५०/- रुपये भरण्यात येवून बरोबर मोणजी केली नसून पोटहिस्सा, ह. कायम करुन देण्यात आले नाही त्याची सत्यप्रत दयावी. (४) बरोबर मोजणी न करता भातून मातूर मोजणी करुन पोटहिस्सा, ह. कायम करुन देण्यास अविलंब करण्याच्या कारणांचा स्पष्ट खुलासा देवून त्याची सत्यप्रत दयावी. (५) सन २००८-०९ मध्ये भु.क्रं. १९१ आराजी हेक्टर १.८२ प्रमाणे क्षेत्र भोगवटादार सौ. अंजनाबाई शंकर निकोसे यांनी मोजणीसाठी अर्ज करुन फी भराली असता अजूनपर्यात मोजणी करुन हद्य कायम करुन देण्यात आली नाही त्याची सत्यप्रत दयावी. वरील मुद्येनिहाय तपशिलवार माहिती लेखी तोंडी स्वरुपात स्पष्ट खुलासा देवून ताबडतोब कळवावे." सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक**

**( पान २ वर..)**

११.१.२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.२.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे या कारणास्तव अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, श्री शंकर निकोसे यांच्या जमीनीचा पोटहिस्सा हद्य कायम करुन देण्याबाबत बरेच अर्ज केलेले आहेत. मोजणी फी भरण्यात आली परंतु हद्य कायम करुन देण्यात आली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या ७/१२ व पुर्वीची वहिवाट हे तपासून हद्य निश्चित होते. अपीलकर्ता यांना क प्रत उपलब्ध करुन दिली. परंतु पुन्हा अपीलकर्ता यांनी मोजणीची फी भरली व ७/१२ तलाठी यांचेकडून दुरुस्त करुन आणला व त्याप्रमाणे क प्रत उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांनी जी हद्य निश्चित करण्याची मागणी केली आहे त्याकरीता त्यांनी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता च्या कलम १०६ व १३५ प्रमाणे अधीक्षकांच्या माध्यमातून उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील करणे आवश्यक असते. तसे अपील सुध्दा त्यांनी केलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मोजणी फी भरलेली आहे. परंतु ती फी मोजणी करीता भरलेली असल्यामुळे ती दुरुस्ती करीता विचारात घेतली गेली नसावी. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दुय्यम क प्रत प्राप्त करुन घ्यावी व दुरुस्तीसाठी प्रकरण दिले होते त्याला जोपर्यंत पुढील कार्यवाहीसाठी अधीक्षक यांचेकडे पाठवावे. भरलेल्या फी ची पावती जोडून पाठवावी. पुन्हा फी भरण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारे अपील झाल्यावर व त्या अपीलाचा निर्णयाप्रमाणे दुरुस्ती होऊन हद्य कायम करुन देता येईल. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य ती कार्यवाही करुन घेणे सुयुक्तिक राहील. त्याकरीता अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

<u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४८७/अम/२००९

१)श्री पुरुषोत्तम धर्माजी आठवले,
विठ्ठल नगर, हातेकर वाडी, मोठी उमरी, अकोला,
ता.जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(क्षेत्रिय आस्थापना)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(कार्या-५-स)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २८.४.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडे, उपनिबंधक सहकारी संस्था तालुका अकोला यांचे विरोधात महाराष्ट्र शासन कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनिमयन व शासकिय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ अन्वये कार्यवाही सुरु होणे बाबत दिनांक २.९.२००८ रोजी अर्ज दिला होता त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.१२.२००८ रोजी, दिनांक २८.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपला दिनांक २.९.२००८ चा अर्ज मा.मंत्री (सहकार) यांनी प्रधान सचिव, सहकार यांना चिन्हांकित केला असून याबाबत दिनांक १५.१०.२००८ च्या शासन पत्रानुसार जिल्हा उपनिबंधक, अकोला यांचेकडे अहवाल मागविण्यात आला आहे. त्याबाबतच्या पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना वस्तुस्थिती कळविली असल्याचे निदर्शनास आले व त्यामुळे अपील खारीज करण्यात आले. व त्यानंतरही अपीलकर्ता यांचे समाधान न**
**झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झ ाालेली आहे हे कागदपत्रावरुन व जन माहिती अधिकारी यांचे निवेदनावरुन स्पष्ट होते. परंतु त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी केली असता दिनांक ८.९.२००९ रोजी तक्रारीत कोणतेही तथ्य आढळून येत नसल्याचे निर्णयाप्रत शासन आले आहे असे त्यांना कळविले आहे.**

**( पान २ वर..)**

**त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु तक्रारीची चौकशी करताना जी टिपणी किंवा जे बयाण घेतलेले असेल किंवा अहवाल मागितलेला असल्यास त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २.९.२००९ च्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीच्या अहवालासह, टिपणीसह कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. /नाग/२०१०

१)श्री अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी जन माहिती अधिकारी तथा**

**त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ३८/२०१०

१) श्री विनयकुमार शिवशंकर डेकाटे,
एम.आय.जी.६४, क्वार्टर नं.१/१२,
हाऊसिंग बोर्ड कॅालोनी, हिवरी ले आऊट,
नागपूर ४४०००८. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार मंडळ,
विभागीय कार्यालय, नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २८.४.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००९ रोजी अपील क्रमांक ९७१/२००९ च्या दिनांक १७.११.२००९ च्या निर्णयाप्रमाणे १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २१.२.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. सदरच्या तक्रारीप्रमाणे दिनांक ४.२.२०१० रोजी खुलासा मागविण्यात आला. त्या खुलासाप्रमाणे दिनांक ५.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ५४/२०१०

१) श्री ताराचंद शामराव वासनिक,
४३, राजगृह मिसाल ले आऊट, जरिपटका रोड, नागपूर-१४. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा
मागासवर्गीय पशु व पक्षी पालन सहकारी संस्था, मर्या.
आमगांव (देवळी), पो. मकरधोकडा, ता.उमरेड, जिल्हा नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २८.४.२०१० )

निर्णय

**तक्रारकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी अपील क्रमांक २१५/२००८ व अपील क्रमांक ३५१/२००८ च्या दिनांक २०.३.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २८.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांचेकडे माहिती मागितली होती. सदरची माहिती ही जन माहिती अधिकारी तथा सचिव, मागासवर्गीय पशु व पक्षी पालन संस्था मर्या. यांचेकडे असल्यामुळे सदरचा अर्ज त्यांचेकडे हस्तांतर करण्यात यावा असे आदेश दिले होते. व त्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांना ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे तक्रार करावी असे आदेश दिले होते. व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीचा खुलासा हा दिनांक ३.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांना मागीतला आहे. व त्यांच्या खुलाशामध्ये त्यांचेकडे अर्जच केलेला नसल्यामुळे माहिती देण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, मागासवर्गीय पशु व पक्षी पालन संस्था मर्या. आमगांव(देवळी) यांचेकडे अर्जाची प्रत देवून ३० दिवसांचे आंत त्यांना माहिती द्यावी असे तोंडी आदेश आयोगाने दिले. त्याप्रमाणे जन माहिती**

**( पान २ वर..)**

**अधिकारी यांना अर्जाची प्रत दिलेली आहे व त्यांनी ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती द्यावी. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांनी, जन माहिती अधिकारी तथा सचिव यांना दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ५२/२००८

१) श्री राजेंद्र तानबाजी सतई,
साई प्रसाद ६९, महालक्ष्मी नगर नं. ३,
गल्ली नं.३, मानेवाडा रोड, नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नागपूर. ८, सहकार सदर, हिंदुस्थान कॅालनी,
अमरावती रोड, नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २१.३.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक ४.२.२०१० रोजी अपील क्रमांक १९९९/२००९ च्या दिनांक २३.१२.२००९ रोजी दिलेल्या आदेशा प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २८.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. सदरच्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ३.३.२०१० रोजी खुलासा मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे खुलासा सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संसथा, नागपूर यांनी खुलासा दाखल केला आहे व त्या खुलाशाची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेले आहे असे कळविले आहे. त्यामध्ये राज्य माहिती आयोग यांचेकडील अपील क्रमांक १९९/२००९ दिनांक २३.१२.२००९ च्या आदेशाप्रमाणे ७ दिवसांचे आंत मुद्या क्रमांक २, ३, ४ ची माहिती तीन प्रतीत या कार्यालयास विनाविलंब सादर करण्याबाबत आदेश नागपूर जिल्हा परिषद पत संस्था मर्या. नागपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक ५२१/२०१० दिनांक १४.१.२०१० अन्वये दिलेले दिसून येते व त्याची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. त्यावर अध्यक्ष/सचिव, नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी संस्था यांनी पत्र क्रमांक १७०३/२०१० दिनांक १.२.२०१० अन्वये सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते.**

**( पान २ वर..)**

**तसेच सदर मुद्यासंबंधाने मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे याचिका दाखल करीत असल्याचे कळविले होते. त्याप्रमाणे दिनांक २९.३.२०१० रोजी अध्यक्ष/सचिव, नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. यांनी श्री सतई यांच्या अर्जासंबंधाने रिट याचिका ६०२५/२०१० अन्वये याचिका दाखल केलेली असून सद्य परिस्थितीत सदर बाब न्यायप्रविष्ट आहे असे कळविलेले आहे. व याचिकेची प्रत सुध्दा आयोगाचे माहिती कीरता सादर केलेली आहे. व त्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४९२/अम/२००९

१)श्री एम.बी. भांगडीया,
मु.पो.बिबी, ता.लोणार, जिल्हा बुलढाणा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी,
लोणार. ता. लोणार, जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, शिवणी पिसा
ता. लोणार, जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २८.४.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००८रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र शिवण पीसा तसेच शासकिय माहिती अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय यांचेकडे दोन अर्जांच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्र शिवणी पीसा ता. लोणार यांचे संदर्भात सन २००७-०८ मध्ये कुटूंब कल्याण व पल्स पोलीओ कार्यक्रमांतर्गत झालेल्या खर्चाचा पुर्ण तपशिल मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी यांनी वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र शिवणी पीसा यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे कळविले व त्या पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. व त्यात पुन्हा आपण सादर केलेल्या अर्जासोबत बी.पी.एल.प्रत साक्षांकित केली नाही. साक्षांकित केलेली प्रत वैद्यकिय अधिकारी यांचेकडे देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. व दिनांक ३.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००८ रोजी बी.पी.एल. कार्डाची साक्षांकित प्रत सोबत जोडली आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २२.९.२००८ रोजी कुटूंब कल्याण व पल्स पोलीओ कार्यक्रमांतर्गत झालेल्या खर्चाचा संपूर्ण तपशिल मागितला असता आपण झालेला खर्च, प्राप्त अनुदान अशी माहिती दिली आहे. माहिती तपशिलासह मागितली असल्यामुळे ती अपूर्ण आहे. झालेल्या खर्चाची पावती, व्हाऊचर झेरॉक्स प्रत सहीत मुद्या क्रमांक ३ अन्वये शिवणी पीसा प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या उपकेंद्रात झालेल्या खर्चाचा तपशिल, कालावधी, खर्चाच्या पावत्या मागितल्या होत्या त्या देण्यात आलेल्या नाही. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी, प्रा.आ.केंद्र शिवणी पीसा यांचेकडे पुन्हा त्यापुर्वीची माहिती व आणखी माहिती मागितलेली**

**( पान २ वर..)**

दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १९.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व दिनांक ८.१२.२००८ रोजी तालुका आरोग्य अधिकारी, लोणार यांनी वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र शिवणी पीसा यांचेकडून माहिती मुदतीत न दिल्याबाबत आपण मागितलेल्या सर्व रेकार्डसह व कारणासहित दिनांक १६.१२.२००८ रोजी उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. व त्या पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येते. परंतु कोणत्याही प्रकारची तारीख त्यावर दिलेली दिसून येत नाही. पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी अपूर्ण माहिती दिल्याबाबत आक्षेप घेतलेला दिसून येतो. अपीलकर्ता हे दिनांक ६.१.२००९ रोजी माहिती घेण्यास गेले असता त्यांना माहिती दिली नाही असे वैद्यकिय अधिकारी यांनी लिहून दिलेले आहे. पुन्हा दिनांक १७.१.२००९ रोजी तालुका आरोग्य अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेश दिले. दिनांक १९.१.२००९ रोजी वैद्यकिय अधिकारी यांनी माहिती देवू शकत नाही. कारण वैद्यकिय अधिकारी (प्रभारी) हजर नाही असे लेखी दिले. दिनांक १३.२.२००९ रोजी तालुका आरोग्य अधिकारी लोणार यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागितलेल्या माहितीच्या चौकशी अंती त्रुटया आढळून आलेल्या आहेत. त्या अपीलकर्ता यांना कळविल्या व प्रतिलीपी वैद्यकिय अधिकारी यांना दिली. तसेच दिनांक ३०.७.२००९ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलढाणा यांनी सुध्दा वैद्यकिय अधिकारी, शिवणी  पीसा यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिलेले दिसून येते. त्यावर दिनांक ११.८.२००७ रोजी तत्कालीन डॉ. श्री व्ही.व्ही. कांबळे यांच्या कालावधीतील असून त्यांनी संबंधीत कार्यक्रमाचा खर्च परस्पर केलेला असल्यामुळे त्याबाबतची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. आपल्या दिनांक १३.७.२००९ च्या स्मरणपत्राप्रमाणे कार्यालयामध्ये कुटूंब कल्याण केस पेपर उपलब्ध आहे. त्याबाबतची माहिती देण्याबाबत संबंधीत कर्मचा-यांना पत्र दिलेले आहे असे कळविले. त्यानंतर त्याच दिवशी वैद्यकिय अधिकारी यांनी श्री एन.डी. राठोड सहाय्यक यांना सुध्दा माहिती देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते.

या सर्व पत्रव्यवहारावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे. दूसरी सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यानंतरही वेळोवेळी अर्ज केल्यानंतर वैद्यकिय अधिकारी किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर त्रोटक माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यातही ती अपूर्ण दिसून येते. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक असल्यामुळे व कुटूंब कल्याण लाभार्थी व कर्मचारी यांच्या संदर्भात जी माहिती विस्तृत प्रमाणात उपलब्ध आहे त्या संदर्भात त्यांना ती संपूर्ण प्रकरण तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यावर विद्यमान वैद्यकिय अधिकारी यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे नवीन होते. तसेच आरोग्य शिबीर असल्यामुळे विलंब झाला आहे. परंतु तालुका वैद्यकिय अधिकारी यांनी सुध्दा त्याच वेळेस माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यांनी सुध्दा माहिती उपलब्ध न करुन देण्याचा निष्कर्ष काढला आहे. त्याचवेळेस संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करुन माहिती

( पान ३ वर..)

**उपलब्ध करुन दिली असती तर प्रश्न उद्‌भवला नसता. वैद्यकिय अधिकारी हजर नाही व त्यामुळे माहिती देता आली नाही असे लेखी दिलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना कुटूंब कल्याण केस पेपरच्या संदर्भात सर्व केस पेपर पाहाणीकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी. सर्व पत्रव्यवहार लेखी करण्यात यावा.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त)ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीच्या रकमेची वसुली संबंधीतांचे दर महिन्याचे वेतनातून कपात करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखा शिर्षात जमा करावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४९४/अम/२००९

१)श्री निमराज पंढरीनाथ विसपुते,
आर १/१५ ब, समर्थ स.ग्र.सं.(अस)म.,
पाषाण, पुणे-२१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अमरावती, कांता नगर अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था(१) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती,
कांता नगर अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००८रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय अमराती यांचेकडे, श्री विसपुते, उपनिबंधक, सहकारी संस्था तालुका अमरावती या पदावर असतांना आपल्या कार्यालयाशी झालेला पत्रव्यवहार मार्चख २००३ ते डिसेंबर, २००४. सासेबत जोडलेल्या एकुण ७ मुद्यांमध्ये माहितीचे वर्णन केलेले आहे. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.१२.२००८ रोजी मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात माहितीचे एकुण ३११ पृष्ठे आहेत. प्रति पृष्ठ रुपये २/- प्रमाणे रुपये ६२२/- चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. सदरची माहिती टपालाद्वारे पाठवावयाची असल्यास रजिस्टर खर्चाचा भरणा करावा लागेल. तसेच मुद्या क्रमांक २ ते ७ ची माहिती तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था अमरावती यांचे स्तरावरील असल्यामुळे ती त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक(१), सहकारी संस्था अमरावती यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक १५.१.२००९ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याबाबत स्मरणपत्र देण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे व त्यामध्ये माझ्या दिनांक १.११.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ७ चे सर्व मुद्यांची माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या स्तरावरील आहे. जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्पर, दुष्ट**

**( पान २ वर ..)**

बुध्दीने व जबाबदारी टाळण्याचे दृष्टीने माहिती त्या कार्यालयाशी संबंधीत आहे ती चुकीची व उर्वरित माहिती कार्यालयाकडून घ्यायला सांगितले. व त्याकरीता अपील करण्यात आले आहे असे नमुद केले आहे.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २४.३.२००९ रोजी निर्णय दिलेला असून त्यात प्रस्तुत प्रकरणातील माहितीच्या संदर्भात अपीलाथी यांना दिनांक ९.१.२००९ च्या अर्जानुसार मागितलेली माहिती दिनांक १३.३.२००९ रोजी दिलेली असून अपीलार्थीचे समाधान झालेले नाही. सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही या कार्यालयाकडून करावयाची नसल्यामुळे अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगीतले की, सहाय्यक निबंधक श्री उल्ले यांनी माहिती त्याच कार्यालयात उपलब्ध असताना सुध्दा ती अमरावती कार्यालयात उपलब्ध आहे असे कळविले आहे. तसेच माहितीच्या खर्चासाठी जास्त रक्कम कळविली. परंतु इतर कागदपत्रे त्यांनी दाखल केलेली नव्हती. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्यांनी आयोगापुढे दाखल केला नव्हता. आज उत्तरवादी हजर नाहीत. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांचे म्हणणे योग्यरित्या सादर केलेले नव्हते तसेच प्रथम अपीलाचा निर्णय किंवा इतर कागदपत्रे दाखल केलेले नव्हते. त्यांनी अमरावती खंडपीठ अमरावती येथे केलेली तक्रार क्रमांक १११/२००९ ही संगणमताने खारीज केलेली आहे असे आयोगास सांगितले. परंतु त्या तक्रारीचा निर्णय सादर केला नव्हता. त्यामुळे त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी असे आदेश दिल्यानंतर त्यांनी ती सादर केली. त्यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय व खंडपीठ अमरावती यांनी खारीज केलेल्या तक्रारीचा निर्णय याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. अमरावती खंडपीठाने स्पष्टपणे, अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, सहकारी संस्था तालुका अमरावती यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे उत्तर देणे हे दिशाभूल करणारे आहे ही गोष्ट मान्य करता येत नाही. व सदरची बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या आदेशामध्ये प्रस्तुत प्रकरणातील अपील अर्जातील माहिती ही अर्जदाराला संपूर्ण माहिती मिळावी या व्यापक उद्येशाने उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक २७.११.२००८ अन्वये विचारणा करण्यात आली. त्यानंतर माहिती उपलब्ध असून रुपये ३५२/- भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी कळविले आहे. त्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) नुसार श्री विसपूते यांचा अर्ज तालुका उपनिबंधक यांना पत्र देवून माहिती उपलब्ध असल्याचे कळविले आहे. व दिनांक १३.३.२००९ रोजी अपीलार्थी व प्रतीवादी हे हजर असताना त्यांना आवश्यक असलेली माहिती रुपये ३००/- ची चालन भरुन देण्यात आली. यावरुन कोणत्याही प्रकारे दुष्ट हेतूने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असा निष्कर्ष काढता येत नाही. अपीलकर्ता यांनी सांगितले की, मुद्या क्रमांक ६, ७ ची माहिती उपलब्ध झालेली नाही. तसे असल्यास त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे तक्रार करणे आवश्यक होते. परंतु

( पान ३ वर..)

**तशी तक्रार केलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २९७/नाग/२०१०

१)श्री भाष्कर गोविंदराव काकडे,
प्लॅाट नं. ३४, आराधनानगर, सिध्देश्वरनगर जवळ, नागोबा मंदीर,
श्री मोडक यांच्या घराजवळ, दिघोरी भंडारा रिंग रोड, नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर, ता.जि. नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,
स्वावलंबी उच्च प्रा.विद्यालय, नविन सुभेदार ले आऊट, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स्वावलंबी उच्च प्राथ. विद्यालय रुख्मिनी नगर, नागपूर यांचेकडे, (१) नियुक्ती आदेश, रुजू अहवाल, सेवा जेष्ठता यादी (संवर्गा सहित), फिटनेस सर्टिफिकेट सेवापुस्तीचेस नमूद करण्याबाबत, नियुक्ती आदेश सन १९९५, सेवा जेष्ठता यादी सन १९९५-९६ व १९९८-९९, फिटनेस सर्टिफिकेट दिनांक १८.२.९९, भ.नि.निधीची खाते क्रमांकाची प्रत, शाळा मान्यता वर्धीत प्रत सन १९९५ ते १९९९-२००० अशी माहिती रजिस्टर पोस्टाने व वैयक्तिक स्वत:हा मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.१२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती एक आठवडयाचे आंत देवून त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे गैरहजर आहे. परंतु अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १२.९.२००९ रोजी मा.सचिव, रघुजीनगर विद्यालय शिक्षण संस्था यांचेकडे अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.८.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. त्यात त्यांनी आपले पत्र दिनांक ३१.८.२००९**

**( पान २ वर..)**

**प्रमाणे मागितलेली माहिती शाळेच्या दप्तराचा भाग असल्याबाबत म्हटले आहे. ती माहिती त्यांना देण्याबाबत आपण आपले पत्रात म्हटले आहे. परंतु हा रेकार्ड आमच्या कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळ ती माहिती त्यांना देवू शकत नाही. आपण सुनफवा तीपासून शाळेचे मुख्याध्यापक व संस्थे सचिव म्हणून कार्यरत आहात. त्यामुळेचा संपूर्ण रेकार्ड स्वत: आपण बघत होते. त्यांची नियुक्ती आपल्याच कार्यकाळात झालेली आहे. आपण सेवानिवृत्त झाल्यानंतर आपणास प्रभारी मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती केले. तेव्हा आपण जूना रेकार्ड आमच्या ताब्यात दिला नाही. मला जो रेकार्ड दिला त्यात अर्जदाराने मागितलेली माहिती नाही. या माहितीचा जूना संपूर्ण रेकार्ड तुमच्याकडेच आहे. तेव्हा ती माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची कृपा करावी. अन्यथा याला आपण वैयक्तिकरित्या उत्तरदायी राहाल असे पत्र दिलेले दिसून येते. त्याची प्रतिलीपी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व उपसंचालक नागपूर व अर्जदार यांना दिलेली दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सांगितले की, मागितलेली माहिती ही शाळेच्या दप्तराचा भाग आहे. परंतु प्रभारी मुख्याध्यापक असल्यामुळे ते पत्र सचिव यांना दिलेले आहे. संस्थेच्या शाळेची मान्यता काढून घेण्यात आलेली आहे. व त्यामुळे आयोगाकडील सुनावणीस मुख्याध्यापक हजर झालेले दिसून येत नाही. संस्थेने उपसंचालक यांचेकडे अपील केले आहे.त्यामुळे अपीलाचा निर्णय झाल्यानंतर व शाळेस मान्यता मिळाल्यास सचिवाकडून सदरची माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व संस्थेने माहिती न दिल्यास त्यांचे अनुदान कमी करण्याची शिफारस करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.८.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती ही शाळेस पुन्हा मान्यता मिळाल्यास संस्थेकडून घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा शाळेचे अनुदान कपात करण्याची शिफारस शासनास करण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २९२/नाग/२०१०

१)श्री मो.आरिफ मो.शब्बीर,
गुजरी बाजार, कामठी, ता.कामठी, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
किदवाई हायस्कुल व ज्यूनिअर कॅालेज, आसीनगर, टेका,नागपूर
जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांना दिनांक २९.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २९६/नाग/२०१०

१)श्री सुर्यकांत शंकरराव रणदिवे,
शेंडे ले आऊट, रामनगर, चंद्रपूर
ता.जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(महसुल)
आयुक्त कार्यालय, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसुल शाखा)
आयुक्त कार्यालय, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (महसुल) आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे, शासनाची अधिसूचना दिनांक ७.७.९९ नुसार महसुल अर्हता परीक्षेचे यापुर्वीचे सर्व नियम व आदेश अधिक्रमित करुन, सदर परीक्षेचे अंतिमरित्या नियम लागू करण्यात आले असतांना पुर्वीच्या नियमांचा विचार करण्याची आवश्यकता नाही. तसेच हे नियम स्पष्ट असतांना, पुन्हा शासनाला विचारणा करण्याची कोणतीही गरज नाही. कोणतेही शासन निर्णय हे सदर परीक्षेची नियमावली होऊ शकत नाही. तसेच महसुल अर्हता परीक्षेच्या नियमावलीची अंमलबजावणी करुन, त्या नियमानुसार जेष्ठता, पदोन्नत्या व मानिव तारीख देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे शासनाचे पत्र दिनांक १८.१०.०६, ६.२.०८ व २.८.०८ अन्वये कळवून त्याची प्रत मा.आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांना देण्यांत आलेली आहे. असे असतांनाही सदर नियमातील नियम ७ नुसार विहित संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांची मुळ जेष्ठता आबाधीत ठेवून, विभागीय जेष्ठता याद्या करण्यात येत नाही या कारणांची माहिती देण्यात यावी. (२) माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत आपले पत्र क्रं.मशा-७(१)/आस्था-२/सीआर-२/२००९ दिनांक ७.१०.२००९ अन्वये कळविल्यानुसार, सदर विषयाबाबत यापुर्वी आपणाकडे अर्ज प्राप्त झालेले असून, याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार सुरु आहे. त्याबाबतची माहिती व त्या पत्राच्या प्रती देण्यात यावे, अशी माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.१२.२००९ रोजी माहितीचा अधिकार प्रकरण १ मधील २(च) माहितीच्या व्याख्येअंतर्गत कारणांची माहिती देता येणार नाही. कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची प्रत देता येवू**

**( पान २ वर..)**

**शकते. त्यामुळे आपण कार्यालयात येवून अभिलेख्याचे अवलोकन करुन आपणास आवश्यक असलेल्या कागदपत्राची मागणी केल्यास सदर अभिलेख्याच्या प्रती आपणास पुरविता येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.२.२०१० रोजी दिला असून माहिती या व्याख्येनुसार उपलब्ध अभिलेख्यांची माहिती देता येईल. मात्र माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे व त्या कारणास्तव अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिला आहे. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २९३/नाग/२०१०
अपील क्रं. २९४/नाग/२०१०

१)श्री पांडुरंग गणपतराव सपकाळ,
रा.करंभाड, पो.ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

अपील क्रं. ३९४/नाग/२०१०

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, पारशिवनी, ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत कार्यालय, करंभाड, ता. पारशिवनी
जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपील क्रमांक ३९३/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे शासन निर्णय क्रमांक वेतन १९९९ प्र.क्र.२/९९ सेवा-३, दिनांक २० जुलै, २००१ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अर्जदारास मिळवून देण्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्राच्या छायांकित प्रती पुरविण्याबाबत एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १, २ व ३ ची माहिती उपलब्ध आहे. मुद्या क्रं.४ मध्ये नमुद माहितीची पुर्णतः स्पष्टता होत नसल्यामुळे त्या अनुषंगाने आपण सदर पत्र प्राप्त होताच या कार्यालयात उपस्थित राहावे व आपणास पाहिजे असलेल्या माहितीबाबत कार्यालयाला स्पष्ट करुन द्यावे. तसेच माहिती प्राप्त करुन घ्यावयाची असल्यास प्रती पृष्ट रुपये २/- प्रमाणे ८ पृष्ठांचे १६/- रुपये कार्यालयात जमा**

**(पान २ वर..)**

करावे. लेखाशिर्ष दिलेले नाही. त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली होती परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सांगितले की, मुद्दा क्रमांक ३ व ४ ची माहिती उपलब्ध झालेली नाही. मुद्दा क्रमांक ४ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना आश्वासित प्रगती योजना प्रमाणे कार्यवाही करुन पाहिजे आहे. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मिळत नाही. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण सेवा अंतर्गत आवश्वासित प्रगती योजना लागू आहे असे कळविले आहे व त्याप्रमाणे कार्यवाही ही संबंधीत सक्षम अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे तक्रार करुन न्याय मागणे योग्य होईल. परंतु माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक २९४/नाग/२०१० मध्ये दिनांक २९.१२.२००८ रोजी, दिनांक २४.११.२००९ ला तहकुब झालेली ग्राम सभा भरविण्यात आली असल्यास सभेच्या इतिवृत्ताची छायांकित प्रत. तहकुब ग्रामसभेची बैठक बोलाविण्यासाठी काढलेल्या नोटीसची प्रत. ग्रामसभेच्या कामाकाजात जास्तीत जास्त सभासदांनी सहभागी व्हावे यासाठी सचिवांनी प्रभाविपणे पार पाडलेल्या कर्तव्याच्या कागदपत्रांची छायांकित प्रत. गाळेधारक दुकानदार यांचेकडील थकीत किरायाची रक्कम, वसुल झालेली रक्कम व शिल्लक रक्कम दर्शविणा-या कागदप९ाची छायांकित प्रत, मकान मालकाचे नांव, मकानाचा प्रकार, क्षेत्रफळ, दर चौरस फुटावर आकारलेला मकान कर दर्शविणा-या कागदपत्रांच्या यादीची छायांकित प्रत. सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करुन बांधकाम करणे, दुकान लावून अतिक्रमण करणा-यांची नांवे, अतिक्रमण काढून टाकण्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, मजूरी देयकाची छायांकित प्रत, बांधकाम साहित्य खरेदीची छायांकित प्रत, किराया देयकाची छायांकित प्रत पुरविण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.१.२०१० रोजी माहितीचा खर्चाची रक्कम रुपये ४८७/- जमा करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्याबाबतचा खर्चाचा भरणा न करता अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १८.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यानंतर दिनांक २०.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली परंतु अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे निर्णय दिलेला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या करीता अतिरिक्त खर्चाचा भरणा मागितला आहे त्याबाबत अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी खर्चाचा भरणाचे विवरण मागितले होते. परंतु विवरण दिलेले नाही. त्यामुळे भरणा केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मोघम माहिती मागितली आहे व त्या माहितीच्या संदर्भात छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावयाच्या असेल तर त्या डबल साईजमध्ये उपलब्ध करुन द्याव्या लागतात. त्यामुळे खर्च तसा दाखविण्यात आलेला आहे.

अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता मुद्दा क्रमांक १ ते ३ ची माहिती ही निश्चित वर्णन केल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मुद्दा क्रमांक

( पान ३ वर..)

**४,५,६ मधील माहिती ही विस्तृत प्रमाणात व मोघम असल्यामुळे त्याबाबतचे निरीक्षण अपीलकर्ता यांनी करावे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपील क्रमांक २९३/नाग/२०१० हे खारीज करण्यात येत आह**

**२) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २९.१२.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ३ ची माहिती विनामुल्य देण्यात यावी. तसेच मुद्या क्रमांक ४,५,६ व ७ ची माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्यामुळे अपीलकर्ता यांनी अभिलेख्यांचे निरीक्षणाकरीता जन माहिती अधिकारी यांना कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून त्या दिवशी उपस्थित होऊन संपूर्ण अभिलेख्याचे निरीक्षण करावे व त्यातून आवश्यक त्या नोंदी घ्याव्यात.**

**अपीलकर्ता यांनी निरीक्षणाकरीता उपस्थित राहाण्याबाबत लेखी कळविल्यास त्यांना मुद्या क्रमांक ४,५,६ व ७ च्या संदर्भातील अभिलेखे निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४९३/अम/२००९

१)श्री दिनेश रामराव सांभारे,
रा.गुरुकृपा कॅालनी, मेहरानंद दळण केंन्द्राजवळ, प्लॅाट नं.४,
एस.आर.पी.कॅम्प शाखा पोस्ट ऑफिस अमरावती-४४४६०२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, अमरावती, कॅम्प अमरावती. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, अमरावती. कॅम्प अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"दिनांक २.९.०८ रोजी श्रीमती पुष्पा रामराव सांभारे, रा.गुरुकृपा कॅालनी मेहरानंद दळण केंद्राजवळ डेन्टल कॅालेज समोर अमरावती यांनी आपणाकडे रितसर नियमानुसार राहण्याचे घराचे म्हणजेच प्लॅाट नंबर ४ चे १६०.०० चौ.मि.चे क्षेत्रफळ असलेल्या घराचे मोजमाप करण्याकरीता अर्ज सादर केला होता. त्यानुसार संबंधीत सर्व्हेक्षक यांनी प्रत्यक्ष जागेवर येवून प्लॅाटची मोजणी केली आहे. व प्लॅाट नंबर ५ यांनी प्लॅाट नंबर ४ चे हद्यीमध्ये वालकंपाऊंडचे अतिक्रमण करुन वॅालकंपाऊंड बांधलेली आहे. सदर अतिक्रमण केलेल्या जागेचे चौ.मि. व क्षेत्रफळ जागा प्लॅाट नंबर ५ यांनी त्यांचे ताब्यामध्ये घेतली आहे. त्या अतिक्रमीत जागेची क प्रत मला न्यायालयामध्ये किंवा महानगरपालिका अमरावती अतिक्रमण पथक यांचे तक्रार वजा प्रकरण दाखल करावयाचे असल्यामुळे सदर अतिक्रमीत जागेची क ची प्रत तातडीने देण्याची कृपा करावी. दिनांक २.८.२००८ रोजी शासनास केलेल्या प्रदानाची पावतीची छायांकित प्रत जोडली आहे, अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते."**

**३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी वरील विषयाच्या अनुषंगाने क प्रत मिळण्याबाबत अर्ज केला होता. परंतु ती क प्रत प्राप्त झाल्याने माझा दिनांक १५.१२.२००८ चा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा अर्ज निकाली ठेवण्यात यावा ही विनंती, असे कथन केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १३.२.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. व प्रथम अपीलात त्यांच्या दिनांक १५.१२.२००८ व ९.२.२००९**

**( पान २ वर..)**

**च्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही असे अपीलाचे कारण दिलेले आहे. त्यानंतर दिनांक १६.३.२००९ रोजी पुन्हा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे तक्रार दाखल केलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.३.२००९ रोजी दिलेला आहे. व त्यामध्ये मौजा अमरावती येथील प्लॅाट क्रमांक ४ ची टिपणी उपलब्ध नसल्यामुळे सदरची मोजणी नियमाप्रमाणे बरोबर झाली आहे असे कारण देवून अपील खारीज केलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपीलाचे कारण त्यांनी क प्रत मिळाली नाही असे दिले आहे.**

**४. अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतु सदरच्या प्रकरणात अपीलकर्ता यांनी क प्रत मिळाली व अर्ज खारीज करण्यात यावा असे लेखी दिले. त्यानंतर पुन्हा त्यासंदर्भात तक्रार केली व मोजणी मान्य नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये टिपणी उपलब्ध नसल्यामुळे ताबा वहिवाटीप्रमाणे मोजणी केली आहे असा निष्कर्ष भूमी अभिलेख यांनी काढला आहे व त्यामुळे वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४९६/अम/२००९

१)श्री अरविंद नामदेवराव पाटील,
अंबार्पन कॅालनी, नव कँाग्रस नगर, अमरावती,
ता.जिल्हा अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(प्रशासन)
महानगरपालिका, अमरावती. जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक(सा.प्र.वि.)
महानगरपालिका, अमरावती, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग महानगरपालिका, अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे.**

**"श्रीमती प्रभा काळे अभिलेखागार यांचे वरिष्ठ लिपिक पदावरील पदोन्नतीस सर्वसाधारण सभेच्या मान्यतेबाबतच्या दस्तऐवजाच्या प्रती. श्री एम.आर. तांबेकर, समाज विकास अधिकारी यांचे सामुदाय विकास अधिकारी पदावरील नियुक्तीस सर्वसाधारण सभेच्या मान्यतेबाबतच्या दस्तऐवजाच्या प्रती. श्री व्ही.एस. मिश्रा, नगर सचिव यांचे कामगार अधिकारी पदावरील नियुक्तीस सर्वसाधारण सभेच्या मान्यतेबाबतच्या प्रती. श्री जी.बी. डोईफोडे, मुख्यलेखाधिकारी यांचे उप लेखापाल, लेखापल, मुख्यलेखापाल या पदावरील पदोन्नतीस सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची दस्तऐवजाची प्रत. तसेच उपरोक्त अधिका-यांचे पदोन्नती आदेश निर्गमित केल्याचे दस्तऐवजाच्या प्रती." अशी माहिती व्यक्त्ीशः मागितलेली दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना, आपण केलेल्या माहितीच्या मागणीनुसार दस्तऐवजाचा शोध सुरु असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होत आहे. ती उपलब्ध होताच पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे दिनांक १३.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.४.२००९ रोजी देण्यात आला असून, माहिती अधिकारी यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी माहिती उपलब्ध होताच माहिती पुरविण्यात येईल असे पत्र दिलेले आहे. यावरुन माहिती अधिकारी यांचा माहिती न देण्याचा उद्येश स्पष्ट होत नाही. माहितीचा शोध घेण्याचे सुरु असल्याबाबत**

**( पान २ वर..)**

**सुरुवातीसच स्पष्ट केले आहे. त्यामुळे माहिती देण्याचा प्रयत्न करीत आहे हे स्पष्ट होते. माहिती अधिकारी यांनी माहितीचा शोध घेण्याचे काम जलद गतीने करावे. माहिती शक्य तितक्या लवकर पुरवावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, दिनांक १७.२.२००९ च्या स्थायी समितीत माहिती तयार असल्याचे नमुद केले आहे. महानगरपालिका कायदेशिर प्राधिकरण असून चुकीची माहिती देण्याचे शक्य नाही. त्यामुळे कार्यालयीन अधीक्षक यांनी माहितीचा अर्जाप्रमाणे हेतुपुरस्पर माहिती दिली नाही, त्याकरीता अपील आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक १ मध्ये श्रीमती प्रभा काळे, अपीलकर्ता यांच्या वरिष्ठ लिपिक पदावरील सर्वसाधारण सभेच्या दस्तऐवजाची प्रत मागितली आहे. परंतु त्यावेळेस अपीलकर्ता हेच अधीक्षक होते असे त्यांनी आयोगास सांगितले. श्री एम.आर. तांबेकर, श्री मिश्रा, श्री डोईफोडे यांच्या संदर्भात स्थायी सभेची मान्यता घेतली आहे किंवा नाही याबाबतची माहिती आढळून येत नाही. तसे असल्यास अपीलकर्ता यांना स्पष्टपणे माहिती आढळून येत नाही असे कळविणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती आढळून येत नसल्याचे स्पष्टपणे कळविण्यात यावे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३७७/नाग/२०१०

१)श्री सुनिल नथ्थुजी अंबागडे,
१०६८, वैशाली नगर, सिमेंट रोड, पी.ओ.आंबेडकर मार्ग,
नागपूर-१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
नागपूर प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ,
उद्योग-उर्जा व कामगार विभाग, सा.बां.परिसर बंगला क्रं.३९/१,
सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विद्युत निरीक्षक,
विद्युत निरीक्षक कार्यालय, निरीक्षण विभाग,
उद्योग-उर्जा व कामगार विभाग,सा.बां.परिसर बंगला क्रं.३९/१,
सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १६.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, अर्जदाराचे भविष्य निर्वाह निधी लेखा संख्या बी.आर.बी.एन./२५७६६ अंतर्गत आर्थीक वर्ष २०००-२००१ मधील पाच महिन्यांचे गुम क्रेडीटस च्या परिशिष्टाची प्रती पुरविण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.१२.२००९ रोजी आस्थापना विभागाच्या इमारतीचे काम सुरु असल्यामुळे एक महिन्याचा कालावधी लागू शकतो. तरी संदर्भांकित अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.१.२०१० रोजी देण्यात अला असून माहे जुलै, २००० ते नोव्हेंबर, २००० या काळात ते रजा मंजूरीशिवाय गैरहजर होते. व सदर काळात रजा दिनांक ६.१.२००१ रोजी मंजूर झाली व त्यानंतर देयक क्रमांक २४३, दिनांक १४.१.२००२ नुसार आपले देयक मंजूर झाले देयकाची स्थुल रक्कम १,०४,०८९/- व वजाती ४२,०३१/- कपात करुन निव्वळ रक्कम रुपये ६२,०५८/- इतकी आहे. या देयकाचा धनादेश क्रं. ३७६६०० दिनांक ३.३.२००२ हा आहे. परंतु देयकाची तपासणी केली असता देयक ज्या गठठयामध्ये ठेवले होते त्या गठठयाला वाळवी लागली आहे.**

**( पान २ वर..)**

**तरीपण त्यातील देयके पाहिली असतां त्यात ते सापडले नाही. यावरुन देयक उपलब्ध होणे शक्य दिसत नाही, असे विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग नागपूर यांनी दिनांक १२.१.२०१० नुसार कळविले आहे. परंतु सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु दिनांक ३.२.२०१० रोजी देयकातील भविष्य निर्वाह निधी कपातीचे नव्याने तयार करण्यात आलेले डुप्लीकेट विवरणपत्र आपणास देण्यात येत असून त्याचे आधारे आपण आपल्या मिसिंग क्रेडीट रक्कमेचा निपटारा महालेखाकार कार्यालय, नागपूर यांचे कडून करुन घेण्यात यावा, असे कळविलेले असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २४८/नाग/२०१०

१)श्री सुरेश यादवराव पाटील,
घर क्रं.१२, जूनी ठवरे कॅालनी,
जरीपटका, नागपूर-४४००१४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक,
कोराडी औष्णिक विज केंद्र, कोराडी(के.टी.पी.एस.)
ता. कामठी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(नि-समन्वय)
कोराडी औष्णीक विज केद्र, कोराडी (के.टी.पी.एस.)
ता.कामठी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १९.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी यांनी पुढील तारीख देण्याची विनंती केल्यामुळे सुनावणीसाठी पुढील तारीख ३०.४.२०१० देण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचेकडे, खापरखेडा परिमंडळातील हस्तांतरीत कार्यरत युडीसी(लेखा) कर्मचा-यांची नांवे दर्शविणारी यादी पुरविण्याबाबत दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३ डिसेंबर, २००६ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु सदरची माहिती चुकीची व अपूर्ण आहे या कारणास्तव त्यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.१.२०१० रोजी देण्यात आला असून दिनांक ५.१.२०१० ला सुनावणी दरम्यान जो लेखी खुलासा सादर केला त्याबाबत आपणास यापुर्वीच मुख्य कार्यालय मुंबईचे वतीने सहसंचालक(मास) व अपील अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रं.१६८८१ दिनांक ३०.१२.२००९ अन्वये कळविलेले आहे व त्यास आपण सहमत व्हाल अशी अपेक्षा आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना ९ कर्मचा-यांची माहिती दिली. परंतु प्रत्यक्षात १० कर्मचारी आहेत व ते स्वतः दहावे कर्मचारी आहे. त्याकरीता दिनांक**

**( पान २ वर..)**

**२३.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून १८४ कर्मचा-यांची नांवाची यादी जोडलेली आयोगाचे निदर्शनास आणली. ती circulation of intergraded seniority list of UDC(A/cs) of MSPGCL as on ३१.३.२००६ अशी आहे. व त्यामध्ये १५३ क्रमांकावर अपीलकर्ता यांचे नांव दिलेले असून खापरखेडा टीपीएस यादीत ते आहे असे दर्शविले आहे. व त्यावरुन त्यांनी सांगितले की, चुकीची माहिती दिली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे सहमत झाले नाही व त्यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही ज्या तारखेची हेती ती दिलेली आहे. असे असेल तर संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या जेष्ठता यादी व उपलब्ध करुन दिलेली माहिती या संदर्भात चौकशी करुन योग्य तो निर्णय देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता पुन्हा चौकशी करीता प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रकरण परत पाठविणे संयुक्तिक राहील.**

आदेश

**१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.१०.२००९ रोजी पुरविण्यात आलेली माहिती व त्यांना म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई यांनी दिनांक २३.२.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली सेवा जेष्ठता यादी दिनांक ३१.३.२००६ प्रमाणे छाननी करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांचेकडे पुन्हा माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात येवू नये. सुनावणी ही जन माहिती अधिकारी व अपीलकर्ता यांचे उपस्थितीत घेण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३०८/नाग/२०१०

१)श्री विजयकुमार गोपालदास अग्रवाल,
ओम राईस मिल कंपाउंड, कुलचूर रोड, गोंदिया,
ता.जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय गोंदिया. ता.जि.गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,
नगर परिषद कार्यालय गोंदिया, ता.जि.गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य अधिकारी कार्यालय, नगर परिषद गोंदिया यांचेकडे, उपरोक्त विषय व कालावधी संदर्भित प्रकरण मे अब तक की गयी संपुर्ण कार्यवाही(यदि शासन निर्धारीत अवधी मे न हुयी हो तो उस हेतु जनसेवको पर की गयी कार्यवाही सहित) प्रदर्शित करने वाली समस्त सूचना कार्यालयीन टिपणी सह देवे. (ब) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रं.कडोमपा १००६/प्र.क्र.१९२/२००६/नवि-२८ मंत्रालय मुंबई, दिनांक २ मार्च, २००९ के अवलोकन हेतु संधी प्रदान की जाय. (क) यदि मेरे आवेदन के पश्चात प्राप्त अतिक्रमण विषय के किसी प्रकरण मे यदि कोई कार्यवाही हुयी हो तो वह प्रकरण दिखाया जाय, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.१२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती मुदतीत दिली नाही. माहिती स्वतःच्या स्वाक्षरीने देणे शक्य नाही, ती तशी दिलेली नाही. याउलट अपूरी माहिती व पत्र दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, गोंदिया यांनी व त्यांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचारी यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती योग्य प्रकारे मिळाली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी व त्यांचे अधिनस्त असलेल्या कर्मचा-यांनी कसून केला आहे. मागितलेली माहिती रेकार्डच्या स्वरुपात सविस्त लेखी स्वरुपात देण्यात आली असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती**

**( पान २ वर..)**

**आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी मुद्दा क्रमांक १ मध्ये कार्यालयीन टिपणी अशी माहिती द्यावी असे मागितले होते. मुद्दा क्रमांक २ व ३ मध्ये माहिती अवलोकन करण्याकरीता मागणी केली होती. परंतु त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली. त्यांच्या माहितीमध्ये कोणताही प्रश्न नाही. तरीही प्रश्नाची माहिती देता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरची माहिती त्यांना त्यांचे सहाय्यक श्री मिश्रा यांचेमुळे वरीलप्रमाणे उपलब्ध झाली. श्री मिश्रा यांचेकडे त्यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अर्जावर आदेश दिले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय स्पष्ट असून नगर रचनाकार व त्यांचे सहाय्यक हे माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यासाठी जबाबदार आहे असा निष्कर्ष काढला आहे व तो योग्य आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांचा अर्ज श्री मिश्रा यांनी वाचलेला दिसून येत नाही. व त्यामुळे ते दोषी आढळून येतात. त्यामुळे नगर रचनाकार यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस तसेच त्यांचे सहाय्यक यांना अधिनियमाचे कलम ५(४)(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द रुपये ३०००/- (रुपये तीन हजार फक्त) ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेख्यांचे निरीक्षण करण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे लेखी कळवावे. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार यांनी स्वतः माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्याकरता त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.**

**२) नगर रचनाकार यांचे सहाय्यक श्री मिश्रा यांना अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ३,०००/- (रुपये तीन हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम संबंधीताचे दर महिन्याचे वेतनातून कपात करुन ती** "००७०-इतर प्रशासीकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".

**या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३००/नाग/२०१०

१)श्री संयजसिंह उदयविरसिंद देसवाल,
अध्यक्ष, ब्रम्हपुरी तालुका युवक राष्ट्रवादी कँाग्रेस,
C/o श्री हुमने निवास, देलणवाडी वार्ड, ब्रम्हपुरी,
ता. ब्रम्हपुरी,जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(आस्था)
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी(प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर. ता.जि. नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.४.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडे मौजा नान्होरी ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर येथील अपील क्रं. १८/२००९-१०, १९/२००९-१० व २०/२००९-१० ही तीन्ही प्रकरणे मा.एन.बी.वटी, अपर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी दिनांक ३.९.२००९ चे पारित आदेशाविरुध्द मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १६(२) अंतर्गत अपीलाबाबत पारित आदेशाची प्रमाणित प्रत तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असल्याचे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १९.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.१.२०१० रोजी देण्यात आला असून प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या वेळेस अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी यांचे आदेशाची माहिती मागितली होती, असे सांगितल्यामुळे पत्र दिनांक २५.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना दिलेले आहे व त्यात रुपये १२/- चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध न करुन घेता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता विलंबाने हजर झाले व माहिती मिळाली नाही असे त्यांनी सांगितले. परंतु रुपये १२/- चा भरणा बाबतचे पत्र मिळाले किंवा नाही याबाबत काहीही सांगितले नाही. परंतु**

**( पान २ वर..)**

**दिनांक ११.१.२०१० रोजी प्रथम अपीलाच्या सुनावणीत त्यांनी मान्य केले त्याबाबत वाचून दाखविले. व त्यांनी रुपये १२/- चा भरणा करुन आदेशाची प्रत उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३१०/नाग/२०१०

१)श्री धनराज रामकृष्णाजी भोंगाडे व इतर,
मु.पो.आंभोरा(खुर्द), ता. कुही, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अभियंता,
गोसे खुर्द पुनर्वसन विभाग, पाटबंधारे वसाहत, प्लॅाट नं.१३,
सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,
गोसे खुर्द पुनर्वसन विभाग क्रं.२ वेलतूर, ता.कुही, जि.नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियता, गोसीखुर्द पुनर्वसन विभाग क्रं.२ वेलतूर यांचेकडे, गोसेखुर्द प्रकल्पाअंतर्गत संपादित केलेल्या मौजा आंभोरा(खुर्द) सा.क्रं.६२ येथील अर्जासोबत जोडलेल्या शेतक-याच्या शेतातील मोबदला दिलेल्या झाडांची यादि मिळण्याबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.१२.२००९ रोजी भूसंपादन प्रस्ताव विशेष भूअर्जन अधिकारी क्रं.२ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी संयुक्त मोजणीनुसार व संबंधीत विभागाकडून प्राप्त मुल्यांकनानुसार झाडांचा मोबदला मंजूर केला असून निवाडयात दर्शविला आहे व त्यानुसार झाडांचा मोबदला देण्यात आलेला आहे. त्यामुळे आपल्या अर्जात नमुद केलेली माहिती आपण त्यांचे स्तरावरुन प्राप्त करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले**

**( पान २ वर..)**

**आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.१२.२००९ रोजी देण्यात आला असून तो स्वयंस्पष्ट आहे. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, जे झाडे शातात आहे त्या झाडांची किंमत त्यांना हवी आहे. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये स्पष्टता असल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४०९/अम/२००९

१)श्री रावसाहेब रामदास च-हाटे,
मु.साखरी पो.चिंचोली (शिंगणे) ता.अंजनगांव(सुर्जी)
जिल्हा अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी,
जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय अंजनगांव सुर्जी, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १३.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर होते. त्यांचे म्हणणे ऐकुण घेतले. व उत्तरवादी हजर नाही व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केलेली नाहीत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे मौजा हपापूर, कोकर्डा व कोकडी मंडळ व कापुसतळणी महसुल मंडळ मधील ०.७७ आर.चे फेरफारच्या गांव नमूना ६ च्या प्रती उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीने व विना परवानगीने दोन्ही मला देण्यात याव्यात अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २६.३.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती उपलब्ध झाली हे मान्य केले. परंतु अपूर्ण माहिती दिली, असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २६.३.२००९ च्या उत्तरावरुन**

**(पान २ वर..)**



**अपीलकर्ता यांना ६०८ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्याकरीता दिनांक २१.२.२००९ रोजी मंडळ अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना मंडळ अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २७६/नाग/२०१०

१)श्री काशीनाथ जनार्दन सोनकुसळे,
प्रतापनगर जवळ, न्यू.पोस्टल कॅालनी, वार्ड नं.१,
मुनोत लॅान मागे, वर्धा, ता.जि. वर्धा-४४२००१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता
स.व सू.प्रविभाग, म.रा.विज वितरण कं.मर्या.विद्युत भवन,
बोरगांव नाका, वर्धा, ता.जि. वर्धा-४४२००१. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(प्रशासन)
प्रविभाग, म.रा.विज वितरण कं.मर्या.बोरगांव नाका, वर्धा
ता.जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २७.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकुण घेतले. उत्तरवादी हजर आहेत व त्यांनी कागदपत्रे सादर केली आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, नेमणुकीबाबतची सन १९९४-९५ या कालावधीची माहिती एकुण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना सातही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी २५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.४.२०१० रोजी देण्यात आला असून तो दिनांक १२.४.२०१० रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला दिसून येतो. त्यात १ ते ७ मुद्यांची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व दिनांक १२.४.२०१० रोजी आपल्या**

**( पान २ वर ..)**

**आदेशानुसार मुद्या क्रमांक १ ते ७ मुद्यांची माहिती दिनांक १०.४.२००६ ला सुनावणीचे वेळी देण्यात आली व ती त्यांनी स्विकृत केलेली आहे असे नमुद केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.४.२०१० रोजी संपुर्ण माति‍ती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सुनावणीत काहीही सांगितले नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झालेली असली तरी त्यांनी आयोगाची दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ४४/२०१०

१) श्री मोहन वासुदेव केळकर,
९०, उषःकाल बिल्डींग, गांधीनगर, नागपूर. — तक्रारकर्ता

विरुध्द

२) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदुम-६)
कृषि, पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२. — गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २१.४.२०१० )

निर्णय

**तक्रारकर्ता यांनी दिनांक १६.१.२०१० रोजी अपील क्रमांक ७९९/२००९ च्या आदेशाप्रमाणे दिनांक ३.११.२००९ चा आदेश क्रमांक १ प्रमाणे १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २१.४.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. परंतु गैरतक्रारदाराचे विनंतीवरुन सुनावणीची पुढील तारीख ३०.४.२०१० देण्यात आली व सुनावणी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहे.**

**२. सदरच्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २३.२.२०१० रोजी खुलासा मागविण्यात आला. परंतु गैरअर्जदार यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी विधान मंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे उपस्थित होता येत नाही, त्याकरीता मुदत मागितली होती. व ती दिनांक ३०.४.२०१० रोजी देण्यात आली. त्यात मा. माहिती आयुक्तांनी दिनांक ३.११.२००९ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन श्री मो.वा.केळकर, अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यां स्तरावर समक्रमांक, दिनांक १८.१.२०१० च्या पत्राद्वारे माहिती यापुर्वीच कळविण्यात आली असून सुलभ संदर्भासाठी प्रत जोडली आहे. त्यानुसार श्री केळकर यांचेशी संबंधीत दोनही प्रकरणे शासकिय स्तरावर अंतिम निर्णयासाठी मान्यतेच्या प्रक्रियेत असल्याचे कळविले आहे. त्यामुळे श्री केळकर यांच्या मागणीप्रमाणे गोपनिय नस्तीमधील टिप्पणीच्या किंवा अंतिम आदेशाच्या प्रती देण्याचा सद्यस्थितीत प्रश्न उद्भवत नाही. याव्यतिरिक्त नमूद करु इच्छितो की, श्री केळकर यांच्या**

**( पान २ वर..)**

**वैयक्तिक विभागीय चौकशी नसून वरील दोन विभागीय चौकशी प्रकरणे ही सामायिक असल्याने एकाच व्यक्तीपुरता माहिती देणे शक्य नाही. दरम्यान उपरोक्त विभागीय चौकशीच्या प्रकरणासंबंधात काही अधिकारी/कर्मचा-यांनी मॅट नागपूर येथे दाखल केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही चालु आहे. तसेच श्री गोपाल झाडे, यांनीही मा.लोकायुक्ताकडे तक्रार दाखल केली असून ती सुध्दा मा. लोकायुक्तांकडे सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये आहे. व त्यामुळे दिनांक १८.१.२०१० रोजी दिलेली माहिती योग्य आहे. व निर्णयाप्रमाणे त्यांनी उत्तर दिलेले आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. यावरुन अपील क्रमांक ७९९/०९ च्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**
**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. २८८/२००९

१) वामन निळकंठ देशपांडे,
एम.आय.जी. २४/४, हाऊसिंग बोर्ड कॅालनी,
त्रिमुर्ती नगर, रिंग रोड, नागपूर. — तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता(जमीन शाखा)
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर. — गैरतक्रारदार

३)जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर. — गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २१.४.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २६७/२००९ मधील दिनांक ३.८.२००९ च्या पारित आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २१.४.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. वास्तविक अपील क्रमांक २६७/२००९ च्या निर्णयामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले नाही. शास्ती लादण्यात आली आहे. व मुद्या क्रमांक ३, ४ व ५ च्या संदर्भात ज्या शाखेतील कर्मचा-यांनी जन माहिती अधिकारी याचेकडे अर्ज सादर केला नाही त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात आली आहे. यावरुन तक्रारदार यांना निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४ प्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. व तरीही दिनांक ६.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता. खुलाशाच्या संदर्भात दिनांक ९.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक ३, ४ व ५ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगास कळविले होते. त्यावर तक्रारदार यांनी आयोगापुढे निवेदन दाखल केले आहे. त्या निवेदनामध्ये उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात विश्लेषण करुन विशिष्ठ ठराव लागू होतो किंवा नाही असे विचारले आहे. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी हे कागदपत्रांचे परिरक्षक असतात. व त्यांच्याकडून**

**( पान २ वर..)**

**कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत अभिप्रायाची अपेक्षा नसते. व धोरणात्मक बाबीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी हे कोणत्याही प्रकारचे मत व्यक्त करु शकत नाही. व त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे. तक्रारदार यांनी त्यांना अपेक्षित असलेली कार्यवाही करुन घेण्याकरीता मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)	तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

**२)	तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. /नाग/२०१०

१)श्री अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.४.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७.४.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी जन माहिती अधिकारी तथा**

**त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं.     /

१)                                                                 तक्रारकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा                                                                 गैरतक्रारदार

३)जन माहिती अधिकारी तथा                                                                 गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २१.३.२०१० )

निर्णय

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक   /२०० च्या दिनांक    च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झ ााली नाही म्हणून दिनांक   रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २१.२.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२.   अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक .१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक .२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

आदेश

**१)   तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून**

**२)   तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

<u>अपील क्र.नाग 160/2010</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री विठ्ठलराव अ. भुजाडे<br>जैन मंदीर जवळ, रामनगर, वर्धा<br>ता.जि. वर्धा 44 2001. | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री मनोज किलेदार,<br>जनमाहिती अधिकारी तथा संचालक,<br>विज्ञान व तंत्रज्ञान विद्या भााखा<br>य ावंतराव चव्हाण महाराश्ट्र मुक्त विद्यापिठ<br>नाशिक. | – | उत्तरवादी |
| 3. | डॉ. प्रकोश अनघरे,<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव,<br>य शावंतराव चव्हाण महाराश्ट्र मुक्त विद्यापिठ<br>नाि ाक. | – | उत्तरवादी |
| 4. | श्री प्रफुल चिकेरुळ,<br>जनमाहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव,<br>य शवंतराव चव्हाण महाराश्ट्र मुक्त विद्यापिठ<br>नाशिक. | – | उत्तरवादी |

(आदेशपारित दिनांक 08/04/2010)

निर्णय

1. अपीलकर्ता यांनी दि. 08.02.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 03.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 08.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2 अपीलकर्ता यांनी दि. 6.06 09 भाासकिय माहिती अधिकारी तथा संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यशवंतराव चव्हाण महाराश्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक यांचेकडे ऑनलाईन बंद केल्यासंबंधीचे व चालू केल्या संबंधीची माहिती नॅशनल पॉलिटेक्निक कॉलेज वर्धाच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 11.11. 2009 रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3 अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना आवक जावक कक्षात दि. 22.06.09 रोजी माहित पाठविली परंतु अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही. त्यांनी दिनांक 30.06.09 रोजी पुन्हा पत्र दिले. त्याप्रमाणे त्यांना दि. 13.08.09 रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिली. त्याबद्दलची छायांकित प्रती (पोस्टाच्या) दाखल केलेल्या आहेत. नंतर मात्र अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतू त्यांनी दिनांक 06.06.09 ला दोन माहितीचे अर्ज केलेले होते. एक अर्ज विद्यार्थी सेवा विभाग यांचेकडे केलेला होता व दुसरा अर्ज संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान भााखा यांचेकडे केलेला होता. दोन्ही अर्जात एकच माहिती मागितली होती त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की एकच माहिती आहे परंतु प्र ाासकिय विभाग हा विद्यार्थी सेवा विभाग असल्यामुळे त्यांचेकडे पाठविण्यात आली होती. व कारवाईर्स विलंब झालेला असल्यामुळे त्यांचेकडून माहिती न देता संचालक विभाग व तंत्र ााखा यांचेकडून देण्यात आली होती. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु ती वि ाश्ट माहिती अपीलकर्ता यांना सेचालक विद्यार्थी सेवा विभाग यांनीच द्यावी असा त्यांचा आग्रह दिसून येतो. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपीलकर्ता यांनी सुध्दा ज्या विभागाकडे माहिती आहे त्या विभागाकडेच माहिती मागणे अपेक्षित असते. एकच माहिती दोन विभागाकडे मागून त्यांचेकडून मिळाली नाही त्याचे संदर्भात अपील करणे हा त्या अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर आहे, व त्रास देण्याचा उद्दे ा दिसून येतो. तरी गुणवत्तेच्या संदर्भात निर्णयास विलंब कां झाला या संदर्भात माहिती असल्यास अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल, व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसात किती दिवसात निर्णय घेणे आव यक असते असा नियम उपलब्ध असल्यास त्याची माहिती द्यावी. .

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

**अपील क्र. 157/2010**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री अनंत रामचंद्र दक्षिणदास<br>55–अ, सोमनाथ अपार्टमेंट, खरे टाऊन,<br>धरमपेठ नागपूर<br>ता.जि. नागपूर | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री टी. एन. चव्हाण,<br>जनमाहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, नागपूर<br>सहकार सदन, हिंदूस्तान कॉलनी, अमरावती रोड,<br>नागपूर | – | उत्तरवादी |
| 3. | श्री ठाकूर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय उपनिबंधक<br>सहकारी संस्था<br>धनवटे चेंबर्स अनेक्स, सिताबर्डी, नागपूर. | | |

(आदेशा पारित दिनांक 08/04/2010)

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दि. 17.02.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 03.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 08.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत

2 अपीलकर्ता यांनी दिनांक 20.11.2009 जनमाहिती अधिकारी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे नागपूर महिला नागरी सहकारी बॅक नागपूर यांचेकडून एप्रिल 96 मध्ये घेतलेल्या सदनिका खरेदीकरीता कर्ज संबंधाने कागदपत्राच्या सत्यप्रतिलिपी दि. 26.08.09, 23.09.09, 20.10.09 रोजी मागितलेल्या

दिनांकास दुसरे स्मरणपत्र देण्यात आले परंतू त्याची माहिती मिळाली नाही म्हणून माहितीचा अर्ज दिलेला आहे. संबधीत माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि. 31.12.09 रोजी प्रथम अपिल दाखल केले प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. 06.02.10 रोजी देण्यात आला असून अपील फेटाळलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलें आहे.

3 अपीलकर्ता यांनी आयोगापूढे असे सांगितले की, सहकार आयुक्त निबंधक यांचेकडून अपीलकर्ता यांच्या मागणीप्रमाणे महाराश्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या कलम 30 प्रमाणे कर्जदारास व जामीनदारांना माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे असे असून सुध्दा त्यांना माहिती दिली नाही म्हणून माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. तसेच संस्थेची बॅक ही अवसायनात निघालेली असल्यामुळे व आज सर्व संचालक मंडळ हे भाासकिय प्र ाासक असल्यामुळे ती माहिती माहितीच्या अधिकारात उपलब्ध होणे आव यक आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्जातील माहिती हि बॅकेच्या स्तरावरील असल्यामुळे बॅकेकडे पाठविला. परंतू बॅकेने सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराश्ट्र राज्य पुणे यांचे दि. 08.02.2006 चे परिपत्रकान्वये .बॅकेला लागू होत नसल्यामुळे माहिती देण्यास असमर्थ असल्याचे कळविले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार लागू होत नाही अ ाा प्रकारचा निश्कर्श काढलेला आहे. परंतु सहकारी आयुंक्त व निबंधक सहकारी संस्था यांच्या पत्राची दखल मात्र का घेतली नाही याबद्दलची कोणतीही चर्चा त्यांनी केली नाही. महाराश्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 विधानमंडळानी केलेला कायदा असल्यामुळे त्या कायद्याचे कलम 30 प्रमाणे कर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. मात्र त्याची दखल सुध्दा माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास घेतली गेली नाही याचाही विचार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी करणे आव यक होते. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मध्ये "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. व त्या व्याख्येप्रमाणे माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये त्या त्या वेळी अमलांत असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अ ाी कोणत्याही खाजगी निकाया ाी संबंधित माहिती यांचा समावे ा होतो. अ ाी तरतूद आहे. सहकार आयुक्त यांचे परिपत्रकाप्रमाणे नागरी सहकारी बॅक ही जर निकाय असेल तर वरील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे महाराश्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण म्हणजे सहकार विभागाचे नियंत्रण हे सहकारी संस्थेवर आहे. संबंधित बॅक ही अवसानयात काढण्यात आलेली आहे. व त्यावर अवसायक हे भाासकिय अधिकारी आहे. याचा अर्थ आता संपूर्ण नियंत्रण हे अवसायकाचे आहे.

पर्यायाने भाासनाचे आहे. या परिस्थितीमध्ये माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अवसायनात निघालेल्या व प्र ाासक असलेल्या किंवा अवसायक असलेल्या संस्थेस लागू होईल. किंवा जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था यांनी माहिती या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अं ाातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपीलकर्ता यांचे अपील हे अं ाातः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावी व उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे त्यांना रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावी.

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. नाग. 161/2010</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री रुपेश विनायक गजपूरे<br>भाहर विभाग, ि ावाजी चौक, वार्ड नं. 1,आरमोरी<br>ता. आरमोरी जि. गडचिरोली. | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री, श्री एस.जी. वाघुळे<br>जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>नगर परिशद, गडचिरोली | – | उत्तरवादी |
| 3 | श्री किरण ग. कोबे<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(ग्राम पंचायत) जिल्हा परिशद, गडचिरोली | – | उत्तरवादी |

**(आदेश पारित दिनांक 08/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दि. 09.02.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 03.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 08.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत

2 अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2009 रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, (पंचायत विभाग) जिल्हा परिशद, गडचिरोली यांचेकडे सन 1995 ते सप्टें. 09 पर्यंत गडचिरोली जिल्हयातील संपुर्ण ग्राम विस्तार अधिका–याची तथा विस्तार अधिकारी यांची माहिती प्रपत्र 1 व 2 मध्ये कोश्टकानुसार मिळण्याचे कळविलेले आहे. मानीव तारखेच्या आदे ाच्या साक्षांकित प्रति,व नस्तीच्या साक्षांकित प्रतींची पूतर्ता करुन प्रति उपलब्ध करुन द्यावी अतिरिक्त माहिती दि. 30.11.2009 चे पत्राच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.11. 09 रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.प्रथम

मुद्दा क्र. 3 ची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब लागेल असे कळविलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.12.09 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 08.01.2010 रोजी निर्णय दिलेला असून मुद्दा क्र. 3 ची सन 1995 ते 2008 या कालावधीमध्ये ज्या विस्तार अधिकारी / ग्राम विकास अधिकारी यांना मानीव तारीख मंजूर करण्यात आली असेल त्याच्या आदे ाच्या व टिपणीच्या प्रति सहायक माहिती अधिकारी (पंचायत) यांचेकडून प्राप्त करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी पाठपुरावा करावा व त्यांचेकडून दस्तऐवज प्राप्त होताच अपीलकर्त्यास सत्यप्रति पुरविण्यात याव्या असा आदे ा दिलेला दिसून येतो. परंतु सोबतच्या आदे ाप्रमाणे माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना 3 मुदयांची माहिती मिळालेली आहे. परंतु मुद्दा क्र. 3 ची माहिती अपूर्ण देण्यात आलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना अर्जाच्या वेळेस उपलब्ध असलेल्या 3 विस्तार अधिका–याची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु आता सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व ती अपीलकर्ता यांना पुरविण्यास कोणतीही अडचण नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

1. अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत त्यांच्या दिनांक 26.10.09 च्या अर्जातील मुद्दा क. 3 ची माहिती विनामुल्य व्यक्ती ाः उपलब्ध करुन देण्यात यावी त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचे ाी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. नाग./158/2010</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री जनार्दन गुलाबराव मून<br>केंद्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,<br>791, नागसेन वन, नागपूर–17 | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री, एम.आर. रामटेके,<br>जनमाहिती अधिकारी तथा सहायक सल्लागार<br>समाज कल्याण विभाग जिल्हा परिशद,<br>नागपूर | – | उत्तरवादी |
| .3 | श्री महेश करजंगावकर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>समाज कल्याण अधिकारी<br>जिल्हा परिशद, नागपूर | – | उत्तरवादी |

**(आदेश पारित दिनांक 08/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दि. 18.02.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 03.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 08.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत

2 अपीलकर्ता यांनी दि. 11.12.09 जन माहिती अधिकारी अधिक्षक, समाज कल्याण यांचेकडे श्री माधव झोड समाज कल्याण अधिकारी हे निलंबित झाले त्याप्रकरणी बेकायदेशीर अनुमोदन दिलेल्या शिक्षक कर्मचा–यांची यादी व त्यांना दिलेल्या ऐरीअर्सची माहिती देण्याची तसदी घ्यावी असे म्हटल्याचे दिसून येते अ ी माहिती मागितलेली असून स्पिड पोस्टने द्यावी. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 19.01.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की आतापर्यंत त्यांना कोणतीही माहिती मिळालेल नाही. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा सांगितले की माहितीच्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. परंतु त्या सेवानिवृत्त झालेल्या आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, त्यांचेकडे अपील हे सुनावणीसाठी सादर केले गेलेले नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अ ी हतबदलता दाखविण्यापेक्षा ज्या कर्मचा–याचे अपील सादर करण्याचे कर्तव्य आहे त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे आव यक होते. त ी कार्यवाही करुन सुनावणीस आले असते तर ते जास्त संयुक्तिक झाले असते. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी नि चत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द ि ास्तभंगाची कार्यवाही करणे आव यक आहे. आयोगाकडे जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ऐरीअर्सची एकूण रकमेचा तक्ता सादर केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी अनुमोदन दिलेल्या ि ाक्षक कर्मचा–याची माहिती मागितलेली आहे. ती माहिती दि. 20.03.2010 रोजी म्हणजे राज्य माहिती आयोगाकडून नोटीस निर्गमीत केल्यानंतर अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु त्यात माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. चौक ी अहवाल पूर्ण झालेला असल्यास तो उपलब्ध करुन घेवून त्यातून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुने देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अ ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही चौक ी अहवाल पूर्ण झालेला असल्यास तो उपलब्ध करुन घेवून त्यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पुरवावी.

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 ( 3) अंतर्गत अपील.

**अपील क्र. 234/2010**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री पांडूरंग गणपतराव सपकाळ,<br>रा. करंभाड<br>पो.ता. पारशिवनी, जि. नागपूर | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>सहायक अभियंता,<br>महाराश्ट्र राज्य विज वितरण कंपनी<br>उप विभाग कार्यालय, पारि ावनी,<br>जि. नागपूर | – | उत्तरवादी |
| 3. | श्री जे.पी ठाकरे,<br>जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,<br>महाराश्ट्र राज्य विज वितरण कंपनी उप. वि.<br>कार्यालय, पारशिवनी, जि. नागपूर | | |

(आदेश पारित दिनांक 12/04/2010)

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दि. 6.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 14.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता विज वितरण कंपनी उपविभाग, पारशिवनी . यांचेकडे ग्राहक क्र. 4221 80074807 DL 00353 ग्राहकाच्या संदर्भात एकूण चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 05.02.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व प्रथम अपिलीय अधिकारी सुध्दा हजर नाहीत किंवा कागदपत्रे दाखल

केलेले नाहीत व त्यामूळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना थकबाकीदार कसे दाखविण्यात आले त्या बद्दलची माहिती अदयापपर्यंत दिलेली नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक 25.01.2010 रोजी समायोजित रकमेची संपूर्ण माहिती दिलेली आहे. आयोगापूढे सुध्दा यूक्तीवाद करतांना जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचे मिटर पूर्वी नादुरुस्त होते. त्यांच्या विनंतीनुसार ते बदलण्यात आले त्यामुळे त्या मिटरप्रमाणे दिलेले विज बिल बदलण्यात येवून तात्पुरते विज बिल देण्यात आले होते. परंतु संगणकात नोंद करतांना पुन्हा सात हजार रुपये क्रेडीट दाखविण्यात आले व त्यामुळे त्यांना त ा प्रकारचे देयक देण्यात आले होते. परंतू ही बाब ऑडीटमध्ये लक्षात आल्यानंतर त्यांना सुधारीत बील देण्यात आले. व त्यामुळे त्यांना त्याबाबतची संपूर्ण माहिती मुद्देनिहाय देण्यात आलेली आहे.दि. 08.02.2010 रोजी उर्वरीत माहिती सुध्दा देण्यात आली. व त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदे श

1. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र. 238/2010</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री बाबूराव मोतीरामजी खोब्रागडे<br>बजरंग नगर, रोड नं.7, पो. भगवाननगर,<br>नागपूर. | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री. ए.बी. पडोळे,<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग–1<br>शिवाजीनगर, नागपूर | – | उत्तरवादी |
| 3 | श्री नितीन पैठणकर<br>जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक–1<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. | | |

**(आदेश पारित दिनांक 12/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दि. 6.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता तर्फे त्यांचा मुलगा श्री अमित बाबूराव खोब्रागडे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत

2 अपीलकर्ता यांनी दिनांक 21.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक कार्यालय यांचेकडे दस्त नें. 1679, 12059 (ब) 28.12.96 असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दिनांक 10.11.2009 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात स्पष्टिकरण विचारलेले होते. परंतू तसे स्पष्टिकरण मिळाले नसल्यामुळे व अपीलकर्ता यांनी दिनांक 30.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक 13.01.2010 रोजी माहिती अधिकारी यांनी श्री अशोक धुळे दुय्यम निबंधक यांना त्याबद्यल माहिती विचारली असता त्यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही वेगळया दस्त्यामध्ये ठेवण्यात आली होती. व त्याबाबतची माहिती घेतल्यानंतर सदरचे

मुखत्यारपत्राची प्रत उपलब्ध झालेली आहे. व त्याकरीता सर्व पत्रव्यवहार आयोगाकडे त्यांनी दाखल केला आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची
टाळाटाळ केली आहे.असा निश्कर्श काढता येत नाही. आज अपिलकर्ता हजर नसून त्यांचे अधिकारपत्र त्यांनी मुलाला दिले आहे. व त्यांच्या मुलाला सदरचे माहितीचे
कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत. त ी त्यांची पोच घेण्यात आलेली आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपीलकर्ता यांचे मुलाला माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. 236/2010**
**अपील क. 261/2010**

1. श्री आनंद अजाबराव धानोरकर — अपीलकर्ता
तुकाराम सभागृह चौक,धाडीवाल ले–आऊट ,
बौध्द विहाराजवळ ,रिंगरोड,
नागपूर.

2 प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त — उत्तरवादी
महाराश्ट्र राज्य परिक्षा, परिशद पूणे
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पूणे–1

3. श्री महावीर माने
जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त
महाराश्ट्र राज्य परिक्षा, परिशद पूणे
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पूणे–1

(आदे श पारित दिनांक 12/04/2010)
निर्णय

1. अपील क. नाग./261/2010 हे दिनांक 19.04.2010 रोजी सुनावणीस ठेवण्यात आलेले आहे. परंतु आज अपील कमांक नाग./236/2010 मधील उत्तरवादी व अपील कमांक नाग./261/2010 मधील उत्तरवादी एकच असल्यामुळे व पुण्याहून येत असल्यामुळे आजच सदरच्या अपीलाची सुनावणी घेण्यास अपीलकर्ता यांनी मान्यता दिली असल्यामुळे ती सुनावणी आज घेण्यात आली.

2. दोन्ही अपीले दिनांक 06.03.2010 व 11.03.2010 रोजी दाखल करण्यात आली आहेत.

3. अपील कमांक नाग. 236/2010 मध्ये दिनांक 14.01.10 रोजी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा आयुक्त, महाराश्ट्र राज्य परिक्षा परिशद पूणे यांचेकडे एकूण 6 मुद्दयांमध्ये त्यांच्या वर्श 2009 च्या ऑक्टोबर मध्ये D.T.ED प्रवे ापत्र बाबत व निकाल न मिळाल्याबाबत तसेच पुढील दिलेल्या विशयांची माहिती मिळण्याबाबत एकूण 6 मुददयांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते

सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दिनांक 03.02.2010 रोजी एकूण 6 मुददयांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 09.02.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले.
प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक 12.03.2010 रोजी निर्णय दिलेला असून अपीलकर्ता हे सुनावणीच्या इतिवृत्तावर स्वाक्षरी न करता तसेच निघून गेल्याची नोंद केलेली आहे. तसेच माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध करुन दिलेली माहिती तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु त्यांची तक्रार गुणवत्तेच्या बाबत किंवा प्रक्रियेच्या बाबत दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

5 अपील क्रमांक नाग./261/2010 मध्ये दिनांक 25.01.2010 रोजी भाासकिय माहिती अधिकारी तथा आयुक्त महाराश्ट्र राज्य परीक्षा परीशद, पुणे यांचे कार्यालयात एकूण चार मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दिनांक 17.02.2010 रोजी काही माहिती उपलब्ध करून दिली व पत्रव्यवहार हा प्राचार्य, अद्यापक विद्यालय, कोराडी यांचेकडून घ्यावा असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांना अपेक्षीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दिनांक 23.02.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी आयुक्त, महाराश्ट्र राज्य परिक्षा परिशद पूणे यांचे कार्यालयातून पत्रव्यवहार हा प्राचार्य, अध्यापक विद्यालय, कोराडी यांचेकडून उपलब्ध होऊ भाकणार नाही. त्यामुळे आयुक्त कार्यालयानी केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती हि त्याच कार्यालयाच्या माहिती अधिकारी यांनी देणे आव यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक नाग./236/2010 मध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2. अपील क्रमांक नाग./261/2010 मध्ये आयुक्त कार्यालयानी केलेल्या पत्रव्यवहाराची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

3. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)<br>
**आयुक्त**<br>
**राज्य माहिती आयोग**<br>
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र. 243/2010</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | सौ. प्रमिला राजेश मेश्राम,<br>श्री दामोदर खोब्रागडे यांचे घरी<br>प्लॉट नं. 56, उंटखाना रोड,<br>नागपूर. | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलिस उपआयुक्त<br>परिमंडळ क्रमांक –4, नागपूर. | – | उत्तरवादी |
| 3. | श्री. के. एस. बहुरे<br>जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस आयुक्त<br>अजनी विभाग, नागपूर | | |

(आदेश पारित दिनांक 12.04.2010)

<u>निर्णय</u>

1. अपीलकर्ता यांनी दि. 8.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे .जनमाहिती अधिकारी अधिकारी हजर आहेत प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे श्री योगे ा कामाळे, वाचक तसेच विधी अधिकारी श्री भां ांक चौबे हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 16.09.09 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे एकूण 7 मुद्दयांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 13.10.09 रोजी मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक 18.11.09 प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दि. 26.11.09 रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतू अपिल अंशतः

मंजूर करण्यात येत असून अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे पुन्हा मुद्दा क्र. 3 ते 7 ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसात देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो.व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्यानंतरही समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3 अपिलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना प्रत्येक मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती मिळाली. परंतु विशलेशण दाखल केलेले आहे व त्यामुळे एखाद्या प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत वि लेशण करुन आयोगास तपासता येत नाही. व त्यामुळे अपिलकर्ता यांनी जे वि लेशण केलेले आहे ते त्यांना मा. न्यायालयात युक्तीवादाद्वारे करणे संयुक्तिक राहिल. व त्यामुळे कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपिलकर्ता यांचे अपिल खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांनी निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र./नाग./ 231/2010</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती य  ोधरा वि  वनाथ सहारे<br>मु. मालदुगी पो. गोठणगाव<br>ता. कुरखेडा जि. गडचिरोली | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>महिला आर्थिक विकास महामंडळ<br>मुख्यालय, मुंबई | – | उत्तरवादी |
| 3. | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिश्ठ जिल्हा समन्वय अधिकारी,<br>महिला आर्थिक विकास महामंडळ,<br>गडचिरोली | | |

(आदे श पारित दिनांक 12.04.2010)

<u>निर्णय</u>

1. अपीलकर्ता यांनी दि. 05.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे  कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 24.04.09 रोजी जन माहिती अधिकारी तथा वरिश्ठ जिल्हा समन्वय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, गडचिरोली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. (1) मानधन व प्रवास बिल जून ते डिसें. 07 (2) एरीअर्स लागू झाल्याचे जी. आर. प्रत व रक्कम (3) कार्यरत असतांनाच कामावरुन कमी केल्याबाबत 31 डिसेंबर 07 इतिवृत्त (4) ठेवनिधी पावत्यांच्या प्रति व रकमाबाबत. (5) आरमोरी तालुक्यातील मोहझरी येथे झालेल्या  3 जाने. 07 मधील कार्यक्रमातील उपस्थित महिलांची यादी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे.अर्जाच्या अनुशंगाने माहिती उपलब्ध झाली

परंतू ती अपूर्ण आहे या कारणास्तव प्रथम अपिल दिनांक 10.12.09 रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती अपिलकर्ता यांना सुध्दा दिली नाही. जन माहिती अधिकारी हे हजर नसल्यामुळे कोणतीच माहिती आयोगापुढे सादर झालेली नाही. परंतू प्रथम अपिलामध्ये अपूर्ण माहिती मिळाली असे गृहित धरल्यास अपिलकर्ता यांना अपूर्ण माहिती मिळाली नाही असा निश्कर्श काढावा लागतो.व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा वरीश्ठ जिल्हा समन्वय अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल परंतु आयोगाकडे उपस्थित न झाल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (1) अन्वये रु. 1000/— ची भाास्ती लावणे आव यक राहिल व माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे अधिनियमाचे कलम 20 (2) अन्वये ि ास्तभंगाची कार्यवाही करणे आव यक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी तथा वरीश्ठ जिल्हा समन्वय अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास त्यांचेविरुध्द रु. 25000/— ची भाास्ती लादण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

2 जन माहिती अधिकारी हे आयोगाचे नोटिसीप्रमाणे आयोगापुढे उपस्थित न झाल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 1000/— ची भाास्ती लादण्यात येते. सदरची भाास्तीची रकमेची वसुली ती त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुंल करण्यात येवून लेखाि ार्श "0070— इतर प्र ाासकीय सेवा, इतर सेवा, 800, इतर जमा रक्कमा, (18) माहितीचा अधिकार (0070—016—1)" मध्ये जमा करण्यात यावी.

3 जन माहिती अधिकारी तथा वरीश्ठ जिल्हा समन्वय अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अपूर्ण माहिती दिलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहिची शिफारस करण्यात येते.

4 सदरच्या निर्णयाची एक प्रत महिला आर्थिक विकास महामंडळ यांचे व्यवस्थापकिय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, म्हाडा इमारत कला नगर, बांद्रा पूर्व, मुंबई – 59. यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

5 अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

अपील क्र. /नाग./240/2010

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री अनिलकुमार प्यारेलाल अग्रवाल,<br>बाजार लाईन, देवरी,<br>ता. देवरी जि. गोंदिया. | – | अपिलकर्ता |
| 2. | श्री. वा. स. मानकर<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भुमी अभिलेख कार्यालय गोंदिया,<br>ता. जि. गोंदिया | – | उत्तरवादी |
| 3. | श्री एम. पी. लंगे<br>जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक,<br>भुमी अभिलेख कार्यालय, देवरी<br>ता. देवरी जि. गोंदिया | – | उत्तरवादी |

(आदेश पारित दिनांक 12.04.2010)

निर्णय

.

1. अपीलकर्ता यांनी दि. 09.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2 अपिलकर्ता यांनी दिनांक 20.10.09 रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, देवरी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून एकूण 5 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती उपस्थित राहून घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 17.11.09 रोजी मु. क्र. 1 व 2 ची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. मुद्या क्र. 3, 4 व 5 ची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. व
त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 20.11.09 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 02.12.09 रोजी देण्यात आला असून मुद्या क्र. 3 ची

माहिती ती तलाठी कडून उपलब्ध करुन घेता येईल व मुद्या क्र. 4 व 5 ची माहिती प्र नाधीन स्वरुपाची असल्यामुळे ती पुरविण्यात आली नसल्याबाबत अपील अर्जदारास समज देण्यात आली. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. दरम्यान दिनांक 04.01.2010 रोजी त्यांना तलाठी यांचेकडून माहिती मिळाली होती. त्यामध्ये अर्जात नमुद केलेले खसरा क्र. 8/17 चे 81,89,85,86 गट क्रमांक कोणत्या वर्शी करण्यात आले. याबाबत तलाठी रेकार्ड तपासनी केले असता तलाठी रेकार्डला वरील द र्शविलेले खसरा क्रमांकाचे गट क्रमांकामध्ये बदल झाल्या वर्शाचे तलाठी कार्यालयात रेकार्ड उपलब्ध नाही संबंधित रेकार्ड तालुका भुमी अभिलेख, देवरी यांच्याकडून रेकार्ड उपलब्ध करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते.व त्यामुळे अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, भुमी अभिलेख कार्यालयातून तलाठी यांचेकडे माहिती मिळाली. परंतू त्यांचेकडे माहिती उपलब्ध नाही. व ती भूमी अभिलेख कार्यालयाकडेच उपलब्ध होईल असे तलाठी यांनी सांगितल्यावर ही माहिती आता कोणत्या कार्यालयाकडे मिळेल याबाबत अपिलकर्ता हे द्विधा मनःस्थितीत आहे. त्याकरीता अधिक्षक भुमी अभिलेख यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती हि तलाठी दप्तरातच असणे आव यक आहे. खसरा नं. हे तलाठी देतात. परंतू त्यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे एकत्रीकरणाच्या संदर्भामध्ये जे कागदपत्र उपलब्ध आहे. संबंधित प्रकरणामध्ये ही माहिती उपलब्ध होवू भाकेल व त्यातही ती उपलब्ध न झाल्यास अपिलकर्ता यांनी मा. उपसंचालक, भूमी अभिलेख यांचेकडे एकत्रीकरणाच्या अधिनियमाप्रमाणे अपिल केल्यास दुरुस्ती होवू भाकेल. असे असल्यास भूमी अभिलेख यांनीच अपिलकर्ता यांच्या अर्जावर योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांनी अधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे संपर्क साधणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी अधिक्षक भूमी अभिलेख यांचे शी संपर्क साधून योग्य ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. 1415/अम./2010**

1. श्री संजय खूशालराव कडू — अपिलकर्ता
गाडगे नगर, अमरावती.

2. प्रथम अपिलीय अधिकीर तथा उपसंचालक,
भूमी अभिलेख कार्यालय अमरावती प्रदे ा अमरावती — उत्तरवादी
जि. अमरावती.

3. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय अमरावती,
ता.जि. अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक 13.04.2010)**

**निर्णय**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 19.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.10.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (03) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे श्री आर. ए. परकर, अधिक्षक हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.01.2009 रोजी अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. परंतू सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 16.02.09 रोजी प्रथम अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलाच्या संदर्भामध्ये दिनांक 24.07.09 रोजी निर्णय दिलेला असून प्रस्तूत अपिलदार यांना अधिक्षक भुमी अभिलेख अमरावती यांनी वरील माहिती न पुरविल्याने या कार्यालयाकडे दाखल केलेले अपिल चुकीचे असल्याने अपिलार्थी यांचे अपिल नामंजूर करण्यात येवून

अपिल अर्ज विनाकारवाई निकाली ठेवण्यात येत आहे असे आदे ा दिलेले दिसून येतात. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

3. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख यांचे कडे अर्ज केला होता. परंतू त्यांचेकडून माहिती मिळाली नाही.म्हणून भुमी अभिलेख, अधिक्षक यांचेकडे माहितीचा अर्ज केला. परंतु त्यांनी मला माहिती उपलब्ध करुन न देता तालूका निरिक्षक यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदे ा दिले. परंतू तरीही माहिती उपलब्ध झाली नाही. परंतू प्रथम अपीलच्या निर्णयानंतर तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडील माहिती उपलब्ध झाली असे त्यांनी आयोगाचे निद ानास आणले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक अमरावती यांनी आयोगापुढे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

श्री कडू यांचे वकील श्री. एस. डब्लू. टेंबले यांस तत्कालीन अपीलीय अधिका–यांनी प्रकरणी सादर केलेले अपील चुकीचे असल्याचे समजावून सांगितले. अपीलकर्ता यांना आव यक असलेली दिनांक 11/04/2000 चे आदे ाची प्रत माहिती अधिकार अर्ज तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, अमरावती यांचेकडे सादर करुन माहिती/ नक्कल मिळाल्याचे आदे ापत्र दिनांक 23/07/2009 मध्ये नमुद केलेले आहे.(पानांक 4). त्यामुळे अपीलार्थी यांचे अपील नामंजूर करुन अपील अर्ज विनाकार्यवाही निकाली ठेवणेत येत आहे असे आदे ा क्रमांकः– लेखा–/मा.अ./अपील 3 /09 दिनांक 24.07.2009 ने पारीत केलेले आहेत. (पानांक 5).सदर आदे ा, आदे ा पत्राचे दिनांक 23.07.2009 ला श्री कडू अपिलार्थी यांचे वकील श्री टेंबले यांना समक्ष समज देण्यात आलेली आहे. (पानांक 4) यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निश्कर्श काढावा लागतो. परंतू अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांचेकडून माहिती मिळाली नाही. परंतू त्यांनी आयोगापूढे दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे दाखल केलेले प्रपत्र 'अ' नाही. व जोडपत्र 'ब' मध्ये उपसंचालक भूमी अभिलेख यांचेकडे दाखल केलेले अपील आहे. व त्या माध्यमातून त्यांना माहिती मिळाली आहे. असे त्यांनी आयोगापुढे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2 अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निकालाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

अपील क्र. 1410/अम./2010

1. श्री किसन लहानुजी मेश्राम – अपिलकर्ता
य ोदा नगर नं.1, बुध्द मुर्तीजवळ,अमरावती
ता.जि. अमरावती.

2. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक – उत्तरवादी
भुमी अभिलेख कार्यालय, अमरावती,
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,
कॅम्प, अमरावती

3. श्री. व्हि. जे. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय, चांदूर रेल्वे
ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती

(आदे श पारित दिनांक 13.04.2010)

निर्णय

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 25.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे श्री एल.एन. सदाफळे, प्रमुख लिपिक हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 13.12.08 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, चांदूररेल्वे यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सन 1996–97 दि. 01.01.96 ते 31.10.97 हया अवधीचे पाचवे वेतन आयोगाची फरकाची रक्कम अजून पर्यंत मिळाली नाही. त्याबाबत

आपणास यापूर्वी ब–याचदा विनंती केली. तसेच उपसंचालक, भूमि अभिलेख नाि ाक प्रदे ा नाि ाक यांनी सुध्दा अधिक्षक भुमि अभिलेख, जळगांव व तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख, रावेर यांना थकबाकी देण्याचे दृश्टीने कळविले तसेच तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख, चांदूर रेल्वे कार्यालय येथील श्री जवादे, वरीश्ठ लिपिक यांनी सांगितले की, तालुका निरिक्षक. भुमि अभिलेख, रावेर वरुन माहिती आणलेली आहे 15 दिवसात काढून देतो असे सांगितले तरी पण अजून पर्यंत थकबाकी मिळाली नाही. हयाबाबत झालेली कार्यवाही तसेच किती दिवसात थकबाकी हे कृपया स्पश्ट करावे म्हणजे या बाबत दिरंगाई कोणत्या स्तरावर होत आहे हे स्पश्ट होईल. या बाबत माहिती अधिकारात एक महिन्यात कळविण्यात यावे व माहिती नाकार म्हणून अपील अधिका–यांचे नांव व पत्ता कळविण्यात यावा.सदरच्या अर्जासोबत रु. 20/– ची मनीऑर्डर पाठविलेली आहे असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 02.02.09 प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दि. 26.02.09 रोजी देण्यात आला असून तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, चांदूररेल्वे यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जातील 1 ते 4 मागण्यांच्या नियमाप्रमाणे पूर्तता करण्यात यावी असा आदे ा दिलेला दिसून येतो.परंतू समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापूढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दि. 31.12.08 रोजी अर्जाच्या संबंधात माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सदरची थकबाकी 1 वर्शावरील कालावधी असल्यामुळे सन 2007–08 मध्ये संकलन (क. लिपिक) यांचेकडून कार्यवाही झालेली नसल्याने तसेच नादेय प्रमाणपत्रात काही अडचणी आल्यामुळे संपूर्ण कार्यवाही करता आलेली नाही. सन 2008–09 चे वेतनभत्याच्या अनुदानात आपले थकबाकीच्या रक्कमेची कार्यवाही करण्यात आलेली असून सदरची थकबाकी 18 वर्शावरील कालावधीची असल्याने त्यावर प्रादेि ाक प्रमुखांची मंजूरांती घेणे आव यक आहे. उक्त प्रकरण माहे 2009 अखेर निघण्याची अपेक्षा आहे. मंजूरांती प्राप्त होवून देण्याची रक्कम प्राप्त होताच आपणास तसे कळविता येईल. असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर. पुन्हा त्याच दिव ी 31.12.08 रोजी दुस–या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना त्याच प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतू अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना दि. 13.04.10 रोजी मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असेच कळविलेले दिसून येते. परंतू अद्यापपर्यंत प्रादेि ाक प्रमुखाकडून मंजूरी आलेली नाही असे त्यांनी सांगितले. वास्तविक अपिलकर्ता यांना कळवून 16 महिने झालेले आहे. व त्यानंतर सुध्दा त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी प्रादेि ाक प्रमुखाकडून निर्णय झाला असल्यास माहिती उपलब्ध करुन घेवून अपिलकर्ता यांना पुरविणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपीलकर्ता यांचे अपील अं ातः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत प्रादे ाक प्रमुखाकडून सदरच्या प्रकरणात माहिती उपलब्ध करुन घेवून पुरविण्यात यावी.

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. अम./1470/2009**
**अपील क्र. अम./1471/2009**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री साहेबराव भाउरावजी नाईक<br>.संजय गांधी नगर नं. 2, अमरावती<br>ता. जि. अमरावती | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपिलीय अधिकारी, तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिशद, अमरावती.<br>ता.जि. अमरावती. | – | उत्तरवादी |
| 3 | जन माहिती अधिकारी, तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिशद, अमरावती,<br>ता.जि. अमरावती. | | |

**(आदेश पारित दिनांक 21.04.2010)**

**निर्णय**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 20.03.2009 व 30.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 25.03. 2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथत अपिलीय अधिकारी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी अपिल क्रमांक अम./1470/2009 मध्ये दि. 22.09.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेकडे शिक्षणाधिकारी यांनी मार्च 2006 ते जुलै 2008 पर्यंत खाजगी संस्थेतील शिक्षण सेवक शिक्षक इतर कर्मचारी मुख्याध्यापक यांच्या पदाला मान्यता देण्यात आल्याच्या संदर्भामध्ये व इतर 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगांने दिनांक 10.10. 2008 रोजी उपस्थित राहून माहिती घेवून जाण्यास कळविले होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता दिनांक 24.10.2008 रोजी उपस्थित राहून त्यांना प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी दिनांक 4.12.2008 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक 3.01.2009 रोजी घेण्यात आली. परंतू माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आले. अपिलकर्ता आज हजर नाही. दि ाभूल करणारी अर्धवट माहिती दिली व मागितलेली माहिती दिली नाही याबाबतचा खुलासा केलेला नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध ंझालेली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

3 .अपिलकर्ता यांनी अपील क्रमांक अम./1471/2009 दि. 10.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचेकडे सन जानेवारी 2007 ते सप्टेंबर 2008 या काळातील सरळसेवा भरती, पदोन्नतीची माहिती देण्यात यावी. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 07.11.2008 च्या पत्राप्रमाणे रु. 32/– असा माहिती बाबतचा खर्च देण्यात यावा असे कळविलेले होते. त्यानंतर अपिलकर्ता यांनी दि. 10.12.2008 रोजी प्रथम अपिल दाखल केले व सोबत दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र सादर केल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

4. अपिलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपिलकर्ता यांनी माहिती देत आहे म्हणून कार्यालयात बोलाविले, बसवून ठेवले माहिती दिली नाही असे द्वितीय अपील मेमोमध्ये म्हटलेले आहे. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिल्याच्या संदर्भामध्ये यु.पी.सी.ने दिनांक 12.11.2008 मध्ये पाठविल्याचे दिसून येते. व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निश्कर्श काढून सदरचे अपिल खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे दोन्ही अपिले खारीज करण्यात येतात.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी याना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. अम./1469/2009**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | श्री हेमराज सदाशिवराव भटकर<br>भटकर प्लॉट, मुलीचे रिमांड होम गल्ली,<br>गोळे चक्की समोर, गाडगेनगर,<br>अमरावती. | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपिलीय अधिकारी,<br>महानगर पालिका, अमरावती,<br>ता.जि. अमरावती. | – | उत्तरवादी |
| 3. | श्री. व्ही पी. अडचुले,<br>जन माहिती अधिकारी तथा भाहर अभियंता<br>महानगर पालिका, अमरावती<br>ता.जि. अमरावती. | | |

**(आदे श पारित दिनांक 21.04.2010)**

**निर्णय**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 02.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 25.03.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 25.03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2 अपिलकर्ता यांनी दिनांक 16/10/2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा भाहर अभियंता, आयुक्त महानगर पालिका, अमरावती यांचेकडे वार्ड क्र. 6 गाडगे नगर परिसर रिमांड होम गल्ली मध्ये श्री भानुदास एकनाथराव सवई यांच्या घरापासून नाली सुरु होते. नालीचे दुरुस्ती करण्याकरिता आलेले कामगारांनी त्यांच्या घरापासून दुरुस्ती सुरु न करता श्री चव्हाण यांच्या घरापासून सुरु करण्यात आली. कामगारांना विचारले असता त्यांच्याकडून सांगण्यात आले की, नगरसेवक यांनी आम्हाला श्री चव्हाण यांच्या घरापासून सुरु करावे असे सांगीतले

श्री भानुदास एकनाथराव सवई ते श्री निरंजन गोळे यांच्या घरापर्यंत नाली चे दुरुस्ती न केल्यामुळे परिणामस्वरुप आज आमच्या घरापासून पुढे पाणी वाहत नसल्यामुळे ते त्या ठिकाणी साचून परिसरात पसरले आहे व त्याचा अति ाय दुर्गंध पसरला आहे, ज्यामुळे आमची मुले ताप, मलेरीया हया सारख्या आजाराला बळी पडले आहे. याबाबत वारंवार आमचे नगरसेवक श्री बबन दे ामुख यांच्याकडे तक्रार नोंदविली परंतु त्यांनी या बाबी कडे पुर्णताः दुर्लक्ष केले आहे. अ ी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्ति ाः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 18.11.2008 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 24.11.2008 रोजी देण्यात आला असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे घरासमोर स्वच्छतेबाबत मौखिक आदे ा सुनावणी दरम्यान केले असेच दिसून येते. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही. या कारणास्तव अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले.

3. अपिलकर्ता आज गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक 24.11.08 रोजी निविदा संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु आरोग्य विभागास संबंधित मुद्दा क्र.2 हा आरोग्य विभागाकडे दिनांक 21.11.2008 ला माहिती उपलब्ध करुन देण्यास हस्तांतर करण्यात आला होता. व सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही व त्यामुळे त्यांनी अपिल दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यांनी टिपणीच्या स्वरुपात सर्व आदे ा पारीत केलेले दिसून येतात. व त्यातही चौक ी काय करावी याबाबतचा कोणताही निर्णय दिसून येत नाही.उप– आयुक्त तथा प्रथम अपिलिय अधिकारी यांना अपिलात सुनावणी क ी घ्यावी व निर्णय काय द्यावा याबद्यल काही माहिती आहे असे दिसून येत नाही. आयोगाचे कार्यालयातून अपिलाची सुनावणीची नोटीस आली त्यास त्यांनी राज्य माहिती आयुक्त महाराश्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त दिनांक 01.04.2010 रोजीचा अर्ज असे संबंधित केले आहे. राज्य माहिती आयुक्त हे कोणत्याही कार्यालयात अर्ज करीत नाही. याचे कोणतेही ज्ञान हे उप–आयुक्त किंवा उपअभियंता यांना दिसत नाही. राज्य माहिती आयुक्ताच्या कार्यालयातून माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतरच माहिती दिली गेली. याबद्यलची जाणीव उपायुक्त, उप अभियंता, भाहर अभियंता यांना झालेली दिसून येते. यावरुन माहितीचा अधिकार 2005 च्या तरतुदीच्या संदर्भात किती काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते असे दिसून येते. असे असले तरी अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेले त्यांच्या घरासमोरील स्वच्छतेबाबत वेळोवेळी सुचना देवून कार्यवाही केली आहे असे आयोगापुढे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. विलंबाच्या संदर्भामध्ये निवडणूकीच्या कालावधीतील अर्ज असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला असेही आयोगापुढे सांगितले. परंतू अपिलकर्ता यांनी वेळोवेळी स्वच्छतेबाबत सहया करुन दिलेल्या असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

1. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. अम./1467/2009</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | श्री धनराज प्रभाकरराव भोळके,<br>श्रा. रमेश द. खारोडे, न्यु हनुमाननगर<br>ता.जि. अमरावती. | – | अपिलकर्ता |
| 2 | श्री श्रीधर भाहाणे<br>प्रथम अपिलीय अधिकारी,<br>तथा समाज कल्याण अधिकारी (गट अ)<br>जिल्हा परिशद अमरावती<br>ता.जि. अमरावती. | – | उत्तरवादी |
| 3. | अंबादास वामनराव भोळके,<br>जन माहिती अधिकारी तथा सचिव<br>अजिंक्य शिक्षण संस्था द्वारा संचालित<br>निवासी मतिमंद विद्यालय, व्हि. एम.व्हि. परिसर,<br>ता.जि. अमरावती. | | |

**(आदे श पारित दिनांक 21.04.2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 02.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 25.03.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 25. 03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 11.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, अजिंक्य शिक्षण संस्था यांचेकडे वस्तीगृह अधिक्षक पदाबाबत माहित पुरविण्याबाबत मागितलेली दिसून येते. सन 19.03.2005 ते आजपर्यंत मागितली आहे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक 06.01.2009 अन्वये अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपिठामध्ये दाखल केलेल्या याचिकेत अभिकर्त्या मार्फत पुरविण्यात आलेली आहे असे कळविलेले आहे. आणि संस्थेकडून माहिती पाहिजे असल्यास माहिती दिडशे प्रती, भुाल्क 2/– रु. प्रमाणे रु. 300/– चा भरणा केल्यास माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले आहे. तथापि अर्जदारांनी भुाल्काचा भरणा केला नाही व माहिती मिळाली नाही व दिनांक 09.02.2009 रोजी प्रथम अपिल समाज कल्याण अधिकारी गट "अ" जिल्हा परिशद यांचेकडे दाखल केले. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी संस्थेचे अध्यक्ष असल्यामुळे अपील त्यांचेकडे सादर करुन माहिती घ्यावी असे कळविले. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अतिरिक्त खर्च भरणा करण्याचे पत्र मिळाले नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगास जावक नोंदवही दाखविली व त्यात अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे दिसून येते. परंतू जावक नोंदवही मध्ये अपीलकर्त्यास पाठविलेल्या पत्राचा कमांक 283 असले तरी पुढील क. 284,285,286 मध्ये खोडतोड केलेली दिसून येते. यावरुन छायांकित नोंदवही मध्ये 283 कमांक हा नव्याने समाविश्ट केलेला दिसून येतो व त्यामुळे अपिलकर्त्यास खरोखरच सदरचे पत्र दिले किंवा नाही याबाबत नि चत निश्कर्श काढता येत नाही. मात्र अपिलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांचे अपिल हे अं ातः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत अपिलकर्ता यांना विनामुल्य माहिती रजिस्टर टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

अपील क्र. अम./1464/2009

1. श्री सुरेन्द्र हिरामणजी टेंभूर्णे – अपिलकर्ता
अशोक नगर,(नवि बस्ती) बडनेरा
ता.जि. अमरावती. 444701

2. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त – उत्तरवादी
पोलीस आयुक्तालय अमरावती
ता.जि. अमरावती.

3. श्री. डि. एस. बिजवे,
जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
फ्रेजरपुरा विभाग, अमरावती
ता. जि. अमरावती

(आदेश पारित दिनांक 21.04.2010)

निर्णय

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 03.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 25. 03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 21.08.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांचेकडे बडनेरा पोलीस स्टे ानचे ठाणेदार यांनी 26 जानेवारी 2008 रोजी पोलिस स्टे ानच्या आवारातील मंदिरात 'राम सीता' यांचे तैलचीत्र स्थापन केल्याची व भाासनाच्या निधीतून लाखो रुपये खर्च करुन मंदीराचा जिर्णोध्दार केल्याची दि.31.01.2008 च्या तक्रारीवरील कार्यवाहिची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 16.10.2008 रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलाच्या संदर्भात दिनांक 24.11.2008 च्या तक्रारीवर चौक ी सुरु आहे व चौकशीची कार्यवाही पूर्ण झाल्यावर माहिती उपलब्ध करुन देता येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपिलाच्या सुनावणीची नोटिस दिनांक 25.03.2010 रोजी कार्यालयातून निर्गमीत करण्यात आली. व त्यानंतर अपिलकर्ता यांना दिनांक 16.04.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यात मी केलेल्या तक्रारीच्या चौकशीत पोलीस उपायुक्त कार्यालयाचा अहवाल मिळाला असे अपिलकर्ता यांनी लेखी लिहून दिलेले दिसून येते. वास्तविक अविनाश बारगळ, पोलीस उपायुक्त (परीमंडळ) अमरावती यांनी दिनांक 26. 08.2009 रोजी पोलिस आयुक्त अमरावती भाहर यांना अहवाल दिलेला आहे व त्याच वेळेस अपिलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते. परंतू जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्याबाबतची कोणतीही काळजी घेतलेली नाही आणि आयोगाची नोटिस निर्गमित झाल्यावर सदरच्या अहवालाची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असेल तर अपिलकर्ता यांना माहिती मिळालेली आहे असे लेखी दिलेले असले तरी त्याबाबत कोणताही खुलासा आयोगाकडे केलेला नसल्यामुहे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1 अपिलककर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपिल खारीज करण्यात येते.

2 अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. अम./1411/2009</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री प्रितमसिंह उल्हाससिंह चव्हाण<br>अनुश्री बिल्डींग क्वा. नं., कांतानगर, अमरावती,<br>ता.जि. अमरावती. | – | अपिलकर्ता |
| 2 | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>अति. आयुक्त (महसूल) /अध्यक्ष<br>विभागीय जात पडताळणी समिती, अमरावती<br>जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, कॅम्प, अमरावती. | – | उत्तरवादी |
| 3. | श्री प्रदिप भोगले,<br>जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण<br>अधिकारी(जा.प्र.प. समिती) समाज कल्याण<br>विभागीय कार्यालय अमरावती<br>व्ही.एम.व्ही.कॉलेज रोड, राठीनगर, अमरावती | | |

**(आदेश पारित दिनांक 13.04.2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 18.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (03) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 12.12.08 रोजी जन माहिती अधिकारी समाज कल्याण विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती अमरावती यांचेकडे राजपूत भामटा जाती वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेल्यांची नावे यादी स्वरुपात व दिलेल्या नमुन्यात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती दि. 12.12.08 पर्यत विभागीय जाती पडताळणी स्थापन झाल्यापासून मागितलेली दिसून येते. सदरची

माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दि. 30. 01.09 रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 19.01.09 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापूढे असे सांगितले की त्यांनी संपूर्ण अमरावती विभागातील माहिती मागितलेली होती. परंतू त्यांना फक्त अमरावती जाती पडताळणी समिती क्र. 1 यांचेकडून जातनिहाय अथवा प्रवर्गनिहाय वैधता प्रमाणपत्राची स्वतंत्र माहिती ठेवण्यात आली नाही व त्यामुळे आपणास समिती स्थापनेपासून ते आतापर्यंत राजपूत भामटा या जातीच्या किती व्यक्तिंना प्रमाणपत्र दिले आहे अथवा या जातीच्या काही व्यक्तींचे अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहेत याची माहिती एकत्रित स्वरुपात पुरविता येत नाही असे दि. 13.01.09 रोजी कळविण्यात आले. आज आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती एकत्रीत रित्या संकलित ठेवणे हे अ ाक्यप्राय आहे. समितीकडे दररोज ज्या क्रमानी अर्ज येतात त्या क्रमानी ती नोंदविली जातात. असंख्य जाती असल्यामुळे जातीनिहाय नोंदवही ठेवण्यात येत नाही. व त्यामुळे नोंदवहीतील राजपूत भामटा या जातीच्या अर्जदारांचे क्रमांक भाोधून त ाी माहिती तयार करुन उपलब्ध करुन देता येत नाही. व त्याकरिता अपीलकर्ता यांना निरीक्षणाकरीता कळविण्यात आले होते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांनी नोंदवहीचे निरिक्षण करावे व त्यातून राजपूत भामटा या जातीच्या अर्जदाराची नोंद घेवून त्याची माहिती मागणे संयुक्तिक राहिल तसेच जाती पडताळणी समिती क्र. 2 अमरावती विभाग अकोला जिल्हाधिकारी कार्यालय परीसर यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना निरीक्षण देवून त्याप्रमाणे आव यक असल्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 1 अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे तसेच विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 2 अमरावती विभाग अकोला जिल्हाधिकारी कार्यालय परीसर अकोला यांचे कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात कामकाजाच्या दिव ी उपस्थित राहण्याची तारीख व वेळ कळविण्यात यावी व अ ाप्रकारे तारीख व वेळ कळविल्यानंतर त्या त्या समितीच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना नोंदवही निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्या नोंद वहितून अपिलकर्ता यांना आव यक असलेली कागदपत्रे नोंदवही निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्या नोंदवहीतून अपीलकर्ता यांनी राजपूत भामटा या जातीच्या संदर्भात आलेल्या अर्जाची नोंद घेवून अपीलकर्ता यांना आव यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. अम./1421/2009**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री कृश्णा रामचंद्र कनसे,<br>मु. पो. येनस<br>ता. नांदगाव खंडे  वर जि. अमरावती | – | अपिलकर्ता |
| 2 | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.<br>ता.जि.अमरावती. | – | उत्तरवादी |
| 3. | जन माहिती अधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती,<br>ता.जि. अमरावती. | | |

**(आदेश पारित दिनांक 13.04.2010)**

**निर्णय**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 03.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (03) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.11.08 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचेकडे (1) नांदगाव (खंडे वर) तालुका बाजार निर्मुलन समितीमधील सदस्यांची नावे, गावे (2) नांदगाव (खंडे वर) भ्रश्टाचार निर्मुलन समिती सदस्यांची एकूण संख्या किती (3) तालुका भ्रश्टाचार निर्मुलन समिती सदस्यांची निवड कोणत्या नियमात केली लेखी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती

उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 01.01.09 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता हे आज सुनावणीस हजर नाहीत. त्यामुळे त्यांना माहितीची आव यकता आहे किंवा नाही याबद्‌दल कोणताही निर्णय घेता येत नाही. परंतू राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केलेले असल्यामुळे माहिती मिळाली नाही हे गृहित धरावे लागते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे हजर नाहीत. त्यांचे प्रतिनिधी नाहीत. प्रथम अपिलाचा निर्णय दिला आहे किंवा नाही याबद्दलची काहीही माहिती नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबद्‌दलचा खुलासा करणे आव यक करणे राहिल. अन्यथा त्यांचेविरुध्द रु. 25000/- ची भाास्ती लादणे आव यक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदे श**

1. अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचें आत त्यांनी दि. 14.11.08 रोजी मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक 14.11.08 च्या अर्जाच्या अनुशंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व आज ते गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकूण घेता आलेले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/- ची भाास्ती का लादण्यात येवू नये याबद्‌दलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत आयोगाकडे करण्यात यावा. अन्यथा भाास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

3. सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4 अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र. अम./1422/2009</u>

1. श्री कृश्णा रामचंद्र कनसे, — अपिलकर्ता
मु. पो. येनस
ता. नांदगाव खंडे वर जि. अमरावती

2 प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी
तालुका कृशी अधिकारी,
ता. नांदगाव खंडे वर जि. अमरावती

3. जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृशी अधिकारी कार्यालय
ता. नांदगाव खंडे वर जि. अमरावती

**(आदेश पारित दिनांक 13.04.2010)**
**<u>निर्णय</u>**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 03.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11. 03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.10.08 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृशी अधिकारी कार्यालय नांदगाव खंडे वर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
(1) तालुक्यातील एकूण सेन्द्रीय भोती बचत गट किती, गावाचे नाव, त्या गावात घेतलेले प्रि क्षण व प्रि क्षणासाठी झालेला खर्च, सेन्द्रीय भोती बचत गटांना दिलेल्या वस्तु, नगदी लाभ. (2) पंतप्रधान पॅकेज अंतर्गत निवडलेल्या भोतकरी लाभार्थ्याची संख्या,त्यांचीनावे, गावे, त्यांना वाटप केलेले साहित्याचे प्रकार, जनावरे,

प्रत्येकी किती. (3) सदण कापूस योजनेअंतर्गत सन 2006 ते 2008 मध्ये निवडलेले एकुण गावे किती. त्या गावाचे नाव व त्या गावातील योजनेकरीता निवडलेल्या भोतक–याचे नांव, त्यांना दिलेला लाभ–कोणता व प्रत्येकी किती दिला.(4) गांडूळ कल्चर युनिट अंतर्गत सन 2007 ते 2008 मध्ये निवडलेले एकूण भोतकरी व त्यांचे नाव, गाव व त्यांना दिलेली रक्कम सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक 20.11.08 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी दिनांक 08.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यानंतरही भाहानि ाा करुन पाहणी करण्याकरीता सहकार्य करण्यास विनंती केली आहे असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय का दिला नाही असे विचारले असता माहिती दि. 08.12.08 रोजी पाठविण्यात आली असल्यामुळे प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नाही. माहितीस विलंब कां झाला याबद्दलचा खुलासा करतांना जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी 3 मुद्यांमध्ये वेगवेगळी माहिती मागितली होती. मुद्या क्रमांक 2 मध्ये पंतप्रधान पॅकेज अंतर्गत अशी माहिती मागितली. परंतू पंतप्रधान पॅकेज असे निद ानास आणून विदर्भ पॅकेज आहे याबद्यलचा खुलासा केला नाही. मुद्या क्र. 3 मध्ये सन 2007–08 या कालावधीतील कापूस योजना अंतर्गतची माहिती मागितली. व त्यामुळे सदरची माहिती संकलित करुन उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा कोणताही उद्‌देश नाही व त्यांनी पुन्हा माहितीच्या संदर्भात निरीक्षणास यावे असे कळविलले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र. अम./1419/2009</u>

1. श्री सुदेश शिवनारायणजी गुप्ता – अपिलकर्ता
को.–ऑप.हाऊसिंग सोसायटी, गुप्ता कुंज बिल्डींग
(तळमजला) धामणगांव रेल्वे,
सा.क्र. 245, घर क्र. 101, ता. धामणगाव रेल्वे
जि. अमरावती. 444709.

2 श्री एस.एन. बाहूरवाघ – उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर प्र ाासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय,
ता.जि. अमरावती.

3 श्री. टिंगणे
जन माहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, नगर परिशद, धामणगांव रेल्वे
ता.धामणगांव रेल्वे, जि. अमरावती

**(आदेश पारित दिनांक 13.04.2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 04.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11. 03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. तसेच अपिलकर्ता यांचे वतीने ॲड श्री. चेतन परडखे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध का नाही याबद्यल विचारले असता अपिलकर्ता यांचा भुखंड त्यावेळेस हा रिकामा होता घर नव्हते व त्या कालावधीतील माहितीसुध्दा उपलब्ध नाही. त्यामुळे ती पुरविता

आलेली नाही. न पुरविण्याचे कोणतेही कारण नाही. असे असल्यास अपिलकर्ता यांनी सांगितले की त्यांना माहितीची आव यकता आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांनी निरीक्षण करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ उपस्थित राहणेसाठी कळवावे. अपिलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यावर त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना संबंधित कालावधीची सर्व्हेच्या संदर्भातील अभिलेखे उपलब्ध असल्यास किंवा त्या संदर्भातील जी कागदपत्रे असतील ती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. व त्यातून माहिती उपलब्ध झाल्यास छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.नाग /328/2010</u>
<u>अपील क.नाग/ 329/2010</u>

1. श्री सुरेश य शवंतराव भौतकर, — अपीलकर्ता
उपकार्यकारी अभियंता,
म.राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
43,जेतवन सोसायटी, खामला, नागपूर

2. श्री संदेश हाके — उत्तरवादी प्रथम
अपिलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (क– रचना व कार्य)
धारावी रोड, माटुंगा, मुंबई.

3. श्री प्रविण बागुल — उत्तरवादी
जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,
महाराश्ट राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
प्रकाशगड, 4 था माळा, वांद्रे (पूर्व)
मुंबई

**(आदेश पारित दिनांक 04/05/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दि. 30.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 08.04.2010 रोजी नोटीस काढून दिनांक अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी अपील क्रमांक नाग./328/2010 मध्ये दिनांक 04.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांचेकडे श्री सु.य. भौतकर यांचे वर्श (2007–2008) व (2008–2009) चे घConfidential Reportङ व त्यांचे सर्वांगीण मुल्यमापन (Adverse remarks, shortcoming & overall grading) ची प्रत देण्यात यावी अ ाी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 09.11.2009 रोजीआपण मागितलेली 2. श्री सुरे ा भौतकर यांनी त्यांच्या दिनांक 04.11.2009 च्या अर्जानुसार गोपनिय अहवाल व त्यांचे

सर्वांगिण मुल्यमापन ची प्रत मिळणेबाबत विनंती केली आहे. 3. सहाय्यक व्यवस्थापक (क– संपादणूक मुल्यण कक्ष) यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबत जोडलेल्या अर्जातील मुद्दयाबाबतची माहिती दिनांक 16.11.2009 रोजी किंवा त्यापुर्वी या विभागास पाठविण्याची व्यवस्था करावी. 4. केंद्रीय माहीतीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 (1) प्रमाणे अर्जदारास भाक्य तितक्या शिघ्रतेने माहिती पुरविणे बंधनकारक असल्यामुळे कृपया ती तातडीची समजण्यात यावी. व आपण मागितलेली माहिती संपादणूक मुल्यन कक्ष या विभागाकडून मागविण्यात आली आहे सदर माहिती प्राप्त होताच देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते दि. 07.11.2009 रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 26. 11.2009 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 07.12. 2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्या निर्णयाप्रमाणे अपिलकर्ता यांना गोपनिय अहवालाच्या प्रति उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. तरी सुध्दा अपिलकर्ता यांनी दिनांक 30.03.2010रोजी गोपनिय अहवालाच्या प्रति उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना गोपनिय अहवालाच्या प्रती उपलब्ध न करुन दिल्यामुळे झालेल्या बैठकीमध्ये चर्चा झाल्याप्रमाणे सर्व मुद्दे घेण्यात आलेले नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांना दिनांक 09.11. 2009 रोजी मुल्यमापन कळविण्यात आले होते असे पत्र सादर झाले आहे. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते त्यांना मिळाले नाही. अर्थात ते माहितीच्या अधिकारात मागण्यापुर्वीच त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरीही त्यांनी माहितीच्या अधिकारात ती मागितलेली आहे त्यानंतर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खरीज करण्यास पात्र आहे.

4. अपिलकर्ता यांनी अपिल क्रमांक नाग/329/10 मध्ये दिनांक 20.06.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 25.08.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 23.09.2009 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 17.12.2009 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे या कारणास्तव खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

5. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत दिली नाही. तसेच पूर्णपणे माहिती दिली नाही. त्यावर जन

माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही वेगवेगळया भााखांमध्ये उपलब्ध असते व त्याकरीता त्या भााखांना दिनांक 25.09.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्रे दिलेली होती. व त्या भााखांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली व त्यामुळे विलंब झालेला आहे. अपिलकर्ता यांनी आयोगाचे निद िनास आणले की संबंधित भााखंनी अपिलकर्ता यांना माहिती दिनांक 30.06.2009 रोजीच उपलब्ध करुन दिली होती. परंतू सर्व माहितीची एकत्रित माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता विलंब झाला असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपिलकर्ता यांनी जी जी माहिती मागितलेली आहे ती सर्व माहिती कार्यालयीन कार्यपध्दतीप्रमाणे त्यांना त्या त्या वेळेस ती पत्रे दिलेली आहेत. यावरुन अपिलकर्ता यांना वास्तविक कार्यालयीन कामकाजाच्या कार्यपध्दतीप्रमाणे जो पत्रव्यवहार होतो त्या पत्रव्यवहाराप्रमाणे सर्व पत्रे उपलब्ध करुन दिलेली होती असे दिसून येते. परंतू माहितीच्या अधिकारात मला विलंबाने माहिती दिली असा निश्कर्श काढावा लागतो. मागितलेल्या माहितीतील पत्रे ही त्यांना पुर्वीच देण्यात आलेली आहे. ही माहिती मुदतीतच त्यांना उपलब्ध करुन देता आली असती. त्यामुळे विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कारणास्तव जन माहिती अधिकारी किंवा संबंधित भााखांमधील जे अधिकारी यापैकी जे दोशी असतील त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची ि ाफारस करणे आव यक राहिल. जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देतील अशी अपेक्षा आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

1. अपिल क्रमांक नाग/328/2010 हे खारीज करण्यात येत आहे.

2. अपिल क्र. नाग/329/2010 अं ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दिनांक 20.06.2009 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आत अधिनियमाच्या 7 (1) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिले नाही व ती विलंबाने उपलब्ध करुन दिली या कारणास्तव अधिनियमाचे कलम 5 (4) (5) प्रमाणे जे अधिकारी दोशी असतील त्यांचे विरुध्द जबाबदारी नि ि चत करुन ि ास्तभंगाची कार्यवाही करण्याची अधिनियमाचे कलम 20 (2) प्रमाणे ि ाफारस करण्यात येते.

3. शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे व त्यांनी ती न केल्यास व आयोगाकडे पुन्हा तक्रार आल्यास त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (1) प्रमाणे भाास्ती लरदण्यात येईल याची नोंद घ्यावी.

4. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

<u>अपील क्र.अम./1417/2010</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री मुरलीधर रामराव गोडबोले<br>चपके वाडा, विद्युतनगर, अमरावती,<br>ता. जि. अमरावती | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री एच.आर. कांबळे<br>अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक अपंग कल्याण कार्यालय, पुणे,<br>3, चर्च रोड, पुणे–1 | – | उत्तरवादी प्रथम |
| 3. | श्री एम.व्ही पावरा,<br>जन माहिती अधिकारी तथा,<br>आयुक्त,अपंग कल्याण कार्यालय (मतिमंद विभाग) पुणे<br>3 चर्च रोड, पुणे – 1. | | |

(आदेश पारित दिनांक 13/04/2010)

<u>निर्णय</u>

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 16.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11. 03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 10.12.2008 रोजी भाासकिय माहिती अधिकारी मतिमंद विभाग आयुक्त अपंग कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक 25.06.2004 ते 10.12.2008 पर्यंत (1) मतिमंद क्षेत्रात महाराश्ट्राच्या कोल्हापूर, सांगली, उस्मानाबाद, लातूर, नांदेड या जिल्हयांच्या राज्य सिमावर्ती भागात किती संस्थांना ? किती मुलांसाठी ? कोणत्या संस्थेस आपल्या कार्यालयाकडून, मान्यता,अनुज्ञाप्ती, अनुदान देण्यात आले यांची सविस्तर यादी देण्यात यावी. (2) सदरील संस्थेत अतिरिक्त कर्मचारी सामावून घेतले काय ? असल्यास त्यांच्या ऑर्डरच्या झेरॉक्स प्रती द्याव्यात. (3) उपरोक्त जिल्हयातील राज्य

सिमावर्ती भागातील मतिमंदांच्या भााळेत कर्मचा–यांना भाासकिय नियुक्ती देतांना आपल्या कार्यालयाने ना हरकत प्रमाणपत्र दिले काय? असल्यास त्या प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रति द्याव्या. नसल्यास खुलासा करावा. तसेच आपल्या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे सदरील संस्थेस सक्तीचे होते किंवा कसे यांचा सविस्तर खुलासा करावा. (4) सदरील संस्थेने ज्या मुलांचे अपंगांचे वैद्यकिय प्रमाणपत्र जोडले त्यांच्या झेरॉक्स प्रती द्याव्या (5) सर्व झेरॉक्स प्रती हया साक्षांकित करुन द्याव्यात. सदरची माहिती रजिस्टर टपालाने मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी दिनांक 25.06.2004 ते 10.12.08 आहे. अर्जाच्या अनुशंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 16.01.09 रोजी प्रथम अपिल दाखल केले व त्या अपीलाचा सुध्दा निर्णय झाला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. उपरोक्त विशयाच्या अनुशंगाने निवेदन सादर करण्यात येते कि, अर्जदार श्री एम. आर. गोडबोले, अमरावती हे मतिमंद विद्यालय भुखेड जि. नांदेड येथील बंद पडलेल्या भााळेतील वि शेश शिक्षक आहे.

मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांच्या निर्णयाप्रमाणे बंद पडलेल्या भााळेतील कर्मचा–यांची आयुक्तालयात ठेवण्यात आलेली प्रतिक्षा यादीत नांव समाविश्ठ करुन त्यांचे समायोजन, मंदबुध्दी व भाारीरीक विकास संस्था संचालित मंदबुध्दी भाारीरीक विद्यालय अमरावती येथे समायोजन केले आहे. परंतु नांदेड जिल्हयातील आसपासच्या मतिमंदांच्या भााळेत विशेश शिक्षक पदावर नोकरी मिळावी या हेतूने आयुक्तालयावर दबाव निर्माण करण्याच्या हेतूने हे वारंवार आयूक्तालयाकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन माहिती मागत आहे. अ ााच प्रकारे त्यांना दिनांक 21.07. 2008 च्या अर्जान्वये माहिती मागविण्यात आली होती. अर्जातील उपलब्ध माहिती त्यांना दिली असून या अर्जामधीलच माहिती मुद्दा क्र. 1 मध्ये थोडा बदल करुन 10.12.2008 च्या अर्जान्वये पुनश्चः माहिती मागविली आहे. या दोन्ही अर्जातील माहिती सारखीच असुन त्यांना उपलबध माहिती देण्यात आली आहे. परंतु केवळ ते नांदेड जिल्हयात नोकरी मिळावी हया हेतुने दबाव तंत्राचा वापर करीत आहे. तसेच तीच माहिती वेगळया पध्दतीने मागण्यासाठी केलेल्या दिनांक 21.07.2008 च्या अर्जाच्या संदर्भात अमरावती येथील खंडपिठात अपील क्र. 1777/08 मध्ये दिनांक 16.11.2009 रोजी निर्णय देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना आयोगाचे निरिक्षण करण्याचे आदे ा देण्यात आलेले आहे. व त्याप्रमाणे दि. 19.01.2010 रोजी निरीक्षणाचे पत्र दिले. दि. 01.02.2010 रोजी अपीलकर्ता यांना एकूणा 82 पानाची माहिती मिळाली व उर्वरीत 6 मुद्याची माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी लेखी दिलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांच्या 6 मुद्ये हे निरीक्षणासाठी उपलब्ध होवू भाकतील व त्याप्रमाणे

निरीक्षण घेतल्यास त्यांना माहिती उपलब्ध होवू भाकेल असे त्यांना कळविलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपीलकर्ता यांना तीच माहिती दुस—या अर्जाच्या माध्यमातून मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

<u>अपील क्र.अम. / 1423 / 2010</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री प्रशांत वासुदेवराव देशमुख<br>संगम निवास,हरीगंगा ऑईल मिल जवळ,<br>फरशी स्टॉप अमरावती,<br>ता.जि. अमरावती | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री ए.एन. डोंगरे<br>अपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>प्रादेशिाक कार्यालय, अमरावती,<br>मोर्शी रोड, अमरावती. | – | उत्तरवादी प्रथम |
| 3. | श्री ए.एन. भोंडे,<br>जन माहिती अधिकारी तथा,<br>सहाय्यक लेखाधिकारी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,<br>मोर्शी रोड, अमरावती. | | |

**(आदेश पारित दिनांक 13 / 04 / 2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 28.02.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सादर केलेले द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11. 03.2010 रोजी नोटीस काढून अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 7.11.08 रोजी जन माहिती अधिकारी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय अमरावती यांचेकडे सहसंचालक यांनी दिलेले पत्र क्र. 2 / 08 / अपक / 2008 / 7464 दिनांक 15.10.08 नुसार महाविद्यालयीन कर्मचा–याची संस्था ही अपिलीय कार्यालय असल्याचे कळविले. त्याबाबत कोणता कायदे ीर तरतुदीचा आधार घेतला याची माहिती माहितीचा कालावधी 05.05.08 ते 15.10.08 आहे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे

घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दिनांक 10.12.2008 रोजी कलम 2 (च) मध्ये नमुद माहिती या अर्जाप्रमाणे वस्तुनिश्ठ नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 05.01.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 18.02.08 रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती उचित आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. व दिशाभुल करणारी माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांनी सहसंचालक यांना केलेल्या उत्तराच्या संदर्भात नियमांची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्र नार्थक आहे व उत्तर देता येत नाही किंवा वस्तुनिश्ठ नाही असे कळविलेले दिसून येते. वास्तविक अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती अगदी स्पश्टपणे नियमाची माहिती मागितलेली आहे. कोणत्याही प्रकारचा प्रश्न त्यांनी विचारलेला नाही. कोणत्याही वाक्यात काय, किंवा कोणता असा भाब्द असल्यास तो प्र न आहे व ती माहिती देता येत नाही हे जन माहिती अधिकारी यांचे ज्ञान अगाध आहे. काय, किंवा, कोणत्या या दोन्ही भाब्दांच्या मधून कार्यवाही सुध्दा प्रतीत होते. व झालेली कार्यवाही ही कागदावरच केली जाते. त्या कागदाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित असते. व याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारचे आकलन करुन न घेता माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा निर्णय दिलेला असून येतो. परतु जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती हि दि ाभुल करणारी आहे असे पुन्हा पुन्हा अपिलकर्ता यांनी सांगितले व माहिती अद्यापही उपलब्ध झालेली नाही तेही सांगितले. तसेच संस्थेनी घेतलेल्या निर्णयाच्या विरुध्द अपिल हे उपसंचालक यांचेकडे असते असे स्कुल कोड मध्ये दिलेले असून सुध्दा संस्थेकउे अपील आहे असे कळविले व त्याबाबत नियम विचारले असता वस्तुनिश्ठ नाही असे कळविले. त्यामुळे त्यांचे विरुध्द भाास्ती लादण्याची विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी यापुढे अर्जाचे वाचन करावे व योग्य ती माहिती उपलब्ध करुन द्यावी याकरीता त्यांचेविरुध्द रु. 250/- ची भाास्ती लादणे आव यक आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

1. अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत दिनांक 07.11.08 च्या नियमाप्रमाणे नियमाचे आधार घेतलेली छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

2. अपिलकर्ता यांच्या दि. 07.11.08 च्या अर्जाच्या अनुशंगाने दि ाभुंल करणारी माहिती दिलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (1) प्रमाणे रु. 250/– ची शास्ती लादण्यात येते. जन माहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून सदरच्या निर्णयाची वसुली करण्यात येवून "लेखाि ार्श 0070– इतर प्र ाासकिय सेवा, 60 इतर सेवा, 800, इतर जमा रक्कमा, (18) माहितीचा अधिकार (0070–16–1)" . मध्ये जमा करण्यात यावी.

3. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.अम./1418/2010**

1. श्री राजेश वल्लभदास लढ्ढा — अपीलकर्ता
आठवडी बाजार, नवी वस्ती,बडनेरा
ता. जि. अमरावती

2. श्री प्र.वि. सरोदे — उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी
तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
3, महापालीका मार्ग, मुंबई –1.

3. श्रीमती ए.सी. आत्तार,
जन माहिती अधिकारी तथा,
आस्थापना अधिकारी, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
3, महापालीका मार्ग, मुंबई –1.

**(आदेश पारित दिनांक 13/04/2010)**

**निर्णय**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 04.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे सदरचे द्वितीय अपिल हे राज्य माहिती आयोग नागपूर खंडपिठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये वर्ग करण्यात आले त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03. 2010 रोजी नोटीस काढून दिनांक 13.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 24.02.08 रोजी जन माहिती अधिकारी तंत्र ि ाक्षण संचालनालय मुंबई यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. संचालक तंत्रि ाक्षण ,महाराश्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. 2/एनजीपी/ 1093/2024 दि. 31. 05.1993 नुसार लक्ष्मीनारायण अग्रवाल मेमोरीयल इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी धामणगाव (रेल्वे) अमरावती येथे नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या (Lecturers) पदास मान्यता घेण्याबाबत आपण त्यांना सुचित केले काय ? सुचित केले असल्यास त्या पत्राची प्रत पुरवावी. सदर संस्थेने वरील

संचालकाचा पत्रानुसार आपणाकडे मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर केले काय? सदर संस्थेने प्रस्ताव सादर केले असल्यास तंत्र शिक्षण संचालनालयाने त्यांना मान्यता दिली काय ? मान्यता (approval) दिली असल्यास ज्यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली त्यांची यादी पुरवावी ही विनंती. तंत्र ि ाक्षण संचालनालयाने सुचित करुनही जर सदर संस्थेने प्रस्ताव सादर केला नसेल तर सदर संस्थे विरुध्द कोणती कार्यवाही केली. कृपया मागितलेली माहिती पुरवावी हि विनंती. सदरची माहिती 1989 ते फेब्रुवारी 2001 पर्यंतच्या कालावधीतील मागितलेली असून ती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 20.05.2008, रोजी सहसंचालक तंत्रशिक्षण मुंबई यांनी निर्देश केल्यानुसार संचालक तंत्र शिक्षण महाराश्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. 2/एन.जी.पी/1093/2024/31.5.93 च्या पत्राची प्रत प्राचार्य लक्ष्मीनारायण अग्रवाल मेमोरीयल इन्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी धामणगाव रेल्वे यांचेकडून प्राप्त करुन घेवून आपणास पाठविण्यात येत आहे. कृपया पत्राची पोच द्यावी असे सहसंचालक तंत्रि ाक्षण अमरावती यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी दिनांक 02.06.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 29.11.2008 रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती सहसंचालक तंत्रि ाक्षण विभागीय कार्यालय अमरावती यांनी त्यांच्यादिनांक 20.05.2008 अन्वये कळविलेली आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यांच्या प्रथम अपिलाची सुध्दा सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही व माहिती दिनांक 20.05.2008 रोजी देण्यात आली असून ती विलंबाने देण्यात आलेली आहे व अपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलकर्ता यांना दिनांक 31.05.93 च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांच्या संदर्भात मात्र जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे समाधानकारक उत्तरे देवू भाकले नाहीत. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती तंत्र ि ाक्षण संचालनालय यांचेकडे मागितली व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. परंतु सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दिनांक 19.03.2008 अन्वये सहसंचालक तंत्रशिक्षण अमरावती यांनी पत्र दिले. माहितीचा अधिकार 2005 च्या 7 (1) प्रमाणे माहिती देण्याची प्रक्रिया सामान्यपणे 30 दिवसात करणे आव यक असते कलम 6 (3) मध्ये माहिती मागितलेल्या प्राधिकरणाकडे नसल्यास 5 दिवसाचे आत अर्ज हस्तांतरण करणे आव यक असते. परंतु हस्तांतरणच मुळात विलंबाने झालेले आहे. व प्रथम अपिलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नसून जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा 6 महिन्यानी कळविलेले आहे. याचा अर्थ तंत्र शिक्षण संचालनालय यांना माहितीचा अधिकार 2005

च्या तरतुदीची काहीही माहिती आहे असे दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन तसेच अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. त्याकरीता संबंधित जबाबदार असलेल्या तंत्र शिक्षण संचालनालय येथील माहिती अधिकारी किंवा हस्तांतर केल्यानंतर अमरावती येथील तंत्र शिक्षण संचालनालयातील माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आव यक आहे. जेणेकरुन पूढील सर्व अर्ज व अपीले ही अधिनियमात दिलेल्या तरतुदीप्रमाणे प्रकिया होईल अशी अपेक्षा आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दिनांक 24.02.2008 च्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तंत्र शिक्षण संचालनालय मुंबई व अमरावती येथाील जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

2 अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

अपील क्र.अम./1495/2010

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री हरीश नानुसिंग राठोड<br>प्रियंका कॉलनी, वार्ड क्र.3,<br>गजानन महाराज मंदिराजवळ भोगाव,<br>ता.जि. अमरावती. | – | अपीलकर्ता |
| 2. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त<br>महानगर पालिका अमरावती,<br>ता.जि. अमरावती. | – | उत्तरवादी |
| 3. | जन माहिती अधिकारी तथा, क्षेत्रीय अधिकारी<br>प्रभाग क्र.1, महानगर पालिका अमरावती<br>ता.जि. अमरावती. | | |

(आदेश पारित दिनांक 13/04/2010)

निर्णय

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 09.04.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ यांचेकडे दिनांक 24. 12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 29.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्र ाा) मनपा अमरावती यांचेमार्फत जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 24.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी कर अधिक्षक महानगर पालिका अमरावती यांचेकडे प्रियंका कॉलनी भोगाव येथील रहिवा ाचे सन 1993–94 ते 2005–06 पर्यंत भरलेल्या मालमत्ता कराच्या पावतीची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसते. सदर माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने कर अधिक्षक महानगर पालिका अमरावती यांनी क्षेत्रीय अधिकारी तथा माहिती अधिकारी प्रभाग समिती क्र. 1 महानगर पालिका अमरावती यांना अपिलकर्ता यांची माहिती त्यांचे कार्यालयाशी संबंधित

असल्यामुळे उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दि.18.12.08 च्या पत्रान्वये दिले. व अपिलकर्ता यांना प्रत दिलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 11.12. 2008 च्या पत्रान्वये मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 7/9 अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कारणासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने आपणास देणे भाक्य होणार नाही. तथापी आपण अर्जात नमुद केलेल्या त्या 15 मालमत्तांच्या सन 2008–09 ची देयके ज्यावर मालमत्ता कराची थकबाकी (असल्यास) नमुद आहे. याच्या प्रति प्रत रु. 2 भुाल्क आकारुन देण्यात येतील असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 03.01.2009 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 03.02.2009 रोजी देण्यात आला असून अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना पुरविणे माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. ते त्यांनी परस्पर अर्जदाराला पुरविणे जरुरीचे आहे. सबब अपिलकर्ता यांना माहिती मिळाली नाही असे दिसते. ती माहिती नियमानुसार पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांना पावती आढळलेली नाही असे कळविलेले दिसून येते. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांचेकडे कर भरणा केल्याच्या पावत्या उपलब्ध नाही हे स्पश्ट होते. म्हणजे कर भरला गेलेला नाही असेही स्पश्ट होते. व त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निश्कर्श काढावा लागतो. तरीही जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की मालमत्तेच्या संदर्भातील माहिती ही छायांकित प्रतिच्या स्वरुपात उपलब्ध करुन देता येईल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अं  ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी ज्या मालमत्ता कराच्या पावत्या मागितलेल्या आहेत त्या आढळून आलेल्या नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले त्यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतू त्यांना असेसमेंटच्या छायांकित प्रति देण्यास जन माहिती अधिकारी तयार असल्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.नाग./380/2010</u>**

1. श्री उमाकांत जे. सांगोडे — अपीलकर्ता
पंचि ाल नगर, मारोती मंदीराच्या रांगेत,
नागपूर.

2. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी — उत्तरवादी
(माध्यमिक विभाग), जिल्हा परीशद,
नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा, मुख्याध्यापक,
नागसेन विद्यालय,
बेझनबाग, नागपूर..

**(आदेश पारित दिनांक 29/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दि. 09.04.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 16.04.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 29.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्रीमती निमजे, कनिश्ठ सहायक हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 11.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे भाहानि ाा करण्याकरीता खालीलप्रती मिळण्याबाबत (1) संच मान्यता प्रमाणित प्रती – 2006 ते 2009 पर्यंतचे (2) रोस्टर कॉपी प्रमाणीत प्रत 2006– ते 2009 पर्यंतचे (3) सेवाजेश्ठता यादी 2003 ते 2009 पर्यंतचे (4) सेवा पुस्तक (दुय्यम प्रत) (5) टाईम टेबलची प्रमाणीत प्रत 2003 ते 2009 पर्यंतची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दि. 15.01.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 23.02.2010 रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता यांना 7 दिवसाचे

आत माहिती सादर करावी असे मुख्याध्यापक यांना आदेश देवून निर्णयाची प्रत अपिलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतू दिनांक 29.02.2010 पर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी जिल्हा परिशद नागपूर यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते. परंतू त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितली होती. परंतू भााळेमध्ये ब–याच वेळा जावून सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की दिनांक 31.01.2010 रोजी सेवानिवृत्त झालेले आहे. परंतू अपिलकर्ता यांनी माहिती हि 12.01.2010 पर्यंत त्यांना देता आली असती ती का देण्यात आली नाही याबद्दल त्यांनी असे सांगितले की संपुर्ण माहिती संकलित करावयाची होती. प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही याबद्दल विद्यमान माहिती अधिकारी उपस्थित आहे काय असे विचारले असता उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की त्यांनीच मुदतवाढ दिलेली असल्यामुळे तेच मुख्याध्यापक आहेत. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनीच अपिलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे 30 दिवसात माहिती दिली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदशाप्रमाणे सुध्दा माहिती दिली नाही त्यामुळे ते भाास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक 11.12.2009 चे अर्जामध्ये मागितलेली माहिती ही विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2. अपिलकर्ता यांच्या दिनांक 11.12.2009 च्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपीलाच्या आदे ाानुसार सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्यामुळे ते दोशी आढळून येत असल्यामळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (1) प्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकूण घेतल्या प्रमाणे रु. 1000/– ची भाास्ती लादण्यात येते.

3. सदरची शास्तीची रकमेची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी करावयाची आहे व ”लेखाशिर्श 0070– इतर प्र ाासकिय सेवा, 60 इतर सेवा, 800, इतर जमा रक्कमा, (18) माहितीचा अधिकार (0070–16–1)“ मध्ये जमा करण्यात यावी.

4. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.नाग./280/2010</u>

1. श्री रंजन एस.पाल — अपीलकर्ता
   प्लॉट नं. 143/बी, पो. मानकापूर,जयहिंद नगर,
   कुणाल हॉस्पीटलच्या मागे,नागपूर –29.

2. श्री एस.एच. गुज्जलवार
   प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता — उत्तरवादी
   नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
   ता.जि. नागपूर

3. श्री. एस. यु. देव
   जन माहिती अधिकारी तथा,कार्यकारी अभियंता,
   नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
   ता.जि. नागपूर

(आदेश पारित दिनांक 27/04/2010)

<u>निर्णय</u>

1. अपीलकर्ता यांनी दि. 17.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 25.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 27.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 26.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे मागणीपत्र व आर. एल. लेटर वेगवेगळया व्यक्तीच्या नावाने काढण्याचे कारण व दस्तऐवज मौजा मानेवाडा येथील भोत खसरा न. 36/23 टाकळी सिमा (1900 ले आउट) मधील भुखंड क्र. 20 नियमिती करण्या करीता सादर केलेल्या संपूर्ण कागदपत्राची सत्यप्रत मिळण्याबाबत (2) भुखंड क्र. 20 ची डिमांड दिली किंवा नाही. (3) डिमांड कॉपी दिली नसेल तर कां दिली नाही

त्याबाबतची सविस्तर माहिती दि. 22.08.2001 ते आजपर्यंतची माहिती मागितलेली असून व्यक्ति ः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 02.12.2009 रोजी आपण मागितलेली माहिती सद्या नागपूर सुधार प्रन्यासच्या अभिलेंखात उपलब्ध नाही. धारीका उपलब्ध होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 16. 01.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 10.02. 2010 रोजी देण्यात आला असून धारीका भाोधून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी धारीका उपलब्ध न झाल्यास तसे अपिलकर्ता यांना कळवावे असा आदेश दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही अपिलकर्ता यांना धारीका उपलब्ध झाली नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, नागपूर सुधार प्रन्यास मध्ये नेहमीच माहिती देण्याची टाळाटाळ केली जाते व नस्ती आढळून येत नाही अ ाच प्रकारची उत्तरे दिलेली दिसून येतात. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचे कार्यालयामध्ये सर्व प्रकारचे एकत्रीकरण सुरु आहे व त्यामुळे नस्ती आढळून येत नाही. परंतू प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर सुध्दा धारीका भाोधली जात नाही व माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही. त्याबाबतचे आ चर्य वाटते. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे सुध्दा आदे ा पाळले जात नाही. यावरुन प्रथम अपिलीय अधिकारी हे सुध्दा हतबल आहे असे दिसून येते. वास्तविक 30 दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी टाळाटाळ करण्याचे उत्तर देणे योग्य नाही. धारीकाचा भाोध युध्दपातळीवर करणे आव यक असते. आपल्या हाताखालील कर्मचारी सांगतात धारीका मिळत नाही व आपण तसे अपिलकर्ता यांना कळवितो याबद्यल अधिका–यांना काहीही वाटेनासे झाले असे दिसून येते. व आयोगाकडे अपील दाखल होईपर्यंत सुध्दा गांर्भीयाने घेतले जात नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वतः सदरची धारीका भाोधून अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अन्यथा त्यांचे विरुध्द रु. 25000/– ची भाास्ती लादण्यात येईल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1 अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आत सदरच्या नस्तीचा भाोध घ्यावा व माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा अपिलकर्ता यांनी आयोगाकडे तक्रार करावी. व त्या तक्रारीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना रु. 25000/– ची भाास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.नाग./281/2010</u>

1. श्री प्रविण भोशराव थाटे – अपीलकर्ता
प्लॉट नं. 97, द्रोणाचार्य नगर, रिंग रोड,
त्रिमुर्ती नगर, नागपूर.

2. श्री एस. एच. गुज्जेलवार,
प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता – उत्तरवादी
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
ता.जि. नागपूर

3. श्री. एस. यु. देव
जन माहिती अधिकारी तथा,कार्यकारी अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
ता.जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक 27/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दि. 17.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 25.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 27.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 23.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता यांचेकडे खसरा क्र. 36/23 मधील भुखंड क्र. 20 नियमित करण्याकरीता सादर केलेले संपूर्ण कागदपत्राची सत्यप्रत मिळण्याबाबत सदरची माहिती साधारण टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अपिलकर्ता यांना दिनांक 20.11.2009 रोजी आपण मागणी केलेल्या माहितीची धारीका अभिलेखात आढळत नाही त्यामुळे आपणास मागणी केलेली माहिती देता येवू भाकत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 23.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 28.01.2010 रोजी देण्यात आला असून आदेश प्राप्त झाल्यापासून 10 दिवसाचे आंत रेकार्ड मध्ये धारीका पुन्हा

भाोधून अपीलार्थीस त्यांनी मागितलेले दस्तऐवज विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू त्या आदे ाप्रमाणे दिनांक 16.02.2010 रोजी अपिलकर्ता यांना भुखंड क्र. 20 ख.क्र. 36/23 मौजा टाकळीसीमा या भुखंडाची धारीका वैयक्तिक धारीका अभिलेखात पुन्हा भाोघ घेवून आढळली नाही करीता या भुखंडाची संगणकीय नोंद माहितीची प्रत आपले माहितीकरीता यासोबत विनामुल्य पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी जी माहिती मागितली ती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी असे सांगितले की त्यांचे कार्यालयामध्ये अभिलेख चार ठिकाणी विभागलेले होते. ते एकत्रित करण्यात आलेले आहे व त्याची संगणकीय नोंद सुरु आहे. त्यामुळे नस्ती आढळून आली नाही. मात्र नस्ती आढळून आल्यावर अपिलकर्ता यांना माहिती दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती मोघम स्वरुपाची आहे त्यात त्याचा अंदाज आहे असे दिसून येते व त्यामुळे त्यांना अपेक्षीत असलेलीच माहिती नस्तीत असल्यास उपलब्ध करुन देण्याची अडचण नाही. सदरच्या प्रकरणात तीन नस्ती आहेत. परंतू अपिलकर्ता यांना काय अपेक्षित आहे योग्य ते आकलन होत नसल्यामुळे अपिलकर्ता यांनी दोन्ही नस्तीचे निरीक्षण केल्यास त्यांना आव यक ती माहिती मिळू भाकेल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अं  ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत कामकाजाचे दिव  ी व तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्या दिव  ी उपस्थित राहून दोन्ही नस्तीचे निरीक्षण करुन त्यातून त्यांना अपेक्षित असलेली कागदपत्रे उपलब्ध असल्यास कागदपत्रांच्या छायांकित प्रति विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या. अपिलकर्ता हे उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दोन्ही नस्ती परीक्षणासाठी उपलब्ध करुन घ्याव्या. व त्यातून त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध असल्यास त्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>**अपील क्र.नाग. / 279 / 2010**</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री गोपाळा मारोतराव पोटदुखे,<br>चिंचगुंडी,<br>ता. अहेरी जि. चंद्रपूर | – | अपीलकर्ता |
| 2. | श्री एस. के. सांबरे,<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भुमी अभिलेख कार्यालय अहेरी,<br>ता.जि. गडचिरोली. | – | उत्तरवादी |
| 3. | श्री. बी.के. पोटे,<br>जन माहिती अधिकारी तथा, तालूका निरिक्षक<br>भूमी अभिलेख कार्यालय, गडचिरोली<br>ता.जि. गडचिरोली. | | |

**(आदेश पारित दिनांक 27 / 04 / 2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दि. 17.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 25.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 27.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.12.2009 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. कोर्ट विद्यमान उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयातील राजस्व प्रकरण क्र. 4 / बी एन.डी. 54 / 2009–10 मौजा चिंचगुंडी तह. अहेरी हे प्रकरण प्राप्त झाले पासून या प्रकरणावर आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती आपले कार्यालयातील पत्र क्र. ले दि त / 110. 55 / मौजा अहेरी जा.क्र. 250 दिनांक 14.09.2009 चे पत्रान्वये दिनांक 04.12.2009 रोजी माझे बयाण घेतल्यानंतर या प्रकरणावर आपण केलेल्या कार्यवाहिची माहिती व दिनांक 04.12.09 चे माझ्या बयाणाची प्रमाणित नकलेची आव यकता आहे. अर्जाच्या अनुशंगाने दि. 13.01.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक. 25.01. 2010 रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक 23.02.10 रोजी देण्यात आला असून तालुका निरिक्षक भुमी अभिलेख यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थी यांना 15 दिवसात पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू तरीही तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांनी अपिलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की दिनांक 04.12.2009 रोजी त्यांचे जे बयाण घेण्यात आलेले आहे व त्या बयाणात त्यांनी जी माहिती दिलेली आहे त्या दिलेल्या माहितीच्या आधारे काय कार्यवाही करण्यात आलेली आहे याबद्दलची माहिती त्यांनी मागितलेली होती तसेच दुस—या प्रकरणात सुध्दा कोणत्या प्रकारची कार्यवाही केली ती माहिती त्यांनी मागितलेली होती. परंतू दोन्ही प्रकरणांच्या संदर्भामध्ये त्यांना समाधानकारक माहिती तर दिली पाहिजेच परंतू अर्जाचे वाचन न करता बयाणाची प्रत मागितली असा निश्कर्श काढून मला बयाणाची प्रत उपलब्ध करुन दिली. यावरुन मला दि ाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली असा याचा अर्थ आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की लोक ाही दिनामध्ये दिलेल्या बयाणावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. परंतु तरीही त्यांच्या बयाणाप्रमाणे प्रस्ताव तयार करुन तो अधिक्षक यांचेकडे मंजूरीसाठी पाठविलेला आहे. अधिक्षक यांनी सांगितले की तो प्रस्ताव पुन्हा मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा लागतो. वास्तविक हिच माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आव यक होते. दुस—या प्रकरणात सुध्दा लवकर कार्यवाही झाली नाही व त्यानंतर भुसंपादनाची कार्यवाही झाली व त्यामुळे सदरच्या प्रकरणात पुन्हा दुरुस्ती करणे आव यक आहे व दुरुस्तीचा प्रस्ताव पाठविण्यात आला. अधिक्षक भुमी अभिलेख यांनी दोन्ही बाबी मान्य केल्या व 15 दिवसामध्ये अपिलकर्ता यांना दोन्ही प्रस्तावाच्या संदर्भामध्ये निर्णय व कागदपत्रे उपलब्ध करुन देता येईल असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत त्यांच्या बयाणवार झालेल्या कार्यवाहीची माहिती व निर्णय व दुरुस्ती प्रस्तावावरील निर्णयाची माहिती व प्रस्तावाची कागदपत्रे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

<u>अपील क्र.नाग./277/2010</u>

1. श्री रोशन खुशाल बडोले — अपीलकर्ता
   बौध्द नगर,
   पो. ता. सडक/अर्जूनी जि. गोंदिया.

2. श्री संजय नरेंद्र क्षिरसागर, — उत्तरवादी
   प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
   सहकारी संस्था, गोंदिया
   वसंत नगर, आजाद वार्ड क्र. 5,
   ता.जि.गोंदिया

3. जन माहिती अधिकारी तथा, जिल्हा उपनिबंधक
   सहकारी संस्था, गोंदिया
   वसंत नगर, आजाद वार्ड क्र. 5,
   ता.जि.गोंदिया

**(आदेश पारित दिनांक 27/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दि. 10.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 25.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 27.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 01.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयामध्ये जिल्हयातील 72 मजूर सहकारी संस्थांच्या मुळ मजूर सहकारी संस्थेचे मुळ दस्तऐवजाच्या सत्यप्रती पाहिजे सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद करुन दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. परंतू अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सर्व तालुके यांना पाठविलेल्या पत्राची प्रतिलिपी पाठविलेली आहे. व त्यामध्ये मजूर सहकारी संस्था या तालुका स्तरावर नोंद होत असल्यामुळे संस्थेचे मुळ प्रस्ताव त्या कार्यालयात उपलब्ध आहे. अर्जदारांना परस्पर माहिती देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक 1.02.2010 रोजी

प्रथम अपील जिल्हा उपनिबंधक यांचेकडे दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक 17.02.2010 रोजी जिल्हा उपनिबंधक यांनी त्यांचा अर्ज हा तालुका सहाय्यक निबंधक यांचेकडे पाठविलेला आहे. व सदर तालुक्या कडून माहिती मिळणे अपेक्षित आहे. परंतू सहाय्यक निबंधक यांनी दारीद्रय रेशेखालील यादीत नाव असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास कळविले व तसे ते सादर करावे व माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोग यांचेकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की,अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती माहिती तालुका सहाय्यक निबंधक यांचेकडे उपलब्ध असते व त्यामुळे अपिलकर्ता यांचा अर्ज त्यांचेकडे पाठविला. परंतु अपिलकर्ता यांना त्यांनी दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र सादर करावे असे कळविले. परंतु त्यांनी ते सादर केलेले नसल्यामुळेच ही माहिती त्यांना देता आलेली दिसून येत नाही. वास्तविक माहितीचा अर्ज हा उपनिबंधकाकडे गेल्या नंतर अपील हे त्यांनी सहनिबंधकाकडे करणे आव यक होते तसे ते त्यांनी केले नाही व उप निबंधकाकडेच प्रथम अपील दाखल केले. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हे सुध्दा माहिती अधिकारी आहेत व माहिती त्यांचेकडे उपलब्ध आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी आयोगाकडे अपील करतांना त्यात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांना माहिती अधिकारी म्हणून पक्षकार करणे आव यक होते. व त्यांनी तसे न केल्यामुळे आज ते येथे उपस्थित नाही. तसेही माहिती मागतांना प्रत्येक संस्थेची माहिती ही 300 पृश्ठांमध्ये होवू भाकते. व 72 मजुर संस्थेची माहिती ही 21600 पृश्ठ होवू भाकतात व एवढी मोठया प्रमाणातील माहिती बी.पी.एल. असल्यामुळे मोफत उपलब्ध करुन देणे हे अ क्य आहे. त्याकरीता कोणत्याही प्रकारचा निधी भाासनाकडून उपलब्ध नाही. व कार्यालयामध्ये झेरॉक्स म ीन नाही. किंवा त्याबाबतचे देयकाची सुध्दा भुगतान करता येणार नाही व ती ही माहिती प्रत्येक तालुका कार्यालयातून दयावी लागेल ही बाब सुध्दा अ क्य आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांनी प्रत्येक तालुका सहाय्यक निबंधक संस्था यांचेकडे उपस्थित होवून त्या तालुक्यात नोंदणी झालेल्या मजुर संस्थेच्या नस्तीची पाहणी करणे व त्यातून आव यक त्या नोंदी घेवून माहिती उपलब्ध करुन घेणे हे सोयीस्कर राहिल. अपिलकर्ता यांनी सुध्दा पाहणी करण्यास मान्यता आयोगापुढे दिली आहे. व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत प्रत्येक तालुका सहाय्यक निबंधक यांचे कार्यालयात कामकाजाच्या दिव ीची तारीख व वेळ कळवून उपस्थित होवून संबंधित मजुर संस्थेच्या नस्तीची पाहणी करुन त्यातून आव यक ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2 जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी तालुका सहाय्यक निबंधक संस्था यांना या आदे ाप्रमाणे अपिलकर्ता यांना उपस्थित झाल्यावर नस्ती दाखविण्याचे व माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश द्यावेत.

3. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.नाग./282/2010**

1. श्री उदय महादेवराव सराटे – अपीलकर्ता
   प्लॉट नं. 2, शिल्पनिकेत अपार्टमेंट,
   नाईक ले–आऊट, सुभाशनगर, नागपूर

2. प्रथम अपिलीय अधिकारी तथा – उत्तरवादी
   उपनिबंधक(सं)/सदस्य सचिव
   अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर
   आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर

3. जन माहिती अधिकारी
   अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर
   आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर

**(आदेश पारित दिनांक 27/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दि. 11.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 25.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 27.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री के.एन.पाठक कनिश्ठ प्र ाासकिय अधिकारी तथा सहायक माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.09.2009 रोजी जन माहिती अधिकारी संचालक जाती पडताळणी समिती आदिवासी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. कार्यालय – न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग ााळा धंतोली नागपूर, या कार्यालयाने खालील अधिकारी व कर्मचारी यांचे जात पडताळणी प्रकरण आपणाकडे केव्हा पाठविले व अजून कोणत्या कारणामुळे त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र देण्यात आले नाही याची कारणे देण्यात यावी. (1) श्री बी.जी. धकीते (2) ए.डब्लू उमरेडकर (3) एम. बी. सोनकुसरे (4) सुधाकर परचड सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 30.09.2009

रोजी माहिती प्र  नोत्तर स्वरुपात असल्यामुळे देता येत नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 26.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 11.11.2009 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी प्र  न जरी विचारलेला असला तरी त्या प्र  नातून झालेल्या कार्यवाहीची व कागदपत्राची माहिती अपेक्षित आहे. त्या कागदपत्रामध्येच प्रस्ताव केव्हा सादर झाला व कोणत्या कारणामुळे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले नाही याचे कारण मला कळले असते. परंतू अ  ाा प्रकारचा विचार न करता फक्त प्र  न विचारता येत नाही व खुलासा करता येत नाही असे ठोकळेबाज उत्तर त्यांनी दिले. म्हणून मागितलेल्या व्यक्तीची माहिती भाोधून दिली असती तर त्यात सर्व माहिती मला आपोआप उपलब्ध झाली असती. परंतू माहिती देण्याचे टाळाटाळ करण्यात येते व ठराविक उत्तरे लिहून देण्याची कार्यपध्दती त्यांचेकडे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारचे आकलन करुन न घेता व अपिलकर्ता यांना काय माहिती पाहिजे आहे याचा विचार न करता व सुनावणी न घेता ठोकळेबाज उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी सर्व व्यक्तींची पूर्ण नावे दिलेली नाहीत व त्यामुळे ही माहिती देता येणे अ  ाक्य आहे.  परंतू ही बाब त्यांना माहितीच्या अर्जाच्या वेळेत कळविता आली असती तर त्याच वेळेस अपिलकर्ता यांनी पूर्ण नावे दिली असती. परतू अपिलकर्ता यांचे म्हणणे नुसार माहिती देण्याची टाळाटाळ केली जाते हे खरे आहे. त्याकरीता त्यावर अपिलकर्ता यांनी असे सांगितले की मी संपूर्ण नावे देण्यास तयार आहे. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना संपूर्ण नावे द्यावी व अपिलकर्ता यांनी नावे दिल्यानंतर 3 दिवसाचे आत अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.अम./1414/2010</u>

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री हरीभाऊ तुकाराम पाटील,<br>श्रीराम नगर, जामनेर रोड, पाचोरा<br>ता. पाचोरा जि. जळगाव. | – | अपीलकर्ता |
| 2. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती अमरावती<br>ता.जि. अमरावती | – | उत्तरवादी |
| 3. | जन माहिती अधिकारी<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती अमरावती<br>ता.जि. अमरावती | | |

**(आदेश पारित दिनांक 13/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपिलकर्ता यांनी दिनांक 12.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ यांचेकडे दिनांक 24. 12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 13.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 01.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.. (1) श्री दिलीप पर ुराम चकोर यांचे कुटुबिय व रक्तातील नात्यांच्या व्यक्ति पैकी वैध बंजारा [V.J.] जात पडताळणी प्रमाणपत्र असणा–या व्यक्तिचे प्रमाणपत्राची नक्कल तसेच रक्तांच्या नात्यांच्या व्यक्ति,कुटुंबिय माहितीचा आपणास सादर केलेला पुरावा नक्कल. (2) श्री चकोर यांचे जन्म गांव, ह. निवासाचे गाव, सेवा पुस्तकावरील पत्यांचे गाव, मुळ गाव यापैकी जात प्रमाणपत्र वैधता पडताळणीसाठी कोणते गाव अंतिम प्रमाण धरण्यात यावे व मानले या बाबत भाासन निर्णय आदे ा परिपत्रकाचे प्रत नक्कल वरिलपैकी कोणते गाव, तालुका, जिल्हा आपलें अमरावती विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयांचे (समिती) कार्यक्षेत्रात येते यांची माहिती. (3) बंजारा [V.J.] जातीप्रताणपत्र पडताळणीसाठी भाासकिय निर्णय परिपत्रकानुसारच्या

कोणत्या निकश व अटीनुसार श्री चकोर  यांनी आपल्याकडे कोणकोणते आव  यक पुरावे सादर केले आहेत त्यांच्या नक्कल.(4) श्री चकोर यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी साठी कधी कोठून कोणामार्फत आपल्याकडे अर्ज केला व पडताळणी कालावधी किती पडताळणी नंतर जात वैधता प्रमाणपत्र आपण कुठे कोणास,कधी, कोणत्या पत्यांवर पाठविले याची सविस्तर माहिती पुराव्यासह दयावी (संदर्भ वैधता प्रमाणपत्र जात पडताळणी श्री चकोर – नंबर 857/9) सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 09.01.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु अपिलकर्ता यांना माहिती दिनांक 13.01.2009 रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. म्हणजेच स्पश्टीकरण विचारण्यात आलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 03.03.2009 रोजी देण्यात आला असून अपील हे अधिकारीतेत येत नसल्यामुळे खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर अपिलकर्ता यांना दिनांक 06.03.2009 रोजी सदरच्या निर्णयाची प्रत दिली. त्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

3 जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की दिलीप पर  ूराम चकोर यांना जे प्रमाणपत्र दिले आहे ते प्रमाणपत्र हे अमरावती समितीचे असल्यामुळे त्यांनी अमरावती समितीकडे अर्ज केला होता. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या अर्जावरुन समीती क्र. 1 किंवा 2 कडे हा अर्ज केलेला आहे असा अर्थबोध होत नसल्यामुळे त्यांना त्याबद्दलचे स्पश्टीकरण विचारण्यात आले होते. व सदरचा अर्ज हा दिनांक 11.12.08 रोजी अपर आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी सं  ोधन अधिकारी विभागीय जात पडताळणी क्र. 1 व 2 अमरावती यांचेकडे हस्तांतर केला होता. परंतू अपिलकर्ता यांनी सुध्दा स्प्श्टीकरण केले नाही व त्यामुळे प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या वेळेस अपिलकर्ता यांचेकडून तोंडी माहिती घेतल्यानंतर सदरची माहिती समिती क्र. 2 कडे उपलब्ध होईल म्हणून त्यांचेकडे अर्ज हस्तांतर केला व अपिलकर्ता यांनी त्यांचेकडून माहिती घ्यावी असे कळविले.  परंतू अपिलकर्ता यांनी तसे न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.  जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अमरावती विभागामध्ये दोन समित्या आहेत व समिती क्र. 1 व 2 यांचे मुख्यालय 2006 पर्यंत अमरावती येथेच होते. व त्यामुळे त्या पुर्वीच्या प्रमाणपत्रावर स्थळ अमरावती असे आहे. परंतू 2006 मध्ये समिती क्र. 2 हिचे स्थलांतर अकोला येथे झाल्यामुळे सर्व कागदपत्रे अकोला येथे आहे व त्यामुळेच अपिलकर्ता यांना त्या समितीकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले होते. वास्तविक अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती हि संदिग्ध होती. त्याबद्यलचे त्यांनी स्पश्टीकरण देणे आव  यक होते. तसे न देता त्यांनी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलात सुध्दा स्पश्टीकरण करण्यात आलेले होते. परंतू त्यांनी त्याप्रमाणे माहिती मागितली नाही राज्य माहिती आयोगाकडेच द्वितीय अपिल दाखल केले. आज समिती क्र. 2 हे आयोगापुढे नाही व त्यामुळे समिती क्र. 1 चे माहिती अधिकारी यांनी किंवा प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी समिती क्र. 2 च्या माहिती अधिका–यांना आयोगाचे निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश हस्तांतरीत करणे संयुक्तिक राहिल व त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी सुध्दा अकोला येथेच माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपिल हे अशंतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांचे अपिल हे अं ातः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा सं ाोधन अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय जाती समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 1 यांनी अपिलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 2 अकोला, यांचेकडे हस्तांतर करुन तसेच आयोगाचा निर्णय सुध्दा हस्तांतर करुन अपिलकर्ता यांना 10 दिवसामध्ये विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश द्यावेत. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 1 हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2. जन माहिती अधिकारी तथा सं ाोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 2 यांनी आयोगाचे निर्णय व विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे आदे ा प्राप्त झाल्यानंतर 10 दिवसाचे आत अपिलकर्ता यांना माहिती न दिल्यास ते भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

3. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.अम./1412/2010**
**अपील क्र.अम./1413/2010**

1. श्री सुरेश भाालीग्रामजी राजगुरे — अपिलकर्ता
मु. पो. नांदगांव खंडे वर,
ता. नांदगाव खंडे वर जि. अमरावती

2. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार — उत्तरवादी
तहसिल कार्यालय, नांदगाव खंडे वर,
ता. नांदगाव खंडे वर जि. अमरावती.

3. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय, नांदगाव खंडे वर,
त. नांदगाव खंडे वर जि. अमरावती.

**(आदेश पारित दिनांक 13/04/2010)**

**निर्णय**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 18.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 13.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपिल क्रमांक अम.1412/2009 मध्ये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी केरोसीन वाटपाचे संदर्भात नांदगाव खंडे वर तहसिल अंतर्गत एकूण 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्ती ाः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 06.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मागितलेली माहिती कार्यालयाचे पत्र क्र. अका/पुरवठा /कावी/–2125/09 दिनांक 27.07.09 नुसार पुरविण्यात आली आहे. त्याबाबत त्याची पोचची झेरॉक्स प्रत सोबत सादर करण्यात येते. अपिलकर्ता यांनी सुध्दा माहिती मिळाली अशी पोच दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपिल क्रमांक अम.1413/09 मध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे BPL अंत्योदय अनुसार योजनेचे लाभार्थ्यांची यादीची पुस्तिका तयार करण्याचे संदर्भात मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 22.12.2008 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु दिनांक 04.03.2009 रोजी सर्व तहसिलदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिलेले आहे व त्याची प्रतिलिपी अपिलकर्ता यांना दिलेली आहे.जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपिलकर्ता यांना दिनांक 19.12.2009 रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. तसेच दिनांक 19.01. 2009 ला सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांना अपिल क्रमांक अम. 1412/2009 व अपिल क्र. अम. 1413/ 2009 मध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले खारीज करण्यात येते.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.अम. / 1416 / 2009**

1. श्री श्रीकृश्ण मोतीराम बीजवे — अपिलकर्ता
   बुधवारा, निळकंठ मंदीर रोड,अमरावती
   ता.जि. अमरावती

2. श्री पी.पी. निकास — उत्तरवादी
   प्रथम अपिलीय अधिकारी तथा
   शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
   जिल्हा परिशद अमरावती
   ता.जि. अमरावती

3. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
   निळकंठ प्राथमिक विद्यालय, बुधवारा, अमरावती
   ता.जि. अमरावती.

**(आदेश पारित दिनांक 13 / 04 / 2010)**

**निर्णय**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 19.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती याांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 11.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 13.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचेवतीने श्री एस.एन. फलावी हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यावतीने ॲड. श्री पांडे उपस्थित आहेत.

2. अपिलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी निळकंठ प्राथमिक विद्यालय, बुधवारा,अमरावती यांचेकडे इयत्ता 1 ते 5 मधील वर्गवारी दैनिक पटसंख्या व उपस्थितीची माहे जून 2008 ते माहे डिसेंबर 2008 हजेरीची झेरॉक्स प्रत मागितलेली दिसून येते सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 21. 02.2009 रोजी अपीलकर्ता यांना रु. 484.50 चा डी.डी. काढून कार्यालयात जमा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांनी दिनांक 02.03.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 16.03.2009 रोजी देण्यात आला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका निळकंठ प्राथमिक विद्यालय, बुधवारा, अमरावती यांनी अपिलकर्ता सदर भााळेच्या जवळ असून त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे तसेच जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका निळकंठ मराठी प्राथमिक भााळा बुधवारा चौक अमरावती यांनी अपील अर्जाच्या अपीलार्थीस आव यक ती माहिती विनामुल्य ि घ्राति घ्र देण्यात यावी असे आदे । दिलेले

दिसून येतात. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरीसुध्दा अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोग यांचेकडें द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

2. अपिलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलार्थीस माहिती पुरविण्यात आली नाही. माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपील मान्य केलेले आहे व त्यामुळे दिरंगाईपोटी दंड रु. 250/— आकारण्याचे आदेश द्यावे अशी विनंती आयोगाकडे केलेली आहे. अपिलकर्ता यांचे तर्फे ॲड. एस. एन. फलावी यांनी युक्तीवाद केला व माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री आर. आर पांडे यांनी युक्तीवाद केला. अपिलकर्ता यांपी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता खर्चाचा भरणा हा दिनांक 21.02.2009 रोजी म्हणजे 7 दिवस उशीराने कळविण्यात आलेला दिसून येतो. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांना विचारले असता अपिलकर्ता यांचा अर्ज हा दिनांक 19.01.2009 रोजी प्राप्त झाला असे नमुद केलेले आहे. परंतू तरी सुध्दा खर्चाची माहिती हि विलंबानेच अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेली आहे.हे निर्विवाद आहे. जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे युक्तीवाद करतांना श्री पांडे यांनी आयोगाचे निद नास आणले की कायदा हा नविन असल्यामुळे व या कायदयाची माहिती हि जन माहिती अधिकारी यांना नसल्यामुळे विलंब झालेला आहे. मात्र माहिती देण्यास तयार आहे व त्याकरीता छायांकित प्रतिसुध्दा काढून ठेवण्यात आलेल्या होत्या परंतू अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न केल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. भााळेच्या चौकशीच्या मागणीबद्यल जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी असे सांगितले की अपीलकर्ता हे भााळे ोजारी राहतात व भााळेतील मुले हे त्यांचे घरासमोरुन जा ये करतात व खेळत असतात व त्याचा त्रास होतो. व त्यामुळे ते माहितीच्या अधिकारात माहिती मागण्याचा प्रयत्न करीत आहे व त्यांनी आतापर्यंत 6 अर्ज केलेले आहेत व म्हणूनच ते भााळेच्या चौकशीची मागणी करीत आहे. परंतू कायद्यात तशी तरतुद नाही. व त्यामुळे भााळेच्या चौकशीची विनंती मान्य करण्यात येवू नये अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली. विलंबाच्या संदर्भात मात्र ॲड. पांडे यांचा युक्तीवाद हा ग्राहय धरण्यासारखा नाही. अपिलकर्ता यांनी माहिती हि 2009 मध्ये मागितली आहे. व सदरचा अधिनियम हा 2005 मध्ये अमलांत आलेला आहे व कोणतीही भााळा ही सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे ती माहितीच्या अधिकारात येते. ही बाब जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना माहिती असणे आव यक आहे. त्यामुळे कायद्याची माहिती नाही हा युक्तीवाद ग्राहय धरता येत नाही. त्यामुळे यापुढे अशा प्रकारे विलंब होवू नये म्हणून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना रु. 250/— ची भाास्ती लादणे आव यक आहे त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्दअधिनियमाचे कलम 20 (1) अन्वये रु. 250/– ची भाास्ती लादण्यात येते. सदरची भाास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन "लेखाशिर्श 0070– इतर प्र ाासकिय सेवा, 60 इतर सेवा, 800, इतर जमा रक्कमा, (18) माहितीचा अधिकार (0070–16–1)" मध्ये जमा करण्यात यावी.

..3..

2. सदरची भाास्तीची वसुली ही शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिशद अमरावती यांनी करावयाची आहे.

3. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

<u>अपील क्र.अम./1465/2009</u>
<u>अपील क्र.अम./1466/2009</u>

1. श्री हरीराम भिकमचंद कलंत्री — अपिलकर्ता
33,प्रभात कॉलनी,ि ालांगन रोड, अमरावती,
ता. जि. अमरावती.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा — उत्तरवादी
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
मांगीलाल प्लॉट्स, कॅम्प, अमरावती,
ता. जि. अमरावती

3. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी
मांगीलाल प्लॉट्स, कॅम्प, अमरावती,
ता. जि. अमरावती

**(आदेश पारित दिनांक 21/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 02.03.2009 व 18.03.2009 रोजी अनुक्रमे राज्य माहिती आयोग अमरावती याांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. हि अपीले राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 25.03. 2010 रोजी नोटीस काढून दिनांक 21.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे श्री एम. जी. देशमुख सह जिल्हा निबंधक हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1465/2009 मध्ये अपिलकर्ता यांनी दिनांक 03.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा मुद्रांक अधिकारी यांचे कार्यालयात सन 1995 पासून ते 02.11.2008 अमरावती जिल्हाधिकारी मुद्रांक विभागाचा परवाना मिळण्याबाबत आलेले एकूण अर्ज व त्या अनुसंघाने अमरावती जिल्हयामध्ये देण्यात आलेले एकूण परवाने यांची पूर्ण माहिती व देण्यात आलेल्या मुद्रांक विक्रीचा परवाने यांची कोणत्या वर्शी कोणत्या दिनांक व कोणत्या कार्यालयासाठी देण्यात आले व ज्या व्यक्तिंना परवाने देण्यात आले त्यांचे नांव व परवाने क्रमांक दिनांक यांची सर्व माहितीची यादी देण्यात यावी माहितीचा कालावधी दिनांक 01.01.1995 ते 2.11.2008 अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 02.12.2008 रोजी माहितीच्या करीता अतिरिक्त खर्च रु. 36 या कार्यालयात येवून चालानाद्वारे भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना दिनांक 10.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी सन 1995 ते 1997 या कालावधीतील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 07.01. 2009 रोजी देण्यात आला असून सन 1995 ते 97 या कालावधीत किती अर्ज प्राप्त झाले याबाबतची माहिती त्वरीत कळवावी असा निर्ण दिलेला दिसून येतो व त्या आदे ाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की त्यांना सन 1995 ते 1997 या कालावधीतील माहिती अद्यापी प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपिलकर्ता यांना दिनांक 10.12.2008 रोजी सन 1995 ते 1997 चे अर्ज ना ा करण्यात आले असल्याने या कालावधीतील माहिती वगळता उर्वरीत कालावधीतील माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी हे वरीश्ठ अधिकारी असल्यामुळे त्यांना माहिती असणे जरुरीचे आहे व असे असुन सुध्दा त्यांनी प्रथम अपिलामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यावर त्यांना वस्तुस्थितीची माहिती असलीच पाहिजे व त्यामुळे त्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे सुध्दा उत्तरदायीत्व आहे. प्रथम अपिलामध्ये कोणत्याही प्रकारची चौक ी करावयाची नाही व आयोगापुढे मात्र नंतर विसंगत युक्तिवाद केला जातो त्यामुळे आयोगास निर्णय देणे अ ाक्य होते. व त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वस्तुस्थिती जाणून न घेता निर्णय दिलेला असल्यामुळे त्यांनीच पुन्हा सन 1995 ते 1997 या कालावधीतील माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृश्टीने निर्णय घेणे आव यक आहे. व त्याकरीता सदरचे अपील प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे परत पाठविण्यास पात्र आहे.

4. अपिलकर्ता यांनी अपिल कमांक अम. 1466/2009 मध्ये दिनांक 15.09.2009 रोजी जन माहिती अधिकारी मुद्रांक कार्यालय जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक 11.04.88 रोजी विजयकुमार भ. मुंधडा अमरावती यांनी कळविलेल्या तकार अर्जावरुन तत्कालीन अधिकारी श्री बेंजामिन यांनी पारीत केलेल्या आदे ाची प्रत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 27.10.2008 रोजी मागितलेली माहिती हि 20 वर्शापेक्षा पूर्वीच्या कालावधीची असल्याने या कार्यालयाचे अभिलेख्यावर आढळून येत नाही. करीता आदे ाची प्रत आपणास उपलब्ध करुन देता येत नाही. सदरचा अभिलेख नाश करण्यात आलेला आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 16.12.08 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 06.01.2009 रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अर्जदार यांना त्यांचा अर्ज दि. 15.09.2008 च्या अनुशंगाने केलेल्या तकारीच्या अनुशंगाने तत्कालीन जिल्हाधिकारी श्री बेंजामिन यांनी केलेल्या आदे ाची प्रतीचा त्वरीत भोध घ्यावा त्याप्रमाणे श्री विजय मुंदडा परवानाधारक मुद्रांक विकेता यांचेकडे सदर आदेशाची प्रत उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करावी. सदर आदे ाची प्रत कार्यालयातील अभिलेख्यामध्ये नसल्यास नाश करण्याबाबतचे आदेश याबाबतची माहिती अर्जदार यांना देण्यात यावी. अर्जातील माहिती मोघम न देता स्वयंस्पश्ट देण्यात यावी. असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपिलाच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतू अपिलकर्ता यांना दिनांक 13.10. 2008 रोजी माहिती तयार करण्याचे काम सुरु आहे. माहिती तयार होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले होते असे आयोगापुढे सांगितले व त्याप्रमाणे त्यांना दिनांक 27.10.2008 रोजी कळविण्यात आले होते. पुन्हा दिनांक 02.02.2009 रोजी त्यांना आदेशाची प्रत उपलब्ध होत नाही असेही कळविलेले दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय अपिलकर्ता यांना दिनांक 07.01.2009 रोजी उपलब्ध करुन दिलेला आहे असे त्यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी

व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे अतिरीक्त कथन केले अर्जदार श्री हरिराम भिकमचंद कलंत्री यांना या विभागाने मुद्रांक विक्रीचा परवाना दिलेला होता श्री कलंत्री यांचेकडून मुद्रांक विक्री करतांना चुका आढळल्यामुळे विभागाने त्यावेळी त्यांचा मुद्रांक विक्रीचा परवाना रद्द केलेला आहे. त्यावेळेपासून श्री कलंत्री यांनी या कार्यालया विरुध्द तक्रार करण्याचा सपाटा सुरु केला आहे. एकदा रद्द केलेला मुद्रांक विक्रीचा परवाना पुन्हा बहाल करण्याची तरतुद कायदयात नाही श्री कलंत्री यांनी या विरुध्द मा. उच्च न्यायालयात सुध्दा रिट पिटीशन दाखल केलेले होते. त्याचा क्रमांक 1401/2003 व 1246/2004 असा आहे. त्यामध्ये सुध्दा  निर्णय झालेला असून त्यांना पुन्हा अर्ज करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. मात्र सद्या मुद्रांक विक्रीचा परवाना वितरीत न करण्याचे धोरण भाासनाने अवलंबीले असल्याने कोणताही नविन मुद्रांक विक्रीचा परवाना वितरीत केलेला नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम ,2005 अंतर्गत श्री कलंत्री यांनी आजपावेतो या कार्यालयाकडे एकूण 11 अर्ज केलेले असुन त्यामधील माहिती एकाच  प्रकारची आहे त्याचा तप ील खालीलप्रमाणे आहे.1) दिनांक 15.09.2008, दिनांक 15.09.2008, दिनांक 15.09.2008, दिनांक 3.11.08, दिनांक 16.12.08, दिनांक 18.03.2009, दि.04.08.2009, दिनांक 10.08.09, दिनांक 27.08.2009, दिनांक 09.10.2009 श्री कलंत्री यानी आजपावेतो या कार्यालयाकडे केलेल्या प्रत्येक तक्रारीस तसेच श्री कलंत्री यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज करतांना सांगतात की, "माझेकडे सर्व प्रकारची माहिती उपलब्ध आहे परंतु तुम्ही मला जोपर्यंत मुद्रांक विक्रीचा परवाना देत नाहीत तो पर्यंत मी असे अर्ज करणे सुरुच ठेवणार आहे."  मात्र कायदयात त ी तरतुद नसल्यामुळे हे कार्यालय त्यांना मुद्रांक विक्रीचा परवाना देण्यास हतबल आहे.

या प्रकरणात सुध्दा या कार्यालयाने पुर्ण जो ाने श्री कलंत्री यांना माहिती पुरविण्याचे ठरविले आहे परंतु संपूर्ण कार्यालयातील अभिलेखाचा भाोध घेवूनही श्री कल़ंत्री यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयास उपलब्ध झालेली नाही. पुर्वी हे कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये होते मात्र वाढलेल्या अभिलेखामुळे हे कार्यालय मांगीलाल प्लॉट येथील इमारतीमध्ये शिप्ट करण्यात आलेले आहे. अभिलेख शिप्टींगमध्ये सदरचे अभिलेख गहाळ झालेले असावे किंवा नाश करण्यात आले असावे.

श्री कलंत्री यांना माहिती देण्यात येवु नये असा या कार्यालयाचा कदापीही हेतू नाही तथापी सदरची माहिती मिळत नसल्यामुळे ती आतापर्यंत पुरविता आलेली नाही. श्री कलंत्री यांचा अपील अर्ज करण्या मागील उद्येश हा केवळ या कार्यालयास त्रास देण्याचा आहे. अपिलकर्ता अर्जदार यांनी दाखल केलेले अपील हे त्रास देण्याचे वृत्तीने केलेले असल्यामुळे, भाासकिय कार्यालयाचा वेळ खर्ची घालण्याचे दृश्टीकोनातून केलेले असल्यामुळे सदरचे अपील अर्ज खारीज करण्यात यावे हि नम्र विनंती. अपिलकर्ता यांचे अपिल खारीज करण्यास पात्र आहे.

5. अपीलकर्ता हे सार्वजनिक व्यापक हिताचे दृश्टीने माहिती मागत नसून स्वहिताकरीता अधिनियमाच्या तरतुदींचा वापर करीत आहेत व जी माहिती उपलब्ध होवू भाकत नाही अ ी माहिती मागत आहेत परंतु याबाबतची जाणीव प्रथम अपिलीय अधिकारी यांना असणे आव यक होती.

## आदेश

1. अपिल क्रमांक अम. 1465/2009 मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदे ाप्रमाणे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृश्टीने पुन्हा सुनावणी घेवून निर्णय द्यावा.

2. अपिल क्रमांक 1466/2009 खारीज करण्यात येते.

3. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.

<u>अपील क्र.अम./1483/2009</u>
<u>अपील क्र.अम./1484/2009</u>

1. श्री संदीप हरी चंद्र वर्मा — अपिलकर्ता
न.प. सदस्य, तलाव रोड, खामगाव,
ता. खामगांव जि. बुलढाणा

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी — उत्तरवादी
नगर परिशद, खामगांव,
ता. खामगांव जि. बुलढाणा

3. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा मुद्रांक अधिकारी
नगर परिशद, खामगांव,
ता. खामगांव जि. बुलढाणा

(आदेश पारित दिनांक 22/04/2010)

<u>निर्णय</u>

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 21.04.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. हि अपीले राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आली आहेत. त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 25.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 22.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक अम.1483/2009 मध्ये दिनांक 29.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी नगरपरिशद खामगाव यांचेकडे विद्यमान मुख्याधिकारी यांच्या काळातील संचालक नगर पालीका प्रशासन यांच्याकडून देण्यात आलेल्या निर्दे ांचे पालन करण्यात वारंवार करण्यात आलेल्या कसूर बाबत एकूण 6 मुद्दे व उपमुद्यांमधील ठरावाची माहिती मागितलेली दिसून येते. हि माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 22.01.2009 रोजी अपिलकर्ता यांना मागितलेली माहिती संदिग्ध, विस्तृत व वि लेशक मागणी करणारी आहे. माहितीच्या अधिकारात वि लेशण करुन माहिती देण्याची तरतुद नाही. तरीपण आपणास जी काही माहिती आव यक आहे त्या सर्व माहितीच्या संचिका संबंधित विभागात आपणास दिनांक 27.01. 2009 रोजी कार्यालयीन वेळेत 11 ते 5.00 वाजता पाहणी करीता उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्यानुसार आपण संबंधित विभागातून स्वतः संचिकांची पाहणी करुन आपणास जी नेमकी माहिती हवी आहे ती द ाविल्यास आपणास संबंधित विभागामार्फत ती माहिती त्वरीत पुरविण्यात येईल कृपया याची नोंद घ्यावी. असे कळविलेले दिसते. एकूण 13 विभागांना हे पत्र दिलेले आहे असे दिसून येते. परंतु

अपिलकर्ता यांनी दिनांक 23.01.2009 च्या पत्रान्वये त्यांनी  मागितलेली माहिती संदिग्ध, विस्तृत व विशलेशक असणारी नसुन स्पश्ट व कायदेशीर दृश्टीने प्रमाणित आहे.त्यामुळे सर्व माहिती संचित करुन कारकुनची व्यवस्था करुन मुद्येनिहाय माहिती दाखविण्यात यावी अशी विनंती करणारे पत्र दिले त्यावर पुन्हा दिनांक 23.01.2009 रोजी माहिती अधिकारी तथा उपमुख्याधिकारी यांनी अपिलकर्त्याला त्यांनी मागितलेल्या सर्व माहितीच्या संदर्भातील संचिका संबंधित विभागातच पहावयास मिळतील, संबंधित रेकार्ड एका ठिकाणी कार्यालयीन व्यापामुळे उपलब्ध करुन देता येणे भाक्य नसल्यामुळे, आपणास  नगर परिशदेने कळविल्यानुसार आपण माहिती पाहून जर विभागवार त्वरीत कळविल्यास आपणास त्याच दिवशी त्याच विभागातून आपण मागणी केलेली माहिती तत्परतेने अग्रक्रम देऊन देण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसते. व त्या पत्राची प्रतिलिपी सर्व विभागांना दिलेल्या दिसतात. त्यावर दिनांक 27.01.2009 च्या पत्रान्वये अपिलकर्ता यांनी आक्षेप घेतलेला आहे. पुन्हा दिनांक 29.01.2009 व दिनांक 07.02.2009 रोजी स्मरणपत्र दिलेले आहे. दिनांक 5.02.2009 रोजी पुन्हा अपिलकर्ता यांना माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता येणे भाक्य नाही असे कळविलेले जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्याला कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांनी दिनांक 27.02.2009 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 29.04.2009 रोजी देण्यात आला असून त्यात अपिलार्थी यांना अपिलाबाबत विचारणा केली असता सुनावणीच्या वेळेस वादविवाद करुन सुनावणी न होवू देता निघून गेले.व त्यानंतर झालेल्या पत्रव्यवहाराच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे व आव  यक असलेली माहिती पाहणी केल्यानंतर वेळीच उपलब्ध करुन द्यावे अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात असे कळविलेले आहे. दिनांक 4.05.2009च्या पत्रान्वये सर्व माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख यांना अपिलकर्त्याला माहिती पुरविण्यात यावी व माहिती अधिकारी नगर परिशद, खामगांव यांनी त्याची प्रतिलिपी अपिलकर्ता यांना दिलेली आहे परंतू त्यानंतर सुध्दा अपिलकर्ता यांनी कागदपत्राची पाहणी न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3 अपिलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपिलकर्ता हे नगर सेवक आहेत व नगर सेवक म्हणून आतापर्यंत त्यांना सर्व ठरावाच्या प्रती उपलब्ध होतात. ते सर्व बैठकीला हजर असतात. व त्यामुळे या सर्व ठरावाची माहिती त्यांना आहे. असे असले तरी त्यांनी माहिती मागितल्यास उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही. परंतू त्यांच्या दिनांक 29.12.2008 च्या अर्जामध्ये ज्या ठरावाची त्यांनी माहिती मागितलेली आहे त्या ठरावांचे त्यांनी नि चत वर्णन केलेले नाही, तारखा दिलेल्या नाहीत. जर तर च्या भाशेत ठरावाची माहिती मागितलेली आहे. याचा अर्थ प्रत्येक ठराव तपासून अपिलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे निकश लावून मगच माहिती उपलब्ध करुन देणे असा त्याचा अर्थ होतो. नगर परिशदेतील एकूण 13 विभागातील 3 वर्शातील माहिती आहे व त्यात प्रत्येक विभागाचा ठराव हे भोकडो पानाचे होतात व त्यात वेगवेगळया वर्शाचे अनेक ठराव असतात व त्यामुळे प्रत्येक ठरावाची छाननी करुन उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास या विभागाची यंत्रणा त्या वि ाश्ट छाननी करीता वळवावी लागेल. व त्यामुळे त्यांनी स्वतः सर्व माहिती पाहावी व त्यातून जी माहिती हवी असेल तशी माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविले. व हे विहित मुदतीत कळविले आहे. माहिती नाकारण्याचा प्र  नच नाही. व अधिनियमाचे कलम 2 (त्र) प्रमाणे “माहितीचा अधिकार” व्याख्येप्रमाणे जे अग्रक्रम दिलेले आहे.  त्या क्रमाने त्यांना कळविण्यात आलेले आहे त्यानंतर सुध्दा अपिलकर्ता यांना संपूर्ण माहितीची कागदपत्रे एका ठिकाणी संकलित करुन उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णयसुध्दा स्वयंस्प्ष्ट दिसून येतो व त्यातही माहिती मागण्यापेक्षा वादविवाद करुनच अपिलकर्ता निघून गेले असे नमुद केलेले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे याबाबत आयोगाची खात्री झालेली आहे. यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा वादविवाद करणे योग्य वाटते असे दिसते. अन्यथा त्यांनी नस्तीचे निरीक्षण करुन आव यक ती माहिती उपलब्ध करुन घेणे हा मार्ग स्विकारला

असता. अपिलकर्ता यांनी पुढे असेही सांगितले की सदरच्या नस्तीचे वर्गीकरण केलेले असते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की तशाप्रकारचे वर्गीकरण केलेले नसते. ठराव झाल्यानंतर त्याबाबत अंमलबजावणी करीता तो मुख्याधिकारी यांचेकडे जातो. व मुख्याधिकारी यांनी त्यावर आदेश केल्यानंतरच त्याची अंमलबजावणी होते. त्यानंतर अपिलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना खास सभा व आमसभा यांचे ठराव दिले तरी चालतील. तरीही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे त्यानंतर अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा नि चत ठरावाची मागणी मागितलेली नाही. असे असले तरी अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

4. अपिलकर्ता यांनी अपिल क्र. अम. 1484/2009 मध्ये दिनांक 26.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिशद खामगांव यांचेकडे एकूण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 23.01.2009 रोजी अपिलकर्ता यांना रु. 242/– चा भरणा नक्कल विभागात करावा. फी चा भरणा केल्यानंतर त्या विभागातून माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपिलामध्ये मागणीनुसार उपलब्ध असतांना मागितलेली माहिती जाणून बूजून अर्धवट दिली असे कारण दिलेले आहे. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 29.04.2009 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्जानुसार दिलेली माहिती बरोबर आहे. दिलेल्या माहिती व्यतिरिक्त माहिती उपलब्ध नसल्यामुळे इतर माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असेही नमुद केलेले आहे तसेच अपिलकर्ता व वादविवाद करुन सुनावणी होवू न देता निघून गेले असे दिसून येते. तरीही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

5 प्रथम अपिलाच्या संदर्भात युक्तीवाद करतांना अपिलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. अर्धवट माहिती दिलेली आहे. वास्तविक प्रथम अपील करतांना त्यांनी हे कारण दिलेले आहे. व त्याच वेळेस प्रथम अपीलीय अधिकारी यांना स्वयंस्पश्टपणे तप ीलामध्ये अर्धवट माहिती कशी उपलब्ध करुन दिली हे त्यांना सांगता आले असते. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांचे पुढे तसे काहीही न सांगता ते वादविवाद करुन निघून गेले असे निर्णयात म्हटलेले आहे. आजही आयोगापुढे अर्धवट कशी माहिती दिली याबद्दल त्यांनी कोणतेही स्पश्टीकरण दिलेले नाही. फक्त आयोगासमोर मिळालेली माहिती दाखवून ती मुद्येनिहाय मिळालेली नाही व मुद्या क्र. 7, 8 ची माहिती दिली नाही असे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना सर्व माहिती ही उपलब्ध करुन दिलेली आहे. व या व्यतिरिक्त कोणतीही माहिती उपलब्ध नाही. लेखी कोणतेही स्पश्टीकरण अपिलकर्ता यांनी आयोगापुढे सादर केलेले नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खुलासा करतांना दिलेल्या माहिती व्यतिरिक्त माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे आयोगापुढे खुलासा केला आहे. अपिलकर्ता यांचे म्हणणे तोंडी असल्यामुळे क्षणभर मान्य केले तरी त्यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास प्रत्येक माहितीच्या प्रमाणे कागदपत्रे क्रमवार लावून देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांनी संपूर्ण माहितीची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांचेकडे घेवून जावून मुद्येनिहाय लावून घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1 अपिलकर्ता यांचे अपिल क्रमांक अम/1483/2009 हे अं ातः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निर्णय योग्य असल्यामुळे अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत कामकाजाच्या दिव ाीची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून त्या दिवशी व त्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित राहून सर्व विभागातील मागितलेल्या माहितीचे नस्तीचे निरीक्षण कलम 2 (त्र) (1) प्रमाणे माहिती अधिकारी यांचे बरोबर प्रत्येक विभागात जावून घ्यावे. व निरिक्षणाअंती त्यांना ज्या ज्या कागदपत्रांची आव यकता असेल त्या त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती मुळातच जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे प्रती पृश्ठ 2 रु प्रमाणे खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्यावी व लेखी पोच द्यावी.

2 अपिलकर्ता यांचे अपिल क्रमांक अम. 1484/2009 हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही संपूर्ण माहिती दिलेली असली तरी अपिलकर्ता यांनी सदरची माहिती मुद्येनिहाय वर्गीकरण करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे घेवून जावून मुद्येनिहाय करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत माहिती मुद्येनिहाय करुन घेण्याकरीता अर्ज सादर केल्यास मुद्येनिहाय करुन द्यावी व पोच घ्यावी

3. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.अम./1488/2009</u>**

1. श्री नारायण काशिराम महल्ले, – अपिलकर्ता
दत्तमंदीराजवळ, गणेश नगर, जुने भाहर,
दाबकी रोड, अकोला,
ता. जि. अकोला

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अवर सचिव – उत्तरवादी
महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई –32.

3. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई –32.

**(आदेश पारित दिनांक 28/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 20.03.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती याांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 28.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता हजर आहे व उत्तरवादी हजर आहेत व उत्तरवादी यांनी दुरध्वनीवरुन मुदत देण्याची विनंती केली होती. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले व दिलेली माहिती तपासून पाहण्यात आली. त्यामुळे पुढील निर्णय देण्यात येत आहे.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 20.01.2009 रोजी महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय यांचेकडे सन 1090–91 मधील विधान परिशद तारांकित प्र न 6849 च्या संदर्भामध्ये 3 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 30.01.2009 रोजी सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी भाालेय ि ाक्षण विभाग यांचेकडे हस्तांतर करणेबाबत कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांना पुन्हा दिनांक 06.02.2009 रोजी सदर प्र न सन 1991 च्या पहिल्या अधिवे ानातील असून या सचिवालयात उपलब्ध असलेल्या तारांकीत व अतारांकीत प्र नोत्तराच्या याद्या तपासल्या असता सन 1990–91 च्या तारांकीत प्रश्न संबंधानी अभिलेख्याच्या नस्त्या न ट करण्यात आलेल्या आहेत. पुन्हा उपरोक्त प्रश्न संबंधातील कोणतीही कागदपत्रे या सचिवालयात उपलब्ध नाहीत. त्यामुळे आपण आपल्या संदर्भाधिन अर्जाद्वारे मागितलेल्या तारांकीत प्रश्नाबाबतची माहिती आपणास देणे भाक्य होणार नाही त्यामुळे

अपिलकर्ता यांनी दिनांक 17.02.2009 रोजी अर्जदाराने जन माहिती अधिकारी भाालेय शिक्षण विभाग मंत्रालय यांचेकडे सुध्दा माहिती मागितलेली दिसून येते. व त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. वास्तविक जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे स्वयंस्पश्ट आहे महाराश्ट्र विधान मंडळाच्या सचिवालयात कोणत्याही प्रश्नातील विशयाबाबत प्रशासकिय कार्यवाही होत नाही. प्रशसकिय कार्यवाही हि संबंधित मंत्रालयीन विभागामध्येच होत असते व त्यामुळे जर अपिलकर्ता यांना चौक ाीचा अहवाल अपेक्षीत असेल तर ती माहिती त्यांनी संबंधित मंत्रालयीन विभागाकडेच मागणे संयुक्तीक राहिल. व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.
2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.अम. / 1489 / 2009**

1. श्री श्रीराम भिकाजी देवकर, — अपिलकर्ता
रा. धामणगाव (धाड)
ता.जि. बुलढाणा

2. आर. डी. पडोळे.
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
जिल्हा परिशद बुलढाणा,
ता.जि. बुलढाणा.

3. श्री डी.व्ही. आढाव,
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बुलढाणा,
ता.जि. बुलढाणा.

**(आदेश पारित दिनांक 28 / 04 / 2010)**

**निर्णय**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 02.04.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यााचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 28.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता हजर आहे व उत्तरवादी हजर आहेत

2. अपिल क्रमांक 1489 / 2009 हे दिनांक 02.04.2009 रोजी दाखल केले असून त्यात दिनांक 12.12.2008 रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही असे नमुद केले आहे. परंतू अपिलकर्ता यांच्या दिनांक 12.12.2008 च्या अर्जाच्या अनुशंगाने अपील क्र. 160 / 2009 मध्ये दिनांक 18.01.2010 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती खंडपीठ, अमरावती यांनी निर्णय दिलेला असून अर्जदाराने सदर रु.

148/—हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भात अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे हे योग्य नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.नाग./291/2010**

1. श्री राजेश केशवराव नारनवरे, – अपिलकर्ता
हुडको कॉलोनी, M.I.G.-B/९३नारा रोड,
नागपूर

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक – उत्तरवादी
कोराडी औशणीक विद्युत केंद्र, कोराडी (के.टी.पी.एस.)
ता. कामठी जि. नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
कोराडी औशणीक विद्युत केंद्र, कोराडी (के.टी.पी.एस.)
ता. कामठी जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक 28/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 17.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 28.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 17.08.2009 रोजी अधिक्षक अभियंता के.टी.पी.एस. कोराडी महाजनको ता. कामठी जि. नागपूर यांचे कार्यालयामध्ये परीमंडळातील दिनांक 31.12.05 व दिनांक 30.06.06 रोजीची उच्चस्तर लिपिक (लेखा) कार्यरत, भरलेल्या एकूण 44 व 42 कर्मचा–यांची दोन वेगवेगळी नावे द ाविणारी फक्त मागासवर्गीय पद निहाय रोस्टरची यादी पुरविण्याबाबत (सेवा जेश्ठता नाही) अ ाी माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी 31 डिसेंबर 2003 ते 31 डिसेंबर 2006 असा असून माहिती व्यक्तिशः घेणार असे कळविले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना 22. 10.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक 28.10.2009 रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 19.12.2009 रोजी देण्यात आला असून, आपण आपले अपीलाच्या दरम्यान जो अर्ज कार्यालयात सादर केला आहे व आपणास सदर्भ क्र. 2

अन्वये या कार्यालयाच्या वतीने जी माहिती पुरविण्यात आली आहे ती योग्य असल्यामुळे आपले अपील निकाली काढण्यात आले आहे. असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. व त्यात खोटी व बनावट माहिती पुरविल्याचे कारण दिलेले आहे. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांनी केलेला नाही. प्रथम अपिलामध्ये खुलासा केला होता. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी योग्य माहिती उपलब्ध करुन दिली आहे असा निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की आस्थापना अधिक्षकांनी जी माहिती दिली आहे ती माहिती अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली आहे. व त्यात कोणत्याही प्रकारची खोटी व बनावट माहिती उपलब्ध करुन दिली नाही अपिलकर्ता यांना दिलेली माहिती तपासली असता त्यांना योग्य माहिती दिली आहे असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.नाग./289/2010**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री भाामदेव का‍ि ारामजी तितरमारे<br>प्लॉट नं. 270, चंदन नगर, राममंदिर जवळ,<br>पो. हनुमान नगर,<br>नागपूर – 440009. | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त–1<br>महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर | – | उत्तरवादी |
| 3. | जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त<br>हनुमाननगर झोन क्र.–3, महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर –9. | | |

**(आदेश पारित दिनांक 28/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 18.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 28.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 23.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त महानगर पालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. चंदननगर राममंदिर म.न.पा. घर क्र. 324 (324/अ) संदर्भात खालील राममंदिर चंदननगर मालकी हक्क संदर्भात आपले पत्र क्र. 1271/III/D/दिनांक 09.12.09 व माझे पत्र 10/12/09 चे खालील मुद्यावर माहिती पाहिजे 22.10.09 ते आजपर्यंत. मुद्या क्र. (1) आपले पत्र क्र. 1271/III/D/दिनांक 09.12.09 चे पत्रान्वये मिळाले उत्तरात सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी यांचे दिनांक 21.02.2009 चे कार्यालयीन टिपणी अहवाल प्रत मिळावी.(2) उदयसिंग लक्ष्मणराव मोहिते हे कोण व त्यांचे आक्षेप पत्राची प्रमाणित प्रत मिळावी.(3)म.न.पा. रेकार्डवर राममंदिर चंदननगर कुणाचे आहे प्रमाणित करावे.

(4) माझे दिनांक 10.12.09 चे निवेदनावर काय कारवाई झाली त्यांचे अहवाल मिळावे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना कागदपत्राची एकूण पृश्ठे संख्या चार पुरविण्यात आलेली आहे. तसेच आपण दि. 10.12.2009 ला दिलेल्या अर्जावर सध्या कारवाई सुरु आहे असे दिनांक 16.01.2010 च्या पत्रान्वये कळविलेले दिसते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि. 06.02.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले व प्रथम अपिलामध्ये मुद्येनिहाय माहिती उपलब्ध झाली नाही असे कारण दिलेले आहे. त्यावरुन अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी पुन्हा दिनांक 06.03.2010 च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामध्ये त्यांना पुर्वी सर्व कागदपत्रे दिलेली आहेत असे कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच दिनांक 9.12.2009 च्या पत्रान्वये राजस्व निरीक्षक वार्ड क्र.12 यांनी अपिलकर्ता यांच्या दिनांक 21.10.2009 रोजीच्या अर्जाप्रमाणे होत असलेल्या कार्यवाहीची सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरीही समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की भूसंपादन क्र. 511 हा भोगवटदार वर्ग –1 नागपूर सुधार प्रन्यास चा 7/12 चा उतारा व नका ाा हा त्यांनी दिनांक 17.12.2009 रोजी उत्तरवादींना पुरविलेला आहे. तसे असेल तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की जी चौकशी सुरु आहे त्या चौक ीमध्ये आतापर्यंत निर्णय झालेला नाही. त्या चौकीच्या प्रक्रीयेतील पत्रव्यवहार किंवा टिपणी अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. चौकशीमध्ये सर्व संबंधितांना बोलावूनच निर्णय घेतला जाईल. असे असले तरी अपिलकर्ता यांना चौकशी प्रक्रियेतील माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृश्टीने त्यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदे ा**

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना त्यांच्या दिनांक 10.12.2009 च्या तक्रारीवरील चौकशीच्या प्रक्रीयेतील माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे त्यांना चौकशीस उपस्थित राहण्यास कळवावे.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.अम. / 1490 / 2009</u>**

1. श्री श्रीराम भिकाजी देवकर, — अपिलकर्ता
   रा. धामणगाव (धाड)
   ता.जि. बुलढाणा

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा
   उपमुख्य कार्यकारी अधिकारी
   जिल्हा परिशद बुलढाणा,
   ता.जि. बुलढाणा.

3. श्री डी.व्ही. आढाव,
   जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
   पंचायत समिती बुलढाणा,
   ता.जि. बुलढाणा.

**(आदेश पारित दिनांक 28 / 04 / 2010)**

**<u>निर्णय</u>**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 02.04.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 28.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता हजर आहे व उत्तरवादी हजर आहेत

2. अपिल क्र. 1490 / 09 दिनांक 02.04.2009 रोजी दाखल केले असून दिनांक 12.12.2008 रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही असे नमुद केले आहे. परंतू अपिलकर्ता यांच्या दिनांक 12.12.2008 च्या अर्जाच्या अनुशंगाने अपील क्र.अपील क्र. 160 / 2009 मध्ये दिनांक 18.01.2010 रोजी राज्य माहिती आयोग अमरावतीखंडपीठ, अमरावती यांनी निर्णय दिलेला असून अर्जदाराने सदर रु.

148/- हा आदे ा मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदे ा दिलेले दिसून येतात. पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भात अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे हे योग्य नाही. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.अम./१४९१/२००९</u>**

१. सौ. स्वाती दिनकरराव सपकाळ - अपिलकर्ता
रा. उमाळा पो. देऊळघाट
ता.जि. बुलढाणा

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा - उत्तरवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद बुलढाणा,
ता.जि. बुलढाणा.

३. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव
जिजाऊ पाणलोट विकास समिती, उमाळा पो. देऊळघाट
ता. जि. बुलढाणा.

**(आदेश पारित दिनांक २८/०४/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१ अपिलकर्ता यांनी दिनांक २६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोग अमरावती याांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ, नागपूर यांचेकडे दिनांक २४.१२.२००९ रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक ३०.०३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.०४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता गैरहजर आहे व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपिलकर्ता यांनी दिनांक २६.०३.२००९ रोजी द्वितीय अपील दि. ३१.१२.२००८ च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात दाखल केलेले आहे. सदरची

माहिती अपिलकर्ता यांनी पूर्वी दिनांक २७.०४.२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे सुध्दा मागितली होती व सदरची माहिती अपिलकर्ता यांना दिनांक १५.०१.२००९ रोजी मिळाल्यामुळे समाधान झाले असे २२.०१.२००९ रोजी लेखी दिलेले असल्यामुळे अ.क्र. २४५६/२००७ हे खारीज करण्यात आले होते. त्यामुळे एकच माहिती दोन अर्जाच्या माध्यमातून मागितलेली असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दिनांक १३.०५.२००९ चे निर्णयातून सुध्दा दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.नाग./381/2009</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री रमेश धनसिंग राठोड,<br>C/o. अरुण जांभळे, 1 के, बापूनगर,<br>उमरेड रोड, नागपूर –440 009. | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर | – | उत्तरवादी |
| 3. | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर | | |

**(आदेश पारित दिनांक 29/04/2010)**

## <u>निर्णय</u>

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 12.04.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 14.04.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 29.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 07.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कार्यकारी अभियंता यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. 1) मला क.अ. पदावरुन 1986 मध्ये रु. 5422.65 चा भ्रश्टाचार केल्याबाबत व रु 14207.30 अफरातफर केल्याबाबत अधिक्षक अभियता सा. बा. मंडळ नागपूर पत्र दि. 4.11.1986 नुसार बडतर्फ केले. रु. 5422 .65 व रु 14207.30 मजुरांचा पगार अध्याप पेंडिग आहे की पगार पर्यायी व्यवस्था करुन झालेली आहे त्याबाबतची माहिती. (2) मजुरांचा पगार पेंडिंग असल्याबाबत मजूरांची तक्रार असल्यास त्याची प्रत (3) मजुरांचा पगार पेंडिंग असल्याबाबत माहिती उपलब्ध नसल्यास संबंधित गावातील सरपंचाकडून उपलब्ध करुन द्यावी. (4) माहे ऑगश्ट 1985, माहे एप्रिल 1986 व माहे मे 1986 कॅ ाबुक प्रत (दि. 06.01.2010) रोजी आपण दिलेल्या रु. 5422.65 च्या कॅ ाबुक नोंदीच्या प्रतीत खोडतोड असल्यामुळे वरील तीन महिन्याच्या कॅ ाबुक प्रत द्यावी) सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या

अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 27.01.2010 रोजी माहे एप्रिल ,मे1986 मधील रोकडवहीच्या झेरॉक्स प्रति आपणास या कार्यालयाचे पत्र क्र.33/प्र.लि./09 दिनांक 02. 01.2010 अन्वये पुरविण्यात आली आहे. माहे मे 1986 च्या रोकडवही रु. 5422.65 च्या अन्वये आपले नांव प्रलंबित आहे असे स्पश्ट दिसून येत आहे.अ ी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपिलकता यांनी दि. 11.02.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. त्याप्रमाणे दि. 19.03.2010 रोजी आपण कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष हजर राहून अभिलेख अभिकर्ता यांचे पाहणीकरीता उपलब्ध करुन द्यावी व आपणास ज्या अभिलेखाची आव यकता आहे त्याच अभिलेख्याच्या छायांकित प्रती विनामुल्य पुरविण्यात याव्या असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांचे विरुध्द खोटे आरोप लावून रक्कम प्रलंबित आहे असे दाखवून त्यांना बडतर्फ करण्यात आले होते. व त्याकरीता त्यांनी संबंधित माहिती मागितली आहे परंतू त्यांना ती उपलब्ध करुन दिली जात नाही. मॅट मध्ये सुध्दा कागदपत्रे दाखल करीत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की चौकशीच्या संदर्भामध्ये माहितीच्या अधिकारामध्ये कोणतीही तक्रार करता येत नाही. तसेच अपिलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलकर्ता यांनी सदरच्या अर्जात सरपंचाकडून माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केली आहे परंतु अशा प्रकारची मागणी करता येत नाही असा प्रथम अपिलात निर्णय दिला आहे. त्याहीपेक्षा अपिलकर्ता यांनी कार्यालयात त्यांच्या संबंधी उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची पाहणी करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश प्रथम अपिलात दिले आहे. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी पाहणी करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आव यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या प्रकरणातील चौकशी करता येत नाही. व त्यामुळे निरिक्षणाअंतीच माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे अपिलकर्ता यांना कळून येईल. मात्र त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून प्रथत अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अभिलेखाचे निरीक्षण करण्याकरीता जन माहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10दिवसाचे आत लेखी कामकाजाच्या दिव ाीची तारीख व वेळ कळवावी व त्या दिवशी उपस्थित राहून आव यक असतील त्या कागदपत्राची छायांकीत प्रत विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.नाग./378/2009**

1. श्री सुनील नथ्थुजी अंबागडे – अपिलकर्ता
1068, वै ााली नगर, सिमेंट रोड, पी.ओ.
आंबेडकर मार्ग, नागपूर–17.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, – उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कार्यालय,
जुने सचिवालय, नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (स्थापत्य) विभाग क्र. 1
सदर, नागपूर

**(आदेश पारित दिनांक 29/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 12.04.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 16.04.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 29.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे श्री डहाके सहाय्यक अधिक्षक, हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 4.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. विद्युत निरिक्षक यांचे कार्यालय, निरिक्षण विभाग, उद्योग उर्जा व कामगार खाते, बंगला क्र. 39/1, सा.बां. परिसर, लेडीज क्लब समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर या भाासकिय कार्यालयीन ईमारतीमधील आस्थापना भााखेच्या केलेल्या डागडुजी प्रकरणाच्या व इतर कामाच्या माहितीबाबत. सदर माहितीचा कालावधी नोव्हेंबर 2009 ते 04.01.2010 असा आहे. अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 15.01.2010 रोजी आपण मागितलेली माहिती अति ाय विस्तृत स्वरुपाची आहे. माहिती अंतर्गत आव यक माहिती कार्यालयात आहे. ती माहिती रकान्यात भरुन देता येणार नाही. कार्यालयीन वेळेत येवून आपणास आव यक असलेल्या दस्तऐवजांची पाहणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलकर्ता यांनी दिनांक 08.02.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 15.03.2010 रोजी देण्यात आला असून आपण भाासकिय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1, नागपूर यांना पुन्हा वेगळा अर्ज करुन नेमकी विविक्षित माहिती जसे कामाचे अंदाजपत्रक / करारनामा / देयक/ मोजमाप पुस्तक यांची सरळ मागणी केल्यास त ाी माहिती अनुज्ञेय भाुल्क आकारुन

आपणास पुरविण्याबाबत भाासकिय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क. 1 नागपूर, यांना आदेि ात करण्यात येत आहे. सदरच्या निर्णयाप्रमाणे अपिलकर्ता यांनी दिनांक 19.03.2010 रोजी नवीन स्वतंत्र अर्ज केला. त्याप्रमाणे दिनांक 26.03.2010 रोजी रु. 12/– अपेक्षीत खर्चाबरोबर कळविण्यात आले. परंतू अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निद ।नास आणले की अपिलकर्ता यांना अतिरिक्त खर्चाची मागणी केलेली होती व त्यांनी भरणा न केल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपीलकर्ता यांना पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतू जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठविल्याचे आयोगाचे निद ।नास आणले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच इतरही माहितीची त्यांना आव यकता असली तर त्यांनी संबंधित अभिलेख्याचे निरीक्षण करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांचे अपील हे अं ातः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्यात यावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी तसेच संबंधित अभिलेख्याचे निरिक्षण करावे. व त्यातून आव यक असतील त्या कागदपत्राची छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.अम. / 1502 / 2009**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री काशिनाथ चिंतामण बेलखेडे,<br>रा.डोल्हारी ( ंद्री)<br>ता. दारव्हा जि. यवतमाळ | – | अपिलकर्ता |
| 2. | जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती दारव्हा<br>ता दारव्हा जि. यवतमाळ | – | उत्तरवादी. |

**(आदेश पारित दिनांक 29 / 04 / 2010)**

**निर्णय**

1 अपिलकर्ता यांनी दिनांक 20.02.2009 रोजी राज्य माहिती आयोग अमरावती यााचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. हे अपील राज्य माहिती आयोग नागपूर खंडपीठ, नागपूर यांचेकडे दिनांक 24.12.2009 रोजी वर्ग करण्यात आले आहे त्यानंतर अपिलकर्ता व उत्तरवादी यांना दिनांक 30.03.2010रोजी नोटीस काढून दिनांक 29.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपिलकर्ता हजर आहे व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री मोहम्मद सलीम भोख गटशिक्षणाधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 09.01.2009 व दि. 13.02.2009 च्या अर्जा प्रमाणे जन माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय दारव्हा यांचेकडे दारव्हा तालुक्यातील संपूर्ण चालू स्थलांतरीत हंगामी निवासी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची यादी मुख्याध्यापकांची यादी, केंद्र प्रमुखांची यादी, विस्तार अधिकारी यांची यादी, विशय तज्ञांची यादी व संबंधित ग्रामशिक्षण समित्यांची माहिती व समित्यांचा ठराव अशी माहिती मागितलेली दिसून येते. दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरची माहिती अतिशिघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 20.02.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरचे प्रथम अपील मुख्य आयुक्त, अमरावती यांचेकडे दाखल केले. दिनांक 13.02.2009 चा अर्ज आयुक्त, अमरावती यांचेकडे दाखल केला व त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. आज आयोगापुढे जन माहिती अधिकारी म्हणून गट शिक्षणाधिकारी हे हजर झालेले आहे. आयोगापूढे त्यांनी असे सांगितले की अपिलार्थी हा वारंवार एकाच विशयावर कार्यालयामध्ये माहिती मागतात. दिनांक 09.01.2009 च्या पत्रात मागितलेली माहिती त्यांनी यापूर्वी दिनांक 18.11.2008, 15.12.2008 व दि. 26.12.2008 च्या पत्रान्वये मागितली होती ती त्यांना पुरविण्यात आली. पुरविण्यात आलेल्या माहितीच्या पोच उपलब्ध आहेत. दिनांक 15.12.2008 च्या अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 1.01.2009 रोजी माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा खर्च रु. 500/- भरावा असे त्यांना कळविण्यात आलेले होते. दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र दाखल केले असले तरी त्यांचे स्वस्त धान्य दुकान आहे. व त्यामुळे त्यांना अतिरिक्त खर्चाची माहिती कळविण्यात आली होती. पुर्वी त्यांना माहिती दिलेली आहे आज आयोगापुढे जी नस्ती आहे त्या नस्तीमध्ये अपिलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक 13.02.2009 रोजी आयुक्त, अमरावती यांचेकडे केले आहे. यावरुन अपीलकर्ता हे स्वतःकरीता माहिती मागत नसून दुस-या करीता माहिती मागत आहे व दारीद्रय रेशेखालील असून सुध्दा प्रत्येक अर्जाला तिकिटे लावत आहे. याचा अर्थ अपिलकर्ता हा एकाच माहिती करीता खर्च करु भाकतो असे दिसते. व त्यामुळे गट विकास अधिकारी तालुका दारव्हा पंचायत समिती जिल्हा यवतमाळ यांनी अपिलकर्ता हे खरोखरच दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र धारण करण्यास पात्र आहे किंवा नाही याबाबतची चौकशी करुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती दारव्हा यांना कळवावे. व दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र धारण करण्यास पात्र असल्यास किंवा त्यांना ते प्रमाणपत्र दिले आहे ते योग्य असल्यास अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी गट शिक्षणाधिकारी यांना आदेश देण्यात यावे.

सदरचा निर्णय हा गट विकास अधिकारी पंचायत समिती दारव्हा जिल्हा यवतमाळ यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.नाग./298/2010**

1. श्री गंगाधर गणपतराव चित्रीव व इतर — अपिलकर्ता
   रा.जिल्हा परिशद कॉलनी, गणे ापुर
   ता.जि. भंडारा.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी — उत्तरवादी
   पंचायत समिती भंडारा
   ता.जि. भंडारा.

3. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
   ग्राम पंचायत गणेशपुर
   ता.जि. भंडारा

**(आदेश पारित दिनांक 30/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 15.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 30.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 24.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांचेकडे ग्रामपंचायतीने आकारणी केलेला मकान कर कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.ग्रामपंचायतीने आकारणी केलेला मकान कर कमी करणे /भेदभाव पुर्वक केलेली आकारणी संबंधाने झालेला अन्याय दुर करणे व आज पर्यंत या संबंधाने केलेल्या कार्यवाहीची माहिती देणे व कार्यवाही कां केली नाही याची कारणे देणे. व या संबंधाने ज्या ज्या लोकांवर अन्याय झाला त्यांचेवरील अन्याय दुर करणे इत्यादी सन 2002 ते 2009 सर्व विनंती अर्जाचे अवलोकन व्हावे अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 15.12.2009 रोजी माहिती काय पाहिजे याचा नेमका बोध होत नसल्याने आपण दिनांक 18.12.2009 ला सकाळी 11.00 वाजता ग्रामपंचायत कार्यालय गणे ापूर येथे हजर रहावे व आपल्याला कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेता येईल असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे

दिनांक 28.12.2009 रोजी अपिलकर्ता यांना कर आकारणी संबंधाने जी. आर. ची प्रत पुरविण्यात आलेली आहे. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 20.01.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 26.03. 2010 रोजी देण्यात आला असून तत्पुर्वीच अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली ती दिनांक 8.04.2010 ला उपलब्ध झाली असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. तसे लेखी सुध्दा दिलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.नाग./299/2010</u>**

1. श्री अशोक नानाजी हिवरकर — अपिलकर्ता
   मु.निलजई पो. पांझूर्णी
   ता. वरोरा जि. चंद्रपूर.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी — उत्तरवादी
   वरोरा.
   ता. वरोरा जि. चंद्रपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
   तहसिल कार्यालय वरोरा
   ता. वरोरा जि. चंद्रपूर.

**(आदेश पारित दिनांक 30/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 12.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 30.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्रीमती पी.के. कुमरे ना. तहसिलदार हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 13.02.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय वरोरा यांचेकडे सोयाबीन पिकावरील लश्करी अळीचे पैसे अर्जदारास मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 27.02.2009 रोजी सोयाबिन पिकावरील लश्करी अळीचे पैसे अर्जदारास मिळण्याबाबत या कार्यालयास अर्ज सादर केला परंतू लश्करी अळीचे पैसे वाटपाची कार्यवाही ही तालुका कृशी अधिकारी वरोरा यांचे कार्यालयामार्फत सुरु असुन आपण आपल्या अर्जाचे संबंधात तालुका कृशी अधिकारी वरोरा यांचे ाी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपिलकर्ता यांनी दिनांक 17.03.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. याच दिनांकास मागणी केलेली माहिती संबंधित भााखेकडून प्राप्त झालेली असून सदरहू माहितीचे अनुशंगाने आव यक फी रक्कम रु. 6 जमा करावी व

माहिती घेवून जावी असे तहसिलदार वरोरा यांनी कळविलेले दिसते. प्रथम अपिलाचा निर्णय दिनांक 6.04.2009 रोजी देण्यात आला असून अपिलकर्ता व उत्तरवादी दोघेही सुनावणीस उपस्थित न झाल्याने प्रथम अपील निकाली काढण्यात आले आहे असे दिसते. माहिती न मिळाल्याने अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.उत्तरवादी यांनाच कलम 19(5) प्रमाणे माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करावे लागते. अपिलकर्ता हजर नसला तरी अपील खारीज करण्याचे कारण नाही. उत्तरवादी हजर नसल्यास पुढील तारीख देऊन निर्णय देणे आव यक आहेत.

3. नायब तहसिलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की लश्करी अळीचे संदर्भात नुकसान भरपाई अर्जदारास मिळते. अर्जदार हे वाहीतीचे असुन सुध्दा ती त्यांना मिळत नाही असा भाासन निर्णय मिळालेला आहे. व त्यामुळे माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.नाग./303/2010</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री राजकुमार रामदास जगने<br>संत रविदास वार्ड क्र. 5,तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया–441911. | – | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा<br>खंड विकास अधिकारी (उ.श्रे.)<br>पंचायत समिती तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया. | – | उत्तरवादी |
| 3 | जन माहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत चिरेखनी<br>ता. तिरोडा जि. गोंदिया. | | |

**(आदेश पारित दिनांक 30/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 19.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 30.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांच्या तर्फे ॲड. श्रीखंडे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव सरपंच ग्राम पंचायत यांचेकडे 4 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी हा 2008 ते 2009 आहे. दिनांक 21.01.2010 रोजी पुन्हा बी.पी. एल. चे प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे विना ुल्क माहिती पुरविता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ताने मागविलेली माहिती रु. 1168/– ची होते. बी.पी. एल.कुटुंबास 300 रु. पर्यंत माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी असा ग्रामपंचायतचा दिनांक 4.02.2009 चा ठराव असल्यामुळे आपण उर्वरीत माहिती पाहण्यासाठी उपस्थित राहावे असे दिनांक 15.02.2010 च्या पत्रान्वये पुन्हा कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपिलकर्ता यांनी दिनांक 24.02.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

अधिकारी यांनी, सुध्दा माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्त्याच्या मुद्या ी संबंधीत आव यक माहितीच्या झेरॉक्स प्रती दिनांक 18.03.2010 पर्यंत देण्याचा प्रयत्न करावा व इतर माहिती कार्यालयीन वेळेत जावून पाहून घ्यावी असे आदेश दिनांक 11. 03.2010 रोजी पारित केले असे कळविण्यात आले. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांचे तर्फे ॲड. एम. एस. लोखंडे यांनी युक्तीवाद केला व दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्र धारकास निः ुल्क माहिती मिळावी असा युक्तीवाद केला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ग्रामसभेच्या क्षेत्रामध्ये अनेक बी.पी.एल. धारक असतात व अनेक बी.पी. एल. धारक हे व्यापक प्रमाणात माहिती मागत असतात. ग्रामपंचायतमध्ये झेरॉक्स म ीन नाही. त्यामध्ये संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास छायांकित प्रती काढण्याकरीता निधी ग्रामपंचायतकडे उपलब्ध नसतो. उपलब्ध निधी खर्च केल्यास विकासाची कामे करता येणार नाही. व त्यामुळे ग्रामपंचायतीनेच निर्णय घेवून एका वर्शात एका बी.पी.एल धारक कुटुंबास 300 रु. पर्यंतची माहिती निः ुल्क उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही असा ठराव घेतलेला आहे. व त्यामुळे अपिलकर्ता यांना तसे कळविण्यात आले. सर्वच बी.पी.एल धारक विस्तृत प्रमाणात माहिती मागत असल्यामुळे व अधिनियमाच्या तरतुदीचे काटेकोर पालन केल्यास संपूर्ण ग्राम पंचायतीचा निधी हा त्याकरीता खर्ची पडेल असा युक्तीवाद केला हा युक्तीवाद योग्य असल्यामुळे अपिलकर्ता यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करावी तसेच अपीलकर्ता हे वकील लावू भाकतात तसेच त्यांचेकडे दूरध्वनी आहे. असे असल्यामुळे गट विकास अधिकारी यांनी अपिलकर्ता दारीद्रय रेशेखाली आहे किंवा कसे याची चौक ी करणे संयुक्तिक राहिल. व चौक ी अंतीच अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**आदश**

1. अपिलकर्ता यांच्या दारीद्रय रेशेखालील प्रमाणपत्रांच्या संदर्भामध्ये गट विकास अधिकारी पंचायत समिती तिरोडा यांनी चौक ी करुन अपिलकर्ता हे दारीद्रयरेशेखालील प्रमाणपत्र धारण करण्यास पात्र असल्यास तसे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना कळविण्यात यावे. व त्यानंतर त्यांना ग्राम सभेच्या निर्णयाप्रमाणे माहिती देण्यात यावी.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.नाग./305/2010</u>**

1. श्री बी.एस. पाल — अपिलकर्ता
   जुना फुटाला चौपाटी जवळ, अमरावती रोड,
   ता.जि. नागपूर –33

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा — उत्तरवादी
   अतिरिक्त जिल्हाधिकारी,
   जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा
   अन्नधान्य वितरण अधिकारी क्र. 1
   नागपूर.

**(आदेश पारित दिनांक 30/04/2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 20.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 30.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 8.01.2010 रोजी जन माहिती अधिकारी शिधा पुरवठा विभाग यांचेकडे 4 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 3.02.2010 रोजी 108 पृश्ठाची माहिती व पोस्टाचा खर्च असे मिळून 425 रु. चालानाद्वारे भाासकीय कोशागारात भरण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर सात दिवसानी माहिती देण्यात येईल असेही कळविलेले आहे. परंतू अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा न करता प्रथम अपील दिनांक 9.02.2010 रोजी दाखल केले. व अपिलार्थीनी रु. 425/– चा भरणा केलेला नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना सदरचे पत्र दिनांक 08.02.2010 च्या नंतर मिळालेले आहे. व त्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरचे पत्र हे दिनांक 3.02.2010 रोजी तयार केले असून पोस्टामध्ये दिनांक 6.02.2010 रोजी टाकण्यात आले आहे. त्यामुळे विहित मुदतीतच पत्र अपिलकर्ता यांना पाठविण्यात आलेले आहे. तसेच अधिनियमाच्या कलम 7(3) प्रमाणे खर्चाचा भरणा करण्याची विनंतीचे पत्र व फी प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी हा त्या पोट कलमामध्ये विनिर्दिश्ट केलेल्या 30 दिवसाच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल अशी तरतूद आहे व त्यामुळे दिनांक 3.02.2010 पासून ते अपिलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी हा 30 दिवसातून वगळून मिळत असल्यामुळे अपिलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निर्णय योग्य आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपिल निकाली काढण्यात येते.
2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.नाग./306/2010</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री प्रभाकर जागे वरराव पाठक<br>165, सहकार नगर, खामला,नागपूर<br>ता. जि. नागपूर | — | अपिलकर्ता |
| 2. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा<br>उपप्रादेशिक परिवहन अधिकारी<br>गडचिरोली. | — | उत्तरवादी |
| 3. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी<br>ता.जि. गडचिरोली. | | |

**(आदेश पारित दिनांक 30/04/2010)**

## <u>निर्णय</u>

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 28.01.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 30.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 23.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी गडचिरोली यांचेकडे 12 ऑगस्ट 1992 पासून जी आई एस (GIS) व (Leave Encashment)बाबत माहिती मागितलेली दिसते. दिनांक 10.12.09 च्या पत्राान्वये माहे ऑगस्ट 1992 ला रु. 30/— (GIS) ची कपात करण्यात आली असून देयकाचे प्रमाणक क. 32, दिनांक 25/08/92, देयकाची (ग्रॉस) एकूण रक्कम रु. 1262/—, देयकाची नेट रु. 862/ होती. ऑगस्ट 92 मध्ये Leave Encashment ची रक्कम अदा करण्यात आल्याची नोंद वेतन देय नोंदणी पत्रकात दिसून येत नाही. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 02.02.2010 रोजी ग्रामीण प्रादेि ाक परिवहन अधिकारी नागपूर यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. सदरचे प्रथम अपील हे उपप्रादेि ाक परिवहन अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी गडचिरोली यांचेकडे दाखल करावे असे

दिनांक 09.02.2010 च्या पत्राान्वये त्यांना कळविण्यात आले. उपप्रादेशिक परीवहन कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक 9.04.2010 रोजी सुनावणी ठेवण्यात आली असल्याचे त्यांच्या दिनांक 29.03.2010 च्या पत्रान्वये कळविले. परंतु सुनावणीस  हजर न होता मागितलेली माहिती पाठवावी मी आपल्या कार्यालयात येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे त्यांच्या दिनांक 3.04.2010 च्या पत्रान्वये कळविल्याचे दिसते. त्यामुळे पुन्हा दिनांक 26.04.2010 रोजी किंवा त्यापुर्वी काय माहिती पाहिजे याबाबत सविस्तरपणे कळविण्यात यावे किंवा कार्यालयात भेटण्यास यावे असे दिनांक 9. 04.2010 रोजी पत्र दिलेले दिसून येते.  परंतू अपिलकर्ता दिनांक 26.04.2010 रोजीच्या सुनावणीस गैरहजर राहिले. व त्यामुळे दिनांक 26.04.2010 रोजी अपिलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात आले असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू अपिलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयापुर्वीच द्वितीय अपील या कार्यालयात दाखल केले.

3. अपिलकर्ता हे सेवानिवृत्त कर्मचारी दिसून येतात. परंतू त्यांनी माहितीचे अर्जामध्ये जी आय एस व लिव्ह एनकॅशमेन्ट या भाब्दापलीकडे From १२th August १९९२ या भाब्दापलीकडे काहीही लिहिलेले नाही. व त्यामुळेच अपिलकर्ता यांनी माहिती स्पश्ट मागितलेली नाही असे दिसून येते. आयोगापुढे सुध्दा मला GIS Leave Encashment चे पैसे पाहिजे या पलिकडे ते काहीही सांगत नाही. व अधिका—यावर मात्र मला पैसे देत नाहीत म्हणून आरोप करीत आहेत. परंतू 1992 ची  Leave Encashment एवढया उि ारा कां मागत आहे असे विचारले असता ते मी विसरुन गेलो असे त्यांनी आयोगापुढे सांगितले म्हणजे त्यांनी स्वतःची चुक असुन सुध्दा आज जे अधिकारी आहेत त्यांचेवर आरोप करीत आहेत. अर्जात सुध्दा माहितीचे काहीही वर्णन केलेले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस बोलाविले असता मला पैसे पाहिजे उपस्थित राहण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते.  त्यामुळे अपिलकर्ता यांनाच स्वतःच्या मागितलेल्या माहिती बाबत फारशी माहिती नाही असा निश्कर्श काढावा लागतो असे असले तरी अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात एकवेळ योग्य त्या कागदपत्रांची छाननी करुन माहिती उपलब्ध झाल्यास त्यांना कळविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे काय एकदा भाोध घेवून उपलब्ध झाल्यास त्यांना कळवावे.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.नाग./307/2010**

1. श्री नथ्थुजी संपतराव अंबादे – अपिलकर्ता
अम्बाडे ले–आऊट, प्लॉट नं. 2( ाहर बस स्थानक जवळ)
नारा रोड,नारा पो.–जरीपटका, नागपूर–14.

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा – उत्तरवादी
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

3. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (मुख्यालय)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

**(आदेश पारित दिनांक 30/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 22.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 30.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 5.12.2009 रोजी नागपूर सुधार प्रन्यास तथा माहिती अधिकारी यांचेकडे वर्श 2008 या कालावधीतील सिटी सर्व्हे नागपूरचे पत्र क्र. मौजा नारा/ बा.क्र. 564/2008 कार्या.न.मु.अ.क्र.2 नागपूर दिनांक 28.12.2008 प्रमाणे ख.क्र. 161 नारा पार्कमध्ये समाविश्ट आहे तरी त्याबद्दलची माहिती व नारा पार्कबद्दल माहिती केव्हा सुरु होणार म्हणून देणे. अशी सदरची माहिती मागितलेली आहे माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने दिनांक 22.12.2009 रोजी कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी आपण मागितलेली माहिती नारा पार्क केव्हा सुरु होणार आहे ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहिती अधिकार कायदा अंतर्गत अपेक्षित नाही. नारा पार्कसाठी जमीन उपलब्ध झाल्यावर त्याबाबत सद्या काहीही सांगता येणे भाक्य नाही याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू

अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक 15.02.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 15.03.2010 रोजी देण्यात आला असून अर्जदाराचा खसरा क्रमांक 161 पार्कच्या आरक्षणामध्ये बाधित आहे. या खस–यासह संपूर्ण पार्कमध्ये बाधित होणा–या क्षेत्राचा डी.पी.चा पार्ट नकाशा देण्याची मागणी अर्जदाराने केली. त्याप्रमाणे अर्जदारास नारा येथील पार्कमध्ये आरक्षित जागेचा नकाशा विनामुल्य देण्यात यावा असे आदेश देण्यात आले. परंतू तरीही अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपिलकर्ता यांनी सांगितले की माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अपील केलेले आहे. अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे वर्णन हे न वाचता येण्यासारखे दिलेले आहे. व त्यामुळेच अपिलकर्ता यांना भोवटचे वाक्य वाचून उत्तर दिलेले दिसून येते.प्रथम अपिलात सुध्दा अपिलार्थी उपस्थित होते. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची काळजी न घेता निर्णय पारित केलेला दिसून येतो. अपीलार्थीला त्याच वेळेस स्पश्टपणे काय माहिती पाहिजे यांची विचारणा केली असती तर त्याच वेळेस त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली असती. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी सुध्दा कोणत्याही अर्जाचे किंवा विशयाचे आकलन न करुन घेता निर्णय देत असतात व त्यामुळेच त्यांचे निर्णय हे निरर्थक असतात व त्यामुळेच अपिलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागतात. आयोगापुढे सुध्दा अपिलकर्ता यांना विचारले तेव्हा नारा पार्क संबंधी काय काय समाविश्ट होते व पार्क केव्हा सुरु होणार याची माहिती पाहिजे असे त्यांनी सांगितले त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की नारा पार्कच्या संदर्भामध्ये नस्तीची कागदपत्रे ही भोकडयानी आहेत. व त्यामुळे माहिती कोणत्या प्रकारची द्यावी याकरीता त्यांनी कार्यालयात येवून नस्तीचे अवलोकन करुन आव यक ती माहिती त्यांना घेता येईल असे त्यांनी सांगितले. परंतू ही सर्व कार्यवाही जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्याच वेळेस करता आली असती. ती त्यांनी केली नाही म्हणून अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास येत असून अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाचे दिव ाीची तारीख व वेळ लेखी कळवून त्यांचेकडे उपस्थित व्हावे. व उपस्थित झाल्यानंतर नस्तीचे निरिक्षण करावे व आव यक असेल तेवढीच माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात उपलब्ध करुन विनामुल्य घ्यावी.जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा अपिलकर्ता यांना नारा पार्कच्या संदर्भातीलसंपूर्ण नस्ती निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावी व विनामुल्य छायाकिंतप्रती उपलब्ध करुन द्याव्या.

2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.नाग. / 309 / 2010</u>**

1. श्री विलास तुळशीरामजी देशभ्रतार — अपिलकर्ता
   द्वारा — श्री अ ोक नगरारे, रोड. क्र. 7 ,
   एल, चंद्रमणी नगर, नागपूर,
   ता. जि. नागपूर.—27

2. प्रथम अपीलीय अधिकारी तथा — उत्तरवादी
   सहाय्यक अभियंता,
   महाराश्ट्र राज्य विद्यूत वितरण कं.
   मर्या. जलालखेडा उपविभाग,
   ता. नरखेड, जि. नागपूर

3. जन माहिती अधिकारी तथा
   कनिश्ठ अभियंता
   महाराश्ट्र राज्य विद्युत वितरण कं.
   मर्यां. वितरण केंद्र भारसिंगी
   ता. नरखेड जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक 30 / 04 / 2010)**

**<u>निर्णय</u>**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 22.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 30.03.2010 रोजी नोटीस पाठवून दिनांक 30.04.2010 रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 29.09.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा भााखा अभियंता यांचेकडे दिनांक 22.05.2009 च्या संबंधाने केलेल्या चौक ी अहवालाची कार्यालयीन टिपणी बाबतचे श्रीमती लिलाबाई तुळ ीरामजी दे ाभ्रतार यांचे घरी विद्युत जोडणीपासून आजपर्यंत विद्युत देयकाची सत्यप्रत अ ी माहिती मागितलेली दिसून येते.सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता यांना दिनांक 29.10.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू

अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 27.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यापुर्वी अपिलकर्ता यांनी दिनांक 20.11.2009 रोजी माहिती घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे ती पोस्टानी पाठविण्यात आली. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 29.12.2009 रोजी देण्यात आला असून त्यामध्ये कागदपत्रे मिळाली असे अपिलकर्ता यांनी लिहून दिले असे असले तरी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांनी कागदपत्रे मिळाली असे प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

## आदेश

1. अपिलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क. 233/2010**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | श्री महादेव चंपतराव ठमेकर<br>दत्तमंदिर समोर,रामनगर, वर्धा<br>ता.जि. वर्धा | – | अपिलकर्ता |
| 2. | श्री द. वि. जोशी<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भुमी अभिलेख वर्धा. | – | उत्तरवादी |
| 3. | श्री एस.डी. मोरे<br>जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक,<br>भुमी अभिलेख,वर्धा<br>ता. जि. वर्धा | | |

**(आदेश पारित दिनांक 12/04/2010)**

**निर्णय**

1 अपीलकर्ता यांनी दिनांक 02.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.09 रोजी जन माहिती अधिकारी तालुका भुमी अभिलेख निरिक्षक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. **एक** (1) जमीन खरेदी झाल्यानंतर 7/12 मध्ये नोंदी घेणे व नंतर 2001 नंतर 7/12 मध्ये फेरफार करुन विकणा–याचे नावे नोंदविणे या बाबत दस्तऐवजांसह खुलासा निवेदन पाहिजे. (2) किस्त बंदी केल्यास किंवा आपले खात्यामार्फत मोजणी सर्वे झाल्यास मा.

तहसिलदार तथा तलाठी यांना पाठविलेल्या आदे ाच्या प्रमाणित झेरॉक्स प्रति पाहिजे. <u>**दोन**</u> माहितीचा कालावधी विक्रीपत्र 25.03.65 सन 83–84 व 86–87 7/12 मध्ये विकत घेतल्याबाबत नोंदी. सन 2001 चे 7/12 मध्ये नोंदी नाही. परंतु नंतर 2005 पासून 7/12 मध्ये विकणा–याचे व त्यांचे वारसदारांची नावे संख्या 10 द विून 30.11.09 चे 7/12 मध्ये नमुद आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दिनांक 17/12/09 रोजी नियमाप्रमाणे नक्कल फी भरुन माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक 29.01.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाचा निर्णय हा दिनांक 16.02.2010 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भुमी अभिलेख वर्धा यांनी मौजा ईटाळा, ता. वर्धा येथील बंदोबस्त सर्व्हे नं. 1 व पुनर्मोजणी सर्वे नं. 1 दोन्ही सर्वे नंबरचे नका ाची कारण पुर्ती नक्कल व पुनर्माजणी अभिलेख्यातील पुरवणी आकार जोडणी नक्कल अर्जदार यांना 15 दिवसात विनामोबदला देण्यात यावी असे दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापूढे सांगितले. परंतु अपिलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जी वारसानची 9 नावे त्याबाबत लेखी निवेदन तसेच मा. तहसिलदार यांना पाठविलेल्या आदे ाची प्रत प्रमाणित करुन पाहिजे व नसल्यास आपले खात्याकडून वरील कार्यवाही झाली नसल्याचे लेखी निवेदनाची खात्रीसह व तारीख शिक्क्यासह प्रत पाहिजे. तरी अपीलकर्ता यांचे समाधान झाले नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपिलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की जी नावे वारसानी आलेली आहेत ती कमी करण्यात यावी. परंतु माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याचे अधिकार आयोगास नाही. माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सर्व कागदपत्र उपलब्ध होवू भाकतात. व तशी ती त्यांना मिळालेली आहे. त्यामुळे महाराश्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 च्या तरतुदीप्रमाणे अपीलकर्ता यांनी सक्षम अधिकारी यांचेकडे अपील करणे आव यक राहिल. परंतु या प्रकरणी कागदपत्रे मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

1 अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते

2 अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. 242/2010</u>**

1. श्री वि वनाथ चिंतामण मेश्राम –
अपिलकर्ता
चंदननगर, प्लॉट क्र. 151,पो. हनुमाननगर,
नागपूर

2. श्री प्रकाश व–हाडे, – उत्तरवादी
प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त
नागपूर महानगर पालिका,नागपूर

3. श्री. व्ही. डी. पंचभाई,
जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक, आस्थापना
आरोग्य विभाग, महानगर पालिका, नागपूर

**(आदेश पारित दिनांक 12/04/2010)**

## <u>निर्णय</u>

1 अपीलकर्ता यांनी दिनांक 08.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 01.12.09 रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, नागपूर महानगर पालिका, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. स्वास्थ कनिश्ठ निरीक्षकांचे 1993 नोव्हेंबर पासून तर 03/10/1997 सेवानिवृत्ती काळापर्यंत कनिश्ठ स्वास्थ निरीक्षकांचे वेतन व तसे कारवाई करण्यास निर्णय देण्याचे आदे ा देण्यात आले आहेत. यानुसार दिनांक 22/05/2009 ला अर्ज देण्यात आला आहे, परंतु कार्यालयाने दखल घेतली नाही म्हणून माहितीच्या

अधिकारान्वये 2005 नुसार कनिश्ठ स्वास्थ निरिक्षकांचे मुळ वेतन महंगाई व्हिकल अलाउन्स, घरभाडे भत्ता, भाहर भत्ता उपदान पें ान, पें ान, पें ान वेतनात लागू केले गेले नाही व इतर भाासकिय मिळणारे फायदे काय़द्यान्वये देण्यात यावे असा आदे ा असतांना अर्जदारास अजूनपर्यंत उपरोक्त संबंधी काहीच कळविण्यात आलेले नाही व कनिश्ठ स्वास्थ निरीक्षकाचे पदोन्नत वेतन नि चत करण्यात आलेले नाही औद्योगीक न्यायालयाच्या आदे ाान्वये फरक देण्यात आला नाही. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दि. 01.01.2010 च्या पत्राप्रमाणे केस क्र. युएलपि 1493/1993 औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयावर विभागातर्फे पूढील प्र ाासकिय कार्यवाही सुरु आहे अ ाी माहिती दिलेली दिसून येते परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक 15.01.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय हा दिनांक 06.02.2010 रोजी देण्यात आलेला आहे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये प्र ाासकिय कार्यवाही म्हणजे नेमकी कोणती कारवाई सुरु आहे, ती माहिती त्यांना देण्यात यावी व त्यांच्या प्रकरणात जो निर्णय लागलेला आहे त्याचे फायदे त्यांना देण्यात यावे तसेच त्यांना हवे असल्यास त्यांचे नस्तीचे निरिक्षण कार्यालयीन वेळेत घेता येईल अथवा काही दस्ताऐवज त्यांना हवे असल्यास त्यांना देता येईल. असा निर्णय दिलेला आहे. तसेच त्यांच्या अर्जात कुठलीही वि ाश्ट दस्ताऐवज अथवा कागदपत्रांची मागणी केली नव्हती. त्यामुळे त्यांचे प्रकरणी नेमकी कुठली कारवाई सुरु आहे याबाबत त्यांना माहिती द्यावी. त्याप्रमाणे अपिलकर्ता यांना दिनांक 08.02.2010 च्या पत्राप्रमाणे नस्तीचे निरिक्षण घ्यावे व त्यानंतर आपल्याला माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले होते. त्याप्रमाणे त्यांनी नस्तीचे निरिक्षण घेतले व त्यासंबंधी कोणत्याही कागदपत्राची त्यांना आव यकता नाही असे त्यांनी दिनांक 17.02.2010 ला लेखी दिलेले आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, औद्योगिक न्यायाधिकरणाने त्यांना सर्व आर्थिक फायदे द्यावेत असे आदे ा दिलेले आहेत परंतु ते न दिल्यामुळे त्यांनी अर्ज दिले होते. व त्या अर्जाप्रमाणे सुध्दा आर्थिक फायदे दिले नाही म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागितली परंतु त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचे आर्थिक फायदे दिले नाही तसेच त्यांनी आरोग्य अधिकारी यांचेकडे माहिती मागितली होती. परंतू त्यांचा अर्ज हा आस्थापना भााखेकडे पाठविण्यात आला. त्यांचेकडे त्यांनी

माहिती मागितली होती.त्यामुळे जन माहिती अधिकारी हजर आहे असे समजावे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की महानगर पालिकेतील कोणत्याही कर्मचा–याची सेवा विशयक कार्यवाही ही आस्थापना भााखेतर्फे होते. त्यामुळे सदरचा माहितीचा अर्ज हा आस्थापना भााखेकडे वर्ग करण्यात आला होता. अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारची माहिती मागितलेली नाही त्यात फक्त त्यांच्या प्रकरणाच्या संदर्भात काय दडले एवढेच वर्णन केलेले आहे. व त्यामुळे त्यांना जे औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आर्थिक फायदे उपलब्ध करुन द्यावे ही अपेक्षा आहे. असे गृहित धरुन त्यांच्या प्रकरणावर प्र ाासकिय कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो कोणत्याही प्रकारची चौकशी न करता दिलेला दिसून येतो. प्र ाासकिय कार्यवाही काय सुरु आहे याबाबतची माहिती घेवून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देणे आव यक होते. परंतु फायदे द्यावेत असा निर्णय दिल्यामुळे व ते फायदे दिले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे विनाकारण त्यांना अपील दाखल करावे लागलेले आहे. हे प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीची माहिती नाही असे द ाविते. आयोगापुढे सुध्दा त्याच निर्णयाचा त्यांनी आग्रह धरलेला आहे. परंतु कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करुन मिळत नाही तर फक्त कागदपत्रे उपलब्ध होतात. एवढाच मर्यादित उद्दश हा माहिती अधिकार अधिनियम 2005 चा आहे. प्रथम अपिलाच्या निर्णयात नस्तीचे निरिक्षणाचा आदेश दिलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी नस्तीचे निरिक्षण केलेले असल्यामुळे व त्यातून कोणत्याही प्रकारची आव यकता नाही असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

आदेश

1. अपीलकर्ता यांनी नस्तीचे निरिक्षण घेतलेले असल्यामुळे व त्यातून कोणत्याही प्रकारची आव यकता नाही असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क. 239/2010**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री सैफ कमाल व मो. जाकीर अन्सारी<br>लकडगंज मस्जिद के पास, कामठी,<br>ता. कामठी, जि. नागपूर | – | अपिलकर्ता |
| 2. | श्री राऊत<br>जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक,<br>माध्यमिक शिक्षण जिल्हा परिशद,<br>नागपूर | – | उत्तरवादी |
| 3. | प्रथम अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिशद नागपूर. | | |

**(आदेश पारित दिनांक 12/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 08.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहे

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 14.12.09 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिशद नागपूर यांचेकडे माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने दि. 16.12.09 रोजी

मागितलेली माहिती हि शाळा स्तरावरची असल्यामुळे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे आपण मुख्याध्यापक, हाजियानी खातीजाबाई गर्ल्स स्कुल, कामठी यांचेकडे रीतसर अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 30.01.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक 23.02.2010 भाासकिय माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांना माहिती दयावी असे पत्र दिले व प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, कोणत्याही शिक्षकाची नियुक्ती ही संस्था करते व संस्थेनी मुलाखत घेतांना मुळ कागदपत्रे ही संस्थेकडेच असतात. किंवा मुख्याध्यापक यांचेकडे उपलब्ध असतात व त्यामुळे तसेच पत्र मुख्याध्यापक यांना दिलेले आहे. शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयामध्ये नस्ती मान्यतेसाठी दिलेली दिसून येते व परत पाठविले जाते. कोणतेही कागदपत्रे ठेवून घेतली जात नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना भााळा स्तरावरची माहिती भााळेतच उपलब्ध होईल असे त्यांनी सांगितले. परंतु मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आव यक होते कारण जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांना आदश दिलेले आहेत म्हणजे त्यांचे सहाय्य घेतले आहे. व त्यामुळे सदरच्या प्रकरणी मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी अधिनियमाच्या कलम 5 (5)प्रमाणे आहे. व मुख्याध्यापकांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी प्र ाासकिय कार्यवाही करणे आव यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1. अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांनी भाासकिय माहिती अधिकारी तथा अधिक्षक शिक्षण विभाग (माध्य.) जि.प. नागपूर यांचे आदे ााचे पालन केलेले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिक्षणधिकारी (माध्य.) प्रशासकिय कार्यवाही करावी अन्यथा जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी (माध्य.) हे भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2. तसेच अपिलकर्ता यांना दिनांक 23.02.2010 च्या आदे ाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन पुरविण्यात यावी.

3. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क. 232/2010**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री य शवंत नामदेवराव झाडे,<br>पोद्दार बगीचा, वार्ड क.34 वर्धा,<br>ता.जि. वर्धा. | – | अपिलकर्ता |
| 2. | श्री अनिल वाळके,<br>जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>समाज कल्याण विभाग जिल्हापरिशद कार्यालय<br>ता. जि. वर्धा | – | उत्तरवादी |
| 3. | श्री नरेंद्र निमगडे<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>समाज कल्याण अधिकारी<br>ता.जि. वर्धा. | | |

**(आदेश पारित दिनांक 12/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 03.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहे व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा परिशद समाज कल्याण कार्यालय वर्धा यांचेकडे राजीव गांधी मुक बधीर विद्यालय, पुलगाव या भााळेचे कर्मचारी भरती प्रकरणाबाबत एकूण 3 मुद्यांमध्ये माहितीच्या

अधिकारात दिनांक 18.12.09 च्या अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपीलकर्ता यांना दिनांक 27.01.2010 रोजी सदर बाबतची नस्ती अंतीम कारवाई करीता अन्य विभागास चौकशी अहवाला – सह सादर केली असल्याचे त्यांचेकडून नस्ती प्राप्त होताच आपणास अहवाल नियमानुसार देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 22.01.2010 रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या अनुशंगाने दिनांक 17.02. 2010 रोजी भााळेचे चौकशी समितीच्या अहवालावर अंतीम कारवाई व्हावयाची असल्याने सन्माननिय समाज कल्याण अधिकारी महोदयांनी कार्यवाही प्रलंबित असल्याने माहिती देता येणार नाही असे टिपणीत नमुद केले आहे. तरी सदरील माहिती सद्याच आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या प्रकरणात वेगळी टिपणी दाखल झाली आहे त्या टिपणीमध्ये राजीव गांधी मुक बधीर विद्यालय, पुलगाव, जिल्हा वर्धा यांचे चौकशी अहवालाची प्रत नस्ती गहाळ झाल्याबाबतची माहिती मागितलेली आहे असे दिसून येते. व त्यावरच माहिती पुरविता येणार नाही असेही दिलेले दिसून येते. यावरुन नस्ती गहाळ झालेली आहे किंवा चौकशी अहवालात अंतिम कार्यवाहीसाठी प्रलंबित आहे याबाबतची स्पश्टता येत नाही. चौकशी अहवालाची नस्ती गहाळ झाली असल्यास समाज कल्याण अधिकारी यांनी संबंधित पोलिस स्टे ानकडे FIR दाखल करणे संयुक्तिक राहिल. तसेच कार्यवाही पुर्ण झाल्यावर अपीलकर्ता यांना संबंधित चौक ी अहवालाची प्रत व त्यावरील निर्णय ही माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता पुन्हा अपिलकर्ता यांना अर्ज सादर करण्याची आव यकता नाही. व त्यामुळे अपिलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

1 अपिलकर्ता यांचे अपिल हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी यांनी चौकशी अहवालावर कार्यवाही पुर्ण झाल्यावर संपूर्ण माहिती अपिलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे भाास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2. सदरची चौकशी अहवालाची नस्ती गहाळ झालेली असल्यास समाज कल्याण अधिकारी यांनी संबंधित पोलिस स्टेशनकडे एफ.आय.आर. दाखल करावे व त्याबाबतची माहिती अपिलकर्ता यांना कळवावे.

3. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)
**आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19 (3) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. 235/2010**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री संदिप वेंकटय्या रांचर्लावार<br>संजिवनी मेडीकल स्टोअर्स,<br>पो.ता. सिरोंचा जि. गडचिरोली | – | अपिलकर्ता |
| 2. | जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती, सिरोंचा<br>ता. सिरोंचा जि. गडचिरोली. | – | उत्तरवादी |
| 3 | श्री एस. प्र. मांडवगडे<br>अधिक्षक शिक्षण (प्राथ.)विभाग<br>ता. सिरोंचा जि. गडचिरोली | | |

**(आदेश पारित दिनांक 12/04/2010)**

**निर्णय**

1. अपीलकर्ता यांनी दिनांक 06.03.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 10.03.2010 रोजी नोटीस काढून दिनांक 12.04.2010 रोजी अपिलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत युपीसीने (Under Certificate Of Posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या वतीने अधिक्षक शिक्षण (प्राथ.) विभाग हे हजर आहेत.

2. अपिलकर्ता यांनी दिनांक 16.11.09 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांचेकडे श्री एस. एम. चुक्कावार यांच्या सेवापुस्तक वहिवर नोंद केलेली सेवा पुस्तकाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुशंगाने अपिलकर्ता

यांना दिनांक 09.04.2010 रोजी एस.एम. चुक्कावार प्राथमिक शिक्षक यांचे मुळ सेवा पुस्तकातील नोंदीच्या झेराक्स प्रति 18 नग याद्वारे पुरविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी दिनांक 02.01.2010 रोजी पैशाचा भरणा करण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपिलकर्ता यांनी पैशाचा भरणा केलेला नाही. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपिलकर्ता यांनी दिनांक 18.12.09 रोजी प्रथम अपिल दाखल केले त्याप्रमाणे दि. 02.01.2010 रोजी अतिरिक्त माहितीकरीता रु. 15/- चा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता आज गैरहजर आहेत व त्यामुळे झालेल्या पत्रव्यवहाराची माहिती हि दाखल केलेली दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी काही पत्रव्यवहार केलेला आहे. त्यातून दिनांक 09.04.2010 रोजी अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असे आयोगाचे निद ानास आले. याचा अर्थ आयोगापुढे अपीलाची सुनावनीची नोटीस दिनांक 10.03.2010 रोजी निर्गमित केल्यानंतर अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया वेगाने सुरु झाल्याचे दिसून येते. अपिलकर्ता यांच्या दिनांक 16.11.09 च्या अर्जाप्रमाणे दखल घेतलेले नसल्यामुळे तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा गटि ाक्षणाधिकारी, पंचायत समिती, सिरोंचा यांचे विरुध्द रु. 500/- ची भाास्ती लादणे आव यक आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही किंवा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्र ाासकिय कार्यवाही करणे आव यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपिल मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

1 अपिलकर्ता यांचे अपिल हे मंजूर करण्यात येत असून अपिलकर्ता यांच्या दिनांक 16.11.09 च्या अर्जाप्रमाणे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी किंवा संबंधित लिपिक यांचे पैकी ज्यांनी सदरच्या अर्जाची दखल घेतलेली नसेल त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन अधिनियमाचे कलम 20 (1)अन्वये रु. 500/– ची भाास्ती लादण्यात येते सदरची भाास्तीची वसुली ही संबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन वसुली करण्यात यावी व "लेखाशिर्श 0070– इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा,800, इतर जमा रक्कमा, (18)माहितीचा अधिकार (0070–016–1)"या लेखाि र्शामध्ये जमा करण्यात यावी.

2. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपिलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात यावी.

3. सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिशद, गडचिरोली यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील)

**आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग,**

**खंडपीठ,**